**MAHIS 1.2M**

# एम. ए. इतिहास

## सत्र - I

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 नुसार सुधारित अभ्यासक्रम

## अभ्यासपत्रिका क्र. - II

# मध्ययुगीन भारताचा इतिहास (इ.स. १२०० - इ.स. १७००)

© UNIVERSITY OF MUMBAI

**प्राध्यापक रविन्द्र कुलकर्णी**
कुलगुरू
मुंबई विद्यापीठ, मुंबई

**प्राध्यापक (डॉ.) अजय भामरे**
प्र-कुलगुरू
मुंबई विद्यापीठ, मुंबई

**प्राध्यापक शिवाजी सरगर**
संचालक
दूरस्थ व ऑनलाईन शिक्षण केंद्र,
मुंबई विद्यापीठ, मुंबई

**कार्यक्रम समन्वयक** : **प्रा. अनिल बनकर**
सहयोगी प्राध्यापक, इतिहास विभाग व
प्रमुख, मानव्यविद्या शाखा,
दूरस्थ व ऑनलाईन शिक्षण केंद्र, मुंबई विद्यापीठ, मुंबई.

**अभ्यास समन्वयक व संपादक** : **प्रा. शिवदास चांगदेव घाडगे**
सहायक प्राध्यापक, इतिहास विभाग,
दूरस्थ व ऑनलाईन शिक्षण केंद्र, मुंबई विद्यापीठ, मुंबई.

**लेखक** : **डॉ. बी. डी. शिंदे (निवृत्त)**
विभागप्रमुख, इतिहास विभाग, महात्मा फुले कला,
वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, पनवेल, जि. रायगड.

: **प्रा. शिवदास चांगदेव घाडगे**
सहायक प्राध्यापक, इतिहास विभाग,
दूरस्थ व ऑनलाईन शिक्षण केंद्र, मुंबई विद्यापीठ, मुंबई.

**सुभाष गंगाराम शिंदे**
उप-प्राचार्य आणि विभाग प्रमुख, इतिहास विभाग,
व्हि.पी.एम. चे के.जी.जोशी कला महाविद्यालय आणि
एन.जी.बेडेकर वाणिज्य महाविद्यालय, ठाणे.

**डॉ. अजयकुमार लोखंडे**
सहाय्यक प्राध्यापक, इतिहास विभाग,
के. व्हि. पेंढारकर महाविद्यालय, डोंबिवली (पु.), जि. ठाणे.

**डॉ. जनार्दन कांबळे**
विभाग प्रमुख, इतिहास विभाग,
वसंतराव नाईक कला आणि वाणिज्य महाविद्यालय,
मुरुड जंजिरा, रायगड-४०२४०१

**डिसेंबर २०२४, मुद्रण - १** ISBN 978-93-6728-290-8

**प्रकाशक** : **संचालक, दूरस्थ व ऑनलाईन शिक्षण केंद्र.**
मुंबई विद्यापीठ, विद्यानगरी, मुंबई- ४०० ०९८.

**अक्षर जुळणी आणि मुद्रण**
मुंबई विद्यापीठ मुद्रणालय
विद्यानगरी, मुंबई

# अनुक्रमणिका


| घटक क्र. | नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १ | राज्याचे सिद्धांतः सुलतानशाही, मोगल, विजयनगर आणि मराठा | १ |
| २ | राजवटीचे स्वरूपः दिल्ली सुलतानशाही, मोगल, विजयनगर आणि मराठा | ९ |
| ३ | मनसबदारी पद्धत व वतन प्रणाली | १९ |
| ४ | इस्लामिक बौद्धिक परंपरा | २९ |
| ५ | मध्ययुगीन भारतातील जात, अस्पृश्यता, गुलाम प्रथा आणि वेठबिगारी | ३७ |
| ६ | मध्ययुगीन भारतातील शिक्षण व्यवस्था | ४९ |
| ७ | मध्ययुगीन भारतातील कला आणि स्थापत्य | ५९ |
| ८ | भक्ती चळवळ: उदय कारणे आणि परिणाम | ७१ |
| ९ | सुफी पंथ | ७९ |
| १० | अकबराचे धार्मिक धोरण | ८५ |
| ११ | मध्ययुगीन भारतातील महसूल प्रशासनातील प्रयोग आणि कर प्रणाली | ९५ |
| १२ | मध्ययुगीन भारतातील उद्योग, व्यापार व नागरीकरण | १११ |
| १३ | मध्ययुगीन भारतातील चलन व्यवस्था व पतपुरवठा (बँकिंग) प्रणाली | १२७ |

# एम. ए. इतिहास

## सत्र - I

## अभ्यासपत्रिका क्र. - पेपर - २

## मध्ययुगीन भारताचा इतिहास (इ.स. १२०० - इ.स. १७००)

**HISTORY OF MEDIEVAL INDIA (1200 CE – 1700 CE)**

# SYLLABUS

**Programme Name: M.A. Sem- I** | **Core Course I: 50211 -History of Medieval India (1200 CE to 1700 CE)**

**Total Credits: 04** | **Total Marks: 100**

**Semester End Assessment: 50** | **Internal Continuous Assessment:50**

**Course Outcome:**

a) To understand the medieval Indian Political development, Theories of State and nature of kingship.

b) To create a better understanding of the economic transformation in medieval India.

c) To enable students to understand the various facets of medieval Indian society.

**MODULE I: (2 Credits)**

**Unit 1: Medieval Indian Political Development**

a) Theories of State: Sultanate, Mughal, Vijayanagar and Marathas.

b) Nature of Kingship: Delhi Sultanate, Mughal, Vijayanagar and Marathas.

(c) Mansabdari System and Watan System

**Unit 2: Social and Cultural Developments**

a) Islamic Intellectual Traditions

b) Caste, Untouchability and Slave system, Bonded labour

c) Education, Art and Architecture Development

**MODULE II: (2 Credits)**

**Unit 3: Religious Movements**

(a) Bhakti Movement: Origin, Causes and effects

(b) Sufism

(c) Akbar's religious policy

**Unit 4: Economic Transformations**

(a) Experiments in Revenue system, Taxation System

(b) Development of Industries, Trade and Urbanization

(c) Monetary and Banking System

**References:**

Bakshi, S. R.,(ed*)., Advanced History of Medieval India: 712-1525* (Vol. 1), Anmol Publications, 1995.

Burton Stein, *New Cambridge History of India: Vijayanagara*, Part of The New Cambridge History of India, 2005.

Bhargava Meena, ed*., Exploring Medieval India, 16th to 18th Centuries, Culture, Gender, Regional Patterns,* 2 vols., Orient Black Swan, New Delhi, 2010.

Bolli Laxminarayan, *Krushnadevraya,* Mehta Publishing House, Pune (Marathi) Chandra Satish, History of Medieval India (800-1700, Orient Longman, 2007.

Chattopadhyaya B.D., *The Making of Early Medieval India*, 1994 Edward Sachau C., Alberuni's India, reprint, Rupa& Co., New Delhi, 2002.

Habibirfan, *Economic History of Medieval India, 1200-1500* (vol. VIII Part I), Centre for Studies in Civilisation, 2011.

Habib Irfan, *Essays in Indian History*, reprint, New Delhi, 1995.

Habib Irfan, Medival India, *The study of a Civilization*, National Book Trust, New Delhi, 2007.

Koch Ebba, *Mughal Art and Imperial Ideology*, Collected Essays, Delhi, 2001.

Moosvi Shireen, *The Economy of the Mughal Empire*, Oxford University Press, 1987.

Mukhia Harbans, ed*.,The Feudalism Debate*, New Delhi, 1999.

Muzaffar Alam and Subrahmanyam Sanjay*, Writing the Mughal World, Studies in Political Culture*, Orient Blackswan, New Delhi, 2010.

Muzaffar Alam and Subrahmanyam Sanjay,eds, *The Mughal State, 1526-1750*, Delhi, 1998.

Muzaffar Alam*, The Languages of Political Islam in India, c. 1200-1800*, Perma Black, New Delhi, 2004.

Nurul Hasan S., *Religion, State and Society in Medieval India*, ed. Satish Chandra, Delhi, 2008.

Pollock, Sheldon, *The Language of the Gods in the World of Men Sanskrit, Culture, and Power in Premodern India*, University Of California Press, London, 2006.

Rizvi S.A.A., *The Wonder that was India*, vol.II, reprint, Rupa& Co., New Delhi, 1997.

Tripathi R.P., *Some Aspects of Muslim Administration*, Allahabad, 1936.

# १

# राज्याचे सिद्धांतः सुलतानशाही, मोगल, विजयनगर आणि मराठा

**घटक रचना**


१.० उद्दीष्टे

१.१ प्रस्तावना

१.२ सुलतानशाही: राज्याचे कायदेशीर, राजकीय आणि सामाजिक स्वरूप

१.३ राज्याचे धार्मिक स्वरूप

१.४ मुघल काळातील राज्यासिद्धांत

१.५ विजयनगर साम्राज्यातील राज्यसिद्धांत

१.६ मराठा साम्राज्याचा राज्यसिद्धांत

१.७ सारांश

१.८ प्रश्न

१.९ संदर्भ


## १.० उद्दीष्टे

- सुलतानशाही आणि मुघल यांच्या राज्याचा सिद्धांत समजून घेणे
- विजयनगर व मराठा साम्राज्यातील राज्यांचा सिद्धांत समजून घेणे
- भारतातील मध्ययुगीन काळातल्या राज्यांचे सिद्धांत समजून घेणे.

## १.१ प्रस्तावना

कोणताही लेखी कायदा किंवा लिखित नीतीनियम नसतानाही दिल्ली सुलतानशाही मधील राज्य राजेशाहीचे अमर्यादित अधिकार आणि राज्यकर्त्यांच्या राजकीय व्यावहारिकतेनुसार चालत असे. सुलतानाच्या अधीन असलेल्या राज्यास एकाधिकार रचनाऐवजी एक प्रक्रिया म्हणून समजले जाणे आवश्यक आहे. तुर्क राज्यकर्ते म्हणून भारतात आले तेव्हा इस्लामी विचारसरणीचा किंवा राज्यासंदर्भातील विचारांच्या दृष्टीने राज्यकारभार होऊ लागला. एतद्देशीय दृष्टीकोन किंवा राज्यपरंपरा याचा प्रभाव ते पूर्णपणे हटवू शकले नाहीत. त्यांनी स्वत:च्या राजकीय व्यवहारात तत्कालीन परिस्थितीनुसार कारभार केल्याचे दिसते. त्यांचे राज्यकारभाराचे सिद्धांत पूर्णपणे इस्लामी नव्हते मात्र त्याच वेळी त्यांनी इस्लामी कायद्याच्या चौकटीत राहून शासन करण्याचा प्रयत्न केला.

## १.२ सुलतानशाही: राज्याचे कायदेशीर, राजकीय आणि सामाजिक स्वरूप

कायदेशीर दृष्टीकोनातून, कुतुबुद्दीन ऐबकच्या (१२०६) सत्तेच्या उदयानंतर आणि त्याच्या अस्त होईपर्यंत, दिल्ली सुलतानशाही ही स्वतंत्र संस्था होती. तथापि इल्तुतमिशने सर्व

राजकीय शक्तीचे एकत्रीकरण होईपर्यंत गझनीच्या राज्यकर्त्यांनी दिल्लीच्या सुलतानशाहीच्या प्रांतावर स्वतंत्रपणाचा दावा केला नाही. दिल्लीतील राज्यकर्ते उर्वरित इस्लामिक जगाशी त्यांचे संबंध राखण्यासाठी उत्सुक होते. त्याचीच एक पद्धत म्हणजे बगदाद येथील अब्बासीद खलीफा कडून औपचारिक मान्यतापत्र मिळणे. १२२९ मध्ये, इल्तुतमिश याने बगदादच्या खलीफाकडून भव्य वस्त्रासह औपचारिक मान्यतापत्र मिळवले. दिल्लीच्या काही सुल्तानांनी त्यांच्या नाण्यामध्ये खलीफाचे नाव कोरले होते आणि प्रार्थनाच्या वेळी त्याचे नाव खुतबामध्ये वाचण्यास सुरुवात केली. सुल्तानांनी स्वत:ला नासिरामिरुल-विश्वासू नेते, खलीफा किंवा खलीफा याला आपला नेता म्हणून मानलेले. असा युक्तिवाद केला जातो की दिल्लीचे सुल्तान हे खलिफाच्या अधीन झाले. तथापि, खलीफाचे नाव नाण्यांवर कोरणे किंवा त्याच्याकडून मान्यता घेणे या बाबी केवळ एका मोठ्या इस्लामी जगतासोबत आपले नाव जोडले जावे यादृष्टीतून होत्या. राजकीय दृष्टीने त्यांना फारसे महत्व नव्हते. भारतातील सुलतान पूर्ण स्वातंत्र्याने आणि त्यांच्या मर्जीनेच राज्यकारभार करत असत. खालीफाचा त्यांच्या राज्यावर कोणताही कायदेशीर अधिकार नव्हता.

खलीफाचे मान्यता पत्र  प्राप्त होण्यापूर्वी किंवा त्यांनतर देखील दिल्लीच्या सुलतानांच्या अनिर्बंध सत्तेबाबत कुणालाही शंका नव्हती. अलाउद्दीन खलजीचा उत्तराधिकारी मुबारक शहा यांनी खलिफासोबतची निष्ठा नाकारली आणि स्वत:ला इमाम किंवा खलीफा घोषित केले. खलीफाकडून  मान्यतापत्र मिळण्याचा प्रश्न एका धार्मिक अधिष्ठानाशी निगडीत होता. याने खलीफाच्या नेतृत्वात इस्लामिक जगाच्या ऐक्याच्या भावना टिकवून ठेवण्यास मदत केली. परंतु हे ऐक्य फार पूर्वी तुटलेले होते, अंशतः विविध धार्मिक पंथांच्या वाढीमुळे आणि काहीसे तुर्की व इतर साहसी लोकांच्या अधीन असलेल्या स्वतंत्र राज्यांची स्थापना झाल्यामुळे,तसेच मंगोलांच्या उदयामुळे ही एकता आणखी खंडित झाली.

**राजकीय स्वरूप**

इल्तुतमिशच्या कारकिर्दीत लिखाण करणारा भारतातील सर्वात पहिला मुस्लिम राजकीय विचारवंत फकर-ए-मुद्दबबीर म्हणतो: “दिवाण, शगीरद आणि मुहरीर (महसूल खाते) हे हुद्दे फक्त अहल-ए-कलाम (शिक्षित विभाग) यांनाच  दिली जावीत कि ज्यांचे पूर्वज राज्यकर्ते व अमीर यांची सेवा करीत होते.” फिरोज तुगलकांच्या सुरुवातीच्या काळात तुरूंगात असताना जियाउद्दीन बारानी याने राजकीय फितवा-ए-जहंदरी या पत्रिकेचे लेखन केले. त्याने घोडदौड, आणि इतर विणकाम, शिलाई-कलाकुसर, सुतारकाम, केस कर्तनालय याबाबत विपुल माहिती दिली आहे. मुहम्मद बिन तुगलक याला अनेक अंतर्गत बंडखोरांचा सामना करावा लागत असताना, त्याने कैरो येथे राहत असलेल्या अब्बासी खलीफाच्या वंशजांकडून १३४३ मधे मान्यतेचे पत्र मागितले होते. यापूर्वी त्यांनी नाण्यांवरून स्वतःचे नाव काढून खलिफाचे नाव ठेवले होते. परंतु या बाबींचा बंडखोरांच्या नेत्यांवर फारसा परिणाम झाला नाही. फिरूझ तुघलकाने खलिफाकडून दोन वेळा मान्यतेचे पत्र आणि सन्मानाचे वस्त्र मिळवले. परंतु काही काळाने अब्बासी खलीफाची प्रतिष्ठा हळूहळू कमी होत गेली.

तुर्कांच्या आगमनाने उत्तर भारतात एक नवीन प्रकारचे राज्य सुरू झाले. सुरुवातीच्या टप्प्यात लष्करी पुढा-यांना देशाच्या विविध भागात विजय मिळवण्यासाठी जास्तीत जास्त स्वातंत्र्य देण्यात आले होते, तेव्हा एक मजबूत सैन्य तुकडी सुलतानच्या थेट नियंत्रणाखाली कार्यरत होती. या प्रकारच्या विकेंद्रीकृत सत्ताकारणाची जागा बलबनने एका अत्यंत केंद्रीकृत राज्यात बदलली. उदाहरणार्थ, जलालुद्दीन खीलजीच्या कारकिर्दीत, दिल्ली सुलतानशाहीने १४ व्या शतकाच्या अखेरीपर्यंत केंद्रीय स्वरूप राखले. तुघलकांचे पतन झाल्यावर आणि लोदी सत्तेत आल्यानंतर, पुन्हा विकेंद्रित सत्तेच्या तत्त्वाचा प्रयोग करण्यात आला, ज्यात अफगाण सरदारांनी सत्तेत सर्वांचा समान वाटा असल्याचा दावा केला. १५२६ मध्ये पानिपतच्या मैदानात सुल्तान लोदी आणि बाबर यांच्यात तुंबळ युद्ध झाले. इब्राहिम लोदी याचा पराभव झाला व बाबराच्या अधिपत्याखाली मुघल साम्राज्याची स्थापना झाली.

१३ व्या आणि १४ व्या शतकादरम्यान दिली सुलतानशाहीच्या राज्याचे वेगळी वैशिष्ट्य होती. तुर्की लोकांचा भारतातील बहुतेक प्रजेशी कोणताही संपर्क नव्हता. तसेच बहुतेक तुर्कांना भारतातील परिस्थितीचे फारसे ज्ञान नव्हते किंवा त्यांचा भारताशी पूर्वी संबंध आलेला नव्हता. त्यामुळे त्यांनी शहरे आणि किल्ल्यांवर देशभर असलेल्या ग्रामीण भागांवर येथीलच नारीकांना पदे देऊन त्यांच्यावर नियंत्रण ठेवले. याच काळात सूफी संतांनी, विशेषकरुन चिस्ती परंपरेने नवीन शासक वर्ग आणि लोक यांच्यात संबंध स्थापित करण्यात महत्वाची भूमिका बजावली होती.

खिलजी राज्यकर्त्यांनी तुर्कीचे वर्चस्व धोरण समाप्त केले. त्यांनी तुर्क लोकांशी भेदभाव केला नव्हता, परंतु मुस्लिमांच्या विविध वर्गातील लोकांसाठी प्रशासनाची दारे खुली केली. अशाप्रकारे अल्लाउद्दीनचा वजीर नुसरत खान जलेसर आणि जफर खान हे दोघेही प्रसिद्ध योद्धा होते पण तुर्की नव्हते, तर भारतीय मुसलमान होते. आणखी एक तुर्क नसलेला व्यक्ती सत्तेवर आला, तो मलिक काफूर होता. तुर्क हे बाहेरून आल्यामुळे व येथे राज्य करायचे तर एतद्देशीय लोकांचे सहकार्य आवश्यक आहे हे लवकरच त्यांच्या ध्यानात आले.

## १.३ राज्याचे धार्मिक स्वरूप

दिल्ली सुलतानशाहीच्या स्थापनेची प्रक्रिया कुतुबुद्दीन ऐबकच्या १२०६ मध्ये सत्तेवर येण्यापासून सुरू झाली. तथापि, इल्तुतमिशच्या कारकीर्दीतच दिल्लीची सुलतानशाही राज्यकर्त्यांच्या नियंत्रणात पूर्णपणे नव्हती. इस्लामी विचारसरणीचा आणि परंपरेचा प्रभाव निश्चितपणे दिल्ली सुलतानशाहीच्या राज्यकर्त्यांवर पडला, परंतु सत्ताधारी वर्गामध्ये आणि प्रामुख्याने निर्णय घेण्याच्या प्रक्रियेवर आधारीत स्थानिक आव्हानांमध्ये भिन्न प्रबळ गटांना संतुलित ठेवण्याची गरज होती. सतीशचंद्र यांचे म्हणणे आहे की मध्ययुगीन राज्य एक ईश्वरशासित किंवा पूर्ण धार्मिक नव्हते कारण मौलवींनी स्पष्ट केलेले शरिया नियमांची सुल्तानांना फारशी चिंता करण्याची गरज नव्हती. ते औपचारिकरित्या मुस्लीम धर्माचे शासक होते पण पूर्णपणे इस्लामी कायद्यानुसार शासन यंत्रणा कार्य करू शकत नव्हती याची त्यांना जाणीव होती.

## १.३.१ उलेमांचा प्रभाव

राज्यातील, राजसत्ता व उलेमा यांची स्थिती आणि धर्मनिरपेक्ष सत्ताधा-यांशी असलेले हे संबंध इस्लामिक जगात सतत चर्चेचा विषय ठरला आहे. मक्का येथे पहिल्या चार खलिफांच्या राजवटीचा अंत झाल्यानंतर, आध्यात्मिक आणि धर्मनिरपेक्ष अधिकारात दुफळी निर्माण झाली. बहुतेक अग्रगण्य मौलवी मक्का येथे राहिले आणि राजकीय अधिकारांचे केंद्र उमायद खलिफा यांनी दमास्कसमध्ये हलवले. प्रेषित यांच्या वंशावळीचा दावा करणा-या अब्बासींनी बगदादवर राजकीय नियंत्रण हलवल्यामुळे त्यांच्या वतीने धार्मिक व राजकीय अधिकार पुन्हा एकत्रित करण्याचा प्रयत्न केला गेला. राजकीय घटकांवर बऱ्याचदा धार्मिक वर्चस्व होते. जरी हे ऐक्य मर्यादित असले तरी ९ व्या शतकाच्या अखेरीस अब्बासी खलिफाच्या राजवटीचे एककल्ली वर्चस्व संपुष्टात आले व संपूर्ण राजवटीचे तुकडे झाले आणि बहुतेक तुर्की सुलतानाच्या अधीन असलेल्या स्वतंत्र राज्यांचा उदय झाला.

नव्याने इस्लाम धर्मांतरित झालेल्या तुर्कांनी प्रस्थापित इस्लामी विचारवंताना आदराचे स्थान दिले परंतु राजकीय नियंत्रण मात्र आपल्या हातात ठेवले. उच्च राजकीय विषयांबद्दल सल्ला देण्याबद्दल मौलवी आणि खालच्या अधिका-यांविषयी आपल्या मताचे स्पष्टीकरण अल्लाउद्दीन खलजी याने दिल्लीचे कोतवाल अलाउल मुल्क याला दिले. त्याने अल्लाउद्दीनला मुत्सद्दी व इतर माध्यमांचा वापर करून मंगोलांसोबत वाटाघाटी करण्याचा सल्ला दिला मात्र अलाउद्दीनने हा सल्ला नाकारला आणि मंगोल लोकांविरूद्ध जोरदार उपाय केले. असा युक्तिवाद केला जातो की तुर्कांनी स्थापन केलेले राज्य धर्माधीष्टीत होते कारण ते मुस्लिम धर्मिय कायद्यावर आधारित होते, शरीयत, ज्याचा अर्थ केवळ उलेमाद्वारे करता येईल, अशा कायद्यावर ते आधारित होते, असेही सूचित केले गेले. असे म्हटले जाते की संघटित चर्चसारखी व्यवस्था नसल्याने मुस्लिम उलेमा राज्य करू शकत नव्हते आणि म्हणून मुस्लीम सुलतानशाही ईश्वरशासित राज्य होऊ शकत नव्हते. सर्वसाधारणपणे, भारतातील सुल्तानांनी उलेमाचा मान राखत असतांनाच, त्यांच्याशी सल्लामसलत करण्यास किंवा राज्याच्या बाबींचा विचार करता त्यांच्या मते स्वीकारण्याची तसदी दाखवली नाही. अशा प्रकारे इल्तुतमिशने त्याची मुलगी रझिया हिला आपला उत्तराधिकारी घोषित करण्यापूर्वी धर्मशास्त्रज्ञांशी सल्लामसलत केली नाही. बल्बन याने आपल्या दरबारात इस्लामपूर्व पर्शियन समारंभ सुरू केले, ज्यामध्ये सिज्दा आणि पायबोस याचा उल्लेख होऊ शकतो.

अलाउद्दीन याने धार्मिक बाबतील काझीचा सल्ला नाकारला आणि घोषित केले- “जरी मी कुराणाचा अभ्यास केलेला नाही, किंवा वेळेअभावी मी तो करू शकत नाही, तरी मी मुस्लिम आहे आणि मी राजा आहे. हजारो लोकांचा नाश होत असलेल्या बंडखोरी रोखण्यासाठी, राज्याच्या हिताचे आणि लोकांच्या हिताचे व्हावे अशी माझी इच्छा आहे. त्यामुळे मी असा अशा आदेश जारी करतो की जे लोक माझ्या आज्ञेकडे दुर्लक्ष करतात आणि माझ्या आज्ञांचे उल्लंघन करतात. त्यांना मी कठोर शासन करणार आहे. मग ते कोणीही असो. याबाबतील धर्म काय म्हणतो किंवा शरियत काय म्हणते हे मला माहिती नाही. मला हेदेखील माहित नाही की हे शरीयत नुसार काय योग्य आहे किंवा शरीयतच्या विरुद्ध आहे.

मला जे काही राज्याच्या भल्यासाठी चांगले वाटते असे वाटते ते मी करणार मग ईश्वराच्या न्यायनिवाड्याच्या दिवशी ईश्वर माझा कसा न्याय करेल त्याबाबत मी फिकीर करत नाही.

### १.३.२ हिंदूंची स्थिती

निष्ठा दर्शवणे आणि राज्यकर्त्याची सेवा करण्याव्यतिरिक्त हिंदूंनाही जिझिया कर देणेही आवश्यक होते. जिझियाची उत्पत्ती स्पष्ट नाही. काहींनी ग्रीस आणि इस्लामिकपूर्व इराणमधील आकारण्यात आलेला कर म्हणून पुढे तो बिगर मुस्लिमांना द्यावा लागणारा कर म्हणून त्याचे स्पष्टीकरण दिले आहे. बिगर मुस्लिमांना सैन्य सेवेतून वगळण्यासाठीच्या बदल्यात हा कर लागू असल्याचे देखील उल्लेख आहेत. तुर्की सुलतानांनी तेथील हिंदूंना जिझिया देण्याचा पर्याय दिला आणि त्यापैकी बऱ्याचांना नागरी कारभारात नोकरी दिली. दिल्ली सुलतानशाही मुस्लीम स्वरुपाची असली तरीही दिल्लीच्या साम्राज्याच्या अगदी मध्यभागीही हिंदू लोकसंख्येचा एक मोठा वर्ग राहत होता हेही लक्षात ठेवण्याची गरज आहे. ग्रामीण भागात मुकादम, चौधरी, राणा, ठाकूर इत्यादी, तसेच शहरांमध्ये व्यापार आणि वित्त तसेच वाहतुकीचा व्यापार (बंजारा) म्हणून वर्चस्व गाजवले. ग्रामीण भागातील हिंदूंच्या दैनंदिन जीवनात सुलतानशाहीने फार मोठ्या प्रमाणात परिणाम केला नाही कारण भारताचे क्षेत्रफळ मोठे होते व सुलतानशाहीचा राजकीय परिणाम दिल्ली व इतर सभोवतालच्या नागरी परिसरात जास्त प्रमाणात होता. एका मतानुसार सुलतानशाहीचा त्रास अशा लोकांना जास्त होत नव्हता कारण जोपर्यंत खेड्यांचा कर भरला तोपर्यंत त्याच्या ग्रामीण भागात फारसा हस्तक्षेप करण्याचे कारण नव्हते. खेड्यातून मुकादम, आणि इतर पारंपारिक अधिकाऱ्यांकडून हा कर वसूल करून मध्यवर्ती सत्तेकडे त्यांचा हिस्सा दिला जात असे.

तथापि केंद्रीकृत राज्यपद्धतीत राज्याचा प्रभाव वाढू लागला, अलाउद्दीन खलजी आणि मुहम्मद बिन तुगलक यांच्या कृषी धोरणांवरून हे दिसून आले. धर्माच्या बाबतीत बऱ्यापैकी स्वातंत्र्य दिले गेले होते अर्थात ते वैयक्तिक सुलतानच्या दृष्टिकोनावर अवलंबून होते. जलालुद्दीन खिलजीने यमुना नदीतील प्रतिमांचे विसर्जन करण्यासाठी हिंदूंनी राजवाड्याच्या बाहेर काढलेल्या मिरवणुकाचे निरीक्षण करून त्याची नोंद ठेवली आहे. मुहम्मद बिन तुगलक याने अगदी होळीसारख्या हिंदू उत्सवात भाग घेतला आणि हिंदू योगी व जैन संतांशी चर्चा केली होती. तत्कालीन राजकीय विचारवंतांनी राजेशाही हा सामाजिक अराजकतेचा बचाव करण्यासाठी एकमेव संरक्षण असल्याचे मानले. सर्वसाधारणपणे राजकीय विचारवंतांनी एका व्यक्तीच्या राजवटीला प्राधान्य दिले.

### १.३.४ अनियंत्रित हुकुमशाहीचे स्वरूप

झियाउद्दीन बरानी हा तत्कालीन इतिहासकार मूलत: धर्मवादी होता. त्याने अनेक राजवटीबद्दल विपुल लिखाण केलेले आहे. धर्मशिक्षणाद्वारे एकाधिकारशाही किंवा वैयक्तिक सत्तेचा गैरवापर करण्याच्या विरोधात धर्म हाच एकमेव मार्ग असल्याचे तो प्रतिपादन करत असे. तथापि राजकीय परिस्थिती पाहता त्याने देखील शरीयतचे उघडपणे उल्लंघन करणे याशिवाय अन्यायकारक शासकाविरूद्ध बंड करण्याचा अधिकार सामान्य जनतेला नसल्याचे उघड केले. मध्ययुगीन कालखंडात देशात कठोर शिक्षा देणे अपरिहार्य मानले गेले होते कारण मानवी अधिकार यासारख्या भावनांचा किंवा विचारंचा प्रसार व प्रचार

नव्हता. विशेषत बरानी असा विश्वास ठेवतो कि मनुष्य मूलतः मूर्ख व अज्ञानी असून त्यावर नियंत्रण ठेवायचे असेल व न्याय व सुव्यवस्था राखायची असेल तर शासकाद्वारे शिक्षा आणि कठोर दडपशाही केवळ अपरिहार्यच नव्हते तर आवश्यक देखील होती.

## १.४ मुघल काळातील राज्यसिद्धांत

मुघल राज्यकर्त्यांनी मध्य-आशियाई राजवटीचे अनेक नियम बऱ्याच प्रमाणात प्रकारे स्वीकारले होते. तुर्की आणि मंगोल दोघांच्या प्रभावांच्या तीव्रतेबद्दल वाद अस्तित्त्वात आहेत. काही विद्वानांचे मत आहे की मंगोल परंपरा प्रबळ आहे, तर इतरांचे म्हणणे आहे की तुर्की परंपरेचा प्रभाव इतका प्रबल होता की त्यामुळेच मुघलांची राज्य प्रणाली तुर्क-मंगोल म्हणून ओळखली जाऊ लागली. अकबराला मध्य आशियाई संबंध आणि परंपरा यांचा अभिमान होता. आशियाई आणि भारतीय परंपरा यांचे मिश्रण असलेले पर्शियन-इस्लामिक प्रभाव मुघल राजकारण आणि प्रशासनाच्या विविध क्षेत्रात दिसून येतो.

### बाबर आणि हुमायून

काही इतिहासकारांचे असे मत आहे की तिमुरी राजवटीचा प्रभाव मुघल राजवटीवर होता. अत्याधुनिकपणे राज्यकर्त्यांच्या पुत्रांमधील साम्राज्याचे विभाजन हे मंगोल राजाच्या राजवटीचे मुख्य तत्व होते. पण हुसेन मिर्झाच्या मृत्यूनंतर बाबरने ही संकल्पना कधीच मान्य केली नाही. त्याचप्रमाणे, त्याने आपल्या (लोकांसमवेत) सार्वभौमत्वाचे वाटप करण्याची कोणतीही कल्पना नाकारली. साम्राज्याच्या विभाजनाच्या तत्त्वाची बाबरच्या मृत्यू नंतर लवकरच चाचणी घेण्यात आली. हुमायूने आपले साम्राज्य त्याच्या भावांमध्ये विभागले परंतु ते अयशस्वी झाले. १५५६ मध्ये उश्तरग्रामच्या युद्धात अकबर आणि कामरानच्या एका मुलाला संयुक्तरीत्या सिंहासनावर बसविले गेले, परंतु हा अल्पकाळ आणीबाणीचा उपाय होता. बाबरने मात्र 'पदशाह' - एक तुर्की पदवी ही पदवी स्वीकारली होती. बाबरने सत्तेचे विभाजन कधीच स्वीकारले नाही. मोगलांनी राज्याला वैयक्तिक मालमत्ता मानली. अकबर अबुल फजल म्हणतो: "ईश्वराच्या दृष्टीने कोणत्याही सन्मानापेक्षा राजेशाही जास्त महत्वाची मानली जाते. सर्वंकष राजेशाही हा बंडखोरीच्या भावनेवर उपाय आहे." एक राजा म्हणूनच "स्थिरता आणि ताबा मिळवण्याचे मूळ" आहे. तो पुढे म्हणतो "राजेशाही हा देवाकडून उत्पन्न होणारा प्रकाश आणि सूर्यापासून एक किरण आहे.

अबुल फजल याने अकबरच्या वतीने सार्वभौमत्वाचा सिद्धांत मांडला आणि त्याच्या लिखाणात हे प्रतिबिंबित झाल्याचे दिसते. राजाला मानवांपेक्षा स्वतंत्र, दैवी ज्ञानाचा वरदहस्त आहे म्हणूनच, राजा कधीकधी ब-याच गोष्टींमध्ये सामंजस्य ठेवून त्याचे निरीक्षण करेल. सध्याच्या युगातील राजाच्या बाबतीतही अशीच परिस्थिती आहे. तो आता राष्ट्राचा आध्यात्मिक मार्गदर्शक आहे.

## १.५ विजयनगर साम्राज्यातील राज्याचे सिद्धांत

निळकंठ शास्त्री, ईश्वरी प्रसाद आणि व्हिन्सेंट स्मिथ सारख्या काही विद्वानांना असा विश्वास होता की विजयनगर राज्य एक लोकशाही राज्य नसले तरी लोकांच्या भावनांना महत्व दिले गेले. महालिंगमसारख्या विद्वानांचे म्हणणे आहे की ते एक पितृसत्तावादी राज्य होते आणि ते

लोकांच्या हितासाठीच होते. इतर विद्वानांचे म्हणणे आहे की विजयनगरच्या राज्यकर्त्यांनी अमर्यादित शक्ती वापरली नाही. मंत्री परिषद, रूढी आणि परंपरा यांनी एकत्रितपणे विजयनगर राज्यावर राजकीय व प्रशासकीय नियंत्रण केले. स्थानिक संस्थांबरोबरच राजाच्या सामर्थ्यावर नियंत्रण म्हणूनही त्यांनी काम केले.

### १.५.१ राज्याचे केंद्रीकरण

राज्याचे केंद्रीकृत व्यवस्थेवर शास्त्री आणि महालिंगम यांच्यासारख्या विद्वानांचे म्हणणे आहे की विजयनगर राजवटी ही एक केंद्रीकृत राजवट होती आणि राजाचे नायक आणि प्रांतीय राज्यपालांवर नियंत्रण होते. व्ही.एन. शास्त्रींनी राज्यातील केंद्रीकृत स्वरुपावर महालिंगम यांच्यापेक्षा अधिक जोर दिला. ते म्हणाले की, विजयनगर राज्य एक केंद्रीकृत नोकरशाही होते. हे मत पेस आणि नुनिझ या पोर्तुगीज प्रवाश्यांच्या अहवालांवर आधारित आहे, ज्यांनी नायकांना विजयनगर राज्याचे प्रतिनिधी म्हणून वर्णन केले आणि केंद्रीकृत राज्य संरचनेचे संकेत दिले.

### १.५.२ विकेंद्रीत राज्य

बर्टन स्टेन यांनी केंद्रीकृत राज्याचा हा सिद्धांत पूर्णपणे नाकारला. विजयनगर राज्य चोल किंवा पांड्या राज्यांसारखे केंद्रीकृत नोकरशाही राज्य नव्हते. त्यांनी असा युक्तिवाद केला की विजयनगरच्या राजाने चोल राजाप्रमाणेच एक विधी अधिकार वापरला होता. त्यांनी लोकसंख्येचे प्रमाण जास्त असणा-या सुपीक नदीच्या प्रदेशातील काही केंद्रीय प्रदेश हेरले व त्याचा महसूल गोळा करण्याच्या दृष्टीने महत्वाचे होते. अत्युच्च शिखरावर असलेल्या केंद्रीय क्षेत्रासह, उतरणीची रचना म्हणून स्टेनने या रचनेकडे पहिले. राजा आणि नायक आणि प्रांतीय राज्यपाल यांच्यातील संबंधांचे वर्णन त्यांनी केले आहे. त्याच्या मतानुसार विजयनगर मध्ये अधीन प्रांतीय अधिकाऱ्यांना जास्त अधिकार होर्ते. शास्त्री आणि महालिंगम यांच्यासारख्या विद्वानांनी स्टेनने प्रस्तावित केलेल्या मॉडेलवर टीका केली कारण प्रांतीय राज्यपाल बदली व बरखास्त करण्याचा अधिकार पूर्णपणे राजाला होता.

## १.६ मराठा साम्राज्याचा राज्यसिद्धांत

छत्रपती शिवाजींनी स्थापलेल्या स्वराज्याच्या स्वरूपाविषयी विविध अर्थ लावले आहेत. हिंदवी स्वराज ही सामाजिक-राजकीय आणि राजकीय प्रभाव दर्शवण्यासाठी वापरली जाणारी संज्ञा आहे. साम्राज्यवादी इतिहासलेखनात अठराव्या शतकातील मराठा वर्चस्व अराजक अशा स्वरूपाचे मांडले गेले. एम. जी. रानडे आणि जे. एन. सरकार यांनी त्यांच्या लेखनात ग्रँड डफ प्रणीत सिद्धांत नाकारला आहे. 'मराठा सत्तेचा उदय' मध्ये रानडे यांनी मराठा सत्तेच्या उदयासाठी जबाबदार असणारी अनेक कारणे दिली आहेत. शिवाजी राजांनी त्यांना नेतृत्व प्रदान केले आणि आपापसात आत्मविश्वास निर्माण केला म्हणून त्यांनी स्वतंत्र राज्य निर्माण करण्याच्या कामासाठी त्यांन पाठींबा दिला. राष्ट्रवादी इतिहासलेखन विकसित करण्यासाठी अनेक मराठा विद्वानांनी मराठा राज्य हिंदू साम्राज्याचा शेवटचा पुनर्जन्म म्हणून पाहिले. सतीश चंद्रा यांनी मुघल जागीरदारी व्यवस्थेच्या संकटात मराठ्यांनी प्रादेशिक स्वातंत्र्यासाठी दिलेला यशस्वी लढा म्हणून वर्णन केले. सी.ए. बेली तीन योद्धा समुदायाची नोंद घेताना म्हणतात - मराठे, शीख आणि

जाट यांनी मुघल राज्सत्तेविरुद्ध काही प्रमाणात निर्देशित केलेली लोकप्रिय किंवा शेतकरी बंडखोरी प्रतिबिंबित केली. शिवाजी राजांच्या कारकिर्दीत व त्यांच्यानंतर आलेल्या राजांची अनिर्बंध सत्ता असली तरी त्यांचा उपयोग राज्यातील लोकांच्या कल्याणासाठी करण्यात आला होता. शिवाजी राजांच्या मंत्रिमंडळात अष्टप्रधान मंडळ होते. त्यांचा सल्ला राजांवर बंधनकारक नसला तरी त्यांच्याशी वेळोवेळी सल्लामसलत करण्यात येत असे.

## १.७ सारांश

तुर्कांच्या आगमनाने उत्तर भारतात एक नवीन प्रकारचे राज्य सुरू झाले. सुरुवातीच्या टप्प्यात, सैन्य नेत्यांना देशाच्या विविध भागात विजय मिळविण्यासाठी जास्तीत जास्त स्वातंत्र्य देण्यात आले होते. त्यावेळेस तैनात मध्यवर्ती सैन्य मजबूत होते आणि सुलतानच्या थेट नियंत्रणाखाली कार्यरत होते. विजयनगर सभ्यता ही केंद्रीकृत राजवट होती आणि राजाचा नायक आणि प्रांतीय राज्यपालांवर अधिकार होता. एम. जी. रानडे आणि जे. एन. सरकार यांनी त्यांच्या लेखनात ग्रँड डफ सिद्धांत नाकारला आहे. 'मराठा सत्तेचा उदय' मध्ये रानडे यांनी मराठा सत्तेच्या उदयासाठी जबाबदार असणारी अनेक कारणे दिली आहेत. शिवाजी राजांनी त्यांना नेतृत्व प्रदान केले आणि आपापसात आत्मविश्वास निर्माण केला म्हणून त्यांनी स्वतंत्र राज्य निर्माण करण्याच्या कामासाठी शिवरायांना पाठींबा दिला.

## १.८ प्रश्न

प्र.१) सुलतानशाहीकालीन राज्य सिद्धांत स्पष्ट करा.

प्र.२) मुघल काळातील राज्य सिद्धांताचे वर्णन करा.

प्र. 3) विजयनगर व मराठा साम्राज्यातील राज्य सिद्धांताचा शोध घ्या

प्र. 4) भारतातील मध्ययुगीन काळात राज्य सिद्धांताचे वर्णन करा.

## १.९ संदर्भ

१) ईश्वरी प्रसाद, हिस्ट्री ऑफ मीडिवल इंडिया, इंडियन प्रेस, अलाहाबाद

२) सतीश चंद्र, मध्ययुगीन भारत: सुलतानशाही ते मुघल, दिल्ली,

३) बर्टन स्टीन, विजयनगर, न्यू केंब्रिज हिस्ट्री ऑफ इंडिया. केंब्रिज युनिव्हर्सिटी प्रेस

४) एम. जी. रानडे, राइज ऑफ मराठा पॉवर, पनाळेकर को, मुंबई,

५) डॉ. आर. एस. त्रिपाठी, सम आस्पेक्ट्स ऑफ मुस्लीम अडमिनि स्ट्रेशण, सेंट्रल बुक डेपो, अलाहाबाद

❄❄❄❄❄❄❄

# २

# राजवटीचे स्वरूपः दिल्ली सुलतानशाही, मोगल, विजयनगर आणि मराठा

**घटक रचना**


२.० उद्दीष्टे

२.१ प्रस्तावना

२.२ राजवटीचे स्वरूप: दिल्ली सुलतानशाही

२.३ मुघल राजवटीचे स्वरूप

२.४ विजयनगर साम्राज्यात राजेशाहीचे स्वरूप

२.५ मराठा राजवटीचे स्वरूप

२.६ सारांश

२.७ प्रश्न

२.८ संदर्भ


## २.० उद्दीष्टे

१) सुलतानशाहीच्या राजवटीचे स्वरूप समजून घेणे

२) मध्ययुगीन राजवटीचे स्वरूप स्पष्ट करणे

3) विजयनगर व मराठा साम्राज्यातील राज्याचे स्वरूप समजावून घेणे

## २.१ प्रस्तावना

मध्ययुगीन भारतामध्ये राजसत्ता ही सर्वशक्तिमान संस्था होती. संपूर्णपणे राजाच्या म्हणजेच सुलतानाच्या इच्छेनुसार ती कार्य करत होती. अनेक विद्वानांचे मत आहे की राजशाहीची संस्था ही इस्लामिक संस्था नव्हती. वेगवेगळ्या परिस्थितीमुळे हे स्थिरपणे उदयास आले. हळूहळू सुलतानशाही हे समाज आणि सभ्यतेचे केंद्र बनले. राज्यातील सत्ता सुलतानाच्या हाती केंद्रित झाली आणि तो निरपेक्ष शासक बनला. तो मुख्य कार्यकारी अधिकारी, सर्व न्यायालयीन प्रकरणांमध्ये अंतिम न्यायालयीन आणि सशस्त्र दलांचा प्रमुख झाला. तो भव्य दरबार भरवत असून अनेक विद्वान, कलाकार आणि धर्म-संरक्षक म्हणून त्याला खूप प्रतिष्ठा आणि सन्मान मिळत होते.

दिल्लीच्या तुर्की राज्यकर्त्यांनी शासक म्हणून सुलतान ही पदवी वापरली. सुलतानशाहीची स्थापना १२०६ मध्ये झाली आणि कुतुबुद्दीन ऐबकच्या राज्यारोहणासोबत नवीन राजकीय व्यवस्थेची सुरुवात मानली गेली. इल्तुतमिश (अल्त्मश) याच्या कारकीर्दीत सुल्तानशाही स्थिरावली. दिल्लीच्या सुलतानांनी खलिफाकडे निष्ठा असल्याचा दावा केला असला तरी, सुलतान राजनैतिक बाबतीत स्वतंत्र होता. इल्तुतमिशने सुलतानाच्या सरकारात घराणेशाहीची तत्त्वे आणली. शमसी घराण्याच्या बाजूने वंशपरंपरेची परंपरा स्थापन केली गेली. इल्तुतमिशच्या कारकिर्दीत सुलतानाची स्थिती ज्येष्ठ सरदारांपैकी एक अशी होती.

तथापि, बलबनच्या उदयानंतर राजेशाहीची प्रतिष्ठा वाढली. सुलतान हा निरंकुश सत्ताधीश बनला.

## २.२ राजवटीचे स्वरूप: दिल्ली सुलतानशाही

मुस्लिम न्यायाधीशांनी धर्माच्या आधारवर सुलतानास पुढील कार्ये सोपविली: इस्लामिक श्रद्धा संरक्षण करणे, त्याच्या प्रजेमधील वाद मिटविणे, इस्लामी प्रांताचे संरक्षण, महामार्ग व रस्ते प्रवाश्यांसाठी सुरक्षित ठेवणे, गुन्हेगारी संहितेची अंमलबजावणी, आक्रमणाविरूद्ध सीमांचे संरक्षण, इस्लामविरोधी वागणूक देणा-यांविरूद्ध युद्ध पुकारणे, कर आणि कर्तव्यांचे संग्रह, त्याच्या सार्वजनिक आणि कायदेशीर कर्तव्यामध्ये त्याला मदत करण्यासाठी अधिका-यांची नेमणूक, सार्वजनिक संपर्क आणि वैयक्तिक संपर्काद्वारे लोकांच्या स्थितीशी संपर्कात रहाणे. सुलतान परिपूर्ण शासक असून त्याला अमर्याद अधिकार असल्याचे दिसते, मात्र प्रत्यक्ष व्यवहारात मात्र त्याचा अधिकार काही विशिष्ट कारणास्तव मर्यादित होता. हिंदू आणि मुस्लिम या दोन्ही परंपरेनुसार एका राजाने सत्तेचा गैरवापर केल्याबद्दल धर्म ही प्रमुख संस्था त्याच्यावर दबाव ठेऊन होती. त्याला धर्माने ठरवलेल्या नैतिक आणि धार्मिक निकषांनुसार कार्य करणे आवश्यक होते. कुराणी कायद्याचा भंग करणा-या शासकाला सत्तेवरून काढून टाकले जाऊ शकत होते. अर्थात त्याला सर्वसामान्य लोकांचा पाठींबा आवश्यक होता. याव्यतिरिक्त, सुलतानची शक्ती सैन्याच्या निष्ठेवर, नागरिकांच्या समर्थनावर आणि मुस्लिम धर्मशास्त्रज्ञांच्या सहकार्यावर अवलंबून होती.

### २.२.१ बल्बन: दिव्य अधिकाराचा सिद्धांत

बल्बनने राजेशाहीची प्रतिष्ठा व शक्ती वाढवण्याचा निर्णय घेतला त्यायोगे त्याने आपली एकाधिकारशाहीचा प्रस्थापित केली. राजेशाहीची प्रतिष्ठा व शक्ती वाढविण्यासाठी बल्बनने दिव्य हक्कांच्या सिद्धांतावर विश्वास ठेवला. त्यांनी आपली मते आपला मुलगा बुगरा खान याला लिहिलेल्या पत्रात व्यक्त केली. तो म्हणतो, “राजाचे हृदय हे देवाच्या कृपेचे खास भांडार आहे आणि मानवजातीमध्ये त्याचे बरोबरीचे कोणीही नाही.” त्याने राजाच्या सर्वांपेक्षा वेगळे व श्रेष्ठ असण्यावर जोर दिला. त्याला खात्री होती की एकाधिरशाही असलेला शक्तिशाली राजा त्याच्या प्रजेचे अगदी अचूकपणे पालन करू शकतो आणि राज्याची सुरक्षा देखील करू शकतो. तो स्वतः आधीच्या आयुष्यात गुलाम असतानाही त्याने मिथक कथेतील तुर्की नायक अफ्रसियाबचा वंशज असल्याचे सांगून बल्बनने सिंहासनावर आपला दावा मजबूत केला.

### २.२.२ दरबाराच्या राजवैभवाची प्रतिष्ठापना

दरबाराचे वैभव व प्रतिष्ठा वाढवण्यासाठी त्याने नाना विविध योजना अमलात आणल्या. दरबाराचे वैभव व दरारा वाढवण्यासाठी शिष्टाचार, परंपरा आणि प्रथा त्याने प्रस्थापित केल्या. बरानी या इतिहासकाराच्या मतानुसार दिल्लीत अशा भव्य आणि भव्यतेचे प्रदर्शन यापूर्वी कधीही झाले नव्हते. एकवीस वर्षे बाल्बनने राज्य केले तेव्हा त्याने राजगादीसोबत आदराची भावना, सन्मान आणि वैभव वाढवले. त्याच्या राज्यारोहणानंतर, बलबनने मद्य पिणे सोडले आणि दरबारातील इतर सरदारांपेक्षा वेगळेपण व श्रेष्ठत्व दाखवण्यासाठी जाणीवपूर्वक तो वेगळा व एकटा राहू लागला. त्याने त्याच्या दरबारी आणि अधिका-यांना एकत्रितपणे मद्यपान करण्यास मनाई केली, त्यांच्यासाठी एक खास पोशाख आणि निश्चित

विधी सुरु केले. सर्व अधिकरी व सरदार यांना सुलतानाला प्रणाम करणे आणि राजाच्या पायाला स्पर्श करणे, हे अभिवादनाचे प्रकार म्हणून सूरू केले. दरबाराचे वैभव वाढवण्यासाठी, बलबन याने पर्शियन दरबाराच्या धर्तीवर समारंभांचे नवीन नियम सुरु केले. त्याने नवीन पर्शियन वर्ष नवरोज या वार्षिक उत्सवाची सुरुवात केली. त्याने हातात तळपत्या तलवारी घेतलेले उंच आणि तगडे अंगरक्षक नेमले. ते सतत राजाभोवती उभे असत. त्याचा उद्देश आजूबाजूच्या लोकावर भीतीयुक्त दरारा निर्माण करणे हा होता.

## २.२.३ तुर्की वर्चस्वाची स्थापना

उच्च कुलाच्या दाव्याला बळकट करण्यासाठी, बलबन तुर्की कुलीन विजेता म्हणून पुढे आला. महत्वाची सरकारी पदे केवळ तुर्की कुटुंबातील व्यक्तिनाच होती. उच्च पदाधिका-यांशिवाय त्याच्याकडे खालच्या अधिका-यांचा प्रवेश नव्हता. त्याने दरबारात गंभीर वातावरण निर्माण केले. त्याच्या दरबारात कोणालाही हसण्याची परवानगी नव्हती. अशाप्रकारे, वेगवेगळ्या उपायांद्वारे बलबनने राजशाहीची प्रतिष्ठा वाढविली. विविध रूढीने आणि सन्मानाने, दरबाराची प्रतिष्ठा व शक्ती पुनर्संचयित करण्यात त्याला यश आले. तुर्की कुलीन व्यक्तीचा नेता म्हणून काम करण्याचा दावा करताना, बलबन स्वत:च्या कुटुंबातील सदस्यांसह नव्हे तर कोणाबरोबरही सत्ता सामायिक करण्यास तयार नव्हता. सुलतानाच्या निरपेक्ष सत्तेच्या मार्गातील सर्वात मोठे अडथळे म्हणजे अग्रगण्य तुर्की सरदारांचा निवडलेला गट म्हणजे 'चाळीस सरदारांचा गट' हे त्याच्या ध्यानात आले. त्याने स्वत:साठी आणि त्याच्या वारसदारांसाठी सिंहासनास सुरक्षित ठेवण्यासाठी 'चाळीस सरदारांचा गट' नष्ट करण्याचा निर्णय घेतला. त्यांचे महत्त्व कमी करण्यासाठी बल्बनने कनिष्ठ तुर्कांना महत्त्वपूर्ण पदांवर बढती दिली. लोकांच्या नजरेत त्यांचे महत्त्व कमी करण्यासाठी थोडासा दोष असला तरीही त्यांनी सदस्यांना कडक शिक्षा केली. स्वतःला राज्यातील सर्व घडामोडींबद्दल आणि तुर्की सरदारच्या हालचालींबद्दल माहिती ठेवण्यासाठी बल्बनने हेरगिरीची विस्तृत व्यवस्था आयोजित केली. प्रशासनाच्या प्रत्येक स्तरावर त्यांनी गुप्त-वार्ता लेखक नेमले. त्यांना दररोज सर्व महत्त्वपूर्ण घटना आणि हालचालींचा अहवाल त्याच्याकडे पाठविणे आवश्यक होते. गुप्त-वार्ता लेखक यांच्या व्यक्तिमत्त्व व निष्ठा या गोष्टींवर त्यांनी विशेष लक्ष दिले. त्यांनी त्यांना चांगला पगार दिला आणि प्रांतीय राज्यपालांना पूर्णपणे स्वतंत्र केले. जर गुप्त-वार्ता लेखकाने त्याच्या कर्तव्यात कसूर केली तर त्याला जबर शिक्षा देण्यात आली. सुप्रसिद्ध आणि कार्यक्षम हेरगिरी यंत्रणा बल्बनच्या राजवटीतील महत्त्वपूर्ण घटना बनली. जनतेचा विश्वास संपादन करण्यासाठी त्याने निःपक्षपातीपणे न्याय दिला.

## २.२.४ सैन्य संघटना

सैन्याच्या संघटनेची आणि राज्याच्या सुरक्षिततेच्या रक्षणासाठी बलबनने सैन्याच्या पुनर्रचनेचा निर्णय घेतला. सैन्य सेवेच्या ठिकाणी जहागीर देण्याची जुनी प्रथा बलबनने रद्द केली नाही परंतु केवळ सक्रिय सैन्य सेवा देण्यास सक्षम असलेल्या अशा व्यक्तींनाच अशी नेमणूक देण्यात येईल हे पाहण्याची काळजी घेतली. ज्यांनी युद्धात त्यांच्या धैर्य व निष्ठेचा पुरावा दिला होता, अशा घोडदळ व घोडदळांचा अनुभव असणा-या अधिका-यांना नेमले. त्याने सैन्यासाठी इमाद-उल-मुल्क या अत्यंत सक्षम व निष्ठावान अधिका-याची नेमणूक कारण त्याला दिवाण-ए-अरिज (सैन्याचे प्रभारी मंत्री) म्हणून नेमले. याच विभागाला अर्थ

मंत्रालयापासून स्वतंत्र करण्यात आले. इमाद-उलमुल्कने सैन्याच्या भरती, प्रशिक्षण, उपकरणे आणि सैन्याच्या पगाराच्या बाबतीत विशेष रस घेतला. बलबनच्या सैन्याचा एक शक्तिशाली साधन म्हणून वापर केला. राजेशाही आणि सैन्याच्या पुनर्रचनाची स्थिती बळकट केल्यामुळे बलबनने आपले लक्ष साम्राज्यविस्ताराकडे दिले. शासन निर्णय मोडणाऱ्यांना कठोर शिक्षा केली. अवध भागात काही काळ सुरु असलेल्या बंडामुळे निर्माण झालेल्या असुरक्षित स्थितीलाही त्याने संपुष्टात आणले.

## २.२.५ अलाउद्दीन खिलजी

खिलजी राजवटीतील अलाउद्दीन खिलजी हा पूर्णपणे साम्राज्यवादी होता. त्याच्या निरपेक्ष राजशाहीच्या सिद्धांतास पाठिंबा देण्यासाठी आणि त्याच्या विजय आणि अभिषेकाची महत्त्वाकांक्षा पूर्ण करण्यासाठी आणि वारंवार होणा-या मंगोल आक्रमणांपासून सुलतानशाहीचे रक्षण करण्यासाठी शक्तिशाली सेना असणे आवश्यक होते. या उद्दीष्टांमुळे अलाउद्दीनने दूरगामी लष्करी सुधारणा केल्या. अलाउद्दीन खिलजीच्या राजकारणाची व्यावहारिक स्वरूपाची कल्पना त्यांच्या काही राजकीय आणि प्रशासकीय उपाययोजनांमधून ध्यानात येते. त्याने सैन्यावर आचारसंहिता लागू करण्याचा प्रयत्न केला. अलाउद्दीनला राज्याच्या कार्यात धर्माचा हस्तक्षेपाला विरोध होता आणि या संदर्भात तो दिल्लीच्या आधीच्या राज्यकर्त्यांच्या परंपरेपासून दूर गेला. काजी यांच्याशी झालेल्या संभाषणात त्याने सुलतानांच्या राजकारणाचा राजकीय सिद्धांत मांडला गेला. अलाउद्दीन यांनी स्पष्ट केले की त्यांनी शरियत मध्ये काय लिहिले आहे अथवा शरियत काय निकाल देते यावर राजकारण अवलंबून नाही. सुलतान म्हणजे शासक हा सर्वोच्च असून आजूबाजूच्या परिस्थिती नुसार तो काय योग्य व काय अयोग्य हे ठरवू शकतो. धर्म व धार्मिक बाबी त्यावर नियंत्रण ठेऊ शकत नाही.,

## २.२.६ मुहम्मद बिन तुघलक

अलाउद्दीन खिलजीप्रमाणेच मुहम्मद बिन तुघलकही धर्मनिरपेक्ष विषय उलेमाच्या नियंत्रणापासून मुक्त ठेवण्याचा प्रयत्न करीत होता. अलाउद्दीन प्रमाणे त्याने उघडउघड शरीयतची अवहेलना केली नाही परंतु त्याच वेळी, महत्वाच्या विषयांवर उलेमा यांच्या पाठिंब्यावर विजय मिळवण्यासाठी त्याने फारसे प्रयत्न'देखील केले नाही. सुलतान स्वत:ला केवळ राज्याचा संपूर्ण प्रमुख नसून तो स्वतःचा 'देवाची सावली' असल्याचा दावाही तो करत होता. सुरुवातीस त्याने खलिफाचे वर्चस्व पूर्णपणे नाकारले. यामुळे साहजिकच त्याचे उलेमासोबत वैर वाढले. सुलतानाला खलीफाकडून आपल्या राज्याला मान्यता घेणे आवश्यक वाटले नाही. परंतु, न्याय, उदारता आणि वैयक्तिक क्षमता असूनही सुलतानाला असे दिसून आले की तो जनतेत अधिकाधिक अप्रिय होत आहे. अशा वेळेस त्याने खलिफाविषयीचा आपला दृष्टिकोन बदलला आणि इजिप्तच्या खलीफाकडून सार्वभौम म्हणून त्याच्या पदाची पुष्टी मागितली. त्याने नाण्यांवरून स्वतःचे नाव काढून खलीफाचे नाव घातले. तथापि, या उपायांमुळे सुलतानची लोकप्रियता पुनर्संचयित झाली नाही, तसेच त्याच्या वारंवार होणा-या बंडखोरीपासूनही त्याला वाचवले गेले नाही जे शेवटी त्याच्या अधिकारासाठी व सुलतानशाहीसाठी त्याचे अनिर्बंध सत्ताधोरण हानीकारक ठरले.

### २.२.७ लोदी घराणे

लोदी सरदारांमध्ये सार्वभौम राजाची कल्पना ही परकीय होती. कुणा एका नेत्याचे अथवा सरदाराचे वर्चस्व मानने त्यांच्या परंपरेत बसत नव्हते. त्यांना स्वताची प्रतिष्ठा व सत्ता अधिक महत्वाची होती. राजा किंवा सत्ताधीश हा श्रेष्ठ नसून तो केवळ 'त्यांच्यातील एक' म्हणून त्यांनी मानले. म्हणूनच, त्यांच्या या विचारसरणी मुळे व परंपरेमुळे त्यांना अशा राज्यात अनिर्बंध सत्ता गाजवण्याची मुभा नव्हती. अनिर्बंध सत्तेमुळे राज्यकर्ते आणि लोक यांच्यातील संबंध कमी होऊ शकतात आणि राज्यकर्त्यांचा दर्जा कमी होऊ शकेल अशी त्यांची भावना होती. बहलोल लोदीने अफगाण साम्राज्याची स्थापना केली होती मात्र अफगाण परंपारीक विचारसरणीमुळे राज्यातील राजाचे स्थान सशक्त होऊ शकले नाही. शक्तिशाली प्रमुखांना सोबत घेऊन व त्यांच्या मर्जीनुसार सतत राज्यकारभार करण्याच्या परंपरेमुळे इतर राजघराण्यासारखे लोदी घराणे सशक्त होऊ शकले नाही. बहलाल लोधीने अफगाण जमातीतील सदस्यांना येऊन त्यांनी भारताच्या राज्यात योग्य प्रमाणात भाग घ्यावा म्हणून अफगाणांना आमंत्रित केले. बहलोल व इब्राहीम लोदी आपल्या वंशाच्या लोकांना एकत्र आणण्याचा प्रयत्न करीत असताना बहलोलने नेहमीच त्याच्या राज्याचा सत्तेत समान वाट देण्याचे धोरण स्वीकारले. सिकंदर लोदिने राजशाही उन्नत करण्यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न केले. मात्र असे करताना त्याने सिंहासनावर आपली पकड कायम ठेवली. इब्राहीम लोदी मात्र याबाबतीत त्याचे वर्चस्व राजकीय संपूर्णपणे राबवण्यात अयशस्वी ठरले आणि भारतात मोगल राज्य स्थापनेचा मार्ग मोकळा झाला.

## २.३ मुघल राजवटीचे स्वरूप

मध्ययुगीन भारतातील राज्यकर्ते स्वत:ला पूर्णपणे सार्वभौम मानत नव्हते. दिल्लीतील सुलतान आणि स्थानिक मुस्लिम राज्यकर्ते खलिफा यांना त्यांचा कायदेशीर सार्वभौम मानत असत आणि सहसा त्यांनी जारी केलेल्या नाण्यांवर त्याचे नाव वापरत असत आणि त्यांच्या नावाने प्रार्थना (खुतबा) वाचत असत. तथापि, मोगल साम्राज्यादरम्यान राजाच्या एकुण परंपरेत व सत्ताप्रकारात आमुलाग्र बदल झाला. मुघल साम्राज्याचा संस्थापक बाबर याने स्वतास भारताचा पदशाह म्हणजेच सम्राट अशी पदवी घेतली आणि कोणत्याही परकीय सत्तेचे वर्चस्व न स्वीकारता आपले संपूर्ण वर्चस्व गाजवले. राजवंशाचा शेवट होईपर्यंत मुघलांचे हे धोरण कायम राहिले. मुघल राज्यकर्त्यांनी खलिफाची नाममात्र सार्वभौमत्व ओळखण्यास नकार दिला आणि स्वत:ला पूर्णतः सार्वभौम मानले. ते स्वतःला पृथ्वीवरील देवाचे प्रतिनिधी मानत. मोगल शासक अमीर-उल-मोमीनिन (मुस्लिमांचा शासक) म्हणूनही ओळखला जात असत.

### २.३.१ बादशाह अकबराचा राजेशाहीचा सिद्धांत

मोगल साम्राज्याच्या राज्यकर्त्यांनी स्वत: ला विविध प्रथा व परंपरेने युक्त असलेल्या लोकांवर राज्य करण्यासाठी दैवी इच्छेने नियुक्त केलेले राजे म्हणून पाहिले. वास्तविक राजकीय परिस्थितीमुळे ही दृष्टी बऱ्याचदा येत असली तरी असली तरी बहुधार्मिक व अनोळखी लोकांवर राज्य करण्यासाठी हा दृष्टीकोन उपकारक होता. अकबराचा हा दृष्टीकोण त्याने नेमलेल्या इतिहासकारांच्या इतिहासाच्या लेखनातून होता. मोगल राजांनी दरबारातील इतिहासकारांना विविध बाबींची नोंद करण्यासाठी लिहण्यासाठी नेमले. या

खात्यांमध्ये सम्राटाच्या काळातील विशेष घटना नोंदवल्या गेल्या. याशिवाय, या लेखकांनी देशातील विविध प्रांतामधील राज्यकर्त्यांना त्यांच्या कारभारावर राज्य करण्यासाठी मदत करण्यासाठी मोठ्या प्रमाणात माहिती गोळा केली. इंग्रजीत लिखाण करणाऱ्या आधुनिक इतिहासकारांनी या संपादित नोंदीच्या ग्रंथांचे इंग्रजीत भाषांतर केले आले. मोगलांचा इतिहास लिहू इच्छिणा-या कोणत्याही विद्वानांसाठी हि पुस्तके एक अपरिहार्य स्त्रोत आहेत. मुघल राज्यातील संस्थांविषयी तथ्यात्मक माहितीचे हे महत्वाचे भांडार आहे. प्रस्तुत लेखकांनी दरबाराशी संबंधित असलेल्या व्यक्तींनी माहिती गोळा करून वर्गीकरण केलेले आढळते. त्यायोगे आपल्याला त्यांच्या राज्यकारभारविषयक कल्पनांची माहिती मिळते.

अर्थात अशा प्रकारच्या पुस्तकातून मोगल राजांविषयी अतिशयोक्त मजकूरही आढळतो. मोगल सम्राट हा देवाचा प्रतिनिधी असल्याने त्याला थेट देवाकडून शक्ती आली आहे हे दर्शविण्यासाठी दरबारातील इतिहासकारांनी बरेच माहिती स्त्रोत दर्शवले आहेत. त्यांनी सांगितलेल्या एक आख्यायिका म्हणजे मंगोल राणी विषयी होती. ती गर्भवती असताना सूर्यकिरणांनी जणू काही तिला आशीर्वाद दिला. तिने जन्माला घातलेल्या संततीवर हा दैवी प्रकाश होता व पिढ्यानपिढ्या त्या दैवी प्रकाशाचा वारसा पुढील मुघल राजांनी चालविला. अबू फजलने देवाकडून (फारूर-इ इजादी) प्रकाश प्राप्त करणा-या मुघल राजांना सर्वोच्च स्थानी ठेवले. हिंदुस्थानचा बादशाह झाल्यावर अकबराने राज्याच्या काही संकल्पनेत बदल केले. अकबर याने ठामपणे प्रतिपादन केले की राजेशाही एक दैवी देणगी आहे. व जोपर्यंत देवाची कृपा आहे अथवा त्याची इच्छा आहे तोपर्यंत राजाला आपल्या मनानुसार राज्यकारभार करता येतो.

अबुल फजल याचे म्हणणे होते की, “राजसत्ता देवाची देणगी आहे आणि सम्राट, "पृथ्वीवरील देवाची सावली" आहे. राजा हेच प्रशासनाचे मुख्य केंद्र होते, सर्व नागरी आणि सैन्य अधिकाऱ्यांचे केंद्र होते आणि सर्व न्यायालयीन आणि कार्यकारी प्रकरणांमध्ये सर्वोच्च न्यायालयात होते. मुत्सद्दी कौशल्य, लष्करी सामर्थ्य आणि धार्मिक सहिष्णुता यांच्या जोडीने १५७६ पर्यंत संपूर्ण उत्तर भारतावर विजय मिळवल्यानंतर अकबरने कुतुबा स्वत:च्या नावाने वाचला. त्याने सिजदा (प्रणाम) आणि झमीनबोस (सम्राटासमोर जमिनीवर स्पर्श घेण्याची) प्रथा सुरू केली. या पद्धतींद्वारे अकबरने आपल्या संपूर्ण सार्वभौमत्वाची घोषणा केली. धर्माच्या कारणास्तव त्याने आपल्या प्रजेमध्ये भेद केला नाही. तो स्वत: ला राजा आणि सर्व प्रजेचा उपकारक मानत असे. अबुल फजलच्या अकबरनामा पासून अकबरचे राज्याभिषेकाचे धोरण ज्ञात आहे. तो म्हणतो, "सार्वभौम शांततेचे (सहिष्णुतेचे) पालन न केल्यास आणि सर्व माणसांचे आणि सर्व धर्मांचे एकनिष्ठ दृष्टीने विचार न केल्यास राजा या सर्वोच्च अशा पदासाठी योग्य ठरू शकत नाहीत." अकबराने आपल्या सर्व प्रजेचा आपण राजा असल्याचा दावा केला. अकबरांचा राजासत्तेचा आदर्श खरोखरच उच्च आणि थोर होता. अकबर याच्यासह मोगल सम्राटांनी कुराणीच्या कायद्याचे अनुपालन करण्याचा प्रयत्न केला.

प्रजेच्या जीवन, मालमत्ता, सन्मान आणि विश्वास अशा चार विषयांचे सम्राट संरक्षण करतो आणि त्या बदल्यात आज्ञाधारकपणा आणि संसाधनांची मागणी करतो. मुघल राजांच्या दृश्य प्रतिनिधित्वासाठी बरीच चिन्हे तयार केली गेली होती. कलाकारांद्वारे वापरल्या जाणाऱ्या आवडत्या प्रतिकांपैकी एक म्हणजे सिंह आणि कोकरू (किंवा बकरी) शांतपणे

एकमेकांच्या शेजारी घर बांधतात. याचा अर्थ असा होतो की दुर्बल व कमकुवत दोघे समरस होऊ शकतील अशा चित्राद्वारे सूचित करतात.

मध्ययुगीन काळात विलासी किंवा शाही राजवट हे एक सामान्य वैशिष्ट्य होते. या संदर्भात, मोगल सम्राट अमर्याद शक्तींचा उपभोग घेणारा परिपूर्ण राजा होता. मोगल राज्य एक केंद्रीकृत (निरंकुश राजशाही) राज्य होते. अशी कोणतीही संस्था किंवा कार्यालये नव्हती जी त्याच्या सर्वोच्च सामर्थ्यावर अंकुश ठेऊ शकत होती. मुघल सम्राट राज्यातील सर्वोच्च पद होते. तो म्हणजेच राज्य व तोच सरकारप्रमुख, सर्वोच्च सेनापती, न्यायाचे मुख्य अधिकारी होता. उत्तराधिकाराचा स्पष्ट कायदा नसतानाही सिंहासनासाठी दावेदारांकडून गट असायचे. एक श्रेष्ठ लष्करी शक्ती असलेला स्पर्धक आपली सत्ता प्रस्थापित करण्यास सक्षम होता. बळी तो कान पिळी या न्यायानुसार सत्ता स्पर्धेत श्रेष्ठ असाच गट आपली सत्ता प्रस्थापित करत असे.

## २.३.२ राजाचे विशेषाधिकार

लोकांच्या नजरेत आपले वास्तविक स्थिती बळकट करण्यासाठी अकबर याने राजेशाहीत काही खास प्रथा रुजू केल्या होत्या. राजेशाहीची शक्ती आणि प्रतिष्ठा वाढविणे या हेतूंचा हेतू होता. काही महत्त्वाच्या पूर्वकल्पनांचा समावेश होता.

(अ) झरोखा दर्शन, ज्यायोगे सम्राट आपल्या प्रजेच्या अभिवादनसाठी विशेष सज्जामध्ये दिसत असे. झरोखा दर्शनाने सम्राटाचे सर्व काही ठीक असल्याचे दर्शविले. जेव्हा राजा एखाद्या मोहिमेवर किंवा आजारी असे तेव्हाच त्याला दर्शन देता येत नसे. राज्यात सर्व काही आलबेल असल्याचा अथवा सम्राट व्यवस्थित असल्याचा संदेश यातून प्रजेपर्यंत जात असे. तथापि औरंगजेबाने ही प्रथा बंद केली.

(ब) जेव्हा सम्राटाने दरबार बोलवला, तेव्हा, इतर अनेक वाद्यांच्या साथीला शक्तिशाली नगारा वाजवला जात असे

(क) केवळ सम्राट त्याच्या अधिकाऱ्यांना पदवी अथवा किताब देऊ शकत असे.

(ड) सम्राटास केवळ त्याचा विशेष शिक्का (मोहर) चिकटविण्याचा विशेषाधिकार होता आणि विशेष बाबत त्याने त्याच्या जारी केलेल्या शेतात त्याच्या तळहाताचे (पंजा) सिंदूर छापले.

(इ) मृत्यूसारख्या फाशीची शिक्षा फक्त सम्राटाद्वारेच दिली जाऊ शकते.

(फ) केवळ बादशाह हत्तींचे झुंज आयोजित करू शकत असे.

(छ) अकबरने त्याच्या वाढदिवशी सोने आणि इतर मौल्यवान धातूंच्या विरुद्ध वजन करण्याचा प्रघात अवलंबिला.

## २.३.३ एकसंध शक्ती

मुगल साम्राज्यामध्ये हिंदू, जैन, पारसी, मुस्लिम आणि विविध धर्माच्या आणि अनेक भिन्न वंशीय आणि धार्मिक समुदायाचा समावेश होता. सर्व शांतता आणि स्थिरतेचा स्रोत म्हणून, सम्राट सर्व धार्मिक आणि वांशिक गटांमध्ये भेदभाव न करता राज्य करत असे. त्याने विभिन्न अशा प्रजेमध्ये मध्यस्थ म्हणून कार्य केले आणि न्याय व शांती कायम ठेवण्याचे सुनिश्चित केले. अबुल फजल याने सुलह-ए-कुल (परिपूर्ण शांतता) हा आदर्श प्रबुद्ध नियम

म्हणून पुढे आणला. सुलह-ए-कुलमध्ये सर्व धर्म आणि विचारधारे यांना अभिव्यक्ती स्वातंत्र्य होते. राज्याचे अधिकार क्षीण न करता राहणे व आपसात संघर्ष न करणे या अटींवर सर्वांना धर्म स्वातंत्र्य होते. सुलह-ए-कुलचा आदर्श राज्य धोरणांद्वारे राबविला गेला. मोगलांच्या अखत्यारीतील कुलीन म्हणजे इराणी, तुराणी, अफगाण, राजपूत, दख्खनी यांचा समावेश असलेला एकत्रित लोक या सर्वांना पूर्णपणे त्यांच्या सेवेच्या आधारे पद व पुरस्कार देण्यात

### २.३.४ शेरशहाची कल्याणकारी राजेशाही

शेर शाह हा एक कल्याणकारी हुकुमशाह होता. तो प्रशासनाला आपल्या कर्तव्याचा एक भाग मानत असे आणि राज्याच्या कारभाराविषयी प्रत्येक व्यवसायाकडे वैयक्तिक लक्ष देत असे. त्याने धर्माच्या आधारावर भेदभाव न करता लोककल्याणाच्या विकासाचा आदर्श त्यांच्यासमोर ठेवला. त्याला प्रजेवर अत्याचार करुन नव्हे तर प्रजेला सुख समृद्धी बहाल करून आपली महानता वाढवायची होती. भारताच्या मुस्लिम राज्यकर्त्यांपैकी शेरशहाने प्रथमच लोकांच्या जीवनमन उंचावून त्यांचे कल्याण करण्याचा व्यापकपणे प्रयत्न केला.

## २.४ विजयनगर साम्राज्यात राजेशाहीचे स्वरूप

विजयनगर प्रशासन राजाच्या नियंत्रणाखालील एक विशाल सामंती संस्था होती. सर्व समकालीन राज्यकर्त्यांप्रमाणेच विजयनगरचा राजा देखील नागरी, न्यायालयीन आणि सैनिकी विषयांवर अमर्याद अधिकार असणारा सर्वोच्च अधिकारी होता. तथापि, राजाने धर्मातील तत्त्वांनुसार लोकांच्या कल्याणासाठी प्रोत्साहन देण्यासाठी भरपूर प्रयत्न केले. कृष्णदेवरायांच्या अमुक्तमल्यादा या पुस्तकाचा सखोल अभ्यास केल्यावर विजयनगर राजांच्या राजकीय तत्वज्ञानाचे स्वरूप समजण्यास मदत होते. कृष्णादेवरायांनी या शब्दांत राजाला सल्ला दिला आहे: “तुम्ही जे काही पाहता किंवा ऐकता त्याकडे दुर्लक्ष न करता तुम्ही मोठ्या काळजीपूर्वक आणि तुमच्या सामर्थ्यानुसार चांगल्याचे रक्षण करण्यासाठी आणि दुष्टांना शिक्षा करण्याच्या कार्यात सामील व्हा.” ते पुढे म्हणतात, “मुकुट असलेल्या राजाने नेहमीच धर्माकडे डोळे लावून राज्य केले पाहिजे.” राजाची कर्तव्ये गृहीत धरुन कृष्णदेवराय म्हणतो की त्याने आपल्या आसपास राज्यकार्यात कुशल लोक गोळा करण्यावर राज्य केले पाहिजे. त्याने अखंड पराक्रम करुन सर्व प्रजेचे संरक्षण करावे.

### २.४.१ विजयनगर साम्राज्यातील दैवी नियोजित राजेशाही

विजयनगरच्या राजेशक्तीच्या कल्पनेला बरेच धार्मिक कंगोरे होते. राजाने पवित्र भूमिका बजावावी आणि लोककल्याण करावे असे अपेक्षित होते. काही प्रथानुसार तो देवाचा अवतार म्हणून पाहिला गेला. विजयनगरच्या संरचनेत धर्म महत्वाची भूमिका बजावत होता. हिंदू परंपरेतील पवित्र कर्तव्य आणि कायद्याची कल्पना धर्मानुसार त्याला प्रजेमध्ये प्रक्षेपित करायची होती. हिंदु परंपरेचा आधार असलेली धर्म ही संकल्पना मनुष्याला परमात्म्याशी अगदी जवळून जोडते. विजयनगरचे सम्राट वैश्विक, दिव्य आणि कर्त्यव्य बजावणारे होते.

## २.५ मराठा राजवटीचे स्वरूप

सतीश चंद्र यांनी मुघल जागीरदारी व्यवस्थेच्या संकटात मराठ्यांनी प्रादेशिक स्वातंत्र्यासाठी यशस्वी मार्ग काढल्याचे नमूद केले. बेले या इतिहासकाराने मराठा, सिख आणि जाट या तीन योद्धा राजवटीच्या उदयाच्या कारणांची नोंद केली आहे आणि असा

युक्तिवाद केला आहे की त्यांनी मुस्लिम राजवटीविरूद्ध काही प्रमाणात लोकप्रिय अशी कृषक समाज प्रेरित बंडखोरी प्रतिबिंबित केली होती. राजा हा मराठ्यांच्या कारभाराचा मुख्य आधार होता. तो एकमेव व सर्वशक्तिमान शासक होता जो अतिशय कठीण प्रशासकीय यंत्रणा चालवत असे. कारभारातील प्रत्येक जण जसे अठरा कारखाने, बारा महाल, सचिवालयातील अधिकारी फडणीस, सबनीस, कारकून, लष्करी सेनापती आणि आठ प्रधान यांच्यासारखे राजाचे आदेश प्राप्त आणि अंमलात आणत असत.

दिल्ली सल्तनत आणि मुघल साम्राज्य या भारतातील दोन मुस्लिम राजवटीच्या टप्प्यामध्ये परदेशी लोकांचे भारतातील वास्तव्य वाढत गेले. इस्लामिक देशातून सतत होणारे स्थलांतर तसेच स्थानिक लोकांचे झालेल्या धर्मांतरमुळे मुसलमानांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढली. यामुळे हिंदू आणि मुस्लिम या धार्मिक भिन्नातेवर दोन परस्पर विरोधी सामाजिक गट अस्तित्त्वात आले. कट्टर इस्लामी विचारांचा प्रभाव हिंदूंच्या सनातनी सामाजिक जीवनावर फारसा परिणाम झाला नाही.

सल्तनत आणि मुघल काळातले समाज आणि संस्कृती आधीच्या किंवा नंतरच्या काळापेक्षा पूर्णपणे नवीन किंवा मुळीच वेगळी नव्हती. दोन्ही कालखंडात हिंदू समाज आपले अस्तित्व कायम टिकवून राहिला.

याशिवाय मुस्लिम समाज हिंदू समाजासारख्या जातीव्यवस्थेच्या आधारे संघटित होऊ लागला. प्राचीन काळापासून हिंदू जातिव्यवस्था ही समाजाची आधार चौकाट होती, ती मोगल काळातहि सामाजिक जीवनाचा मुख्य आधार राहिली. शिवाय समानता आणि मनुष्याच्या बंधुत्वाच्या तत्त्वांवर विश्वास ठेवणाऱ्या मुस्लिमांशी झालेल्या संपर्कांमुळे त्याची तीव्रता कमी झाली.

सुलतानकाळात प्रचलित असलेल्या मुस्लीमाविषयी असलेला कट्टर हिंदू दृष्टीकोन हळू हळू संपला. याचे कारण मोगल राज्यकर्त्यांनी हिंदुना दिलेली चांगली वागणूक आणि अधिक आर्थिक सुविधा होय. मुघल काळात हिंदूंनी मुस्लिमांपासून दूर राहण्याची पूर्वीची मनोवृत्ती सोडली. ते मुस्लिम आणि त्यांचे वंशज यांना भारतीय मानू लागले. तसेच मुघल काळात मुसलमानांना भारत भूमी प्रिय वाटू लागली.

## ५.२ मुस्लिम समाज

तत्वता इस्लामचा भारतात सामाजिक समानता आणि बंधुता वाढविण्याचा हेतू स्पष्ट असला तरी व्यवहारात मात्र मुस्लिम समाजात विभाजन राहिले. हिंदूंच्या जातीव्यवस्थेचा मुस्लिम समाजावरही काही प्रमाणात प्रभाव पडला. हिंदू सामाजिक संरचनेतील उच्चनिचतेच्या संकल्पना मुस्लिमांमध्येही जन्म, पंथ आणि वंश यांच्या आधारे उदयास आल्या. समानता आणि बंधुता या संकल्पनेचा केवळ तत्वतः सन्मान करण्यात आला. समकालीन इतिहासकार उच्च आणि नीच कुळातील जन्माच्या व्यक्तींबद्दल संदर्भ देतात

आणि त्यांचा तिरस्कारहि करतात. तेथे दोन विशेषाधिकारित वर्ग होते: उमार किंवा कुलीन आणि उलेमा किंवा धर्म संबधित इतर लोक.

इस्लामच्या भारतातील सुरुवातीच्या शतकात मुस्लिमांमध्ये अरब आणि गैर-अरब असा फरक होता. अरब लोक स्वत:ला अरब नसलेल्या मुसलमानांपेक्षा श्रेष्ठ मानत. ते समाजातील उच्च पदांवर मक्तेदारी प्रस्तापित केली होती. प्रेषित मोहम्मद यांच्या जन्मभूमीतील असल्याचा अरबांना अभिमान होता. अरबी लोकांपैकी ज्या कुरेशी समुदायाशी संबंधीत होते ते इतर अरबांपेक्षा श्रेष्ठ मनात. प्रेषित मोहम्मदाची मुलगी फातिमाच्या वंशाचा दावा करणारे सय्यद हे मुस्लिमांमधे स्वताला सर्वोच्च मानत. ब्राह्मणांनी हिंदूमध्ये केलेल्या दाव्यासारखा मुस्लिमांमधील सय्यदाचा दावा होता.

मध्य आशियाई अरबांच्या बरोबरीने पर्शियन मुसलमान लोक मुघल सेवेत नोकरीसाठी किंवा अरब व पर्शियाशी व्यापार करण्यासाठी भारतात आले होते. अब्बासी खलीफाच्या काळात पर्शियनाचा प्रभाव वाढत गेला. बरेचसे पर्शियन शिया होते. त्यांना स्वताच्या प्राचीन संस्कृतीचा प्रचंड अभिमान होता आणि ते अरबांपेक्षा स्वताला श्रेष्ठ मानत. राजकीय सत्ता संपादन हाती आल्यावर पारसी लोक अरबांपेक्षा आपले श्रेष्ठत्व सांगू लागले. त्याचप्रमाणे जेव्हा राजकीय सत्ता तुर्कांच्या हाती गेली तेव्हा तुर्कांनी सर्वांवर वर्चस्व प्रस्तापित करण्याचा प्रयत्न केला. अशा प्रकारे, काळाच्या ओघात हा समाज सय्यद, शेख, मोगल, पठाण आणि भारतीय-मुसलमान या वंशीय गटात विभागला गेला.

भारतीय मुसलमान जे हिंदू धर्मांतरीत होते ते परदेशी मुसलमानांपेक्षा मोठ्या संख्येने होते. सांप्रदायिक मतभेदांमुळे मुसलमान समाज पुन्हा अनेक गटात विभाजित झाला. हिंदूंनी इस्लामला धर्म स्वीकारूनहि त्यानी पूर्वीच्या काही वैशिष्ट्यपूर्ण सामाजिक प्रथा कायम ठेवल्या. मध्य आशियाई मुस्लिम आणि काही पर्शियन जे वर्णाने काळे होते ते सेवेचाकरीसाठी बहुतेक उत्तर भारतात आढळून आले आणि त्यांच्यातील बरचशी संख्या विजापूर, अहमदनगर आणि गोवळकोंडा दरबारात आढळली. मुस्लिम न्याय व्यवस्थेत परदेशी मुस्लिमांचे वर्चस्व होते.

अरबांव्यतिरिक्त तुर्क, मंगोल आणि उझबेग तसेच अबीसिनियन आणि आर्मेनियन लोकांचा भरणा होता. उत्तर भारतातील काही भागात अफगाणिस्तानी देखील बऱ्यापैकी होते. अशाप्रकारे मुस्लीम समाजात जातीय भेद निर्माण होण्यात इस्लामवर हिंदूस्तानचा उल्लेखनीय प्रभाव होता. हिंदू समाजात जसे व्यक्तीचे सामाजिक दर्जा स्पष्टपणे दर्शवितात तसे मुसलमानांमध्ये जातीव्यवस्थेचे अस्तित्व होते असे प्रा. मोहम्मद लोबेल यांनी मान्य केले आहे. त्यांच्या मते, ' मुस्लीम धार्मिय साहसी-सेनेने निरनिराळ्या क्षेत्रांत योगदान केले आहे. तसेच ते आपल्या बंधुवर्गाशी नेहमी भांडत राहतात आणि हिंदूसारख्या जाती-पोट-जाती निर्माण केल्या आहेत. हि बाब खरंच हिंदूंना चकित करणारी आहे. मुस्लीम समाज दुहेरी जातीव्यवस्थेने त्रस्त होता, ज्या मुसलमानांनी हिंदूंकडून शिकल्या किंवा त्यांचा वारसा आत्मसात केला.

## ५.३ हिंदू समाज

मध्ययुगीन कालखंडात भौगोलिक परिस्थितीनुसार थोडे बदल वगळता हिंदू समाजाची सामाजिक रचना भारताच्या बऱ्याच भागांसारखीच होती. मध्य आशिया, तुर्क, मुघल,

अफगाण इ. च्या आक्रमणामुळे उत्तर भारतातील हिंदूंचे अस्तित्व धोक्यात आले असल्याचे चित्र निर्माण झाले होते. या काळात हिंदूंमध्ये तीव्र धार्मिक रूढीवाद दिसून येतो. ब्राह्मण, क्षत्रिय, वैश आणि शूद्र म्हणून समाजाचे विभाजन अनेक जाती विकसित झाल्या. राजपूत आणि इतर पारंपारिक क्षत्रिय जातींच्या अपयशामुळे अनेक हिंदुना इस्लाम धर्माचा आश्रय घेणे भाग पाडले.

लढवू क्षत्रीयांची शक्ती दुर्बळ ठरल्याने हिंदूंच्या मालमत्तेचे आणि स्त्रियांचे रक्षण करण्यास असमर्थ ठरले. मात्र ब्राह्मण वर्गाची शक्ती वाढली आणि त्यांनी समाजातील अनेक परंपरांना ताठर स्वरूप दिले. शिक्षण आणि अध्यापन हे ब्राह्मण वर्णापर्यंत मर्यादित राहिले. बहुसंख्य जनता अज्ञानी, अशिक्षित आणि अंधश्रद्धाळू होती. त्यांना वाचवण्यासाठी दैवी शक्ती, पुराण किंवा पौराणिक कथांचे अवास्तव स्तोम माजविले.

इस्लामच्या भारतातील अस्तित्वाविषयी हिंदू समाजाची पहिली प्रतिक्रिया म्हणजे धार्मिक आणि सामाजिक कायद्यांचे अधिक कठोर पद्धतीच्या रूपात संरक्षक चिलखत स्वीकारणे होय. हिंदू सवर्ण वर्गाने सर्वात खालच्या वर्गाला लागू केलेले अस्पृश्यतेचे तत्व मुस्लिमांनाहि लागू केले. इस्लामच्या संसर्गाला प्रतिकार करण्यासाठी आणि ज्यांना हिंदू समाजात सामावून घेता येत नाही त्यांच्यासाठी उंच सामाजिक निर्बंधाच्या भिंती उभी करून त्यांना दूर अंतरावर ठेवले.

तथापि, भारतातील हिंदू लोकामधे एकसमानता नव्हती. हिंदू समाज सवर्ण आणि अस्पृश्य अशा अनेक जाती आणि पोट-जातींमध्ये विभागल्या गेलेल्या हिंदू सामाज सरचनेची ताठर व्यवस्था निर्माण झाली. ब्रह्मण, क्षत्रिय, वैश्य आणि शूद्र हि सामाजिक संरचनेत चार प्राथमिक जाती आहेत. उत्तर भारतात हिंदूंमध्ये उच्च वर्णात मुख्यत: राजपूत (ब्राह्मण, कायस्थ) आणि वैश्य जातीचे होते परंतु ते आपापसात रोटी आणि आणि बेटी व्यवहार करीत नसत.

सामर्थ्यशाली मुस्लिम समुदायाच्या अस्तित्वामुळे जातीव्यवस्था अधिक ताठर बनली. मुस्लीम धर्म स्वीकारणाऱ्या हिंदुना सवलती बहाल करण्यात राज्यकर्त्यांना जास्त रस होता. राजपूत लढवाय वर्ग होता आणि त्यांचे नेते शाही सेवेत उच्चपदस्थ मनसबदार होते. ब्राह्मण सामान्यत: यज्ञादी व्यवसाय आणि अध्यापनात गुंतलेले होते. वैश्य किंवा बनिया व्यापारी उद्योग - दुकानदारी, स्थानिक व्यापार तसेच अंतर्देशीय व्यापारात गुंतले होते. कायस्थ हे लिपीक, सचिव आणि महसूल अधिकारी म्हणून मोठ्या प्रमाणात गुंतले होते. मध्यमवर्गीय हिंदू जमीनीचे तसेच भूमिहीन मजूर म्हणून शेती व्यवसायात गुंतले होते.

मध्ययुगीन काळात भारतावर मुस्लिम राज्य स्थापनेचा भौतिक परिणाम ब्राह्मण आणि क्षत्रियांच्या पारंपारिक हक्क आणि अधिकारावर झाला. हिंदू राज्ये नष्ट झाल्यामुळे ब्राह्मण लोकांचे प्रशासनातील महत्व कमी झाले. याशिवाय त्यांच्या वाङ:मयीन कामगिरी आणि अध्यापन संस्थाना राजाश्रय बंद झाला. क्षत्रियांनी आपली राजकीय सत्ता तुर्क आणि मोगलांना गमावली. याशिवाय बऱ्याच जणांनी लष्करी पेशातून आपले जीवनमान सुधारण्याची करण्याची संधी गमावली.

राजकीय-आर्थिक जीवनातील बदलांचा परिणाम जातीय गटाच्या स्थित्यांतरवर तरावर झाला. प्रस्थापित व्यवस्थेतूनच उत्तर व दक्षिण भारतात कांही नवीन जाती नावारूपाला आल्या. उत्तर भारतातील असंख्य कृषक उपजातींपैकी कायस्थ सरकारी नोकर म्हणून

लोकप्रिय झाले. पंजाबचे खत्री सावकार आणि यशस्वी प्रशासक बनले आणि त्यांचा प्रभाव संपूर्ण भारतभर पसरला. महाराष्ट्रातील कोकणस्त आणि चित्पावन ब्राह्मणानी उत्कृष्ट प्रशासक निर्माण केले. दक्षिण भारतात ब्राह्मणांनी आपले सामाजिक नेतृत्व टिकवून ठेवले आणि ते सतत हिंदू धर्माचे रक्षक राहिले.

मध्ययुगीन काळात अनेक धार्मिक पंथांचा उदय झाला. श्री शृंगेरीच्या शंकराचार्यांनी बौद्ध आणि जैन धर्माच्या प्रसाराला आळा घालण्यासाठी हिंदूची धार्मिक श्रद्धा बळकट केली आणि हिंदू समाजाला त्याच्या दृष्टीनुसार आकार देण्याचा प्रयत्न केला. त्याचा प्रभाव संपूर्ण भारतभर पसरला. तथापि, १२ व्या शतकापासून हिंदू समाजावर इस्लामच्या प्रभावामुळे बरेच धार्मिक पंथ निर्माण झाले आणि प्रत्येक पंथ जनमान्यतेसाठी इतरांशी स्पर्धा करीत होता. नाथपंथ, भक्तीपंथ, भैरवि, शक्ती हे त्या काळातले सर्वात महत्त्वाचे लोकप्रिय धर्म पंथ होते. बौद्ध धर्म आणि जैन धर्माचा प्रभाव कमी झाल्यामुळ भक्ती पंथाला सर्वत्र मान्यता मिळू लागली. विठ्ठलाच्या भक्तांनी असहिष्णु आणि अत्याचारी राज्यकर्त्यांनी केलेल्या अत्याचारांपासून त्यांची मुक्तता व्हावी यासाठी आराधना करीत. संत परंपरेने तारणकर्त्याच्या येण्याची वाट पाहण्याची सहनशीलतेची शिकवण दिली. खरं तर सामाजिक रचनेवर त्यांचा विश्वास आहे.

## ५.४ अस्पृश्यता

हिंदू धर्मग्रंथ हिंदू समाजाचा पाया आहे. धर्मग्रंथामधून म्हणजेच वैदिक वांङ:मय, श्रुती,स्मृती, पुराणे यामधून चातुर्वण्याचा जन्म झाला. या चातुर्वण्याच्या विषवृक्षाला असंख्य अशा उच्च नीच, श्रेष्ठ कनिष्ठ जातीची कडू फळे आली आहेत. धर्मग्रंथात- धर्मशास्त्रात शुद्र, अतिशूद्र, चांडाळ, दास, दासू ,अत्यंज, अंत्य, अन्तवासिन हिन कनिष्ठ अश्या अनेक जातींचा उदय झालेला आहे. अश्या जातीनी हिंदू समाजाच्या तळाच्या-खालचे पायरीचे, हीन दर्जाचे म्हणून अस्पृश लेखले आहे, मानले आहे.

हिंदू समाजातील एका जातीने दुसऱ्या जाती बरोबर कसे वागावे याची नियमावली कायदे-कानुनाच्या स्वरुपात धर्मग्रंथात ग्रंतीत केली आहे. उच्च-वरिष्ट जातीने खालच्या कनिष्ठ जातीवर कोणती बंधने, निर्बंध लादावीत याची यादी यात आहे. तसेच धर्म ग्रंथात वरिष्ठ जातींनी कोणते हक्क-अधिकार उपभोगावेत, वापरावेत हे लिखित करून अधोरेखित केले.

अस्पृशातेचे मूळ **-**अस्पृशातेच्या उत्पातीविषयी बरेच सिद्धांत आहेत. सर्वसामान्यपणे याची उत्पती पुरातन काळापासूनची आहे, कदाचित चार ते पाच हजार वर्षांपूर्वीची असेल असे मानले जाते. आर्यांनी आपल्या उत्तर भारतातील स्वाऱ्यात मूळच्या अनार्यांना- रहिवाश्याना जिंकल्यावर जीत अनार्यांना जेत्या आर्याबरोबर मिळते जुळते घ्यावे लागले. यांना आर्यांनी वर्ण व्यवस्थेत शूद्रांच्या चौथ्या वर्णात प्रवेश दिला असावा. आणि जे मुलनीवासी जमाती उदा. चांडाळ, निषाद आदि ग्रामबाह्य जाती वर्णव्यवस्थेच्या बाहेर राहिले. तेच अंत्यनिवासी अतिशूद्र ओळखले गेले असावे. डॉ. आंबेडकरानी, अस्पृश्य मुळचे कोण होते? या ग्रंथात अस्पृश्य, अंत्य, अन्त्यावासीन ग्रामबाह्य अतिशूद्र, पंचामवर्ण जमातींच्या नावाचा उल्लेख कोण कोणत्या धर्म ग्रंथात आणि स्मृती ग्रंथात आलेला आहे याची यादीच दिली आहे. यावरून अस्पृश्य- अतिशूद्राचे चे चातुर्वण्य व्यवस्थेतील स्थान वर्णा बाहेरचेच होते हे स्पष्ट होते.

## ५.५ भारतातील गुलामीचे मूळ

हिंदू धर्माला व समाजाला साजेसे रूप देण्याचा सनातनी प्रयत्न आपणास मनुस्मृतीत आढळतो. मनुस्मृतीच्या १० व्या अध्यायातील चवथ्या श्लोकात, ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य हे तीन वर्ण दोनदा जन्मतात म्हणजे सृष्टी क्रमाने व नंतर उपनयन संस्काराने. शुद्र फक्त एकदाच व त्यांना उपनयानाचा अधिकार नाही. मनुस्मृती १० अध्यायाच्या बाराव्या श्लोकात चांडाळाच्या उत्पती विषयी सांगितले आहे. शुद्र पुरुष व ब्राह्मण, क्षत्रिय आणि वैश्य वर्णातील स्त्री संबध झाल्याने जी प्रजा उत्पन होते तीला अनुक्रमे आयोगाव, क्षत्र आणि चांडाळ अशी नावे आहेत. मानुस्मृतीत चारी वर्ण पेक्षा पाचवा वर्ण नाही. शूद्रास आणि अतिशुद्रास एकाच सामाजिक दर्जाने मोजले असावे. तसेच इतर स्मृती, श्रुती आणि पुराणे यांनी शुद्र आणि अतिशुद्राना समान सामाजिक दर्जा अनुसरला.

थोडक्यात मनुस्मृती पुराणांनी चांडाळादि अतिशुद्राचा सामाजिक दर्जा अधिकच हीन ठरवून त्यांना अस्पृशातेच्या पक्क्या स्थानावर आणून बसविले. वास्तविक मौर्योत्तर काळात चातुर्वर्ण्य व्यवस्थेतून पुढे पुढे उच्च नीच जाती जमाती निर्माण झाल्या. त्याच जाती व्यवस्थेची परिणीती गावाबाहेर राहणाऱ्या चांडाळादि अतिशूद्र अस्पृश्य जातीवर शिक्कामोर्तब केले. पुढे गुप्तांच्या काळात अस्पृशता पक्की झाली. अस्पृश्यता वंशभेद, धंद्यामुळे, बुद्ध धर्माच्या द्वेषामुळे आणि गोमांस भक्षण केल्यामुळे या चार कारणामुळे जन्मास आली. अस्पृश्यतेची उत्पत्ती वर्णद्वेष, जातीव्देष,जीत-जेते मत्सर यातून निर्माण झाली हे निशित आहे. अस्पृशातेच्या उत्पत्तीला निश्चित अशी सांस्कृतिक जडण घडण, इतिहासातील कालक्रम व घटनाची साक्ष आहे. मनुस्मृतीतील अस्पृश्यतेची वर्णसंकरातून झालेले उत्पत्ती खोटी आणि काल्पनिक वाटते.

माणूस कोणत्याही प्राण्याला स्पर्श करू शकतो पण एका विशिष्ट जातीमध्ये जन्मलेल्या माणसास नाही ही कल्पना धक्कादायक आहे. शुद्धतेची कल्पना जातीच्या उत्पत्तीमध्ये एक घटक असल्याचे आढळले आहे. मध्ययुगीन काळातील राजकीय परिस्थितीमुळे हिंदू समाजाची सामाजिक रचना बदलली नव्हती. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या मते अस्पृश्यता हा हिंदू तत्वज्ञानाचा अविभाज्य भाग आहे.

जातींच्या आधारे नागरिकांमध्येहि भेदभाव केला जात असे. अस्पृश्य लोक गावकुसाबाहेर राहत असत. हे लोक गरीब, मागासलेले आणि शिक्षण व शिक्षणाविषयी अज्ञानी होते. कित्येक काळापासून उच्च जातींनी दुर्लक्ष केल्यामुळे त्यांना सामाजिक आणि आर्थिक पंगुत्व आले, ज्यामुळे त्यांचे जीवन दयनीय झाले. मुस्लीम राजवटीत उच्च जातीतील हिंदूंनी त्यांची जातीची रचना अधिक कठोर बनविली जेणेकरून उच्च सामाजिक रचनेत त्यांचा प्रवेश रोखला गेला.

मध्ययुगीन काळात अस्पृश्यांना अगदी खेड्याच्या बाहेरील भागातही राहण्याची परवानगी नव्हती, त्यांना गावाच्या वेशी बाहेरच राहावे लागले. त्यांना त्यांच्या गळ्यामध्ये मातीचे मडके बांधावे लागे ज्यामध्ये त्यांना थुंकावे लागे कारण त्यांच्या थुंकीलाही अपवित्र मानले जात होते. समकालीन नोंदी दर्शवितात की महाराष्ट्रातील महारांना दुपारी तीन ते सकाळी नऊ दरम्यान पूना शहरात प्रवेश करण्यास परवानगी नव्हती. कारण रस्त्यावरील त्यांच्या लांब सावलीने उच्च जातीतील लोकांना विटाळ होत असे.

अस्पृश्यांच्या स्पर्शाने लाकूड व धातूही दूषित होतात असा अंधविश्वास होता. त्यांचा स्पर्श अपवित्र या कारणावरून त्यांना अनेक नागरी हक्क नाकारले गेले. खेडेगावाचे पुजारी, सर्व ग्रामस्थ त्यांना सेवा देण्यास नकार देत. त्यांना मंदिरात प्रवेश करण्याची परवानगी नव्हती. ते मंदिराच्या बाहेरील प्रवेशद्वारातून मंदिरातील देवताची उपासना किंवा प्रार्थना करत.

संत संप्रदायामुळे माणसाला त्याची जातपात विचारात न घेता पुरुष व स्त्रियांना देवाची भक्ती करण्याचे स्वतात्र्य मिळू शकले. त्यामुळे समाजात असलेल्या उच्च-नीच अश्या वर्णाश्रम धर्मावर आधारलेल्या जातीत कठोरपणा कमी झाला. संत संप्रदायामुळे असे असलेतरी धर्म शास्त्रातील कर्मकांड, विधी उपासना यापेक्षा परमेस्वराच्या भक्तीला, अराधनेला अधिक महत्व दिले.

जातीव्यवस्था इतकी खोलवर रुजली होती की त्या काळातील  कोणत्याही धार्मिक सुधारकांच्या उदारमतवादी प्रयत्नामुळे बदलू शकली नाही. संत वाङ:मयामुळे वर्णाश्रमधर्मातील व्यवहाराला एकप्रकारे परत पुन्हा  मान्यता (पावित्र्य) मिळून त्याचे पुंरुज्जीवन झाले व ते पक्के झाले. मध्ययुगीन संतानी एकदा धर्मशास्त्राला वर्णाश्रमधर्माला प्रतिकूल किंवा अनुकूल असे विचार आपली वाङ:मयातून मांडले. काळाच्या प्रवाहाविरुद्ध जावून त्यांनी धर्मशास्त्र व वर्णाश्रमधर्माविरुद्ध आपल्या वाणीचे, विचारकृतीचे पाउल उचलले असते तर त्यांनी खऱ्या अर्थाने समाज क्रांतीच झाली असती.

## ५.६ मध्ययुगीन कालखंडातील गुलाम प्रथा

**दिल्ली सल्तनत काळातील गुलाम प्रथा:** सल्तनत काळात गुलाम (दास) पद्धत खूप मोठ्या प्रमाणात प्रचलित होती. गुलाम पद्धत सामाजिक प्रतिष्ठेच प्रतिक होती. सुलतान त्याचे सामंत किंवा उच्चभ्रू वर्ग त्यांच्याकडे गुलाम ठेवत असत. गुलाम स्त्री आणि पुरुष दोघेपण होते. इतिहासकार बरणीच्या मतानुसार सुलतानाचे जेवढे जास्त गुलाम तेवढी त्याची शक्ती मोठी आणि जास्त प्रतिष्ठा. घरकामापासून ते युद्धापर्यंतचे सर्व कार्य गुलामांना करावे लागत. सल्तनत काळापूर्वी भारतामध्ये दासप्रथा (गुलाम) अस्तित्वात असल्याचे दिसते. हिंदू स्मृतीमध्ये १५ प्रकारच्या गुलामांचे वर्णन पाहायला मिळते.

**गुलाम (दास) मिळवण्याचे मुख्य स्त्रोत:** (गुलामांचे) दास दासींचे बाजार भरत असत आणि त्यांची जनावरांसारखी खरेदी विक्री होत असे. गुलामांच्या खरेदी विक्रीचा मोठा बाजार दिल्लीला होता. **कामरूप** (आसाम) येथील गुलामांची मागणी जास्त होती कारण ते काम करण्यासाठी शारीरिक ताकतवर होते. **इब्न बतुता** च्या मते त्यांची किमत इतर गुलामांपेक्षा जास्त होती. **इब्न बतुता** बंगालच्या दासी मुलींच्या खरेदी विक्रीचे वर्णन करतो. आफ्रिकेसारख्या इतर देशांमधूनपण गुलामांची आयात केली जात होती. बंगाल आणि मलय येथून हिजड्यांचा व्यापार होत असे. त्यांची नियुक्ती शाही हराम मध्ये केली जात होती. गरीब लोक आपल्या मुलांना विकत असत. दुष्काळामुळे **कोरोमंडल** किनाऱ्यावर लोक भूखेमुळे मरत होते असे **बार्बोसा** वर्णन करतो. येथे लोक आपल्या मुलांना विकत असत. **कर्जदार** स्वत:च्या मुलांना विकत असत. काही वेळा सैन्य शेजारील गावांवर आक्रमण करून तेथील लोकांना गुलाम करत असत. **युद्धात पराभूत** झालेल्या सैन्याला पकडून त्यांना गुलाम केले जात असे. **महमूद गझनीने** संपत्तीबरोबरच हजारो कैद्यांना आपल्यासोबत नेऊन त्यांना गुलाम म्हणून विकले होते. **फिरोज तुघलका**च्या काळात त्याच्या वैयक्तिक गुलामांची संख्या एक लाख ऐंशी हजार झाली होती. त्या गुलामांचे व्यवस्थापन करण्यासाठी **दिवाण-ए-बंदगान** या वेगळ्या विभागाची स्थापना केली होती.

**गुलामांची किंमत/मूल्य :** समकालीन इतिहासकार सुलतान अल्लाउद्दीनच्या काळातील दिल्ली येथील गुलामांच्या बाजारामध्ये गुलामांच्या किंमतीची सूची देतात. सामान्य **दासीची** किंमत **५ ते १२** टंका होती. सुंदर दासीची किंमत **२० ते ३०** टंका होती. रूपवती दासीला **४०** टंका पर्यंत खरेदी केले जात असे. **बरणी**च्या मते बंगालमधील रूपवान दासीची किंमत सोन्याच्या एक दिनार पर्यंत होती. मुलीच सुंदरता आणि तिच्या शरीराच्या रचनेनुसार किंमत वाढत जाऊन १०० टंका किंवा त्यापेक्षा अधिक पण असे. सुंदर गुलाम मुलांची किंमत १०० ते २०० टंका पर्यंत असे. मलिक काफुरला हजार दिनारी म्हटले जाते. याचा अर्थ तो हजार दिनारला खरेदी केला होते.

**मालक-गुलाम (दास) संबंध :** गुलामांप्रती मालकाकडून माणुसकीच्या वागणुकीची अपेक्षा असे. गुलामांना गुलामीतून मुक्त करणे हिंदू आणि मुस्लीम समाजात खूप पुण्याचे काम समजले जाई. गुलामांना मुक्त करतेवेळी हिंदू मालक गुलामाच्या डोक्यावरून पाण्याची घागर उतरून फोडून त्याच्यावर तांदूळ फेकत 'तुला गुलामीतून मुक्त केले आहे' असे म्हणत असे. मुस्लीम समाजात 'मुक्ती पत्र' देण्याची पद्धत होती. गुलामांना त्याच्या मालकाची आज्ञा पाळावी लागत असे. त्याला पळून जायची परवानगी नव्हती.

**गुलामांचे कार्य :** घर काम, शेती काम, सेवकाचे काम, युद्धामध्ये सैनिक मानून कार्य, व्यापारात मदत करणे इत्यादी कार्य दास दासिंकडून कामे करवून घेतली जात असे. दासींना शारीरिक भोगासाठी त्यांचा वापर केला जात होता. शाही हरम साठी विशिष्ट प्रकारच्या दासांची (हिजडे) नियुक्ती केली जात होती. सुलतानाच्या सेवेसाठी नियुक्त केलेल्या गुलामांना स्वत:च्या उन्नतीसाठी चांगली संधी असे. शाही महाल, दरबारामध्ये गुलाम वेगवेगळ्या पदावर कार्यरत असत. गुलामांची नियुक्ती अगोदर छोट्या पदांवर केली जाई आणि नंतर प्रगती पाहून इक्ताचा 'मुक्ता' पर्यंत त्यांची नियुक्ती करत. सुलतान आपल्या गुलामांना गुप्तहेर म्हणून नेमत असे. अल्लाउद्दिन खिलजी आपल्या गुलाम मुलांना बाजारामध्ये पाठवून वस्तूंच्या किंमतींची माहिती घेत असे. इब्न बातुताच्या मते मुहम्मद तुघलक आपल्या गुलामांना 'अमीर' सरदारांच्या घरी नौकर म्हणून पाठवत असे आणि त्यांच्या हालचाली काय चालल्या आहेत हे जाणून घेत असे. गुलामांना सुलतानाचे अंगरक्षक म्हणून नियुक्त केले जाई. सुंदर गुलाम मुलींना गायन वादनाचे प्रशिक्षण देऊन दरबारी नर्तकी म्हणून ठेले जात. काही गुलाम शाही कारखान्यामध्ये काम करत.

सुलतान काळाच्या प्रारंभी गुलाम (दास) सुलतानांची शक्ती/ताकत होते. गुलाम घराण्याचा संस्थापक कुतुबुद्दीन ऐबक मुहम्मद घोरीचा गुलाम होता. अल्तमश आणि बल्बन प्रारंभी गुलाम होते परंतु प्रगती करत करत ते सुल्तान बनले.

**मुघल काळातील गुलाम (दास) :** मुघल कालखंडात गुलामी हे सामाजिक, आर्थिक आणि राजकीय संरचनेचा एक महत्त्वाचा भाग होते, परंतु ही गुलामी इतर जगातील गुलामगिरीच्या तुलनेत वेगळी होती. मुघल साम्राज्यातील गुलामीचे काही मुख्य पैलू खालीलप्रमाणे:

### १. गुलामीचे प्रकार

**सैन्य गुलाम:** मुघल साम्राज्यात गुलामांचा युद्धामध्ये सैन्य म्हणून वापर केला जाई. गुलामांना राजदरबारात अंगरक्षक म्हणून नियुक्ती केली जात होता. गुलाम स्वकर्तृत्वाने सैन्य, संरक्षण किंवा प्रशासनातील उच्च पदांवर पोहोचू शकत असे.

**घरकाम:** गुलामांना घरकाम, मुलांची काळजी घेणे, आणि आपल्या मालकांसाठी इतर सेवा करण्यासाठी वापरले जात होते. मुघल सम्राट आणि सरदार त्यांच्या राजवाड्यात अनेक गुलाम ठेवत.

**शेती काम:** काही गुलाम शेतमजुरीसाठी वापरले जात. मुघल साम्राज्यात ज्या भागात विस्तार करण्यात आला होता, तिथे भव्य किल्ले, बागा, आणि मस्जिदांची बांधकामे करण्यासाठी गुलामांची मदत घेतली जात असे.

## २. गुलामांचे स्रोत

**युद्ध कैदी:** मुघल कालखंडात अनेक गुलाम हे युद्धातील बंदी होते.

**गुलामांचा बाजार:** गुलामांची खरेदी-विक्री विविध बाजारात केली जात असे. काही गुलाम मध्य आशिया, आफ्रिका आणि दक्षिणेतून वेगवेगळ्या बाजारातून खरेदी करत असत.

**भारतीय गुलाम:** विदेशी गुलामांच्या सोबतच भारतीय लोकांनाही गुलाम बनवले जात असे. विशेषत: गरीब, मागासलेल्या जाती किंवा कर्जाच्या तडजोडीनुसार काही लोकांना गुलाम बनवले जात.

## ३. गुलामांचे स्थान आणि भूमिका

**राजकीय आणि सैन्य भूमिका :** अनेक गुलाम विशेषत: सैन्य गुलाम उच्च स्थानांवर पोहोचू शकत होते. एक प्रसिद्ध उदाहरण म्हणजे मीर्झा रफी अल-दराजत गुलाम होता पण तो सम्राटाचा मुख्य मंत्री बनला. काही गुलाम स्वकर्तृत्वाने सैन्यामध्ये सैन्य प्रमुख, सेनापती, आणि महत्त्वाच्या पदावर जाऊ शकले.

**सुलतानशाहीचा प्रभाव :** मुघल साम्राज्यातील गुलामीचा प्रभाव दिल्ली सुलतानशाहीकडून घेतला होता. सैन्यातील गुलामांना उच्च पदांवर जाण्याची संधी होती. हीच परंपरा मुघल कालखंडात कायम होती.

**सामाजिक स्थान :** गुलाम समाजातील सर्वात खालच्या स्तरावर होते, पण त्यांचे स्थान त्यांच्या कामावर आणि त्याच्या स्थानावर अवलंबून वेगवेगळे होते. सैन्यातील किंवा दरबारातील गुलाम चांगले राहत असले तरी कामगार किंवा घरकाम करणाऱ्या गुलामांना इतरांच्या तुलनेत वाईट परिस्थितीला सामोरे जावे लागे.

## ४. सम्राट अकबराच्या सुधारणा

सम्राट अकबर (१५५६–१६०५) आपल्या मानवतावादी आणि सुधारकी धोरणांसाठी प्रसिद्ध होता. त्याने काही प्रमाणात गुलामप्रथा बंद केली. युद्धानंतर महिलांना आणि मुलांना गुलाम बनवण्यास मनाई केली. अकबरने गुलाम व्यापारावर

काही प्रमाणात नियंत्रण ठेवले आणि त्याने काही गुलामांना मुक्त केले किंवा त्यांच्या कार्याची योग्य ती कदर केली.

### ५. गुलाम प्रथेचा ऱ्हास

**मुघल साम्राज्याचे पतन:** १८ व्या शतकात मुघल साम्राज्याचे पतन होऊ लागले आणि गुलामांच्या व्यापारामध्ये घट होऊ लागली. युरोपियन सत्ता विशेषत: ब्रिटिश भारतावर वर्चस्व प्रस्थापित करू  लागले त्यामुळे श्रमाच्या नव्या प्रकारांचा उगम झाला. परंतु गुलाम प्रथा काही भागात अद्याप अस्तित्वात होती.

**ब्रिटिशांचा प्रभाव:** ब्रिटिशांनी वासाहतिक काळात काही कायदे करून गुलाम प्रथा बंद करण्याचा प्रयत्न केला.

मध्ययुगीन कालखंडातील गुलामी ही बहुआयामी होती. यामध्ये सैन्य, घरकाम आणि कामगार अशा प्रकारच्या गुलामांचा समावेश होता. काही गुलामांना विशेषत: सैन्य किंवा प्रशासनात उन्नतीची संधी होती पण बहुतेक गुलामांची परिस्थिती अतिशय वाईट होती.

## ५.७ वेठबिगारी

वेठबिगारी म्हणजेच मोबदल्याशिवाय, विनावेतन, बिनपगारी चाकरी होय. भारत मध्ये आठव्या व नवव्या शतकापासून वेठबिगारीची पद्धत रुढ होती. ती पुढे सुलतान, मुघल, मराठे पेशवेकाळातही चालू राहिली. बेगर म्हणजे सामान्यत: मजुरी न मिळालेली सक्तीचे काम दर्शवते.  एकतर जमीनदारांचे उत्तर भारताच्या कृषी व्यवस्थेत वर्चस्व होते. जमीनदार लोकांना शेतीमध्ये बेगार म्हणजे श्रम जबरदस्तीने करण्यास भाग पाडे किंवा कोणत्याही मोबदल्याशिवाय  किंवा नाममात्र वेतनावर राबावे लागे.

वेठ  (किंवा वेठी किंवा वेट्टी-चाकरी हा शब्द , संस्कृत शब्द विस्टी तयार झाला असून याला बेगर (पर्शियन भाषेत) देखील म्हटले जाते, ही प्राचीन, मध्ययुगीन आणि स्वातंत्र्यपूर्व भारताच्या काळात जबरदस्तीने काम लोकांकडून काम करवून घेणारी  एक यंत्रणा होती, ज्यामध्ये लोकांना विनावेतन कोणतीही  कामे करण्यास भाग पाडले जात असे. वेठ घेण्यास नकार म्हणजे कारावास किंवा दंड होता.

गुप्तोत्तर काळापासून मोठ्या प्रमाणावर  जमीन-लागवड सुरु झाल्याने ग्रामीण भागात जमीनदारांचा वेगळा गट तयार झाला होता. सातव्या शतकापासून देणगी म्हणून लागवड जमिनी व्यतिरिक्त कुरण, झाडे, जलसंपदा इत्यादी देण्यात आल्या. जमीन मालक शेतकऱ्याकडून नियमित आणि अनियमित कर वसूल करतात. 'भाग', 'भोग' वगैरे नियमित कर चालूच होते  आणि करांव्यतिरिक्त जमीनदार इतर अनेक कर शेतकऱ्याकडून वसूल करत. शेतकऱ्यांवर लादलेला सर्व कर भरण्याचे बंधन होते. जमीनदार स्वत:च्या इच्छेनुसार शेतकऱ्याकडून जमीन हस्तगत करून हाकलून देण्यास मोकळे होते आणि त्याऐवजी नवीन शेतकऱ्यांची नेमणूक करण्याचा अधिकार होता.

अनियमित करवसुलीमुळे जमीनदारांची शक्ती व स्थिती बळकट झाली, तर यामुळे शेतकऱ्यांची स्थिती खालावली. उत्तर भारतमध्ये आठव्या व नवव्या शतकात 'विष्टी' किंवा

सक्तीची मजुरी करणे ही सामान्य गोष्ट होती. या काळातील अनेक जमीन देणगीपत्रानुसार शेतकऱ्यांना जमीनदारांच्या आदेशांचे पालन करावे लागे. जरी शेती योग्य जमिनीचा विस्तार झाला असला तरी, शेतकऱ्यांची परिस्थिती ढासळली.

या काळात जमीन उत्पन्न हे राज्याच्या उत्पन्नाचे मुख्य स्त्रोत होते. शेतकऱ्यांकडून गोळा केलेला जमीन कर साधारणपणे एकूण उत्पादनाच्या १/६ ते १/४ पर्यंत होता. जेव्हा जेव्हा सैन्य खेड्यांतून कूच करीत असे तेव्हा लष्कराला अन्न व निवारा देण्याची जबाबदारी ही खेड्यांची होती.

राज्यकर्ते "विष्टी" म्हणून जबरदस्तीने काम लादत असत, ज्यायोगे शेतकऱ्यांना कित्येक दिवस मजुरी न देता, राज्यकर्त्यांच्या शेतात काम करायचे होते. गुप्तोत्तर काळात असे मानले जाते की समाजातील 'शूद्र' वर्ण हा उच्च वर्णीयाचे पूर्वीचे नोकर होते. ते पुढे नोकर-गुलाम या पदावरुन शेतकऱ्यांपर्यंत आले होते. ह्यूएन-त्सांग त्याच्या लिखाणात 'शूद्र" हे कृषक होते असा उल्लेख करतो.

१६०० पर्यंत गुलामांचा कामगार म्हणून एक छोटा घटक तयार झाला. परंतु मुख्यत्वे त्यांची कामे घरगुती सेवेपुरती म्हणून मर्यादित होते. अकबर बादशहाने गुलामांच्या व्यापाराला व जबरदस्तीने गुलामगिरीत टाकण्याला पायबंध घातला. त्याने सर्व शाही गुलामांना मुक्त केले, ज्यांनी "शेकडो व हजारो लोकांची संख्या पार केली होती". परंतु घरगुती गुलाम आणि अंगवस्त्रे ही केवळ खानदानी घरातीलच नव्हे तर खालच्या अधिकाऱ्यांच्या आणि सधन लोकांच्या घरासाठीदेखील आवश्यक वैशिष्ट्ये म्हणून राहिले.

जबरदस्तीने काम करून (बेगार) घेण्याची प्रथा सामान्यत: अनैतिक मानली जात होती. ती विशिष्ट प्रांतीय व ग्रामीण जाती किंवा समुदायांवर लागू केलेली होती.

इ. स. १८०० पर्यंत वेठबिगारीची पद्धत चालू राहिली. तुर्क-मुघलांनी भारतावर स्वाऱ्या करून राज्ये स्थापन केली. अपापल्या राज्यात स्थिर सरकारे, राज्यकारभार चालवा यासाठी सर्व सुखसोई व संरक्षणे तयार करावी लागली. मराठे व पेशावाई काळातही सुखासोईची साधने निर्माण केली यासाठी वेठबिगारीचा अवलंब केला गेला.

वेठबिगारी मजुराकडून अनेक प्रकारची कामे करऊन घेतली जात. यामध्ये किल्ला बंधने, पोलीस ठाणे, कचेऱ्या बांधणे, तलाव, धरणे बांधणे, सरकारी धान्याची वाहतूक करणे, कुराणातून गावात लाकूड आणणे, सरकारी घोड्यांच्या पागेत काम करणे. गावाच्या चौकी बाजारात काम करणे, शिवाय राजे, पेशवे, सरदार, इनामदार, जहागीरदार, जमीनदार यांचे वाडे, बंधने इ. प्रकारची कामे वेठ-बिगारी माजुराकडून करून घेतली जात असत.

या वेठीस धरलेल्या बिगाऱ्यात मुख्यता दलित-अस्पृश वर्गातील बहुसंख्य मजूर असत. विशेषता: भूमिहीन मजूर, बाराबलुतेदार कष्टकरी यांचाही त्यात भरणा होता असे दिसते. वेठबिगार हा एक जुलमी शोषित जबरदस्तीचा कामाचा प्रकार होता. या वेठबीगारीमुळे अस्पृश्य-दालीतांवर प्रचंड अन्याय अत्याचार होत राहिला. या भयानक स्वरूपाच्या जीवघेण्या कामामुळे वेठीस धरलेले मजूर बऱ्याचवेळा पळून जात, परांगदाहि होत असत. कारण वेठबिगारी म्हणजे सवर्णाचा चाकर-सेवक हीच रूढी परंपरा होती.

## ५.८ प्रश्न

प्र.१ मध्ययुगीन काळातील जात आणि अस्पृश्यतेवर प्रकाश टाका.

प्र.२ मध्ययुगीन काळातील अस्पृश्यांच्या समस्या समजावून सांगा.

प्र.३ मध्ययुगीन काळातील गुलाम (दास) प्रथेवर भाष्य करा.

प्र.४ मध्यकालीन भारतातील वेठबिगारीचे वर्णन करा.

## ५.९ संदर्भ

१) Dr. Iswari Prasad - The Mughal Empire, Allahabad, १९७४.

२) Dr. R. Tripathi - Rise and Fall of te Mughal Empire, Allahabad, १९८१.

३) A. L. Shrivastav, The Mughal Empire, १५२६-१८०३, Shivlal-Agrawal, Agra.

४) S. R. Sharma - Studies in Medieval Indian Society, Solapur.

५) डॉ. धनंजय आचार्य, मध्ययुगीन भारत (१०००ते १७०७ ), नागपूर, २००८

६) शंकरराव खरात, सामाजिक चळवळीचा इतिहास,पुणे, २००६

७) मध्यकालीन भारत, विद्याधर महाजन, सं. चंद, दिल्ली. २००२

८) मध्यकालीन भारत, ओमप्रकाश सिंह, किताब महाल, इलाहाबाद, २००१.

❄❄❄❄❄❄❄

# ६

# मध्ययुगीन भारतातील शिक्षण व्यवस्था

**घटक रचना**

६.० उद्दीष्टे
६.१ प्रस्तावना
६.२ सुलतान कालखंडातील शिक्षण
६.३ मुघल कालखंडातील शिक्षण
६.४ सारांश
६.५ प्रश्न
६.६ संदर्भ

## ६.० उद्दीष्टे

- सुलतान कालखंडातील हिंदू शिक्षण पद्धतीची माहिती जाणून घेणे.
- सुलतान कालखंडातील मुस्लिम शिक्षण पद्धतीची माहिती जाणून घेणे.
- मोगल कालखंडातील हिंदू शिक्षण पद्धतीचा अभ्यास करणे.
- मोगल कालखंडातील मुस्लिम शिक्षण पद्धतीचा अभ्यास करणे.

## ६.१ प्रस्तावना

शिक्षण हा संस्कृतीचा एक भाग आहे. शिक्षण समाज घडविण्याचे प्रभावी साधन आहे. आपला सांस्कृतिक वारसा एका पिढीहुन दुसऱ्या पिढीपर्यंत पोचवण्याचा हा एक पद्धतशीर प्रयत्न शिक्षणातून होत असतो. समाजाची प्रगती शैक्षणिक पद्धतीवर अवलंबून असते. प्राचीन काळात भारत आपल्या शिक्षण केंद्रांसाठी प्रसिद्ध होता. मुस्लीम आक्रमणाने भारतातील अनेक शैक्षणिक प्राचीन केंद्रे उद्ध्वस्त झाली. तक्षशिला, नालंदा आणि विक्रमशीला इ. प्रख्यात शिक्षण केंद्रे बंद पडली. तथापि प्राचीन शिक्षण व्यवस्थेची हस्तलिखिते संग्रहित राहिली. गुजरात, राजस्थान आणि दक्षिण भारतालील राज्यकर्त्यांनी प्राचीन शिक्षण व्यवस्थेला संरक्षण दिले. सुखी जीवन व धार्मिक शिक्षण यांचा समन्वय साधण्याचा प्रयत्न मुस्लीम शिक्षणपद्धतीतून केला गेला. 'जो ज्ञानाचा शोध घेतो, तो अल्लाची उपासना करतो' अशी मुस्लिमांची श्रद्धा असल्यामुळे सक्तीच्या शिक्षणावर भर दिला जात असे. भारतात मुस्लिम सत्तेच्या स्थापनेपूर्वीच अन्य देशात मुस्लिम शिक्षणाला सुरवात झाली होती.

भारतामध्ये इ. स. १२०० ते इ. स. १७०० या कालावधीत मुस्लिम राजवट प्रामुख्याने दिल्ली सलतनत व मोगल काळ या दोन मुस्लिम राजसत्तांत विभागली आहे. सुरुवातीच्या मुस्लीम राज्यकर्त्यांच्या काळात शिक्षणाकडे फारसे कोणी लक्ष दिले नाही. पुढील काळातील शिक्षणाचा उदय धर्मप्रसारासाठी होऊ लागला. शिक्षणाकडे धर्मप्रसाराचे एक प्रमुख व प्रभावी साधन म्हणून पाहिले जाई. शैक्षणिक मुल्ये आणि धार्मिक आज्ञांचा आदर

केला जाई. या काळात मुस्लिम शिक्षणाचा फारसा प्रसार झाला नसला, तरी चांगली शिक्षण व्यवस्था रुजण्यास सुरवात झाली.

## ६.२ सुलतान कालखंडातील शिक्षण

तुर्की राज्यस्थापनेपूर्वी भारतात एक परिपक्व व अत्यंत प्रगत शिक्षण व्यवस्था होती. हे शिक्षण प्राचीन भारतीय संस्कृती आणि संस्कृतीचा आधार होती. ब्राह्मण आश्रम आणि जैन मंदिरे आणि बौद्ध मठ ही प्राचीन भारतीय शिक्षणाची प्राथमिक केंद्रे होती. तथा, मुलतान, मथुरा, वाराणसी, नालंदा आणि विक्रमशीला येथील भारतीय उच्चशिक्षणाची केंद्रे मुस्लिम सैन्याच्या आक्रमणास बळी पडली. अनेक शैक्षणिक संस्था व ग्रंथालयांना आग लावली गेली. परंतु प्राचीन किंवा हिंदू शिक्षण व्यवस्था टिकून राहिली. तसेच भारतात मुस्लिमांची एक नवीन शिक्षण प्रणाली उदयास आली. हिंदूप्रमाणेच मुसलमानांनीही बदल आणि प्रगतीचे माध्यम म्हणून शिक्षणाला खूप महत्व दिले.

सुलतान काळात मुस्लिम शिक्षणाचा फारसा प्रसार झाला नसला, तरी मुस्लिमकालीन शिक्षण उत्तम प्रतीची होती आणि मुसलमानी अंमलातील सुलतानांनी मक्तब (प्राथमिक विद्यालय), खानकाई, दरगाह आणि विशेषत: मदरसा (महाविद्यालये) दिल्ली, लाहोर, आग्रा, जौनपूर येथे सुरू केल्या होत्या. केवळ दिल्लीत त्या वेळी एक हजारापेक्षा जास्त मदरसा होत्या. या शैक्षणिक संस्थांमध्ये अरबी, फारसी, मुसलमानी, धर्मशास्त्र, न्यायशास्त्र यांचे मुल्ला-मौलवींकडून शिक्षण दिले जाई. मुसलमान अध्यापक आणि धर्मवेत्त्यांना सरकारकडून मानधन मिळत असे. लहान खेड्यांतील आणि शहरांतील मुसलमानी वस्त्यांत मक्तबा असत. शिक्षणाची सुरुवात 'बिस्मिल्लाह' या संस्काराने होत असे. उत्तम हस्ताक्षर, निर्दोश शब्दोच्चार, वाचन, लेखन, पाठांतर, गणित व कुराणातील आयते यांवर भर दिला जात असे. मदरसांमध्ये उच्च शिक्षणाची सोय होती. याठिकाणी कुराण, हदीस (पैगंबरांची वचने), मुसलमानी धार्मिक विधी आणि अरबी भाषा प्रामुख्याने शिकविली जात. शिवाय व्याकरण, तर्कशास्त्र, धर्मशास्त्र, भौतिकिशास्त्र, साहित्य, न्याय तत्त्वे, शास्त्रे व युनानी औषधशास्त्र यांचा उच्च शिक्षणात समावेश होता. फारसी व अरेबिक भाषा हे शिक्षणाचे माध्यम होते.

### ६.२.१ हिंदु शिक्षण पद्धती

सार्वजनिक शिक्षण राज्यव्यवस्थेची जबाबदारी नव्हती. हिंदू समाजाने स्वतःच्या साधनाद्वारे शिक्षणाचे पोषण केले आणि देखभाल केली. शिक्षण हि खाजगी बाब समजून ब्राह्मण, बौद्ध भिक्षू किंवा जैन लोक वैयक्तिक पातळीवर व्यवस्थापन करीत असत. पाठशाळा नावाची प्राथमिक शाळा सहसा ब्राह्मणाच्या घरी चालत असे किंवा एखादा शिक्षक वा पंडिताची नेमणूक करून शिक्षण दिले जाई.

परिसरातील मुलांना विनाशुल्क शिक्षण देण्यासाठी कांही विद्वान संस्था कार्यरत असत. या संस्थांना क्वचितच राज्यकर्त्याकडून देणगी मिळे. काही ठिकाणी धर्मादाय संस्था शिक्षणाची संपूर्ण व्यवस्था पाहत. तत्कालीन शिक्षण व्यवस्थेमध्ये तीन गोष्टीवर अधिक भर दिला जाई. उदा. वाचन, लेखन आणि अंकगणित. याव्यतिरिक्त धर्मशास्त्राचे ज्ञान देण्यात येई. मंदिरे आणि मठ वगळता, हिंदूंची जास्त लोकसंख्या असलेल्या गावे आणि शहरांमध्ये हिंदू पाठशाला भरत असत. त्या प्रामुख्याने स्थानिकांच्या मदतीने चालू होत्या किंवा सार्वजनिक

धर्मादाय संस्थांकडून चालत. ब्राह्मण विद्वान आणि त्यांच्या आदेशानुसार शिक्षणाची परंपरा चालू असत. कधीकधी त्यांच्या घरात शाळा भारवल्या जात असत. परंतु या व्यवस्थेने खालच्या जातींना शिक्षण नाकारले. मात्र बौद्ध भिक्षुनी त्यांचा सामाजिक वर्ण आणि जातीव्यवस्थेवर विश्वास नसल्यामुळे ज्यांना शिकण्याची इच्छा होती त्या सर्वाना शिक्षण देत.

सुलतानी राज्यकर्त्यांनी हिंदूच्या शिक्षणासाठी खास प्रयत्न केले नाही. राज्यकर्त्यांच्या आश्रयाशिवाय ब्राह्मण विद्वानांनी आणि पंडितांनी पाठशाळेची देखभाल केली. ब्राह्मण पाठशाळांतील शिक्षण शूद्राव्यतिरिक्त सर्वांसाठी उपलब्ध आणि विनामूल्य होते. बौद्धांनी कोणतीही जातपात नव्हती, कोणतेही बंधन किंवा भेदभाव न करता सर्वांना शिक्षण दिले. प्राचीन वारसा आणि सांस्कृतिक संवर्धन हे शिक्षणाचे प्रमुख उद्दीष्ट होते. याकाळात हिंदू शिक्षणाची काही विशिष्ट उद्दीष्टे होती, जसे चारित्र्य संवर्धन, सर्वांगीण व्यक्तिमत्त्व विकास, सामाजिक आणि धार्मिक कर्तव्ये विधी प्रशिक्षण देणे इ. हिंदू शिक्षण प्रणाली विद्यार्थ्यांच्या नैतिक आणि अध्यात्मिक प्रगतीसाठी कार्यरत होती. विचारात आणि जीवनातील शुद्धता हेच शिक्षणाचे अंतिम ध्येय होते. शैक्षणिक व्यवस्थेने नागरी आणि सामाजिक कर्तव्ये आणि जबाबदाऱ्यांवर विशेष भर दिला. यामुळे 'स्वाभिमान, स्वावलंबन आणि आत्म-संयम विकसित करणारे व्यक्तिमत्त्व विकसित होण्यास मदत झाली.

एखाद्या शुभ वेळी उपनयनाचा औपचारिक सोहळा पार पडून, मुलाला वयाच्या पाचव्या वर्षी पाठशाळेत पाठवले जाई. अभ्यासाचा कालावधी व अभ्यासक्रमांचा कालावधी निश्चित केलेला नव्हता. सामान्यत: मनुस्मृतिनुसार वय पंचवीस वर्षे होईपर्यंत हे शिक्षण दिले जाई. शिक्षक विद्यार्थ्यांला स्वताच्या मुलासारखे वागणूक देत. तर शिष्य सर्व प्रकारची घरगुती कामे करत, ज्यात झाडलोट, कपडे धुणे आणि गुरेढोरे राखणे या गोष्टींचा समावेश आहे. शिक्षक देखील शिष्याची अध्यात्मिक पिता म्हणून विद्यार्थ्यांकरीताचे आपले कर्तव्य करी. प्राप्त परीस्थितीतून त्यांची अन्न आणि कपड्यांची व्यवस्था होई. सार्वजनिक दान किंवा विद्यार्थ्यांचे सामूहिक प्रयत्न यावर आश्रम चालवले जाई. विद्यार्थ्यांच्या आध्यात्मिक, शारीरिक आणि नैतिक आरोग्याची काळजी घेतली जाई. संस्कृत हे प्राथमिक शाळा स्तरावरील शिक्षणाचे माध्यम होते. शिकवण्याची पद्धत तोंडी होती कारण त्या काळात मुद्रण व्यवस्था नव्हती आणि हस्तलिखित फारच कमी होती.

शिक्षणाची ठिकाणे चारित्र्य घडविणे, व्यक्तिमत्त्व निर्माण करणे, प्राचीन संस्कृतीचे जतन करणे आणि सामाजिक व धार्मिक कर्तव्ये पार पाडत. नव्या पिढीला प्रशिक्षण देणे हे उच्च शिक्षणाचे उद्दिष्ट होते. याठिकाणी योगाविद्येबरोबर तर्कशास्त्र, तत्त्वज्ञान, औषध आणि शस्त्र विद्या देखील शिकवत असत. आत्मनिर्भरतेला महत्त्व देण्यात आले होते. आधुनिक काळाप्रमाणे औपचारिक परीक्षा नव्हत्या. वर्षभर विद्यार्थी गुरुच्या आश्रमात असताना त्याला परीक्षा द्यावी लागे. स्वत: शिक्षकच विद्यार्थ्यांच्या कामगिरीचे सर्वोत्कृष्ट परीक्षक होते. त्यांना 'उपाध्याय', महाउपाध्याय अशी उपाधी देण्यात येई. विद्यार्थ्यांचे शैक्षणिक आभ्यासक्रम पूर्ण झाल्यावर विद्यार्थ्यांना वेगवेगळ्या विषयांवर प्रश्न विचारले जाई. शिक्षणाचा कालावधी सुमारे दहा ते बारा वर्षे असे. शिक्षकाची गुरुदक्षिणा एक गाय, फळे व खाण्यायोग्य पदार्थ, धान्य, घोडा, कपड्यांमधील किंवा विद्यार्थ्याला जे सहज मिळू शकणारी कोणतीही वस्तू असे.

### ६.२.२. हिंदूंच्या उच्च शिक्षण संस्था

उच्च शिक्षण संस्थांचे अभ्यासक्रम बऱ्यापैकी महाग आणि वैविध्यपूर्ण होते. संस्कृत भाषा व साहित्य आणि ब्राह्मण, बौद्ध आणि जैन पंथांच्या धार्मिक ग्रंथांच्या विशेष अभ्यासाव्यतिरिक्त, यात गणित, खगोलशास्त्र, ज्योतिष, योग, तर्कशास्त्र, तत्वज्ञान, जीवशास्त्र, भूगोल, चिकित्सा आणि औषध यासारख्या मोठ्या संख्येने धर्मनिरपेक्ष विषयांचा समावेश आहे. लष्करी विज्ञान. विद्यार्थ्यांना अभ्यासाच्या विविध अभ्यासक्रमांसाठी प्रवेश देताना जाती आणि व्यावसायिक आवश्यकता विचारात घेण्यात आली. सामान्यत: एका विषयात पदवी घेण्यासाठी दहा ते बारा वर्षांचा कालावधी आवश्यक होता. विद्यार्थ्यांची वेळोवेळी शिक्षक विविध प्रकारच्या चाचण्या घेत आणि पुढील उच्च गुणवत्तेच्या वर्गात प्रवेश होई. शिक्षक स्वतः एका विशिष्ट टप्प्यावर त्याच्या विद्यार्थ्यांच्या प्राप्तीच्या मानकांचा एकमेव न्यायाधीश होता. अभ्यासक्रमास कांही औपचारिक पदवी दिली जाई. केवळ काही उत्कृष्ट विद्यार्थ्यांना त्यांच्या शैक्षणिक गुणवत्तेच्या आधारे उपाध्याय, महाउपाध्याय, वेदी, द्विवेदी, त्रिवेदी, चतुर्वेदी इत्यादी या पदव्या बहाल करण्यात येत.

हिंदूंचे उच्च शिक्षण केंद्र जेथे सामान्यत: मंदिरांशी जोडलेली होती किंवा तीर्थक्षेत्राच्या ठिकाणी स्थित असत, जेथे भाविकांनी या ठिकाणी उदारता दाखवत. प्रख्यात विद्वान येथे वास्तव्यास असून आणि या केंद्रांना मिळालेल्या देणग्या आणि दानापासून त्यांचा व्यवसाय चाले. मुस्लीम व्याप्त भागात विद्वानांच्या उपस्थितीमुळे आणि राजपूत राज्यकर्त्यांच्या उदार संरक्षणामुळे काही संस्था प्रसिद्ध पावल्या.

खरं तर उच्च शिक्षण संस्था बहुतेक हिंदू संस्था अरब आणि तुर्की-अफगाण आक्रमणकर्त्यांनी नष्ट केली. यापैकी काही शैक्षणिक संस्था ब्राह्मण आणि बौद्ध पंडितांनी सुलतानशाहीच्या स्थापनेनंतर पुनरुज्जीवित केल्या. राज्याचे संरक्षण, सामाजिक प्रतिष्ठा आणि धार्मिक स्वातंत्र्यापासून वंचित राहिल्यामुळे हिंदू उच्च शिक्षण व्यवस्थेने बहूसंख्य विद्यार्थी किंवा शिक्षक आकर्षित केले नाहीत. ठठ्ठा, मुलतान, सिरहिंद, मथुरा, वृंदावन, प्रयाग, अयोध्या आणि वाराणसी यासारख्या ठिकाणी हिंदू उच्च शिक्षण संस्था काही व्यक्तींनी पुन्हा स्थापित केल्या परंतु त्यापैकी कोणीही प्राचीन भारतातील शिक्षणाचे वैभव आणि प्रतिष्ठा परत मिळवू शकली नाही. दुसरीकडे, मुस्लीम राजवटीच्या कक्षेबाहेर राहिलेले देशातील विविध भागांमध्ये पूर्वीप्रमाणेच राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय कीर्तीचे उच्च शिक्षण देणाऱ्या अनेक संस्था भरभराटीसं आल्या. मिथिला विद्यापीठ, नादिया विद्यापीठ, रामावती विद्यापीठ (बंगाल), काश्मीर खोऱ्यातील काही ठिकाणी मध्ययुगीन काळात हिंदूंची शिक्षणाची केंद्रे होती.

काही राजपूत राज्यकर्त्यांनी शिक्षणास संरक्षण दिले. माळवामध्ये, धार आणि उज्जैन हि शिक्षणाची केंद्रे प्रसिद्ध पावली. परमार राजा भोज किंवा धार स्वत: अभ्यासू होता. विज्ञान, खगोलशास्त्र, ज्योतिष, गणित, वैद्यकशास्त्र शिक्षण याच्या केंन्द्रात शिकवले जाई. आयुर्वेदिक पद्धतीच्या शिक्षणासाठी यासाठी सरहिंद खूपच प्रसिद्ध होते. ठठ्ठा हे धर्म, तत्वज्ञान आणि राजकारण या अभ्यासाचे नावाजलेले केंद्र होते. दक्षिणेमध्ये याकाळात मदुराई शिक्षणाचे महत्त्वपूर्ण ठिकाण होते. अशा प्रकारे मुस्लिम आक्रमण व मुस्लिम राज्य स्थापन होऊनही हिंदूंच्या शिक्षण केंद्रांनी त्यांची ओळख कायम ठेवली.

### ६.२.३ मुस्लीम शिक्षण व्यवस्था

दिल्लीतील सुलतान आणि भारतातील इतर मुसलमान राज्यकर्त्यांनी मुस्लिम शिक्षणाची चांगली व्यवस्था निर्माण केली आणि त्याला राजाश्रयही दिला. धर्मादाय विभागाचा मंत्री शिक्षण विभागाचा प्रमुखही होता. उमरांव वर्गाच्या सहकार्याने राज्यसत्तेला मार्गदर्शन करणारा मुख्य सल्लागार किंवा प्रवक्ता असणारा उलेमा शिक्षण क्षेत्रात महत्वाची भूमिका पार पाडत असे. मुस्लीम शिक्षण पद्धती, हिंदू धार्मिक शिक्षण पद्धतीसाराखीच होती. इस्लामचा प्रसार करणे हा त्याचा प्राथमिक हेतू होता. राज्यात मुस्लिम शिक्षणासाठी अर्थसहाय्य दिले गेले आणि त्यावर सर्वसाधारण देखरेख व नियंत्रण ठेवले. उलेमा वर्ग शैक्षणिक धोरण निश्चित करून शैक्षणिक संस्थावर नियंत्रण ठेवा. उच्च शिक्षण केंद्रे, ज्याला मदरसा म्हणत, त्यांना राज्याकडून देणग्या मिळत. मंकतब नावाच्या प्राथमिक शाळां मशिदी, दर्गा किंवा पवित्र तीर्थक्षेत्रे किंवा उपासनास्थळे या ठिकाणी भारत होत्या. ही शिक्षणाची ठिकाणे उदार देणगीदार, राज्यकर्ते वा अधिकारी किंवा सार्वजनिक धर्मादाय संस्थांकडून चालविले जात.

इस्लामिक राज्य आणि सुलतान यांचे कर्तव्य इस्लामचा प्रसार करणे हे होते. मशिदी किंवा मशिदीशी संलग्न असलेल्या मंकतबमध्ये प्राथमिक शिक्षण दिले गेले. त्या हिंदू पाठशाळांसारख्या होत्या. मुल्ला किंवा मौलवी हा मशिदीचा प्रमुख होता. प्रत्येक मुस्लीम भागात मंकतब एकच शिक्षक चालवत असे. इस्लामिक परंपरेनुसार मुलगा चार वर्ष, चार महिने आणि चार दिवसांचा असताना शाळेत पाठवले जाई. हिंदूंच्या उपनयन प्रमाणेच बिस्मिल्ला समारंभ एखाद्या विद्वानाच्या सल्ल्यानुसार योग्य वेळी करण्यात येई. श्रीमंत पालक आपल्या घरातच शिक्षकाकडून त्याच्या मुलाना प्राथमिक शिक्षणाचे धडे देत. या शिक्षकांना अश्रीताकडून भरपूर मोबदला दिला जाई. अन्यथा शिक्षण विना भेदभाव न करता सर्वांसाठी विनामूल्य होते. प्राथमिक शिक्षण इस्लामधर्म शास्त्राच्या अभ्यासावर आधारित होते.

प्राथमिक शिक्षण पर्शियन भाषेतून दिले जाई. मौखिक पाठाबरोबर धार्मिक ग्रंथांच्या स्मृती अरबी भाषेत शिकविल्या होत्या. अशा प्रकारे मुलाला अरबी आणि पर्शियन भाषांचे ज्ञान जवळपास एकाच वेळी मिळत होते. मुलाला व्याकरणाचे प्राथमिक नियम शिकवले तसेच हदिसमधील सोप्या भाषेत लिहिलेल्या लहान कथा, कविता किंवा धडे असलेल्या लहान पुस्तकांचा अभ्यास त्यांच्याकडून पूर्ण करवून घेतला जाई.

### ६.२.४ मुस्लीम उच्च शिक्षणाच्या संस्था

मुस्लिमांसाठी उच्च शिक्षण देणाऱ्या संस्थेला मदरसा किंवा जामिया असे म्हटले जाते. या सुलतान आणि त्यांच्या प्रांतीय राज्यपालांनी त्यांच्या मुलुखात आणि इतर महत्वाच्या शहरांमध्ये संस्था स्थापित केल्या. हिंदू गुरुकुलांप्रमाणे याही निवासी संस्था होत्या. मदरसा हा एक राज्याचा उपक्रम असे कारण त्याची स्थापना आणि देखभाल खर्च खूप जास्त होता. हिंदू शिक्षकांप्रमाणेच, मुस्लीम विद्वान, विशेषत: नामांकित विषयाचे तज्ञ यांना भरपूर मानधन आणि त्यांच्या कुटुंबासाठी त्यांना चांगली सुविधा दिल्या जात होत्या. भारतातील मुसलमानांची संख्या अत्यल्प असल्याने उच्च शिक्षणात प्रगती करण्याची जबाबदारी राज्याने स्वीकाराली होती.

समकालीन साहित्यातून आपल्याला विविध मदरसाद्वारे अवलंबलेल्या अभ्यासक्रमाची माहिती मिळते. पर्शियन आणि अरबी भाषा आणि साहित्य यांच्या प्रगत अभ्यासक्रमातून बरेच विषय शिकवले जात. ईश्वरज्ञान, धर्मग्रंथांचे विश्लेषण, धार्मिक परंपरा, न्यायशास्त्र, गणित, खगोलशास्त्र, नीतिशास्त्र, तत्वज्ञान, गूढवाद, तर्कशास्त्र. इतिहास आणि इतर शास्त्रे अभ्यासक्रमाचा भाग होता. अगदी आधुनिक जीवशास्त्र, भौतिकशास्त्र आणि रसायनशास्त्राचे प्राथमिक ज्ञानदेखील उच्च अभ्यासांक्रमामध्ये समाविष्ट केले गेले होते. उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना भारतीय व परदेशी विद्वानांनी लिहिलेल्या विविध विषयांवरील असंख्य लोकप्रिय ग्रंथ उपलब्ध असत. प्रत्येक मदरशाचे स्वतःचे ग्रंथालय होते. त्याठिकाणी लोकप्रिय पाठ्यपुस्तके आणि दुर्मिळ हस्तलिखितांचा संग्रह होता. सुलेखन कला प्रत्येक विद्यार्थ्याला शिकविली जात असे. एकूणच मदरसाने धार्मशास्त्र, भाषाशास्त्र आणि अमूर्त विषयांवर जास्त भर दिल्यामुळे विद्यार्थ्यामध्ये वैज्ञानिक दृष्टीकोन विकसित होण्यास अनुकूल वातावरण मिळाले नाही. विद्यार्थ्यांनी मजकूर मनापासून लक्षात ठेववा म्हणून त्यांच्याकडून दररोज कुराण पठण करून घेतले जाई.

सुलतानकाळात राज्यकर्त्यांनी शिक्षणास प्रोत्साहन देण्यासाठी मोठे योगदान दिले असल्याचे बरेच पुरावे सापडतात. अरबांनी प्रथमत: सिंध प्रांतात अरबी भाषेतून धार्मिक अभ्यासासाठी मशिदीशी संलग्न 'मंकतब' ची स्थापना केली. कुतुबुद्दीन-ऐबकाने अनेक मशिदी बंधून तेथे शिक्षणाची केंद्रे बनवली. इल्लतमुश यांनी दिल्लीत नैसिरी मदरसाची स्थापना केली. सुलतान नसीरुद्दीन महमूद यांच्या कारकीर्दीत 'मुन्निझी' आणि 'नसिरी' अशी दोन दिल्लीतील 'मदरसे' शिक्षणाची केंद्रे म्हणून भरभराटीस आली. अल्लाउद्दीन खिलजी यांने धर्मांला राजकारणापासून विभक्त करण्याचा प्रयत्न केला. अल्लाउद्दीन खिलजी स्वत: साक्षर नसला तरी त्याने शिक्षण केंद्रांना प्रोत्साहन दिले. त्याने विद्वान लोकांना सहकार्य केले आणि त्यांना मुक्तहस्ते तिजोरीतून देणग्या दिल्या. फिरोज तुघलक यांनी आपल्या राज्यात तब्बल तीस 'मदरसे' बांधली.

अशा प्रकारे सुलतान काळात मुस्लिमांना शिक्षण घेण्यास प्रोत्साहन मिळाले. परंतु मुलींचे शिक्षण आणि समाजातील गरीब घटक शिक्षणापासून उपेक्षितच राहिला. सर्वांना शिक्षण देणे हे आपले कर्तव्य असल्याचे राज्यकर्त्यांनी कधीच मानले नाही. सार्वत्रिक शिक्षणाची संकल्पना त्याकाळात अस्तित्वात नव्हती. मुस्लीम दरबारात नोकरी मिळावी म्हणून काही उच्चवर्गीय हिंदूंनी पर्शियनही शिकण्यास सुरुवात केली होती.

## ६.३ मुघल कालखंडातील शिक्षण

सर्व जाती, धार्मिक समुदाय आणि भाषिक गटातील विद्वानांना शिक्षणाचे दालन खुले करणारा मुघल कालखंड शिक्षणासाठीचे प्रबोधन युग ठरला. कोणताही भेदभाव न करता विद्वानांना मुक्तपणे राजाश्रय मिळाला. मुघल काळातील उच्चशिक्षित आणि सुसंस्कारित राजपुत्रांनी उदारमतवादी शिक्षणास पाठबळ दिले. शैक्षणिक आणि सांस्कृतिक मूल्ये याबद्दल मुघल राजकर्त्यांची जाण आणि त्यांनी स्वीकारलेल्या धार्मिक सहिष्णुतेचे धोरण यामुळे शिक्षणाच्या प्रगतीसाठी अत्यंत अनुकूल वातावरण निर्माण झाले.

### ६.३.१ मुघल काळातील हिंदु शिक्षण व्यवस्था

हिंदु शिक्षण व्यवस्था सुलतानकाळापासून जशी चालत आली होती ती तशीच चालू राहिली. विद्वान लोकांची शिक्षक पदावर नेमणूक केली जाई. जुन्या शिक्षकांचे अनुकरण करून नवीन शिक्षक तयार होत. शिक्षक विद्यार्थ्यांच्या अडचणी सोडवीत व त्यांना वेळोवेळी प्रोत्साहन देत. तेथे शिक्षक व विद्यार्थी एकत्र राहात असल्यामुळे त्यांच्यात पिता-पुत्रांप्रमाणे संबंध होते. कडक शिस्तीवर भर दिला जाई. प्राथमिक शिक्षण ब्राह्मण गुरू किंवा पंडिताकडून पाठशाळेत दिले गेले. पाठशाळा मंदिरांशी जोडल्या गेल्या होत्या. उच्च शिक्षण गुरुकुल पद्धतीद्वारे दिले जाई. जिथे विद्यार्थी गुरूकडेच राहत असत. विद्यार्थी गुरूच्या आश्रमात राहून गुरूची सर्वार्थाने सेवा करी. संस्कृत भाषा शिक्षणाचे माध्यम होते. विद्यार्थ्यांना धार्मिक अभ्यासाबरोबरच खगोलशास्त्र, तर्कशास्त्र, गणिताचे विषयही शिकवले जात होते. भक्ती चळवळीमुळे प्रादेशिक भाषांच्या विकासाला चालना मिळाली. बनारस, मथुरा, तिरहुत, पैठण, ठठ्ठा, मुलतान आणि सरहिंद ही हिंदूंची उच्च शिक्षण केंद्रे होती. बंगालमधील नाडिया येथे १६८० मध्ये ४००० विद्यार्थी आणि ६०० शिक्षक राहत होते. ठठ्ठा हे धर्मशास्त्र, तत्त्वज्ञान आणि राजकीय शिक्षणासाठी प्रसिद्ध केंद्र होते. मुलतान हे खगोलशास्त्र, ज्योतिष, औषध आणि गणिताच्या अभ्यासाचे केंद्र राहिले. सर्वसाधारणपणे हिंदू लोकांचा व्याकरण, तर्कशास्त्र, तत्वज्ञान, गणित, विज्ञान तसेच वैद्यकशास्त्र इ. अभ्यासामध्ये अधिक रस होता.

### ६.३.२ शिक्षण संस्था

आधुनिक शिक्षण पद्धतीसारखी मुघल काळातील शिक्षण व्यवस्था सुनीयोजित नव्हती. मुघल काळातील शिक्षण मुसलमान आणि हिंदूंनी नियंत्रित केले आणि चालवले होते. श्रीमंत कुटूंबांनी त्यांच्या मुलांसाठी खास स्वतंत्र व्यवस्था केली आणि मध्यम वर्ग त्यांच्या मुलांना एकतर मशिदींमध्ये पाठवत. शिक्षणाची सुरुवात 'बिस्मिल्लाह' या संस्कारान होत असे. उत्तम हस्ताक्षर, निर्दोश शब्दोच्चार, वाचन, लेखन, पाठांतर, गणित व कुराणातील आयते यांवर भर दिला जात असे. मदरसांमध्ये उच्च शिक्षणाची सोय होती. याठिकाणी कुराण, हदीस (पैगंबरांची वाचने), मुसलमानी विधी आणि अरबी भाषा प्रामुख्याने शिकविली जात. शिवाय व्याकरण, तर्कशास्त्र, धर्मशास्त्र, भौतिकिशास्त्र, साहित्य, न्याय तत्त्वे, विज्ञान व युनानी यांचा उच्च शिक्षणात समावेश होता. फार्सी व अरेबिक भाषा हे शिक्षणाचे माध्यम होते. पुढे मोगल काळात (१५२६ – १७०७) सर्वसामान्यांच्या शिक्षणासाठी प्रयत्न केले, तरी सरकारमान्य विद्यालये थोडीच होती. उच्च शिक्षणासाठी नंतरच्या सम्राटांनी विधायक प्रयत्नही केले नाहीत. ग्रामीण भागात मशिदीतून मंकतब असत. त्यांतून मुख्यत्वे धार्मिक शिक्षणावर भर असे. मंकतब व मदरसा (Madrasa) हीच मुसलमानांची खरी शैक्षणिक केंद्रे होती. अकबर, शहाजहान व जहाँआरा यांनी आग्रा येथे मदरसे स्थापन केले. आग्रा, दिल्ली, जौनपूर, सियालकोट, अहमदाबाद ही इस्लामची अध्ययनाची केंद्रे होती.

### ६.३.३. मुघलकाळातील मुस्लीम शैक्षणिक विकास

मुघल काळात प्राथमिक आणि माध्यमिक शिक्षणाकडे दुर्लक्ष झाले नाही. मशिदी व मदरसांच्या नावे जमीन मोफत देण्यात आली. शिक्षकांना शिक्षणाच्या आणि सांस्कृतिक कार्यात प्रगती करण्याच्या कामात रस घेण्यास सर्व प्रकारचे प्रोत्साहन देण्यात आले. सर्व मशिदींमध्ये प्राथमिक शिक्षण दिले जाणारे मकतबा कायम ठेवले. सगळ्या मुघल शासकांनी पाठशाळा व मंकतबांना आर्थिक मदत केली. मुघल सम्राटांनी सांस्कृतिक उपक्रमांनाहि

मोठ्या प्रमाणावर मदत केली. हुमायूनला शिक्षणाबद्दल खूप आवड असून त्याला भूगोल आणि खगोलशास्त्रात विशेष रस होता. त्यांच्याकडे स्वत:चे एक समृद्ध ग्रंथालय होते. त्यांने दिल्ली येथे मदरसाची स्थापना केली आणि नंतर पुराणा-किल्ल्याचे ग्रंथालयात रूपांतर झाले.

अकबराच्या काळात मौखिक शिक्षण देण्याच्या कलेत एक नवीन पर्व सुरू झाले. आग्रा आणि फतेहपूर सिक्री येथे अनेक महाविद्यालये स्थापन झाली. त्यांने मुस्लिम शिक्षण प्रणालीमध्ये सुधारणा करण्यासाठी पाठ्यक्रमात दूरगामी अनेक महत्वाचे बदल केले. मुस्लिम विद्वानांना संस्कृत आणि हिंदी अभ्यास करण्यास प्रोत्साहित केले गेले. त्यांच्याकडे स्वतंत्र भाषांतर विभाग होता जिथे संस्कृत ग्रंथाचे फारसी आणि अरबीमध्ये भाषांतर केले गेले. दिल्ली, आग्रा फतेहपूर सिक्री ही शिक्षण केंद्रे होती. अकबरकडे आग्रा येथे २४,००० पुस्तकांचे एक भव्य ग्रंथालय होती. अकबराने तर्कशास्त्र विषयाच्या अभ्यासास प्रोत्साहित केले आणि तांत्रिक शिक्षणाला चालना दिली. मीर फत्तेउल्लाह शिराज या पर्शियन विद्वानाला मुख्य सदर पदासाठी नित्युक्त गेले होते. अकबर अनेक विद्वानाशी युद्ध शस्त्र, तोफखाना आणि शास्त्रीय संशोधन इ. विविध विषयांवर चर्चा करीत असे.

स्वतः जहांगीर पर्शियन व तुर्की भाषांमध्ये प्राविण होता. मालमत्ता खरेदी-विक्री करातून मिळालेल्या रक्कमेचा उपयोग मदरसाच्या इमारती व इतर खर्चसाठी केला जावा असा हुकुम काढला होता. शाहजहांच्या कारकीर्दीत बेवारस हिंदूंची मालमत्ता मदरशाकडे सोपविली जायची. हुशार विद्यार्थ्यांना आणि विद्वान शिक्षकांना आकर्षक शिष्यवृत्ती आणि बक्षिसे देऊन शिक्षणाला चालना दिली. राजपुत्र दारा शिकोह एक महान विद्वान होता. त्यांने अरबी, पर्शियन आणि संस्कृत भाषेवर प्रभुत्व मिळवले. त्यांनी उपनिषद, भगवत गीता, रामायण आणि योगवशिष्ठ यांचे पर्शियन भाषेत भाषांतर केले.

शेवटचा मुघल सम्राट औरंगजेबसुद्धा सुशिक्षित होता आणि शिक्षण प्रेमी होता. त्याने मुस्लिम शिक्षणासाठी सर्वाधिक निधी खर्च केला. त्यांने परंपरावादी धार्मिक शिक्षणास चालना दिली. त्याच्या काळात हिंदू शिक्षणाकडे दुर्लक्ष झाले. त्याने मुस्लिम कुटुंबातील गरीब मुलांना आणि मुस्लिम विद्वानांना उदारहस्ते मदत केली. औरंगजेबाने शिक्षण अधिक व्यावहारिक आणि उपयुक्त होण्यासाठी अभ्यासक्रमात दुरुस्त्याही केल्या.

महमूद गवान याने १४७९ मध्ये बीदर (कर्नाटक) येथे स्थापन केलेली मदरसा अल्पावधीत नावारूपास आली. इ. स. १५२० मध्ये जयपूरजवळील नरनौ या गावात शेरशहा यांने एक मदरसा सुरू केली. नरेंद्रनाथ यांच्या उल्लेखावरून अकबराच्या कारकिर्दीत (१५४२ – १६०५) हिंदू व मुसलमान एकाच मदरसात फारसी भाषा शिकत होते. अकबर बादशाहच्या आणि नंतरच्या काळात मदरसात धर्मशास्त्राशिवाय तर्कशास्त्र व तत्त्वज्ञान यांसारख्या बुद्धिप्रधान विषयांचा योग्य तो सन्मान केला जात असे. तसेच पर्शियन साहित्यातील गुलिस्तान बोस्तान आणि दिवाने हदीस यांसारखे ग्रंथ शिकविले जात. सम्राट अकबर (Akbar) यांने आपल्या काळात अनेक शैक्षणिक बदल व सुधारणा केल्या होत्या. त्यांला शिक्षणात फार रूची होती. मुस्लिम अभ्यासक्रमात भारतीय तत्त्वज्ञान, नीतिशास्त्र, भौतिकशास्त्र, राज्यशास्त्र इत्यादी जीवनाभिमुख विषयांचा समावेश केला होता. भाषा मंडळ स्थापन करून अन्य भाषिक उत्कृष्ठ ग्रंथांचे फार्सीमध्ये भाषांतर करून घेतले. त्यांच्या

काळात मुस्लिम पाठ्यक्रम लवचिक होता. त्यामुळे विद्यार्थ्यांना आपल्या आवडीनुसार शिकता येत असे.

मुघल काळात सिंध, लाहोर, मुल्तान, आग्रा, फतेपूर, सीक्री, दिल्ली, जौनपूर, सियालकोट, अजमीर (अजमेर), लखनौ, गुलबर्गा, विजापूर, गोवळकोंडा, हैदराबाद इत्यादी ठिकाणी मुस्लिम शिक्षणाची केंद्रे होती.

### ६.३.४ स्त्री शिक्षण

मोगल काळात महिलांच्या शिक्षणामध्ये निश्चित सुधारणा झाली. दुर्दैवाने, हा बदल फक्त राजघराण्यातील महिलांच्या शिक्षणासाठीच आपल्याला दिसतो. मुस्लिम पडदा पद्धतीचे कट्टर समर्थक असल्याने त्यांच्या मुलींना शिकायला मदरशामध्ये पाठवत नसत. प्रा. अतुलनंद सेन म्हणतात, 'हिंदू, मुस्लिम, स्त्रियांचे शिक्षण बहुतेक समाजातील श्रीमंत आणि हितकारक लोकांपुरतेच मर्यादित होते. पडदा पद्धती, बालविवाह आणि इतर सामाजिक रीतीरीवाजांमुळे स्त्रियांच्या स्वातंत्र्यावर बंधने आली. मुगल काळात राजघराणे आणि सरदार व श्रीमंत वर्गाने त्यांच्या महिलांच्या शिक्षणाकडे बरेच लक्ष होते. गुलबदन बेगम हिने प्रसिद्ध हुमायूं नामा लिहिला. जहांआरा बेगम आणि झेबुन्निसा ह्या उच्च दर्जाच्या कवयित्री होत्त्या. रझिया सुल्ताना, माहम अनगा, नूरजहां, चांद सुलताना, मुमताज महल या सर्व शिक्षित महिला होत्या.

## ६.४ सारांश

मध्ययुगीन भारतातील सत्ता बदलामुळे शिक्षणपद्धतीमध्ये सुद्धा बदल झाल्याचे आपल्या निदर्शनास येते. प्राचीन भारतातील जगप्रसिद्ध नालंदा, विक्रमशीला, वल्लभी सारख्या विद्यापिठांचा ऱ्हास झाला. त्यामुळे भारतातील विद्यापीठीय स्तरावरील शिक्षण बंद झाल्याचे दिसते. राजघराण्यातील पुरुषांना प्रशासकीय कामकाजासाठी शिक्षण मिळत असे. सामान्य जनतेसाठी खासकरून खालच्या जाती, अस्पृश्य जाती आणि महिलांना शिक्षण बंद झाले. राजघराण्यातील महिलांना केवळ अक्षर ओळख महणून शिक्षण मिळत असे. हिंदू मठांमधून किंवा मुस्लिमांच्या मस्जिद-मदरशांमधून धार्मिक शिक्षण मिळू लागले.

## ६.५ प्रश्न

१. मुस्लिम शिक्षणपद्धतीचे चिकित्सक परिक्षण करा.

२. मध्ययुगीन कालखंडातील हिंदू शिक्षणाची ठळक वैशिष्ट्ये सांगा.

३. सुलतान आणि मोगल काळातील शैक्षणिक विकासाचा तुलनात्मक आढावा घ्या.

४. इ. स. १२०० ते १७०७ काळातील स्त्री शिक्षणाच्या विकासाचे विश्लेषण करा.

## ६.६ संदर्भ

१. अहेर, हिरा, उदयोन्मुख भारतीय समाजातील शिक्षण व शिक्षक, नागपूर, १९९५.

२. गाठाळ, एस. एस., भारताचा इतिहास, परभणी, २००४.

३. गायकवाड, आर. डी. भोसले, आर. एच., प्राचीन व मध्ययुगीन भारताचा इतिहास, कोल्हापूर,

४. डॉ. धनंजय आचार्य, मध्ययुगीन भारत (१०००ते १७०७ ), नागपूर, २००८

५. शंकरराव खरात, सामाजिक चळवळीचा इतिहास,पुणे, २००६

६. मध्यकालीन भारत, विद्याधर महाजन, एस. चंद, दिल्ली. २००२

७. Jafar S. M., Education in Muslim India' Peshawar, १९३६.

८. Law N. N., 'Promotion of Learning during Muhammedan Rule' London, 1916

९. Pande A. B., 'Society and Government in medieval India ,1965

१०. Frazes R. W., 'Literary History of India, London 1898.

११. Majumdar R. C. (ed), 'The Mughal Empire' Bhavan's Volume - 7, Bombay 1974.

१२. Raychoudhary R. C., Social, Cultural and Economic History of India, Delhi, 1984.

❄❄❄❄❄❄❄

# ७

# मध्ययुगीन भारतातील कला आणि स्थापत्य

**घटक रचना**

७.० उद्दिष्टे

७.१ प्रस्तावना

७.२ मध्ययुगीन भारतातील कला

७.२.१ संगीत

७.२.२ चित्रकला

७.२.३ नृत्यकला

७.२.४ शिल्पकला

७.३ मध्ययुगीन भारतातील वास्तुकला

७.४ सारांश

७.५ प्रश्न

७.६ संदर्भ

## ७.० उद्दिष्टे

१. मध्ययुगीन भारतातील संगीत, चित्रकला समजून घेणे.

२. मध्ययुगीन भारतातील नृत्यकला, शिल्पकलांचा अभ्यास करणे.

३. मध्ययुगीन भारतातील वास्तुकलेचा अभ्यास करणे.

## ७.१ प्रस्तावना

मध्यकालीन भारतातील कला आणि स्थापत्याचा विकास भारताच्या सांस्कृतिक इतिहासातील एक महत्त्वपूर्ण टप्पा आहे. मध्ययुगीन काळात कला – स्थापत्य आणि हस्तकलेमध्ये महत्त्वपूर्ण बदल झाले. मध्ययुगीन काळात संगीत, चित्रकला, नृत्यकला, धातू कला, मूर्तीकला इत्यादींचे संदर्भ मिळतात. **सितार आणि तबला** या वाद्यांचा अविष्कार मध्ययुगात झाला. कव्वाली आणि काही रागांचा उदय मध्ययुगातच झाला. चित्रकलेच्या क्षेत्रात मुघल काळात प्रचंड विकास झाला. त्याचबरोबर काही प्रादेशिक चित्रशैलींचा उदय याच काळात झाला. भक्कम आणि मजबूत बांधकाम, सुंदर आकर्षकपणा आणि चुना-गाऱ्याचा वापर, घुमट, उंच टोकदार मिनारे, सुंदर सजावटीची 'अरबस्क' शैली यासारखी दिल्ली सल्तनतकालीन स्थापत्यकलेचे वैशिष्टे आहेत. दिल्ली सल्तनत काळात इंडो-इस्लामिक शैली विकसित झाली. त्याचबरोबर लाल वालुकाश्म आणि संगमरवर दगडाचा मोठ्याप्रमाणात वापर, त्यामध्ये 'पिट्रा डूरा'चा सजावटीसाठी अत्यंत कुशलतेने केलेला उपयोग, 'चारबाग' प्रणालीचा वापर अशी अनेक वैशिष्ट्ये मुघल कालीन वास्तुकलेत पाहायला मिळतात. मध्ययुगातील प्रादेशिक राज्यांतील शासकांनीसुद्धा कला आणि स्थापत्याला प्रोत्साहन दिले होते. या सर्व गोष्टींचा उहापोह आपण या घटकात घेणार आहोत.

## ७.२ मध्ययुगीन भारतातील कला

### ७.२.१ संगीत :

### दिल्ली सल्तनत कालीन संगीत

इस्लाममध्ये संगीताला महत्व नसले तरी बल्बन, त्याचा मुलगा बुगरा खान अल्लाउद्दिन आणि मुहम्मद तुघलक या सुलतानांनी प्रोत्साहन दिले. बलबनचा मुलगा मुहम्मद याने संगीततज्ञ आणि कवी अमीर खुसरोला आश्रय दिला. **'कव्वाली'** गाण्याची सुरुवात करण्याचे श्रेय अमीर खुसरोकडेच जाते. अमीर खुसरोने इस्लामी आणि भारतीय शैलीच्या मिश्रणातून 'तिलक', साजगिरी, सरपदा, औमन, घोर सनम अशा नव्या रागांना निर्माण केले. **सितार आणि तबला** या वाद्यांचा निर्माता म्हणून अमीर खुसरो ओळखला जातो. अल्लाउद्दिन खिलजीने दक्षिण भारतातून महान संगीततज्ञ **गोपाल** याला आपल्या दरबारात बोलून राजाश्रय दिला. फिरोज तुघालाकाच्या काळात '**रागदर्पण'** चे फारसी भाषेमध्ये भाषांतर झाले. मुहम्मद तुघलकाच्या दरबारात बाराशे गायक होते. जौनपुरचे सर्व शर्की सुलतान संगीत प्रेमी होते. हुसैनशाह शार्की राग **खयाल** चा उद्गाता होता. त्याच्या संरक्षणाखालीच 'संगीत शिरोमणी' नावाचा ग्रंथ रचला गेला. **हसन-ए-देहलवीला** त्याच्या उत्कृष्ट गझलांसाठी भारताचा **सीदी** म्हणतात. माळव्याचा शासक बाजबहाद्दूर संगीत प्रेमी होता. ग्वालियरचा राजा मानसिंहने संगीताला संरक्षण दिले. त्याच्याच काळात **मन कौतूहल** नावाचा ग्रंथ रचला तसेच **ध्रुपद** चा उदय झाला. दक्षिण भारतातील वेगवेगळ्या शासकांनी संगीत कलेला संरक्षण दिले. बहामनी राज्याचे शासक फिरोजशाह आणि महमूद शाह तसेच विजापूरचा युसुफ आदिलशहा यांनी संगीत कलेचे विशेष संरक्षण केले. (भारत का इतिहास एंव भारतीय राष्ट्रीय आंदोलन) सुफी संतानी सुद्धा संगीतामध्ये रुची दाखवली होती.

### मुघलकालीन संगीत

बाबर आणि हुमायून यांनी संगीत कलेला प्रोत्साहन दिले परंतु अकबराच्या काळात ही कला शिखरावर पोहोंचली होती. अबुल फजल याच्या मतानुसार अकबराच्या दरबारात **३६** गायकांना राजाश्रय दिला होता. **तानसेन, बाजबाहाद्दूर, बैजबख्त, गोपाल, हरिदास, रामदास, सुजान खान, मियां चांद आणि बैजू बावरा** इत्यादी अकबर कालीन प्रमुख संगीततज्ञ होते. त्यात सर्वात प्रसिद्ध **तानसेन** आणि **बाजबहाद्दूर** होते. तानसेन अकबराच्या नवरत्नापैकी एक होता. अकबराने तानसेनला '**कंठाभरणवाणी विलास'** अशी उपाधी दिली होती. '**रुद्रवीणा**' या वाद्याचा शोध तानसेनने लावला होता. अकबर स्वत: नगारा खूप छान वाजवत असे. जहांगीरच्या काळात तानसेनचा मुलगा **विलास खान, छतर खान, मक्खू** आणि **हमजान** हे प्रमुख संगीततज्ञ होते. शाहजहानला संगीत गायन खूप आवडत असे. त्याच्या दरबारात दररोज गायन-वादन होत असे. शाहजहान स्वत: खूप चांगल्याप्रकारे गात असे. **लाल खान, खुशहाल खान** आणि **बिसराम खान** हे शाहजहानच्या काळातील प्रमुख संगीततज्ञ होते.

औरंगजेबाने संगीत इस्लामविरोधी असल्याकारणाने त्यावर बंदी आणली होती. परंतु त्याच्याच काळात फारसी भाषेमध्ये भारतीय शास्त्रीय संगीतावर सर्वात जास्त पुस्तके लिहिली गेली. औरंगजेब स्वत: चांगला वीणावादक होता. रसबैन खान, सुखीसेन, कलावंत, हयात सरसनैन आणि किरपा हे औरंगजेबाच्या काळातील प्रमुख संगीततज्ञ होते.

मुघल काळात संगीताचा सर्वात जास्त विकास १८ व्या शतकातील मुघल बादशहा **मुहम्मदशाहाच्या** काळात झाला होता. त्याच्या दरबारात नेमत खान, सदारंग आणि त्याचा पुतण्या अदारंग यांनी संगीत ला विकासाच्या परमोच्च शिखरावर पोहोंचवले.

### ७.२.२ चित्रकला:

### दिल्ली सल्तनत कालीन चित्रकला

प्रारंभीच्या मुस्लीम शासकांनी चित्रकलेप्रती रुची दाखवली नाही. अल्तमशच्या काळात चीनी चित्रकार दिल्लीला आले होते याला पुष्टी **इसामि**च्या **फतेह-उस-सलातीन** या ग्रंथाने मिळते**.** सल्तनतकालीन चित्रकलेचा प्रथमत: उल्लेख **बैहाकीच्या** 'गजनवींच्या इतिहासा'मध्ये मिळतो. चौदाव्या शतकात कागदाचा शोध लागल्याने तो विपुल प्रमाणात उपलब्ध होऊ लागला. परिणामी भारतीय चित्रकला निरनिराळ्या अंगाने विकसित होऊ शकली. अहमदाबादच्या मुस्लीम राज्यकर्त्यांच्या प्रोत्साहनामुळे चित्रकलेच्या 'बेझान चश्मी' या प्रकाराला विशेष आश्रय व प्रोत्साहन दिले. सुलतानशाही राजवटीमध्ये मात्र चित्रकलेचा फारसा विकास झाला नाही. इस्लामी परंपरेला चित्रकला निषिद्ध असल्याचा या काळात सार्वत्रिक समज होता. सोळाव्या शतकात अहमदनगर, विजापूर गोवळकोंडा व बिदर येथील मुस्लीम राज्यकर्त्यांच्या प्रोत्साहनामुळे चित्रकलेची एक नवीन शैली उदयास आली.

### मुघलकालीन चित्रकला

मुघल कालीन चित्रकलेवर प्रारंभी इराणी चित्रकलेचा प्रभाव दिसतो. मुघल चित्रशैली चे दोन प्रकार आहेत. १) **व्यक्ती चित्र** २) **लघु चित्र.** लाल, हिरवा, नीळा आणि सोनेरी रंगांचा वापर मुघल काळात सर्वात जास्त झाल्याचे दिसते. मुघलांच्या चित्रकलेचा विषय हा दरबार किंवा निसर्ग होता. सामान्य लोकांना चीत्रकलेमध्ये फार अपवादात्मक स्थान होते.

मुघल चित्रकलेची मुहूर्तमेढ **हुमायून**ने रोवली होती. **अब्दुल समद** आणि **अका रिजा** हे हुमायूनच्या काळातील चित्रकार होते. अकबराने चित्रकलेला विशेष आश्रय दिला होता त्यासाठी एक वेगळा विभाग स्थापन केला होता. त्या विभागाचे अध्यक्ष **अब्दूलस्समद** होता. त्यामध्ये काही विदेशी आणि काही स्थानिक चित्रकार होते. **मीर सैयद, अब्दूलस्समद, फारुख बेग, दसवंत, उली, मिस्कीन आणि बसावन** हे अकबरकालीन चित्रकार होते. मुघल काळात चित्रकलेचा सर्वोच्च विकास जहांगीरच्या काळात पाहायला मिळतो. नवीन चित्रशाळेची स्थापना **आग्रा** येथे जहांगीर काळात झाली होती. चित्रकलेवरील इराणी प्रभाव कमी होऊन त्याची जागा युरोपीय शैली आणि नैसर्गिक चित्रांनी घेतली. या काळात फुल, वनस्पती, पशु-पक्षी यांचे प्रामुख्याने चित्रण पाहायला मिळते. **उस्ताद मन्सूर, अबुल हसन** आणि **बिशनदास** सारखे प्रमुख चित्रकार जहांगीरच्या काळात होऊन गेले. शाहजहानला चित्रकलेपेक्षा स्थापत्यकलेमध्ये जास्त रुची असल्याचे दिसते. औरंगजेबाने संगीताप्रमाणे चित्रकलेला इस्लामविरोधी मानून राजाश्रय दिला नाही. अठराव्या शतकाच्या उत्तरार्धामध्ये मुघलकालीन चित्रकलेचा ऱ्हास होत गेला. परंतु मुर्शिदाबाद, लखनौ, हैदराबाद आदि प्रांतिक सत्तांच्या राजवटीमध्ये मात्र मुघल चित्रकलेची परंपरा तग धरून राहिली.

दख्खन शैलीतील चित्रकला मुघल चित्रकलेपेक्षा वेगळी होती. विजापूर व गोवळकोंडा राज्यात तिचा विकास झाला. हैदराबादच्या असफजाही राजवटीमध्ये बहरास आलेली चित्रकला मुघल चित्रकलेच्या नकलेच्या स्वरुपात होती.

**राजपूत शैलीतील चित्रकला:**

मुघल काळात राजपूत शैलीच्या चित्रकलेचा अविष्कार झाला असला तरी ती मुघल चित्रकले एवढी प्रभावी नव्हती. राजपूत चित्रकलेवर मुघल चित्रकलेचा प्रभाव दिसतो असे मत जदुनाथ सरकारांचे आहे. मात्र अन्य इतिहासकार त्यांच्या मतांशी सहमत नाहीत. मुघल पूर्व राजपूत शैलीची चित्रकला भित्ती चित्रे आणि चित्रकृती अशा दोन प्रकारची होती. महारणा कुंभाच्या कुंभलगढ येथील राजवाड्याच्या भिंतीवर राजपूत शैलीच्या भित्तीचित्रांचे सर्वोत्कृष्ट नमुने आढळतात.

राजपूत चित्रांमध्ये हिंदू पौराणिक कथांचे चित्रण होते. मंदिरातील राजवाडे, हवेल्या आणि विविध किल्ल्यांच्या आतील खोल्या राजपूत चित्रांमध्ये दाखवल्या आहेत. चित्र विविध वनस्पती, खनिजे, दगड आणि अगदी सोने आणि चांदीपासून घेतलेल्या विविध रंगांनी बनलेले आहे. राजपूत कला कलम नावाच्या दोन शैलींमध्ये विभागली गेली आहे १) **राजस्थान** आणि २) **पहाडी** चित्रकला. मुघल सत्तेच्या पतनामुळे अनेक चित्रकार राजस्थान आणि इतर प्रांतामध्ये स्थानांतरीत झाले. त्यामुळे प्रादेशिक चित्रशैलींचा उदय झाला त्यामध्ये मेवाड शैली, बुंदी शैली, कोटा शैली, आमेर-जयपूर शैली, जोधपुर शैली, बिकानेर शैली इत्यादी. **पहाडी** उत्तर-पश्चिम हिमालय क्षेत्रात विविध पहाडी राज्यात केल्या जाणाऱ्या चित्रकलेला पहाडी चित्रशैली म्हणतात. या प्रदेशात अनेक ठिकाणी लहानमोठ्या राजपूत घराण्यांचा अंमल होता. या राजपूत घराण्यांच्या आश्रयाने पहाडी चित्रकलेचा विकास घडून आला. बसोली, गुलेर, कांगडा, नुरपूर, पूंछ, जम्मू, चंबा ही या चित्रकलेची प्रमुख केंद्रे होती. (मध्यकालीन भारत-भाग-२, संपादक- हरिश्चंद्र

**७.२.३ नृत्यकला :**

मध्ययुगीन काळात नृत्यकला अस्तित्वात असल्याचे संदर्भ मिळतात. सुलतान आणि मोगल तसेच इतर प्रादेशिक राजांच्या **शाही दरबारात** मनोरंजनासाठी नृत्य आणि संगीताचे आयोजन केले जात असे. दरबारातील नर्तक प्रशिक्षित असत. दरबारात नर्तकी नृत्य करत असल्याचे अनेक संदर्भ मिळतात. या काळात काही लोकनृत्याचे प्रकार (गरबा, घुमर, लावणी ) अस्तित्वात होते. वेगवेगळ्या प्रदेशमध्ये भरतनाट्यम, कत्थक, कुचीपुडी सारखे प्रादेशिक नृत्यप्रकार चालू होते. **धार्मिक** नृत्यामध्ये विशेषकरून दक्षिण भारतातील मंदिरामध्ये **देवदासीं**चे नृत्याचे कार्यक्रम होत असत. यामध्ये प्रामुख्याने महिला नृत्य सदर करत असत. देवदासिंना नृत्याचे प्रशिक्षण दिले जाई. सुफी संप्रदायामधील संत संगीत-नृत्याद्वारे ईश्वरभक्ती करत असत.

**७.२.४ शिल्पकला**: मध्यकालीन भारतात शिल्पकला मुख्यतः धार्मिक उद्देशासाठी केली जात होती. ती शिल्पकला खूप विस्तृत आणि कलात्मक होती.शिल्पकला विशेषतः मंदिरे व काही इतर ठिकाणी पण दिसून येत होती.

## ७.३ मध्ययुगीन भारतातील वास्तुकला

दिल्ली सल्तनत (१२०६ ते १५२६) हा भारताच्या मध्ययुगीन इतिहासातील एक अत्यंत महत्त्वाचा कालखंड आहे. हा कालखंड इस्लामी साम्राज्य स्थापन होण्याच्या पार्श्वभूमीवर घडला, ज्यामुळे हिंदू आणि इस्लामी संस्कृतींचा संगम झाला. सुलतान कालीन कला आणि वास्तुकलेत अशा विविधतांची छाप दिसून येते, ज्यामध्ये इंडो-इस्लामिक शैली विकसित झाली. या काळात निर्माण झालेल्या वास्तू आणि कलेचा प्रभाव पुढे मुघल साम्राज्यावर पडला.

**दिल्ली सल्तनत कालीन वास्तुकलेचे वैशिष्ट्ये :**

दिल्ली सुलतानत कालीन वास्तुकलेत सैन्य, धार्मिक, आणि वंशवृद्धीचे प्रतीक असलेल्या वैशिष्ट्यांचा समावेश आहे. काही प्रमुख वैशिष्ट्ये:

१) **लाल वालुकाश्म आणि संगमरमर दगडाचा वापर:** दिल्ली सुलतानत कालातील वास्तुकलेतील एक प्रमुख वैशिष्ट्य म्हणजे लाल वालुकाश्म आणि संगमरमर दगडाचा वापर अनेक महत्त्वाच्या इमारतींच्या बांधकामात वापर केला आहे.

२) **घुमट आणि मिनार :** सल्तनत काळातील वास्तुकलेमध्ये घुमट आणि मशिदीमध्ये मिनार हे एक अत्यावश्यक घटक होते, जे इस्लामी वास्तुकलेचे प्रतीक होते.

३) **भौमितिक आणि पुष्पवेलीचे नक्षीकाम:** इस्लामी कला या कालखंडात मानवाचे चित्रण टाळते, पण त्यात भौमितिक रचना, पुष्पवेलीचे नक्षीकाम, वेलबुट्टीचा वापर करण्यात आला. सजावटीच्या या संयुक्त पद्धतीला '**अरबस्क**' प्रणाली म्हणतात.

४) **'सुलेखन' कलेचा वापर:** कुराणातील वचनांचे '**सुलेखन**' या कलेचा वापर दिल्ली सल्तनत काळात वस्तूच्या सुशोभेसाठी केला आहे.

५) **कमानी (मेहराब) :** सल्तनत काळातील वास्तुंमध्ये कमानींमुळे सौंदर्य आणि मजबुतीसाठी उपयोग केल्याचे दिसते.

६) सल्तनत काळातील इमारतींच्या मजबुतीसाठी दगड, काँक्रीट आणि चांगल्या दर्जाच्या चुन्याचा वापर केला आहे.

**दिल्ली सल्तनत कालखंडातील प्रमुख स्मारके**

- भारतातील पहिली तुर्की **मस्जीद कुव्वत-उल-इस्लाम** होती. कुतुबुद्दीन ऐबकाने ११९७ मध्ये विशिष्ट शैलीमध्ये **रायपिथौरा** येथे बनवली होती.

- '**अढाई दिन का झोपडा**' नावाची मस्जिद कुतुबुद्दीन ऐबकाने अजमेर येथे १२०० मध्ये बांधली होती.

- **कुतुब मिनार -** कुतुबुद्दीन ऐबकाने सुफी संत कुतुबुद्दीन बख्तियार काकी यांच्या स्मृतीप्रित्यर्थ ११९७ कुतुब मिनारची सुरुवात केली. परंतु याचे बांधकाम पूर्ण १२३२ मध्ये अल्तमशने केले.

- अल्तमशने बदायुन मध्ये जमा मस्जिद, नागौरमध्ये अतरकीनचा दरवाजा व **नासिरुद्दीन मुहम्मदचा सुल्तानगढी** येथील **मकबरा** आणि इमारतींची निर्मिती केली. त्यामुळे मकबरा स्थापत्याचा जन्मदाता म्हणून अल्तमशला ओळखले जाते.

- **बल्बन**ने लाल महाल आणि स्वत:चा मकबरा बांधला. हा पूर्णत: इस्लामी पद्धतीने बनवलेला पहिला मकबरा होय.

- अल्लाउद्दिन खिलजीने स्थापत्यकलेला संरक्षण दिले होते. त्याने **सिरी** येथे महाल आणि **हजार स्तंभी महाल** बांधला. त्याने निजामुद्दीन औलिया यांच्या दर्ग्यावर **जमात खाना मस्जिद** आणि कुतुब मिनार जवळ **अलाई दरवाजा** बांधला.

- तुघलकाबादची **गढी** त्याबरोबरच कृत्रिम तलावामध्ये **गयासुद्दिनचा मकबारा** बांधला. या मकबऱ्यात प्रथमत: संगमरमर आणि वालुकाश्म दगडांचा एकत्र वापर केला आहे.

- मुहम्मद तुघलकाने दिल्ली जवळ **जाहंपन्नाह नगर** तसेच तुघलकाबादच्या जवळ **आदिलाबादचा किल्ला** बांधला.

- फिरोजशाहने हौजखासच्या जवळ **मदरसा** आणि **फिरोजशाह कोटला** नगर आणि **किल्ला** बांधला.

- फिरोजशाहने हौजखास नावाच्या डोंगरावर स्वत:चा आणि आपला प्रधानमंत्री **खान-ए-जहाँ तेलंगाणीचा मकबरा** बांधला. तेलंगाणीच्या मकबऱ्याची विशेषता अशी की तो पहिला **अष्टभुजाकार मकबरा** आहे. तसेच फिरोजशाहने काळी मस्जिद, खिडकी मस्जिद आणि काबा यांसारख्या मस्जिदी बांधल्या.

- लोदी काळाला मकबऱ्यांचा काळ म्हणतात. लोदी काळातील मकबऱ्याची विशेषता अशी की ते **उंच चबुतऱ्यावर** बांधले. तसेच काही मकबरे **बागेच्या** मध्यभागी बांधले आहेत.



**कुतुब मिनार**



**अलाई दरवाजा**

**सल्तनत कालीन प्रादेशिक स्थापत्य**

**जौनपुर**: जौनपूरच्या शर्की सुलतानांच्या स्थापत्यावर हिंदू आणि मुस्लीम शैलीचे मिश्रण पाहायला मिळते. जौनपूर येथील काही मस्जिद प्रसिद्ध आहेत. इब्राहीम शाह शर्कीने **अटाला मस्जिद** आणि **झंझरी** मस्जिद बांधल्या. हुसैनशाह शर्कीने **जामा मस्जिद** आणि **लाल दरवाजा मस्जिद** बांधल्या. **माळवा** प्रांतात मांडू किल्ला, सात मजली विजय स्तंभ आणि राणी रूपमतीचा महाल प्रसिद्ध आहेत. **बंगाल गौड** मधील दाखिला दरवाजा, छोटा सोना मस्जिद, बडा सोना मस्जिद, दरसवारी चा मकबारा, लोटन मस्जिद प्रसिद्ध आहेत. बंगालमधील स्थापत्याचे मुख्य केंद्र पांडूआ होते. येथे सिकंदरशाहने बांधलेली **अदीना मस्जिद** तत्कालीन भारतातील सर्वात मोठी वस्तू होती. **गुजरात** येथील **अहमदशाह पहिला** याने १४११ मध्ये **अहमदाबाद** शहराची तसेच जामा मस्जिदीची स्थापना केली होती. **महमूद बेगडाने** चंपानेर, जुनागढ आणि खेडामध्ये रानिपिसारीचा रोजा, नगीना मस्जिद इत्यादींची निर्मीती केली.

**दक्षिणेकडील बहामनी** राज्यात एक वेगळी स्थापत्यशैली होती. अल्लाउद्दिन बहमनशाह ने गुलबर्गा येथे **जामा मस्जिद** आणि **महमूद गवान**ने बिदर येथे एक **मदरसा** बांधला. कुली कुतुबशहाने (गोवळकोंडा) ने काही इमारतींची निर्मिती केली त्यापैकी **चारमिनार** सर्वात प्रसिद्ध आहे. विजापूरच्या मुहम्मद आदिलशहाचा मकबरा **गोल घुमट** नावाने प्रसिद्ध आहे.



चारमिनार



गोलघुमट

**मुघल काळातील वास्तुकला :** मुघल काळ हा भारताच्या इतिहासातील एक अत्यंत महत्त्वाचा कालखंड होता. मुघल बादशहांनी आपल्या स्थापत्यकलेत पर्शियन, तैमुरी आणि मध्य आशियाई शैलिंचा वापर केला आणि त्याला भारतीय स्थापत्यशास्त्राच्या पारंपरिक घटकांसोबत एकत्रित केले. यामुळे एक अत्यंत अद्वितीय इंडो-इस्लामिक किंवा मुघल शैली तयार झाली. तिचा भारतीय उपखंडाच्या कला, संस्कृती आणि वास्तुकलेवर खूप प्रभाव पडला.

**मुघल वास्तुकलेची प्रमुख वैशिष्ट्ये :**

१) **पर्शियन, तुर्की, मध्य आशिया आणि गुजरात, बंगाल आणि जौनपुर इत्यादी** शैलींचे मिश्रण मुघलकालीन स्थापत्यामध्ये पाहायला मिळतो.

२) **लाल वालुकाश्म आणि संगमरवरी दगडाचा वापर**

मुघल वास्तुकलेत लाल वालुकाश्म आणि संगमरवर दगड यांचा अत्यंत सुंदर वापर केला गेला. लाल वालुकाश्म प्रामुख्याने किल्ले आणि राजवाड्यांसाठी वापरला गेला, तर संगमरवर मुख्यतः समाधी, मशिदी आणि इतर महत्त्वाच्या इमारतींमध्ये वापरला जात होता.

३) **'चारबाग' प्रणाली आणि भौमितिक आरेखन**

मुघल वास्तुकलेत संपूर्णता आणि सुनियोजित बागांचे (चारबाग) महत्त्व आहे. यामध्ये चार भागात विभागलेली बाग दाखवलेली आहे, जी स्वर्गाचे प्रतीक मानली जात होती. बागेचा आराखडा हा मुघल वास्तुकलेतील एक महत्त्वाचा घटक होता.

**४) पिट्रा डुरा आणि सजावट**

मुघल कालखंडात पिट्रा डुरा कलेचा वापर अत्यंत महत्वपूर्ण होता. यामध्ये रत्ने, लाजवर्द, हिरे, आणि अगेट यांसारखी अर्धमूल्यवान रत्ने संगमरवरात जडवली जात. हे तंत्र विशेषतः ताज महल सारख्या मुघल स्मारकांमध्ये दिसून येते.



**५) मुघलकालीन वस्तूंमध्ये वाहत्या पाण्याचा उपयोग केला आहे.**

**मुघलकालीन प्रमुख वास्तू :**

मुघलकालीन स्थापत्यकलेची सुरुवात बाबरच्या काळापासून होते. त्याने पानिपतच्या जवळ **कबुली बाग** मध्ये एक मस्जिद बांधली. बाबरने रोहिलखंडमध्ये संभल ची **जामी मस्जिद** तसेच आग्रा येथील लोदी किल्यामध्ये मस्जिद बनवली आणि भौमितिक पद्धतीचा वापर करून एक उद्यान (बाग) तयार करून त्याला **नूर अफगाण** असे नाव दिले. हुमायूनने दिल्ली मध्ये दिनपनाह (जगाचे शरनस्थळ) नावाचे नगर १५३३ स्थापन केले. त्याने हिसार जिल्ह्यात फतेहाबाद मध्ये एक मस्जिद बनवली. शेरशहाने **शेरगढ** नावाच्या नगराची स्थापना दिल्लीमध्ये केली. शेरशहाच्या काळातील बिहार मधील **सासाराम** येथील तलावातील उंच चाबुतऱ्यावरील त्याचा मकबरा महत्वपूर्ण स्थापत्य आहे. १५४२ मध्ये शेरशहाने दिल्लीमध्ये पुराना किल्ल्यामध्ये **किला-ए-कुहाना** नावाची मस्जिद बांधली आणि त्याच परिसरात **शेरमंडल** नावाचा अष्टभूजाकार तीन मजली मंडप बनवला.

**अकबरा**च्या काळात मुघल वास्तुकलेचा खऱ्या अर्थाने विकास पाहायला मिळतो. अकबराच्या काळातील बांधकामामध्ये लाल दगडाचा वापर जास्त झाल्याचे दिसते. अकबराच्या काळातील स्थापत्य निर्मिती दोन टप्प्यामध्ये झाली. **आग्रा, इलाहाबाद, लाहोर येथील किल्यांचे आणि काही महालांचे बांधकाम पहिल्या टप्प्यातील आहे.** फतेहपुर सिकरी येथील वास्तू दुसऱ्या टप्प्यातील आहेत. १५७२ मध्ये अकबराने आग्र्यापासून ३६ किमी. अंतरावर फतेहपुर सिकरी नावाचे नगर वसवले. अकबर कालीन काही महत्वपूर्ण वास्तू पुढीलप्रमाणे:

जहांगीर महाल - आग्रा

अकबरी महाल - आग्रा

जहांगिरी महाल - फतेहपुर सिकरी

दिवाण-ए-आम - फतेहपुर सिकरी

दिवाण-ए-खास- फतेहपुर सिकरी

पंचमहाल (हवामहाल)- फतेहपुर सिकरी

दुर्की सुलतानाचा महाल - फतेहपुर सिकरी

मरियम महाल - फतेहपुर सिकरी

जमा मस्जिद - फतेहपुर सिकरी

बुलंद दरवाजा - फतेहपुर सिकरी

शेख सलीम चिश्ती चा मकबरा - फतेहपुर सिकरी

इस्लामशहाचा मकबरा- फतेहपुर सिकरी

**सिकंदरा** येथील **अकबराचा मकबरा**, **दिल्ली** येथील **अब्दुल रहीम खानखानाचा मकबरा**, **आग्रा** येथील **इतमादुदौलाचा** मकबरा हे **जहांगीर** कालीन स्थापत्य महत्वपूर्ण आहेत. इतमादुदौलाच्या मकबऱ्यात **'पिट्रा डूरा'**चा सर्वप्रथम वापर झाल्याचे अपल्याला पहायला मिळते. **शाजाहनच्या** काळात मोगल स्थापत्यकलेचा सर्वोच्च विकास झाला. शाहाजहान कालीन महत्वपूर्ण स्थापत्य पुढीलप्रमाणे-लाहोरमध्ये **शहादरा** येथे **जहांगीरचा मकबरा** बांधला. त्याने आग्रा आणि दिल्ली येथे अनेक वस्तूंची निर्मिती केली. **आग्रा** येथे दिवाण-ए-खास, रंग महाल, शिश महल, खास महल, मच्छी महाल, नगीना मस्जिद, मुसम्मन बुर्ज आणि मोती मस्जिद इत्यादी. दिल्ली येथे **१६३९** मध्ये **शाहजाहांबाद** नावाचे नगर वसवले. येथेच **लाल किल्ला** व **जामा मस्जिद** बांधली. दिल्लीच्या लाल किल्यात दिवाण-ए-आम, हिरा महाल, रंग महाल, ख्वाब गाह आणि हमाम  इत्यादी वास्तूंची निर्मिती केली. शाहजहानच्या काळातील सर्वात प्रसिद्ध वास्तू म्हणजे **ताजमहल** होय. अर्जुमत बानू बेगमच्या (मुमताज) स्मृतीप्रित्यर्थ ताजमहल बांधला. १६३१ ला तिचा मृत्यू झाला होता आणि **१६३२** मध्ये ताजमहल बांधण्यास सुरुवात झाली व १६५३ मध्ये बांधून झाला. ताजमहलचा आराखडा निष्णात अभियंता **उस्ताद अहमद लाहोरी** याने बनवला होता. म्हणून शाहजहानने त्याला **नादिर-अल-असर** ही उपाधी दिली. ताजमहल हा **यमुना** नदीच्या किनाऱ्यावर शुभ्र संगमरमर दगडामध्ये बंधाला आहे. **चारबाग** प्रणाली आणि **'पिट्रा डूरा'** शैलीचा उपयोग ताजमहलमध्ये केला असल्यामुळे खूप सुंदर दिसतो. जगातील सातवे आश्चर्य म्हणून ताजमहलची ओळख आहे.



*आग्रा येथील ताजमहल*



*दिल्ली येथील लाल किल्ला*

**लाहोर** येथील **बादशाही मस्जिद,** दिल्लीच्या लाल किल्यातील **मोती मस्जिद** आणि **औरंगाबाद** (छत्रपती संभाजीनगर) स्थित **राबिया दुर्रानीचा मकबरा** इत्यादींचा समावेश **औरंगजेबकालीन** स्थापत्यामध्ये होतो.

**विजयनगर** कालीन स्थापत्यशास्त्रामध्ये खास दक्षिण भारतीय शैलीचा प्रभाव दिसतो. यामध्ये मंदिरे, राजवाडे आणि किल्ले यांचा समावेश होता. हंपी येथील **विरुपाक्ष मंदिर** एक भव्य दक्षिण भारतीय मंदिर आहे. याची बांधणी प्रचंड आणि अचूक असून ती विजयनगर साम्राज्याच्या स्थापत्यकलेची उत्कृष्टता दर्शवते.

**राजस्थान आणि गुजरात**: राजस्थानमधील जैन मंदिरं **रणकपूर** मंदिर यांसारख्या सुंदर संगमरवराने आणि उत्कृष्ट शिल्पकलेमुळे प्रसिद्ध आहेत. **मोढेरा** येथील **सूर्य मंदिर** गुजरातमधील एक महत्त्वाचे स्थापत्य असून ते सूर्य देवतेला समर्पित आहे. याची रचना शिल्पकलेचे आणि जल व्यवस्थेचे उत्तम उदाहरण आहे.

मुघल साम्राज्याच्या उत्तरार्धात विशेषतः औरंगजेबाच्या मृत्यूनंतर भारतीय कला आणि स्थापत्यशास्त्राचा विकास मंदावला होता. त्यानंतर ब्रिटिशांनी हा वारसा चालू ठेवला.

## ७.४ सारांश

दिल्ली सल्तनत कालखंड भारतातील कला आणि वास्तुकलेचा एक महत्त्वाचा भाग होता. हा काळ इस्लामी आणि भारतीय वास्तुकलेचे मिश्रण दर्शवतो. त्यातील इमारती आणि स्मारक हे त्या काळातील स्थापत्यकलेच्या बाबतीत उत्कृष्ट आहेत आणि आजही ते भारताच्या ऐतिहासिक परंपरेचे प्रतीक आहेत. मुघल कला आणि वास्तुकलेवर पर्शियन, भारतीय आणि मध्य आशियाई शैलिंचे सुंदर मिश्रण दिसते. मुघल सम्राटांनी स्थापत्यकलेला नवी दिशा दिली. संपूर्णता, सुंदर सजावट आणि भव्यता हे मध्ययुगीन

काळातील वास्तुकलेचे विशेष आहेत. सल्तनत आणि मुघल स्थापत्यकलेचे आजही भारतीय वास्तुकलेच्या इतिहासात एक महत्त्वाचे स्थान आहे.

## ७.५ प्रश्न

१) सल्तनत कालीन कला आणि स्थापत्याचे वर्णन करा.

२) मुघल कालीन कला आणि स्थापत्यावर प्रकाश टाका.

३) मध्ययुगीन काळातील कला आणि स्थापत्यावर भाष्य करा.

## ७.६ संदर्भ

१. मध्यकालीन भारताचा इतिहास -डॉ. म.वा. काळे, प्राची प्रकाशन

२. मध्यकालीन भारत- डॉ. ओमप्रकाश सिंह, किताब महाल

३. मध्यकालीन भारत -भाग-१ & २ - हरीश्चंद्र वर्मा, दिल्ली विश्वविद्यालय.

४. भारतीय इतिहास- वि. के. अग्निहोत्री, एलाईड प्रकाशन

❈❈❈❈❈❈❈

# ८

# भक्ती चळवळ: उदय कारणे आणि परिणाम

**घटक रचना**

८.० उद्दीष्टे

८.१ प्रस्तावना

८.२ भक्ती चळवळीचा उदय

८.३ भक्ती चळवळीच्या उदयाची कारणे

८.४ भक्ती चळवळीची वैशिष्ट्ये / कामगिरी

८.५ भक्ती चळवळीचे परिणाम / प्रभाव

८.६ भक्ती चळवळीतील संत

८.७ प्रश्न

८.८ संदर्भ

## ८.० उद्दीष्टे

- भक्ती चळवळीच्या उदयाची कारणे समजून घेणे.
- भक्ती चळवळीच्या वाटचालीतील संतांची कामगिरी समजून घेणे.
- भक्ती चळवळीच्या परिणामांचा आढावा घेणे.

## ८.१ प्रस्तावना

मध्ययुगीन कालखंडात भक्ति चळवळीचा झालेला उदय ही तत्कालीन भारतीय इतिहासातील एक महत्वपूर्ण घटना मानली जाते. तत्कालीन भारतीय समाजात प्रचलित चुकीच्या रूढी परंपरा विरुद्ध जागृती निर्माण करणे तसेच परकीय सत्तेला विरोध करण्यासाठी भारतीय समाजात जागृती निर्माण करणे हा या चळवळीचा मुख्य उद्देश होता. प्रस्तुत प्रकरणात आपण भक्ती चळवळ, या चळवळीचा उगम, या चळवळीच्या उदयाची कारणे तसेच या चळवळीतील संतांची कामगिरी व चळवळीचा प्रभाव आदींची माहिती पाहणार आहोत.

## ८.२ भक्ती चळवळीचा उदय

भारतात प्राचीन कालखंडात भक्ती चळवळ उदयाला आली होती. **सर आर.जी. भंडारकर –** यांच्यामतेः ``उपनिषदे म्हणजे भक्तीमार्गाचे प्रवेशद्वार आहे. महाभारत काळापासून शैवपंथात शिवाची पूजा सुरू झाली.`` डॉ**. सत्येंद्र यांच्या मते:** प्रागैतिहासीक काळापासून भक्ती चळवळीचा प्रारंभ झालेला दिसतो. प्रारंभी भक्ती परंपरेचा दक्षिण भारतात उदय झाला. आलवार आणि नायनार या संतानी लोकांच्यात भक्ती भावना निर्माण करण्याचा प्रयत्न केला. **प्रा. कृष्णास्वामी यांच्या मते**, ``आलवार संघाचा काळ हा प्राचीन कालखंडापासून तामिळी प्रदेशात होता. भक्ती चळवळ द्रविड प्रदेशात जन्माला आली.

कर्नाटकात विकसित झाली. महाराष्ट्रात पसरली आणि गुजरातमध्ये जाऊन म्हातारी झाली."

## ८.३ भक्ती चळवळीच्या उदयाची कारणे

**८.३.१) ईश्वराचा आश्रम:** मुस्लीम सत्तेने मुस्लीमेत्तर लोकांच्यावर अनेक अत्याचार केले. यातून मुक्ती मिळवण्यासाठी परमेश्वराला शरण जावे. या हेतूने ईश्वराच्या आश्रयाला लोक गेले. त्यातून भक्ती चळवळीचा उदय झाला.

**८.३.२) हिंदूवरील अत्याचार:** मुसलमानी राजवटीत हिंदूवर राजकीय, आर्थिक, धार्मिक अत्याचार होत होता. उदा. हिंदूना सरकारी नोकरीत प्राधान्य नव्हते. शेतकऱ्याकडून प्रचंड शेतसारा घेतला जात असे. अनेक सामाजिक बंधने लादली होती. हे संकट नष्ट व्हावे म्हणून भावनिक दृष्टीकोनातून परमेश्वराची पूजा लोक करुन लागले. यातून भक्ती चळवळीचा उदय झाला.

**८.३.३) हिंदू धर्मातील जटील कर्मकांड:** भारतात बाह्मण कालखंडापासून हिंदू धर्मामध्ये अनेक स्वरूपाचे कर्मकांड निर्माण झाले. त्यामध्ये यज्ञाविधी, पुजापाठ इ. कर्मकांड निर्माण झाले. यातून मुक्ती मिळवण्यासाठी सरळ साध्या पद्धतीने धर्मांचा प्रसार केला गेला. त्यामुळे भवती चळवळीचा उदय झाला.

**८.३.४) हिंदू समाजातील जातीय व्यवस्था:** प्राचीन कालखंडात वर्णव्यवस्था होती. वर्ण व्यवस्थेचे विभाजन जाती-उपजातीमध्ये झाले. ऋग्वेद, ब्राह्मण, सुत्र, महाकाव्य, पुराण या वेगवेगळ्या काळात जातीव्यवस्था भक्कम बनली, जातीप्रथेमध्ये शीथीलता निर्माण करण्याच्या प्रयत्नातून भक्ती चळवळीचा उदय झाला.

**८.३.५) हिंदू-मुसलमान याच्यात ऐक्य:** मध्ययुगीन काळात इस्लामांचे किंवा मुसलमानांचे भारतावर आक्रमण होऊन, त्यांची राजकीय सत्ता स्थापन झाली. त्यांची रूढी, परपंरा आणि संस्कृती आणि भारतातील संस्कृती यांच्यात समन्वय साधण्याचा प्रयत्न केला. यातूनच ऐकमेकांच्या देवदेवताबद्दल आकर्षण निर्माण झाल्याने भक्ती चळवळीचा उदय झाला.

**८.३.६) ईस्लाम धर्माचा वाढता प्रभाव:** मुसलमानांची सत्ता स्थापना झाल्यानंतर, त्यांनी आपल्या धर्माचा प्रसार करण्याचा प्रयत्न केला. हा प्रयत्न करत असताना, त्यांनी धर्मांतराला प्रोत्साहन दिले. जे धर्मांतर करतील त्यांना जहागीऱ्या दिल्या. त्यांच्यावरचे कर कमी केले. तर काही प्रसंगी सर्वांना सक्तीने मुसलमान बनविण्यात आले. इस्लामी धर्माच्या आक्रमणापासून आपल्या धर्माचे संरक्षण आणि प्रसार करावा या उद्देशाने भक्ती चळवळ सुरू झाली.

**८.३.७) सुफी पंथाचा प्रभाव:** इस्लाम धर्माचा पुरस्कार करणारे लोक कट्टर धर्माभिमानी होते. याच मुसलमानांनी सुफी संप्रदाय निर्माण करून लोकांना प्रेम, सहिष्णूता, माणुसकी, दुसऱ्याबद्दल आदर व दुसऱ्यना मदत करणे इ. संदेश लोकांना दिला. त्यामुळे भक्ती चळवळीचा उदय झाला.

**८.३.८) उपेक्षीतांसाठी कार्य:** भक्ती चळवळीने प्रामुख्याने उपेक्षित समाजाला आधार देण्याचे काम केले. त्यांच्यात ईश्वर भक्ती, प्रेम निर्माण केले. त्यामुळे अनेक जाती - जमातीतून संत निर्माण झाले. या संतांच्या प्रयत्नातून भक्ति चळवळ उदयास आली.

**८.३.९) हिंदू धर्म व समाज यांची दुरावस्था:** शंकाराचार्याच्या प्रयत्नाने हिंदू धर्माचे पुनरुज्जीवन होऊन ब्राह्मणाचे वर्चस्व व महत्त्व वाढले व कर्मकांडास महत्त्व प्राप्त झाले. त्यांनी लोकांना परमेश्वराचे महत्त्व पटवून दिले. त्यातूनच भक्ति चळवळीचा उदय झाला.

**८.३.१०) मुस्लीम राजवटीची स्थापना:** मुस्लीम राजवटीची स्थापना होऊन भारताची सामाजिक व सांस्कृतिक परिस्थिती धोक्यात आली. काही लोक मुस्लीम धर्म स्वीकारत होते. त्यांना आळा घालण्यासाठी व हिंदू धर्माचे संरक्षण करण्यासाठीच भक्ती मार्गाच्या चळवळीस चालना मिळाली.

**८.३.११) हिंदू तत्त्वज्ञानाचे वितरण व सामान्य जनता:** शंकराचार्याचा अदवैतवादाचा सिद्धांत व त्यासंबंधीची तात्विक चर्चा व युक्तीवाद सर्व सामान्य हिंदू जनतेच्या आकलना बाहेरचा होता. त्यामुळे त्यांना सोपी व तात्विक चर्चा हवी होती. की ज्यामध्ये त्यांना सहज सहभागी होता येईल. ही गरज भक्ती मार्गाने पूर्ण केली.

## ८.४ भक्ती चळवळीची वैशिष्ट्ये

भक्ती चळवळीमध्ये अनेक संतांनी महत्त्वाची कामगिरी केली आहे. त्यांनी भक्ती चळवळीतून समतेचा मार्ग दाखवला. त्याची वैशिष्ट्ये किंवा संताचे कार्ये पुढील प्रमाणे -

**८.४.१) सामाजिक समतेचा मार्ग दाखवला:** दक्षिण भारतामध्ये भक्ती चळवळीला प्रारंभ झाला. अलवार व नयनार असे दोन पंथ भक्ति चळवळीत होते. या दोन्ही पंथानी सामाजिक समता प्रस्थापित करण्याचा प्रयत्न केला. परिणामी समाजातील काही प्रमाणात जाती विषमता कमी होऊन समतेचा मार्ग निर्माण झाला.

**८.४.२) धार्मिक कर्मकांडाला विरोध केला:** हिंदू समाजात यज्ञ विधी, देवदेवतांची पूजा, नवस इ. स्वरूपात कर्मकांड चालत होते. यांच्या माध्यमातून ईश्वर प्राप्ती होणार नाही. असा संदेश संतांनी दिला. परमेश्वर हा केवळ तुमच्या प्रेमाचा भुकेलेला आहे हे सांगून त्यांनी कर्मकांडाला विरोध केला.

**८.४.३) संतांनी एकेश्वरवादाचा मार्ग सांगितला:** प्राचीन काळापासून हिंदू समाजात अनेक देवातांची निर्मिती झाली होती. मानवाने आपल्या भक्तीच्या व श्रेद्धेच्या जोरावर वेगवेगळ्या देवतांची पूजा करण्यास सुरूवात केली होती. परंतु परमेश्वर एक आहे. त्यांची रूपे अनेक आहेत हा संदेश संतांनी लोकांना समजावून देऊन एकेश्वरवादाचा प्रसार केला.

**८.४.४) लोकभाषेचा उपयोग:** भक्ती चळवळीच्या उगमापर्यंत जे साहित्य होते ते संस्कृत भाषेत होते. त्यामुळे सामान्य लोकांना ती भाषा कळत नव्हती. संतांनी आपला भक्ती मार्ग सर्वांना कळावा, सामान्य जनतेपर्यंत त्याचा प्रसार व्हावा, यासाठी

लोकभाषेत सहित्याची निर्मिती केली. त्यामुळे अभंग, भारूड, कीर्तन इ.ची रचना केली.

८.४.५) **ग्रह जीवनाला महत्त्व:** भक्ती चळवळीने संन्यास, आश्रम व वानप्रस्थ आश्रमाला विरोध केला. कारण मानव जन्म पुन्हा नाही. म्हणून संतांनी ग्रहस्थाश्रमाला महत्त्व दिले. परमार्थ करूनही परमेश्वर प्राप्त करता येतो. असा सल्ला समाजाला दिला.

८.४.६) **हिंदू - मुस्लीम ऐक्य:** तत्कालीन मुसलमान राज्यांच्या धर्माधतेमुळे हिंदू-मुस्लीम समाजात संघर्ष निर्माण झाला होता. परंतू या भक्ति चळवळीने एकेश्वरवादाचा पुरस्कार केल्याने हिंदू-मुसलमान समाजात ऐक्य निर्माण करण्याचा प्रयत्न केला.

८.४.७) **परमेश्वराच्या सच्चा भक्तीचा संदेश:** भक्ती चळवळीने ईश्वराचे खरे रूप समाजासमोर मांडण्याचा प्रयत्न केला. दिन-दुबळ्यांची, गोर-गरीबांची प्राणी मांत्रांची सेवा करा. त्यांच्यावर प्रेम करा ही खरी भक्ती असून, तो परमेश्वराचा खरा संदेश आहे. असे सांगून लोकांपर्यंत पोहोचवण्याचा प्रयत्न केला.

८.४.८) **दलित जातीचा उद्धार:** सर्व जाती-जमातीतील लोकांना भक्ती करण्याचा अधिकार आहे, असे भक्ती चळवळीने सांगितले. त्यांनी भक्तीचा खरा मार्ग दलीतापर्यंत पोचवला. त्यामुळे दलित जातीतून अनेक संत निर्माण झाले.

८.४.९) **धार्मिक सहिष्णुतेवर भर:** भक्ती चळवळीच्या माध्यमातून संतांनी धार्मिक विषमता कमी केली. सर्व धर्मामध्ये प्रेम, मैत्री निर्माण करण्याचा प्रयत्न केला.

८.४.१०) **धर्मांतरास बंदी:** मुस्लीम राजवटीत सक्तीने किंवा आमिष दाखवून धर्मांत्तर सक्तीने केले जात असे. या धर्मांतरास संतांनी विरोध केला व त्याच्यावर बंदी घातली.

८.४.११) **सद्गुरूचे महत्त्व:** गुरूशिवाय ज्ञान नाही आणि ज्ञानाशिवाय भक्ती नाही. भक्तीमूळेच मनुष्य जीवाला मोक्ष प्राप्ती होते. परमेश्वराची आराधना केल्यास मोक्ष मिळतो असे त्यांनी समाजापर्यंत विचार पोहचवला.

८.४.१२) **भक्ती चळवळ हे एक आंदोलन होते:** भक्ती चळवळीच्या माध्यमातून समाजात समता निर्माण करण्याचा प्रयत्न करून धर्माची माहिती दिली, धर्माचे स्वरूप सांगितले, हिंदू-मुसलमानाच्यात ऐक्य निर्माण केले त्यामुळे सामान्य जनता भक्ती चळवळीकडे आकर्षित झाली. परिणामी हे एक सामाजिक आंदोलन निर्माण झाले.

## ८.५ भक्ती चळवळीचे परिणाम / प्रभाव

भक्ती चळवळी मुळे धर्मातील व समाजातील अनिष्ठ रूढी, परंपरा नष्ट करण्याचा प्रयत्न केला. भारतीय लोकांच्या जीवनावर याचा दिर्घकाळ परिणाम पडला तो पुढील प्रमाणे-

८.५.१) **सामाजिक सुधारणेला उत्तेजन:** भक्ती चळवळीने ढोंगी, अंधश्रद्धा, रूढी, परंपरा या अशा अनेक हानीकारक घटकावर टिका करून, सामाजिक सुधारणेला प्राधान्य दिले. त्यामुळे समाजाला नवीन उत्तेजन मिळाले.

**८.५.२) लोक जागृती:** भक्ती चळवळीतील संतांनी ओव्या, अभंग, भारूड यांच्या माध्यमातून लोक जागती केली. सामान्य लोकांना परमेश्वराची प्रार्थना करण्याचा अधिकार आहे. याची जाणीव करून दिली.

**८.५.३) हिंदू-मुसलमान यांच्यात मैत्री**: हिंदू मुसलमान धर्मांना ऐकमेकांच्या जवळ आणण्याचे महत्त्वाचे कार्य भक्ती चळवळीने केले. दोन्ही धर्मांतील कटूता त्यामुळे बरीच कमी झाली.

**८.५.४) एकात्मतेची भावना**: भक्ती चळवळ ज्या-ज्या ठिकाणी जाऊन पोहोचली त्या-त्या ठिकाणी एकात्मतेची भावना निर्माण झाली. उदा. पंजाब, महाराष्ट्र, गुजरात, कर्नाटक, तामीळनाडू ई. भक्ति चळवळीमुळे ऐक्याच्या भावनेवर स्वत:च्या संस्कृतीचा आणि धर्माचा अभिमान वाढीस लागला.

**८.५.५) समतेचे मार्ग प्रस्थापित केले**: समाजा मध्ये कनिष्ट जाती-जमातीना सर्वच क्षेत्रात स्थान नव्हते. भक्ती चळवळीने त्या लोकांना या चळवळीच्या प्रवाहात आणण्याचा प्रयत्न केला. व त्यांना निंदा नालस्तीपासून दूर करून भक्तीचा मार्ग दाखवला व समाजातील विषमता नष्ट होऊन सामाजिक समता निर्माण झाली.

**८.५.६) भाषा व वाङ्मयाचा विकास:** भक्तीचा मार्ग सर्व सामान्य लोकांना समजावा यासाठी लोकभाषेचा स्विकार करुन, या भाषेतून आपले विचार अभंग, भारुड, ओव्या समाजा समोर मांडल्या. त्यामुळे भाषा वाङ्मयाचा विकास झाला.

**८.५.७) एकेश्वर वादाचा प्रभाव:** भक्ती चळवळीने ऐकेश्वर हा विचार समाजात मांडला. परमेश्वर एकच आहे. म्हणून एकाच परमेश्वराची पूजा, प्रार्थना करावी त्यामुळे व्यक्तीला मोक्ष प्राप्त होतो. हा ऐकेश्वरवादाचा विचार समाजात निर्माण झाला.

**८.५.८) राजनैतिक प्रभाव:** भक्ती चळवळीने राजकीय क्षेत्रात ही जागृती केली. धर्माचे, समाजाचे संरक्षण करावे या उद्देशाने स्वत:ची राजकीय सत्ता असावी असा विचार मांडला. त्यामुळे विजयनगरची सत्ता, मराठ्याची सत्ता अशा राजकीय सत्ता निर्माण झाल्या.

**८.५.९) सांस्कृतिक प्रगती:** भक्ती चळवळीने समाजात मंदिरे बांधकामे मोठ्या प्रमाणात सुरू केली. विशिष्ट देवताची मूर्ती पूजा सुरू झाली. त्यामुळे समाजात सांस्कृतिक जागृती निर्माण झाली.

**८.५.१०) हिंदू धर्माचे रक्षण** मध्ययुगीन कालखंडामध्ये इस्लामी सत्ता असून ते सक्तीने धर्मांतर करत होते. याच्या विरोधात भक्ती चळवळीने कार्य करून मुस्लीम राज्यकर्त्याच्या अन्याय, अत्याचार पासून हिंदू धर्माचे, समाजाचे रक्षण केले.

## ८.६ भक्ती चळवळीतील संत

मध्ययुगीन कालखंडात संतांनी भक्ती चळवळ विकसित करून या चळवळीचे कार्यक्षेत्र संपूर्ण देशात विस्तारले होते. संतांनी साध्या सोप्या काव्य अंभगाची निर्मिती करून लोकांपर्यंत पोहचवले ते संत पुढीलप्रमाणे-

**८.६.१) रामानुजाचार्य:** भक्ती चळवळीचे **जनक** म्हणून यांचा उल्लेख करण्यात येतो. हे **वैष्णव पंथीय** असून यांचा जन्म तिरूपती येथे झाला व त्यांनी सगुण भक्तीचा पुरस्कार केला. परमेश्वराची मनापासून भक्ती करणे हा मोक्ष प्राप्तीचा एकच मार्ग असल्याची त्याची धारणा होती. परमेश्वराची अनन्य भावाने भक्ती केल्यास शुद्रांनाही मोक्ष मिळू शकतो असा त्यावेळी क्रांतीकारक वाटणारा विचार त्यांनी प्रथम मांडला ब्रह्मसुत्र आणि भगवद्गीतेवरील टिका तसेच वेदांत सदयमहा हे ग्रंथ त्यांनी लिहिले.

**८.६.२) निंबकाचार्य:** हे राधाकृष्ण यांचे भक्त होते. त्यांचा जन्म निंबकपुर येथे झाला. शंकराचार्यांचा **अद्वैतवाद** व रामानुजाचार्यांचा **द्वैतवाद** यावर श्रद्धा होती. मोक्ष प्राप्तीसाठी कृष्ण भक्ती करा असे सांगत मथुरेच्या परिसरात त्यांनी भक्तीमार्गाचा पुरस्कार केला.

**८.६.३) मधवाचार्य:** याचा जन्म कल्याणपूर येथे १२०० मध्ये झाला. बालपणापासून संसार त्याग करून  ज्ञान प्राप्त केले. हे विष्णूचे भक्त असून त्यांनी ज्ञानामुळे भक्ती, भक्तीमुळे मोक्ष मिळतो असे सांगितले.

**८.६.४) वल्लभाचार्य:** यांचा जन्म तेलगू कुटूंबात १४६९ रोजी झाला. शिक्षण संपल्यावर तिर्थयात्रा करून विजयनगरला भेट दिली. यांनी संस्कृतमध्ये १७ ग्रंथ लिहिले त्यांनी शुद्ध **द्वैतवादाचा** पुरस्कार केला.

**८.६.५) चैतन्य महाप्रभू:** बंगालमध्ये एका ब्राह्मण कुटुंबात इ.स. १४०५ मध्ये त्यांचा जन्म झाला. भक्ती मार्गाच्या प्रसारासाठी त्यांनी भारतभर भ्रमण केले. त्यांनी जातीव्यवस्था, पशूबळी मांसाहार, मद्यपान इ. गोष्टींचा निषेध केला. हे प्रमुख भक्ती मार्गाचे प्रवर्तक असून त्यांचा मुत्यू १५५३ मध्ये झाला.

**८.६.६) संत ज्ञानेश्वर:** याचा जन्म आळंदी येथे १२७५ रोजी झाला. निवृत्ती, ज्ञानेश्वर, सोपान, मुक्ताबाई असे चार भावंड ज्ञानेश्वर बालबह्मचारी असून १६व्या वर्षी भागवत गितेवर त्यांनी ज्ञानेश्वरी हा ग्रंथ लिहिला त्यांनी लोकांना विठ्ठलाची भक्ती करण्यास सांगितले . त्यांनी १२९६ ला आळंदी येथे समाधी घेतली.

**८.६.७) संत नामदेव:** याचा जन्म १२७० मध्ये पंढरपूर येथे शिंपी कुटुंबात झाला. ११ व्या वर्षी लग्न झाले पण संसारात मन रमले नाही. ते विठ्ठलाचे भक्त होते. त्यांनी पंजाब, राजस्थान, महाराष्ट्र भागवत धर्माचा प्रसार केला. मराठी, हिंदी भाषेत हजारो अभंग रचले. कर्मकांड, जातीभेद यास विरोध केला.

**८.६.८) संत एकनाथ:** यांचा जन्म पैठण येथे १५३३ मध्ये झाला. त्यांनी भक्ती मार्गाचा प्रसार केला. त्यांनी १०३६ ओव्याचे `भावार्थ रामायण` एकनाथी भागवत रूक्मिणी स्वयंवर इत्यादीचे लेखन केले. गोर-गरिबांना त्यांनी जवळ करून प्राण्यावरही दया केली. त्याचा मृत्यु १५९९ मध्ये झाला.

**८.६.९) संत तुकाराम:** विठ्ठलभक्त तुकाराम यांचा जन्म देहू येथे १६०८ मध्ये झाला. त्यांनी ४००० हून जास्त अभंगाची रचना केली हे अभंग तुकारामगाथा म्हणून प्रसिद्ध आहेत. त्यांनी संतांना उपदेश दिला.

``जे का रंगले गांजले । त्यांसी म्हणे जो अपुले ॥तोची साधू ओळखावा । देव तेथेची जानावा ॥``हा संदेश त्यांनी लोकांना दिला.

**८.६.१०) रामनंद:** यांचा जन्म अलाहाबाद मध्ये १२९९ मध्ये ब्राह्मण कुटुंबात झाला. त्यांनी रामाची भक्ती केली. जातीभेदाला विरोध करून त्यांनी भक्तीमार्ग मोकळा केला. त्यांनी संस्कृत भाषे ऐवजी हिंदी भाषेला प्राधान्य दिले.

**८.६.११) संत कबीर:** एक कथा सांगते की यांचा जन्म विधवा बाह्मण स्त्रीच्या पोटी झाला. त्यांना नदी काठी सोडून दिले. निऊ-निमा नावाच्या मुस्लीम दांपत्याने त्याचे पालन केले. कबिरांना दोन मुले होती. त्यांना लिहिता-वाचता येत नसूनही, परमेश्वर एकच आहे अशी शिकवण दिली. त्यांचे दोहे प्रसिद्ध आहेत.

**८.६.१२) संत मीराबाई:** मीराबाई कृष्ण भक्ती असून १५१६ मध्ये जोधपूर येथे जन्म झाला. राजस्थानी भाषेतील त्यांची भजने असून, भक्ती चळवळीचा तो एक अमूल्य ठेवा आहे.

**८.६.१३) गुरूनानक:** यांचा जन्म १६६९ मध्ये खत्री कुटुंबांत झाला. वयाच्या २०व्या वर्षी गृहत्याग केला. त्यांनी शीख धर्माची स्थापना केली. ऐकेश्वरवादाचा पुरस्कार केला. परमेश्वराच्या निर्गुण भक्तीचा पुरस्कार केला. समाजातील व धर्मातील अनेक गोष्टीवर टिका केल्या.

**८.६.१४) संत रामदास स्वामी:** रामदास स्वामीचा जन्म जांब या गावी १६०८ मध्ये झाला. त्यांनी दासबोध हा ग्रंथ लिहून मोलाचा उपदेश केला. श्लोकातून त्यांनी लोकांना सुविचार व सद्वर्तन यांची शिकवण दिली. लोकांना भक्ती मार्गा कडे वळवून त्यानां भक्ती मार्गाची शिकवण दिली.

**८.६.१५) संत तुळसीदास -** यांचा जन्म राजापूर येथे ब्राह्मण कुटुंबांत झाला. बाबा नरहरीदास त्यांचे गुरू. त्यांचे पत्नीवर खूप प्रेम. पत्नीच्या सांगण्यावरून त्यांनी परमेश्वराची आराधना केली. त्यांनी एकूण २५ ग्रंथ लिहिले. रामचरित्रावर लिहिलेला ग्रंथ तुलसी रामायण म्हणून प्रसिद्ध आहे. अनेक ग्रंथाद्वारे त्यांनी समाजातील अंधश्रद्धा, रूढी यावर टिका केल्या.

**८.६.१६) संत तुकडोजी महाराज:** यांचा जन्म यावली येथे १९०९ मध्ये झाली. त्यांनी ४६७५ ओव्यांचा `ग्रामगीता` हे काव्य लिहिले. त्यांनी इर्श्वराची भक्ती केली व लोकांना उपदेश केले.

भक्ती चळवळीमुळे भेदभाव न करता समतेची शिकवण लोकांना दिली. तसेच साधु संतांच्या कार्यामुळे लोकजागृती झाली. धर्माबद्दल आदर वाढला. लोकांच्या मनात आत्मविश्वास निर्माण झाला. संतांच्या कामगिरीचा शिवरायांनी स्वराज्य स्थापनेसाठी उपयोग करून घेतला.

## ८.७ प्रश्न

१. भक्ती चळवळीच्या उदयाची कारणे सांगा.

२. भक्ती चळवळीची वैशिष्ट्ये स्पष्ट करा.

३. भक्ती चळवळीच्या परिणामांचा आढावा घ्या.

४. भक्ती चळवळीतील संतांची कामगिरी स्पष्ट करा.

## ८.८ संदर्भ

१. डॉ. धनंजय आचार्य, मध्ययुगीन भारत, (१००० ते १७००) नागपूर

२. डॉ. अनिल कठारे मध्ययुगीन भारत, कल्पना प्रकाशन

३. ओक पी. एन. इस्लामी प्रचक्राची सुरुवात मनोरमा प्रकाशन

❄❄❄❄❄❄❄

# ९

# सुफी पंथ

**घटक रचना**

९.० उद्दीष्टे

९.१ प्रस्तावना

९.२ सुफी पंथाचा उदय व तात्विक विचार प्रवाह

९.३ सुफी संप्रदायाचे स्वरूप आणि प्रसार

९.४ सुफी पंथाचे सिद्धांत व तत्वज्ञान

९.५ भारतातील प्रमुख सुफी संप्रदाय

९.६ प्रश्न

९.७ संदर्भ

## ९.० उद्दीष्टे

- सुफी पंथाच्या उदयाची पार्श्वभूमी समजून घेणे.
- सुफी पंथाच्या स्वरूपाचा अभ्यास करणे.
- सुफी पंथाचे तत्वज्ञान समजून घेणे.
- भारतातील सुफी संप्रदायाची माहिती जाणून घेणे.

## ९ .१ प्रस्तावना

**अबू नस्त्र-अलू-सिराज** याच्या मते जे लोक ऊन किंवा लेकरीचे कपडे वापरतात ते सुफी होय. **डॉ. अवध पांडेयच्या** मते गरम कपडे वापरणारे सुफी होय. सुफी पंथाची तीन वैशिष्ट्ये म्हणजे १) भौतिक सुखाचा पूर्णपणे परित्याग करणे. २) परमेश्वराला पूर्ण शरण जाणे. ३) परमेश्वराच्या या जगातील व्यापकतेवर अढळ विश्वास ठेवणे.

## ९.२ सुफी पंथाचा उदय व तात्त्विक विचार प्रवाह

कुराणापासून सुफी पंथाचा उगम झालेला दिसतो. तरीपण ख्रिश्चन व हिंदू धर्मातील तत्त्वे त्यामध्ये आढळतात. पुढे ख्रिश्चन धर्माचा प्रभाव कमी होऊन हिंदू धर्माचा प्रभाव वाढला. **हिंदूधर्मातील** भक्तियोग, राजयोग या कल्पना स्विकारल्या. सुफी पंथा मध्ये व्यावहारिक दृष्टिकोन व तात्विक दृष्टिकोन आढळतो. व्यावहारिक दृष्टीने राजयोग व भक्तीयोग यांच्याशी साम्य आहे. तात्विक स्वरूप मात्र वेदान्तामधील तत्वांशी मिळते जुळते आहे. सुफी पंथाने हिंदू धर्माकडून स्वच्छता, विशुद्धता, तर **बौद्ध धर्माकडून** सत्य व अहिंसा, आर्य आष्टांगमार्ग या कल्पनेचा स्विकार केला. ग्रीक वाङ्मयाचे अरबी भाषेत रूपांतर झाल्यावर प्लेटोवादाच्या तत्वांचा सुफी पंथावर प्रभाव पडला. त्यामुळे नवव्या शतकापासून पंथाचा प्रसार झाला.

त्यावेळी सुफी पंथाने तात्विक भूमिका स्विकारली, त्यामुळे **पाच तात्विक विचार प्रवाह** निर्माण झाले. ते पुढील प्रमाणे-

१) **संत हुसेन-बिन-मन्सूर-**अनल हक, अनल हक (मी तो आहे, मी तो आहे)
२) **इब्नसीना : -** परमेश्वराच्या अलौकिक व विश्वव्यापक स्वरूपावर विश्वास व्यक्त.
३) **सुऱ्हावर्दी: -** ईश्वरामध्ये विलीन होण्याचे अंतिम ध्येय साध्य होईपर्यंत आत्मा पुनर्जन्म होत राहतो. शेवटी आपले ध्येय साध्य करतो.
४) **इब्न-अल्-अरबी : -** परमेश्वराचे प्रतिबिंब निसर्ग व मानव या दोन्हीतही आहे.
५) **अब्दुल करीम अल् जीली : -** सर्व विश्व हे परमात्म्याचे स्वरूप आहे.

## ९.३ सुफी संप्रदायाचे स्वरूप आणि प्रसार

सुफी पंथमधील संप्रदायाला **सिलसिला** म्हणून ओळखले जाते. गुरू किंवा नेतृत्व करणारा धर्मोपदेशक याला **पीर**, **शेख** किंवा **मुर्शिद** असे म्हणतात. खानका, जमातखाना, झाविया हे **तीन प्रकारचे मठ** आहेत. **१) खान का मठ -** विस्तिर्ण असून त्यामध्ये प्रत्येकाला प्रवेश असे. **२) जमातखान मठ -** काही शिष्यांची राहण्यासाठी जागा असे **३) झाविया मठ -** जगापासून दूर एकांतात राहून साधना करणाऱ्या गुढवाद्यांचीच फक्त सोय केलेली असे. जेव्हा सुफी पंथामध्ये प्रवेश करावयाचा असेल तेव्हा त्याला ठिगळे लावलेला एक अंगरखा घालावयास देत व डोक्यावरील केस काढून टाकीन असत. शेख आपल्या वारसाला पदाची सर्व सन्मान चिन्हे म्हणे अंगरखा, प्रार्थनेची वस्त्रे, खडावा, जपमाळा, काठी इ-देत असे. अध्यात्म साधना करताना भक्ताचा जोष वेगवेगळ्या टप्प्यातून जात असतो. त्यास **मकामात** असे म्हणतात. या वेळी मनाच्या अनेक अवस्था दिसून येतात त्याला **हाल** म्हणतात. सुफी पंथात भक्तीने करावयाच्या साधनेला **जिक्र** म्हणतात.

७व्या शतकामध्ये सिंध, पंजाब प्रांतात मुस्लिम सत्तेचा प्रवेश झाला. **मुलतान हे प्रमुख केंद्र** होते. ९व्या शतकानंतर सुफी पंथाचा प्रसार मोठ्या प्रमाणात झाला. या काळात सुफी पंथामध्ये दोन प्रकारच्या संताचा उदय झाला. एका प्रकाराला **संशयी किंवा झहिंद** आणि दुसऱ्या प्रकाराला **सेवक किंवा उब्बाद** असे म्हटले आहे. सुफी पंथाने दक्षिण भारतात **प्रथम पेन्नूकोंड** येथे प्रवेश केला. त्यानंतर सर्वत्र प्रसार झाला. नुरूद्दीन हा सुफी संत इजिप्तमधून इ.स.च्या नवव्या शतकात दक्षिण भारतात आला. त्याने राक्षसभुवन व गोणगाव येथे धर्मप्रसार केला. जल्लाउद्दीन - गंजखा आणि मोमिन आरिफ हे साधू १३व्या शतकात दक्षिणेत आले. मध्ययुगीन दक्षिण भारतात अंदाजे ३५० सुफी किंवा मुस्लिम संत होते असे अब्दुल जब्बार मल्कापुरी यांच्या ग्रंथावरून समजते. बुऱ्हाणपुर, औरंगाबाद, हैदराबाद, गुलबर्गा, बिदर-विजापूर ही मुस्लिम **धार्मिक केंद्र** होती. अल्लाउद्दीन खिलजीच्या काळात शेख मुंतजीबुद्दीन जरीजरबक्ष दुल्हा हा दक्षिणेत **खुलदाबाद** येथे आला. पैठण ते महाराष्ट्रातील **सुफी केंद्र** होते. खानदेशाचा सुलतान नसिरूद्दीन फारूकी याने बुऱ्हाणूद्दीनच्या नावाने बुऱ्हाणपूर हे गाव बसविले. बुऱ्हाणूद्दीनचे शिष्य इमाद काशानी, शेख हुसेनी, रूकनुद्दीन काशांने, हुसलुल वसूल, हिदायतुल कुतूब, नफायसुल अन्फास हे तीन ग्रंथ लिहिले. सुफी संतांनी पुढीलप्रमाणे शहरात धर्मप्रचाराचे कार्य केले. **पैठण-** निजामुद्दीन, **खुलदाबाद**-बुऱ्हाणूद्दीन गरीबशहा, **गुलबर्गा**-सिराजुद्दीन, जुनैदी, **विजापूर**-ऐनउद्दीन, **खानदेश**-बहुदुल्ला, **पुणे**-हिसानुद्दीन कत्ताल.

## ९.४ सुफी पंथाचे सिद्धांत व तत्त्वज्ञान

प्रत्येक भक्तीपंथात गुढ़वादी ज्ञानाला महत्त्व आहे. त्याप्रमाणे सुफी पंथामध्येही गुढ़वादी ज्ञानाला महत्त्व आहे. अध्यात्म्याचे ज्ञान मिळवणे म्हणजे परमात्म्याशी एकरूप होणे होय. परमेश्वराचा आविष्कार ज्या पद्धतीने होतो त्याला सुफी पंथात **तनजुल्लात** म्हणतात. तनजुल्लात म्हणजे अवतरणे होय. परमेश्वराच्या निर्भेळ स्वरूपाला **अल्ल वजदूल मुतलक** म्हणतात. त्याचा अर्थ एकाच एक अस्तित्व होय. जात (सत्ता) सिफ्त (गुण) आणि कर्म याबाबत परमात्मा अद्वितीय आहे. अज्ञान हे सर्व दुःखांचे मूळ आहे. मोक्ष म्हणजे अज्ञानाचा नाश, अहंकार, आसक्ती यांचा निरास आहे. परमेश्वराचे स्वरूप यासंदर्भात सुफी पंथामध्ये तीन विचारप्रवाह आहेत.

१) **इजादिया (दैतवाद) : -** सृष्टी व परमेश्वर भिन्न आहे. सृष्टीची परमेश्वराने निर्मिती केली.

२) **शहुदिया : -** परमेश्वर सर्वव्यापी, सर्वश्रेष्ठ आहे.

३) **वजुदिया (अद्वैतवाद) : -** परमेश्वर हे एक सत्य असून सर्व काही तोच आहे.

**९.४.१) अध्यात्म साधनेच्या मार्गातील सात टप्पे:** अध्यात्म जीवनातील प्रगतीच्या पंथाला **मार्ग** म्हणतात. त्या मार्गावर प्रवास करणाऱ्या **सालीक** म्हणतात. सालीकला परमेश्वराचे ज्ञान म्हणजे **मारिफन** संपादनासाठी शिक्षण देणे. या शिक्षणाचे किंवा अध्यात्म साधनेच्या मार्गातील **सात टप्पे : -**१) उबुदियात (सेवा) : - मुमुक्षूला तोबा (पश्चाताप) होतो. २) इष्क : - परमेश्वराविषयीची ओढ /प्रेम निर्माण होते. ३) जाहेद (त्याग) : - परमेश्वराला सोडून बाकी सर्व गोष्टींचा त्याग करणे. ४) मारिफत (ज्ञान प्राप्ती) - सर्व गोष्टी सोडून दिल्यास परमेश्वराच स्वरूपात ज्ञान भक्ताला प्राप्त होते. ५) वजद (उन्मादावस्था) : - परमेश्वराच्या ध्यानाने उन्मादावस्था प्राप्त होते. ६) हकिकत- परमेश्वराच्या ज्ञानप्राप्तीनंतर भक्तांच्या मनात तव क्कुल (परमेश्वराला शरण नाण्याची भावना) निर्माण होते. परमेश्वर एकमेव सत्य आहे. हे समजणे त्यालाच तौहिद म्हणतात. आत्मा अनंतात विलिन होतो. याला ईश्वर दत्त हकीकत असे म्हणतात. ७) वसल (मलिन): - परमात्म्याच्या साक्षात्काराने भक्ताचे हदय समाधानी होते. थोडक्यात साधनमार्गातील सात टप्पे म्हणजे १) पश्चाताप २) संशय ३) संन्यास ४) दारिद्र्य ५) शांतपणा ६) विश्वास ७) समाधान ही तत्त्वे आहे.

**९.४.२) आत्मस्थितीच्या अवस्था:** मानवाच्या आत्मस्थितीचे **सात टप्पे** आहेत. त्याला **मुकामत** म्हणतात. ते म्हणजे १) तोबा (पश्चाताप) २) इनावत (मतांतर) ३) जुहूद (त्याग) ४) तवक्कूल (परमेश्वराला शरणागती) ५) सब्र (संतोष) ६) शुक्र (ईश्वराविषयीची कृतज्ञता) ७) मुकाम / रजा (ईश्वरी इच्छा हीच आपली इच्छा) या अवस्थेच्या सात टप्प्यामध्ये खौफ (भय) वादा (विरक्ती) फक्र (गरिबी) यांचा तीनचा समावेश केल्यास ईश्वर प्राप्ती होते. ईश्वरप्राप्तीत ही १० तत्त्वे सांगितलेली आहेत. सुफीचा **त्रिप्रवास** म्हणजे मानवाच्या आत्मोद्धाराचे तीन मार्ग होय. १) सररिलला - परमेश्वरापर्यंत प्रवास करणे २) सैरफिल्ला - परमात्म्य स्वरूपात प्रवास करणे. ३) सैरअनिल्ला - परमेश्वरापासून प्रवास करणे. सुफी पंथाची आत्म्याच्या स्वरूपाविषयीची धारणा म्हणजे रूढ (आत्म्याचे स्वरूप पवित्र्य

असून श्रेष्ठ आहे), नफस (आत्म्याचे कामक्रोधधारी मुक्त स्वरूप होय) या दोन प्रकारच्या आहेत.

**९.४.३) सुफीचे आचारशास्त्र:** आत्म्याच्या उद्धारासाठी **चार आचार मार्ग** सुफीने सांगितले आहेत. १) शरियत - धर्माचे पालन कसे करावे हे सांगणारे नियम होय. २) मलकुत-दैवी संपत्ती व दैवी आशीर्वाद होय. ३) जबरूत - सिद्धी प्राप्ती होय. ४) लाहून - परमेश्वरात विलिनीकरण होय. **शरियतच्या आचार** धर्मात पुढील सांगितलेल्या आहेत. १) तिलावत (कुराणाचे पठण करणे) २) रोज पाच वेळा नमाज पढणे. ३) जिक्र (परमेश्वराचे स्मरण करणे.) मोठ्यां आवाजात उच्चार करणारे याला जिक्र-इ-जली म्हणतात. तर मनातल्या मनात उच्चार करणे याला जिक्र-इ-खफी म्हणतात. ४) फिक्र (ईश्वराच्या गुणांचे चिंतन करणे) ५) समा (ईश्वरी नावाचे संकीर्तन करणे) ६) मुजाहद (सर्व इंद्रिये व चित्तवृत्तीचा निषेध)

परमात्मा स्वरूपाचा प्रकाश पडल्यानंतर त्या व्यक्तीला अलफरदर कामील म्हणजे **पुरूषोत्तम सिद्धपुरूष** म्हणतात. या सिद्ध पुरूषाला **गौसुल जाम / जगदाधारी** म्हणतात. परमेश्वर ज्यांना योग्य मार्गदर्शन करतो. अशा संतांना **अल्महदी** म्हणतात. फना म्हणजे नष्ट होते. बका म्हणजे परमेश्वर स्वरूपाच्या चिंतनात मग्न राहणे. **फनाचे तीन प्रकार** सांगितलेले आहेत. १) कुर्वे फरायज (परमेश्वराच्या हातातील बाहुले बनणे.) २) कुर्वे-न-वासिल (सुफी एजंट) ३) जमाबयनुल कुरबैन (भक्त व परमेश्वराचे मिलन) सुफी पंथात गुरूभक्ती महत्त्वाची आहे. **गुरूला** शेख/पीरा/मुर्शीद म्हणतात. **शिष्याला** मुरीद म्हणतात. गुरूकडून उपदेश घेणाऱ्या विद्यार्थ्याला **बैत** म्हणतात. गुरू ध्यानाच्या प्रकाराला **तवज्जू** म्हणतात. दर्ग्याची यात्रा भरते, त्यास **उरूस** म्हणतात.

**९.४.४) सुफी पंथाची चार तत्त्वे:** १) फना (निर्माण) २) सलुक (अष्टांगमार्ग) ३) मराकबा (राजयोग) ४) करामन (करामत) (अलौकिक भक्तीचा वापर)

**९.४.५) सुफी पंथाचे तत्त्वज्ञान :**

१) ईश्वर एक असून तो सर्वव्यापी आहे. तो मंदिर, मस्जिदमध्ये नसून व्यक्तीच्या हृदयात आहे.

२) धार्मिक क्रिया, रोजे रखना मानत नाही. कारण परमेश्वराचे निवास स्थान शुद्ध मनामध्ये असते.

३) अहंकाराची भावना मिटवून ईश्वराचे दर्शन करत येते.

४) व्यक्तीने ईश्वराच्या प्रेमात, भक्तीमध्ये इतके तल्लीन झाले पाहिजे की, तो शुद्ध, बुद्ध विसरला पाहिजे.

५) सर्व एकाच परमेश्वराची लेकरे मानून परस्परांशी प्रेमाने वागावे.

६) दुसऱ्याचा तिरस्कार करणाऱ्याला परमेश्वर प्राप्त होत नाही.

७) गुरूशिवाय ज्ञान आणि गती प्राप्त होत नाही.

८) संगीताने व्यक्तीचे मन केंद्रित होते.

## ९.५ भारतातील प्रमुख सुफी संप्रदाय

सुफी संप्रदायाचे भारतात एकूण ११ पंथ होते. त्यामध्ये प्रमुख सहा संप्रदाय होते.

**९.५.१) चिस्तिया संप्रदाय:** या संप्रदायाची स्थापना ख्वाजा अबू इशाक याने १२व्या शतकात केली. याचा प्रमुख चिस्ती गावचे असल्याने या संप्रदायास चिस्ती हे नाव पडले. हे गाव हिरात जवळ होते. ११९२च्या सुमारास मुईनुद्दीन चिश्ती यांनी भारतात संप्रदाय आणला. **अजमेर** हे प्रमुख केंद्र होते. दिल्ली येथे बख्तीयार काकीने, नगोर येथे हमिदउद्दीनने, अजोधन येथे फरीदउद्दीनने, बंगालमध्ये सिराजउद्दीनने, दौलताबाद **बुऱहाबुद्दीन** यांनी चिश्ती संप्रदायाचा प्रसार केला. सत्ता **शास्त्रीय एकत्ववाद** हे प्रमुख तत्वज्ञान होते. एकांतामधील पुजा, केंद्रीत बैठक, श्वास निरोधन यांना साधनेमध्ये महत्त्व होते. महंमद-बिन-तघलकच्या काळात जबरदस्तीने स्थलांत्तर करण्यात आले. त्यामुळे हा पंथ अडचणीत आला.

**९.५.२) सुऱ्हावर्दी संप्रदाय:** इराकमध्ये नजीब उद्दीनने १२व्या शतकात या संप्रदायाची स्थापना केली. १३ व्या शतकात बहाउद्दीन झकारिया याने भारतात संप्रदाय आणला. त्यांनी आपले पहिले **केंद्र मुलतान** येथे स्थापन केले. त्यानंतर बंगालमध्ये जलालुद्दीन तबरीझी, गुजराथमध्ये जलालुद्दीन बुखारीने शाखा स्थापन केली. या संप्रदायाचे सुलतानाशी प्रेमाचे संबंध होते. तैमूरलंगच्या स्वारीनंतर त्याचा विकास झाला नाही.

**९.५.३) नक्शबंदीचा संप्रदाय:** भारतातील सुफी संप्रदायापैकी एक संप्रदाय अतिशय महत्त्वाचा व बिलिष्ठ होता. मध्य आशियामध्ये १२ व्या शतकात बहा-अल-दीन याने स्थापना केली. महंमद-बाकी-बीला याने अकबराच्या काळात भारतात आणला. तुर्की व मोगल लोकांच्या खोट्या धार्मिक समजुतीच्या विरूद्ध प्रतिक्रिया केली. या संप्रदायाच्या नेतृत्ववादी असणाऱ्या व्यक्तीमध्ये सखोल ज्ञान आणि गुढवाद यावर प्रभुत्व होते. १७व्या शतकात शेख महंमद सरहिंदी याने पंथाला नवे स्वरूप दिले. हा पंथ हिंदूच्या बाबतीत अधिक सहिष्णू होता. `साक्षीतादात्म्य` हे मुख्य सुत्र होते. **अलहल्लाज याने** सर्वांत प्रथम या तत्त्वाचा पुरस्कार केला. मध्य आशियामध्ये अलाउद्दीला सिमनानी याने विकास केला. भारतातील प्रसारामध्ये गुढवादी शेख अहमद सरहिंदी याचा उल्लेख केला जातो. १९व्या शतकात महत्त्व कमी झाले.

**९.५.४) कादिरीया संप्रदाय:** इराकमध्ये अब्दुल कादीर अल गिलानी याने स्थापना केली. १४८२ मध्ये त्याने मठ स्थापन केला. भारतामध्ये महंमद घौय याने आणला. या संप्रदायाला मोगल काळात महत्त्व प्राप्त झाले. मुहंमद मिर हा शेख (गुरू) होता. त्याच्या शिष्यामध्ये दारा व जहान अरा हे प्रमुख होते. एकत्ववाद हे तत्वज्ञान संप्रदायाने मानले होते. इब्न-अल-अरबी हा या तत्वाचा प्रवर्तक होता. या संप्रदायाला औरंगजेबच्या काळात उतरती कळा लागली.

**९.५.५) शतारी संप्रदाय:** हा संप्रदाय अबू-यझीद-अल-बीस्वामी याने स्थापन केला. १५व्या शतकात शेख अब्द-अल्ला याने भारतात आणला. तत्वज्ञान, आध्यात्मिक साधना, समाज, प्रार्थना इत्यादी बदल या संप्रदायावर हिंदूचा प्रभाव होता. मुहंमद घौय याचा बाबर, हूमायून, अकबराशी संबंध होते.

**९.५.६) फिदीसिया संप्रदाय:** या संप्रदायाची स्थापना मध्य आशियामध्ये सैफुद्दीन बाखर्झी याने केली. हा पंथ भारतामध्ये बद्रुद्दीन याने आणला. याचा प्रभाव बिहार भागात होता. या संप्रदायाच्या गुढवादी लोकांमध्ये अहमद इब्न याह या मानेरी याचा समावेश आहे. याचा काळ तघलक सुलतानाचा काळ होता.

## ९.६ प्रश्न

१. सुफी संप्रदायाच्या उदयाची कारणे सांगा.

२. सुफी संप्रदायाच्या स्वरूपावर भाष्य करा.

३. सुफी संप्रदायाच्या तत्वज्ञानाची सविस्तर माहिती लिहा.

## ९.७ संदर्भ

१. चौबळ जे. असे होते मोगल, महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ
२. डॉ. धनंजय आचार्य, मध्ययुगीन भारत, कल्पना प्रकाशन.
३. गाठाळ एस. एस. भारताचा इतिहास, परभणी २००४.
४. विद्याधर महाजन, मध्यकालीन भारत, सं. चंद, दिल्ली २००२.
५. आर. डी. भोसले, आर. एच. प्राचीन व मध्ययुगीन भारताचा इतिहास.

❄❄❄❄❄❄❄

# १०

# अकबराचे धार्मिक धोरण

**घटक रचना**

१०.० उद्दीष्टे

१०.१ प्रस्तावना

१०.२ मध्ययुगीन भारतातील समन्वयवाद (बहुमिश्रवाद)

१०.३ अकबराचा दिन-ए-इलाही

१०.४ सारांश

१०.५ प्रश्न

१०.६ संदर्भ

## १०.० उद्दीष्टे

- अकबराची धार्मिक नीती समजून घेणे.
- अकबराचा दिन-ए-इलाही व त्याचे महत्व जाणून घेणे.
- अकबराचे धार्मिक धोरण व त्याचे महत्त्व समजून घेणे.

## १०.१ प्रस्तावना

अकबराचा जन्म आणि त्याचे संगोपन उदारमतवादी वातावरणात झाले. त्याचे वडील सुन्नी मुगल आणि आई पर्शियन शिया होती तर त्याचा जन्म एका हिंदू राजांच्या घरात झाला होता. तसेच जन्मानंतर साधारणपणे तो एक महिना त्याच हिंदू राजाच्या घरात वाढत होता. अकबराचे सर्वात उल्लेखनीय शिक्षक अब्दुल लतीफ हे एवढे उदारमतवादी होते की, त्यांना संपूर्ण शिया असलेल्या पर्शियात सुन्नी समजले जाई तर सुन्नी बाहुल्य असलेल्या उत्तर भारतात शिया समजले जाई. याच अब्दुल लतीफ यांनी अकबराला सुल्ह-ए-कुल (वैश्विक शांतता) या तत्वाची शिकवण दिली होती जी अकबर शेवटपर्यंत विसरला नाही. अशाप्रकारे अनुवांशिकता आणि आसपासचे वातावरण यांच्या प्रभावामुळे अकबराचे धार्मिक धोरण उदारमतवादाकडे झुकलेले जाणवते. त्यामुळे बुद्धीप्रामाण्यवादी अकबराने शास्त्रीय वा वैज्ञानिक सत्याचा शोध घेण्याचा प्रयत्न केला.

धर्म आणि अधिकाराशी असमाधानी होऊन अकबराने मानवी बुद्धीप्रामाण्यवाद हाच धर्माचा खरा पाया वा आधार असल्याचे जाहीर केले. तसेच आपल्या साम्राज्यातील प्रत्येक पंथाला सहनशीलतेचा धडा दिला. आपल्या साम्राज्यातील धार्मिक मतभेद संपविण्यासाठी त्याने आपल्या साम्राज्यातील त्याला ज्ञात असलेल्या सर्व धर्मांच्या तत्त्वांचे एकत्रिकरण करून वा समन्वय साधून त्यास तवाहिद-ए-इलाही म्हणजेच दैवी एकेश्वरवाद असे संबोधले. हा काही धर्म नव्हता तर साम्राज्यातील वेगवेगळ्या समुदायांना एकत्र बांधून ठेवण्यासाठीची एक सामाजिक व धार्मिक परंपरा वा बंधुत्ववाद होता.

## १०.२ मध्ययुगीन भारतातील समन्वयवाद (बहुमिश्रवाद):

आपण मध्ययुगीन भारताच्या ज्या कालावधीचा अभ्यास करत आहोत त्याकाळातील धार्मिक परिस्थिती व्यवस्थितपणे समजून घेण्यासाठी आपणास 'समन्वयवाद' वा बहुमिश्रवाद या शब्दाचा अर्थ समजून घेणे महत्वाचे ठरते. समन्वयवाद म्हणजे काय?

समन्वयवादाचा शब्दकोशातील अर्थ पुढीलप्रमाणे आहे- विविध धर्मं, संस्कृती वा विचारधारांचे एकत्रिकरण वा एकत्रिकरण करण्याचा प्रयत्न होय. मध्ययुगीन काळातील धार्मिक चळवळी आणि धार्मिक उत्थान समजून घेण्यासाठी शब्दकोशातील अर्थाच्यापलीकडे जाऊन समन्वयवादी वा बहुमिश्रवाद या शब्दाचा अर्थ समजून घ्यावा लागेल.

**रशिदुद्दीन खान यांच्या म्हणण्याप्रमाणे भारतीय सभ्यतेवर खलील दोन महत्वाच्या परंपरांचा पगडा आहे:**

इंडो-आर्यन सांस्कृतिक प्रवाह ज्यातून वैदिक तत्वज्ञान निर्माण झाले

इंडो-मुस्लिम सांस्कृतिक धागा ज्यात भक्ती मार्ग व इस्लामिक सुफीवादाची गुंफण होती

ते पुढे जाऊन आपल्या कम्पोजिट कल्चर ऑफ इंडिया ॲंड नॅशनल इंटेग्रेशन या पुस्तकात उद्धृत करतात की, "त्यामुळे असे लक्षात येणे आश्चर्यकारक नाही की, भारतातील संमिश्र संस्कृतीचा उगम खंडनाऐवजी समेटाच्या वातावरणात, तंट्याऐवजी सहकार्य, राजकिय दृष्ट्या प्रबळ असलेल्या इस्लामिक सांस्कृतीक धाग्यांशी तंटा करून परस्पर विनाश करून घेण्याऐवजी जमवून घेऊन सहअस्तित्व टिकविणे यात आहे". अशाप्रकारे, मध्ययुगीन भारतातील काळ म्हणजे धार्मिक असहिष्णुतेचा आणि हिंदू व मुस्लिमांमध्ये सांप्रदायिक युद्धे होण्याचा काळ होता असे जे सनातनी अभ्यासकांनी मत मांडले आहे त्याचे प्रबळ खंडन करण्याचा प्रयत्न करतात.

गॅबोरियू यांच्यानुसार संत परंपरेमुळे भारतात हिंदू-मुस्लीम धर्मांमध्ये समन्वयवाद निर्माण होण्यास मदत झाली. सुफीवादाचा मोठ्या प्रमाणात प्रसार झाल्यामुळे देखील हिंदू व मुस्लिम धर्मांमध्ये सलोखा निर्माण होण्यासाठी मदत झाली.

अशाप्रकारे निर्माण झालेला धार्मिक समन्वयवाद पुढे मुगल काळात देखील मोठ्या प्रमाणात प्रसार पावत होता. बाबर व हुमायून या दोघांचाही विशाल दृष्टीकोन होता व त्यांची इच्छा इस्लाम तसेच हिंदू समाज पाठिंबा देण्याची होता. हे बाबरने मृत्युशय्येवर असताना हुमायूनला पुढील दिलेल्या सल्ल्यावरून लक्षात येते: "हे पुत्रा, भारतात अनेक धर्म आहेत. त्या देवाची स्तुती असो ज्याने हे राज्य तुला मिळवून देण्यास मदत केली. त्यामुळे तुझे हे कर्तव्य बनते की, तू तुझ्या हृदयातून धार्मिक कलुषित पणा काढून टाकून प्रत्येक धर्माप्रमाणे न्याय देण्याचे काम करावे. असे करून तू लोकांची मने जिंकशील व त्यांची निष्ठा मिळवू

शकतील. राज्यकर्त्यांचे नियम पाळणारी कुठल्याही समुदायाची मंदिरे व प्रार्थना स्थळे तु उध्वस्त करू नकोस. इस्लाम धर्माच्या शिकवणीचा प्रसार तलवारीपेक्षा परोपकाराच्या शस्त्राने केला जाऊ शकतो." नंतरच्या काळात हुमायूनने आपल्या पित्याने दिलेला हा सल्ला पाळल्याचे लक्षात येते. परंतु या दोघांचाही कार्यकाल कमी असल्यामुळे जास्त प्रमाणात धार्मिक समन्वयाला बढावा देणारी पावले ते उचलू शकले नाहीत असे वाटते.

हुमायूनचा पुत्र अकबर याने  या दिशेने निर्णायक  पावले उचललेली  दिसतात. अकबराने सत्तेवर आल्यानंतर लागलीच या दिशेने उचललेले सर्वात निर्णायक पाऊल म्हणजे फक्त हिंदूंच्या तीर्थयात्रेवर लादलेला जिजया हा कर रद्दबातल करणे हे होय. त्याने हिंदू आणि मुस्लीमांना समान वागणूक देणारे कायदे केले. तसेच बादशहाच्या सांगण्यावरून रामायण, महाभारत आणि वैदिक साहित्याचे भाषांतर मुस्लीम वाचकांना सुकर व्हावे म्हणून पर्शियन (फारसी) भाषेत भाषांतर करण्यात आले. धार्मिक समन्वयवाद जो अकबराच्या काळात अतिउच्च शिखरावर पोहोचला होता तो त्याच्यानंतरच्या मुगल बादशहाच्या काळातदेखील सुरू असल्याचे लक्षात येते. याबाबत एक महत्वाचे उदाहरण द्यावयाचे झाले तर- शहाजहानचा ज्येष्ठ पुत्र दारा शिकोह याने उपनिषदे, भगवद्गीता आणि योग वशिष्ठ सारख्या हिंदू धार्मिक ग्रंथांचे भाषांतर पर्शियन म्हणजेच फारसी भाषेत केले होते. त्याने ' मजमौल बहरेन' (दोन महासागरांच्या मिलनाची भूमी ) नामक पुस्तक लिहिले होते. या पुस्तकात त्याने हिंदू तत्वज्ञान तसेच मुस्लीम गुढवादी तत्वज्ञाचा तुलनात्मक अभ्यास केला होता.

एम्. मोहिउद्दिन यांनी प्रसिद्ध केलेल्या 'द एलिमेंट्स ऑफ कम्पोजिट कल्चर' यांनी असे नमूद केले आहे की, अलिकडच्या काळात झालेल्या संशोधनातून भारतातील इस्लाम धर्माविषयीच्या प्रामुख्याने औरंगजेबाच्या संदर्भातील समान्यजनांच्या मनात असलेल्या चूकीच्या समजूती काढून टाकण्यासाठी मदत होते. मोहिउद्दिन म्हणतात,"आधुनिक संशोधनाने आश्चर्यकारक तत्त्वज्ञ दाखवून दिले आहे की, अगदी औरंगजेबानेसुद्धा अनेक मंदिरांना जागिरी दिल्या होत्या. त्याचप्रमाणे मुस्लीम व हिंदू राजांमधील युद्धांना मुस्लीम शासकांच्या सैन्यात अनेक हिंदू सैनिक होते व हिंदू राजांच्या सैन्यातदेखील मोठ्या प्रमाणात मुस्लीम सैनिक होते या सत्याकडे दुर्लक्ष करून धार्मिक युद्धांचा रंग देण्याचे काम करण्यात आले."

पश्चिम भारतामध्ये समन्वयाच्या परंपरेचा मोठ्या प्रमाणात फक्त प्रसारच झाला नव्हता तर ती खोलपर्यंत रूजली होती. अजमेर च्या ख्वाजा मोईनुद्दीन हसन चिस्ती यांचा राजस्थानातील दर्गा म्हणजे पश्चिम भारतातील सर्वात प्रसिद्ध धर्मस्थळ होय असे म्हणणे वावगे ठरणार नाही. ख्वाजा मोईनुद्दीन चिस्ती यांचा नेहमीच हिंदू आणि मुस्लीमांमध्ये सलोखा निर्माण करणे, जातींवर आधारित असमानतेला विरोध करणे आणि इतर सामाजिक वाईट प्रवृत्तींच्या विरोधात झगडा देण्यासाठी नेहमी प्रयत्नरत राहत असे निदर्शनास येते. असे जाणवते की, त्यांच्या शिकवणीचा येणाऱ्या काळातील भक्ती

चळवळीवर मोठा प्रभाव पडला होता. असे मानले जाते की, अकबर चिस्तींच्या शिकवणीचा खंदा समर्थक होता. अझिज अहमद आपल्या 'स्टडीज् इन इस्लामीक कल्चर इन द इंडियन सबकॉंटिनन्ट' या पुस्तकात म्हणतात की, हुसैनी ब्राम्हण हे उच्च जातीतील लोकांनी इस्लाममधील समन्वयवादी तत्वांचा स्विकार करून त्यांचा आपल्या मनानुसार अन्वयार्थ लावणे याचे महत्वपूर्ण उदाहरण होय. ते पुढे जाऊन लिहितात की, हुसैनी ब्राम्हण ख्वाजा मोईनुद्दीन चिस्ती यांना नामधारी देव मानत. ते मुहम्मद पैगंबराला हिंदूंचा एक अवतार मानत व मुस्लीमांप्रमाणे रमजानचे पवित्र उपवास करत व मृतांना दफन करत. ते आपल्या कपाळावर ब्राम्हणांसारखे गंध वा तत्सम गोष्टी लावत असत परंतु भिक्षा मात्र फक्त मुस्लीमांकडूनच स्विकारत असत.

सुमित्रा पॉल आपल्या 'व्हेयर मुस्लीम्स् परफॉर्म दिवाली, पुजा' लिहितात की, अजमेर जवळच्या काही गावांमध्ये हिंदू-मुस्लीम भेदाला काहीच अर्थ नाही. तेथे मुस्लीम सर्व हिंदू सण साजरे करतात आणि हिंदू 'हलाल' मांस खातात व मृतांना दफन करतात. अनेक मुस्लीम घरांमध्ये संपूर्ण लक्ष्मीपुजन करून दिवाळी साजरी केली जाते जसे आनंदाने ते ईद वा शबे-बारात साजरी करतात. दोन्ही धर्माचे लोक समान श्रद्धाभावनेने मंदिर व मशिदीत जातात. मुस्लीम स्त्रिया विवाहप्रसंगी हिंदूंप्रमाणे सात 'फेरे' घेण्यासाठी आग्रही असतात. खोजा मुस्लीमांमध्ये तर हिंदू समन्वयवादाचा थेट प्रभाव आढळतो. खोजा मुस्लीम बांधव आजही एकादशी, दिवाळी, होळी इत्यादी सण साजरे करताना आढळतात. यांना आपण नेमक्या कोणत्या धर्माचे आहोत याविषयी गोंधळ होता. इंग्रजांच्या न्यायालयांनी नंतरच्या काळात त्यांना शिया पंथीय मुस्लीम म्हणून घोषित केले. खोजांनी हिंदू व इस्लाममध्ये बरेच समान धागे गोवलेले दिसतात. बोहरा मुस्लीमांमध्ये देखील वारसाहक्क कायदा, कर्जावर व्याज आकारणे तसेच व्यापार उदीमाच्या दृष्टिने दिवाळीत नवीन वर्ष सुरू करणे अशा हिंदू प्रथा प्रचलित आहेत. त्यांच्या कुटुंबांमध्ये अनेक हिंदू अंधश्रद्धा देखील पाळल्या जातात. गरोदर स्त्रियांसाठीच्या हिंदू प्रथेप्रमाणे निषिद्ध असलेल्या अनेक गोष्टी यांच्यात पाळल्या जातात, तसेच त्यांनी चंद्रग्रहणात उपवास करावा, विशिष्ट काळात नवीन कपडे घालण्याविषयीची बंधने व दुष्टांची दृष्ट लागू नये म्हणून मेंदी लावणे अशा हिंदू प्रथा यांच्यात मानतात.

'सेंट्स्, गॉडेसेस अ‍ॅंड किंगज्: मुस्लीम्स अ‍ॅंड ख्रिश्चन्स इन साऊथ इंडियन सोसायटी १७००-१९००' या पुस्तकात सुसान बायली म्हणतात की, मदुराईचा बऱ्याच काळापासून हिंदू-मुस्लीम समन्वयवाद दर्शविणारा सिकंदर परंपरेशी संबंध आहे. दक्षिण भारतातील दर्गा परंपरा हिंदू परंपरेशी जवळचा संबंध दर्शवितात. पीर हजरत हमीद शहा औलीया यांचा दर्गा अशा समन्वयवादी परंपरेचे एक द्योतक आहे.

मात्र, आपणास ठाऊक असावयास हवे की, हिंदू-मुस्लीम परस्परसंबंध उत्तर भारतात मोठ्या प्रमाणात खोलवर रूजलेला आहे. जरी या उत्तरेत या दोन धार्मिक समुदायांमध्ये

बराच काळ तंटे चालू असले तरी या दोन धर्मियांमध्ये मैत्रीभाव व सहिष्णुतेचे बंध असल्याचे जाणवते. अजमेरच्या मोईनुद्दीन चिस्तींनतर दिल्लीच्या निजामुद्दीन औलीयांचा दर्गा म्हणजे समन्वयवादी धर्मस्थळाचे प्रसिद्ध उदाहरण असावे. अशाप्रकारे मध्ययुगीन भारतातील धार्मिक स्थितीचे खरे स्वरूप जाणून घेण्यासाठी समन्वयवाद वा बहुमिश्रवादाचा सखोल अभ्यास करण्याची आवश्यकता आहे.

## १०.३ अकबराचा दिन-ए-इलाही

जेव्हा आपण दिन-ए-इलाही वा तौहीद-ए-इलाही विषयी बोलतो तेव्हा आपल्यासमोर सर्वश्रेष्ठ मुगल सम्राट अकबर याचे नाव येते. अकबराचा दिन-ए-इलाहीशी फार जवळचा संबंध होता. अर्थात या धर्माचे प्रतिपादन करण्यात त्याचा पुढाकार होता. अकबराचा राज्यकाल (१५५६-१६०५) हा भारतीय इतिहासातील एक लक्षणीय व प्रामुख्याने वेगवेगळ्या धर्मांमधील सुसंवादाच्या दृष्टीने महत्वाचा आहे. इतिहास आपणास साग़तो की, अकबर हा फक्त महान नेता, कार्यक्षम प्रशासकच नव्हे तर एक सहिष्णू व उदारमतवादी शासक होता. त्याची धार्मिक मते वेळेनुसार विविध कारणांच्या प्रभावामुळे बदलत गेलेली दिसतात.

अकबराचे सलोख्याचे, समेटिचे आणि समन्वयाचे धार्मिक धोरण अकस्माकपणे अस्तित्वात आले नव्हते. त्याची धार्मिक मतं व धोरणे संथ उत्क्रांतीच्या प्रक्रियेतून गेलेले व अनेक अंतर्गत आणि बाह्य घटकांमूळे प्रभावित झालेले निदर्शनास येते. यातील पहिला घटक अनुवांशिक होते. त्याचे वडील हुमायून हे सुन्नी पंथीय होते तर आई हमिदा बानू बेगम ही पर्शियन शिया पंथीय होती. हे सर्वश्रुत आहे की, अकबराचा जन्म  हिंदू राजा अमरकोटचा राणा आमरसाल याच्या राजवाड्यात झाला होता. तसेच त्याचा राजपूत राजकन्येशी झालेला विवाह व हिंदू धर्माशी आलेला संपर्क याचाही त्याच्यावर प्रभाव पडला होता. भक्ती चळवळीने देखील भारतात नाविन्यपूर्ण वातावरण निर्माण केले होते. या सर्वांचा परिणाम म्हणून भारतातील विविध भागांतील राजांनी उदारमतवादी धोरणाचा दृष्टिकोनाचा स्विकार केला होता. त्याचप्रमाणे या शासकांचा १५ व्या शतकाच्या सुरूवातीपासूनच हिंदू आणि मुस्लीमांमध्ये धार्मिक सलोखा निर्माण करण्याचा प्रयत्न होता. त्यामुळे भक्ती चळवळीच्या कल्पना व तत्वं तसेच सुफी वादाशी असलेला संपर्क यांचा अकबराच्या मनावर परिणाम झाला होता. या सर्व कारणांमुळे अकबराच्या धार्मिक धोरणांचा ओढा उदारमतवादाकडे होता. अकबराची काही महत्वपूर्ण धार्मिक धोरणे पूढीलप्रमाणे  होती- युद्धकैद्यांचे बळजबरीने धर्मांतर करण्यावर बंदी (१५६२), तीर्थयात्रेवरील कर रद्द (१५६३) तसेच जिजया कर रद्द (१५६४).

त्याने १५७५ मध्ये फतेहपूर सिक्री येथे इबादतखाना (प्रार्थनास्थळ वा उपासना मंदिर) बांधला होता. येथे ख्रिस्त धर्मासह इतर अनेक धर्मांच्या व पंथांच्या प्रख्यात व्यक्तींसोबत

धार्मिक चर्चा होत असे. या धार्मिक चर्चांचा व वादविदांचा मुख्य उद्देश धर्माचे व्यवस्थित आकलन होऊन खरे धार्मिक सत्य कळावे हा होता. तो ख्रिस्त पाद्रींना गोव्याहून बोलवत असे. गोव्याहून १५८० साली उत्तरेत आलेल्या पहिल्या ख्रिस्त धर्मोपकदेशकांमध्ये फादर रूडॉल्फ अॅक्वाविवा (इटालियन), अँटनी मॉसरेट (स्पॅनिश) आणि फ्रान्सिस हेन्रीक्ज (मुळचा पर्शियन मात्र नंतर ख्रिस्त धर्म स्विकारलेला) यांचा समावेश होता. अकबर या ख्रिस्त मंडळींनी आणलेल्या बायबलचा नितांत आदर करत असे व त्यांच्याशी दीर्घ धार्मिक चर्चा करत असे. त्याने झोरोस्ट्रियन धर्मियांच्या सुर्याची उपासना करणे, अग्निची पूजा करणे इत्यादी गोष्टिंचा स्विकार केला होता. तसेच त्याने नौरोज या फारसी (पर्शियन) उत्सवाची देखील सुरूवात केली होती. तसेच तो आदि ग्रंथ या शीखांच्या पवित्र धर्मग्रंथाचा नितांत आदर करत असे.

अकबराला उलेमांनी धार्मिक बाबतीत केलेला हस्तक्षेप व अधिकार आवडत नसे. त्याला त्यांनी राज्यकारभारात केलेला अनियंत्रित हस्तक्षेप रूचत नसे. त्यामुळेच शेख मुबारक यांनी सुचविल्याप्रमाणे अकबराने धार्मिक बाबतीत देखील आपला सर्वोच्च अधिकार प्रस्थापित करण्याचे ठरविले. अशाप्रकारचा दस्तऐवज लिहिण्यात आला की, अकबर हा नागरी तसेच धार्मिक (धर्मोपदेशाच्या बाबतीत) बाबतीत सर्वोच्च अधिकारी व्यक्ती बनला. या दस्तऐवजाला प्रमादातीत हुकूम असे म्हणण्यात येऊ लागले. या हुकूमानुसार ख्यातनाम उलेमांनी आपला अध्यात्मिक बाबतीतला अधिकार अकबराला बहाल केला. प्रमादातीत हुकूमनाम्याने अकबराला 'इमाम-ए-आदिल' म्हणजेच अध्यात्मिक बाबतीतील सर्वोच्च मध्यस्थ बनविले.

दिन-ए-इलाहीची व्याख्या करणे कठीण आहे कारण या धर्माची अचूक व्याख्या व तत्वे बनविली गेली नसल्याचे आपल्या निदर्शनास येते. या धर्माची अमूक एक व्याख्या नव्हती व हा नवीन धर्मदेखील नव्हता तर जुन्याच धर्मांचा सारांश होता. मात्र आपण असे नक्की म्हणू शकतो की, विविध धर्मांची तत्वे एकत्र गुंफून अकबराने राष्ट्रीय धर्माची स्थापना करण्याचा प्रयत्न केला होता.

अकबराचा उदारमतवाद त्याने १५८२ साली केलेल्या दिन-ए-इलाही या धर्मातून निदर्शनास येतो. या धर्माने सुल्ह-ए-कुल या तत्वाचा प्रसार केला. सुलह-ए-कुलचा अर्थ वैश्विक बंधूभाव वा धार्मिक सहिष्णुता असा होतो.

सुलह-ए-कुलचा आदर्श हा प्रबोधनकारी राज्याचा पाया रचने हा होय. सुलह-ए-कुल मध्ये सर्व धर्म व विचारधारांना अभिव्यक्ती स्वातंत्र्य होते. ज्याप्रकारे स्वातंत्र्यासोबत जबाबदारी वा काही बंधने येतात त्याचप्रमाणे सुल्ह-ए-कुल नुसार राज्यावर टिका करणे वा राज्यासोबत सतत संघर्ष करण्यास अनुमती नव्हती. या तत्वाची अमंलबजावणी राज्याच्या धोरणांतून होत असे. आपल्या असे निदर्शनास येते की, या काळात मुगल उमराव पद्धती वा सरदार पद्धती संमिश्र स्वरूपाची होती. इराणी, तुर्रानी, अफगाण, राजपूत, दख्खनी आणि

इतरही वंशाचे उमराव वा सरदार मुगल दरबारात होते. या सर्वांना महत्वाची पदे देण्यात आली होती तसेच त्यांची सेवा, गुणवत्ता आणि बादशहाप्रती असलेली निष्ठा याच्याआधारे त्यांना बक्षिसी तसेच इतर फायदे दिले जात. सुल्ह-ए-कुलच्या या तत्वात अकबरचा दृढविश्वास होता ज्याचा प्रत्यय त्याच्या खालील दोन कृत्यांवरून येतो:

त्याने राज्यातील अधिकाऱ्यांना सुलह-ए-कुलच्या उपदेशाचे पालन करण्याच्या सुचना दिल्या होत्या तसेच या उपदेशाला दिन-ए-इलाहीचे एक मुलभूत तत्व बनविले होते

दिन-ए-इलाही या नवीन धर्माचा अनुयायी बनण्यासाठी दीक्षा घेण्यासाठीचा एक रीतसर समारंभ होत असे. अबुल फजलने दिन-ए-इलाहीचा दीक्षा समारंभ तसेच इतर विधींचे वर्णन आपल्या ऐन-ए-अकबरी या ग्रंथात दिले आहे. नवखा व्यक्ती म्हणजेच अशी व्यक्ती जिला दिन-ए-इलाहीचा अनुयायी बनावयाचे आहे त्याला दीक्षा देण्याचा समारंभ रविवारी होत असे व या व्यक्तीने आपले पागोटे हातात घेऊन बादशहाच्या पायांवर आपले डोके ठेवणे क्रमप्राप्त होते त्यानंतर बादशहा तत्सम व्यक्तीच्या खांद्याला स्पर्श करून उठवित असे. त्यानंतर बादशहा त्या व्यक्तीची पगडी (पागोटे) आपल्या हाताने पुन्हा डोक्यावर ठेवत असे व त्याला आपली 'शस्त' म्हणजेच प्रतिमा वा तसबीर देत असे जीवर "अल्ला-ओ-अकबर' हे शब्द ज्यांचा अर्थ 'देव महान आहे'  कोरलेले असत.

दिन-ए-इलाहीचा स्विकार केल्यानंतर या सर्व अनुयायांना काही प्रथांचे पालन करावे लागत असे. त्यांनी एकमेकांना अल्ला-ओ-अकबर आणि जल्ले जलाल हळू या शब्दांनी अभिवादन करण्याची प्रथा होती. उदाहरणार्थ, जर एखाद्या अनुयायाने अल्ला-ओ-अकबर म्हणून अभिवादन केले तर दुसऱ्याने त्यास जल्ले जलाल हू असा प्रतिसाद देणे आवश्यक असे. यामागचा हेतू असा होता की, त्यांनी नेहमी देवाला मनात ठेवावे व देवाची मनात नेहमी आठवण ठेवावी तसेच आपल्या अस्तित्वाबबतचे नेहमी मुल्यमापन करावे. बादशहाने असे आदेश दिले होते की, माणसाच्या मृत्यूनंतर जेवण (श्राद्ध) देण्याऐवजी त्याच्या हयातीत त्यास जेवण द्यावे वा अन्नदान करावे. असे करून बादशहाने अढळ सत्याचा म्हणजेच माणसाचा मृत्यू होणे अटळ आहे  याचा स्विकार केला होता आणि त्यामुळे त्यांचे या भौतिक जगातून मुक्ती मिळविण्याचे प्रयत्न होते.

दिन-ए-इलाहीच्या अनुयायांनी शक्यतो मांसाहार टाळणे अपेक्षित होते आणि खाटिक, कोळी आणि पक्षी पकडणाऱ्यांसोबत जेवणे वा त्यांची भांडी वापरणे निषिद्ध होते. ते वृद्ध स्त्रिया व अल्पवयीन मुलींशी लग्न करत नसत. त्यांनी दानधर्म करणे आवश्यक होते. दिन-ए-इलाहीच्या अनुयायांची विभागणी चार श्रेणींमध्ये केलेली असे. या श्रेणी अनुयायांची बादशहासाठी पुढील गोष्टींचा कितपत त्याग करण्याची तयारी आहे त्यावर अवलंबून असत- मालमत्ता (मास), जीवन (जान), सन्मान (नामुस) आणि धर्म (दिन).

जी व्यक्ती या चारपैकी एकाच गोष्टीचा त्याग करण्यास तयार असे त्याला एकच श्रेणी वा दर्जा दिला जाई, जर तो यापैकी दोन गोष्टींचा त्याग करत असेल तर त्याला द्वितीय क्रमांकाचा दर्जा दिला जात असे, या धर्तीवर अनूयायांचा दर्जा ठरविला जाई. अशाप्रकारे, या श्रेणी म्हणजे अनुयायांनी अकबराप्रती असलेली निष्ठा ठरवित असत जो दिन-ए-इलाहीच्या अनुयायांचा अध्यात्मिक गुरू होता.

परंतु आपल्या असे निदर्शनास येते की, दिन-ए-इलाही या नवीन धर्माच्या अनुयायांची संख्या फार कमी होती. कदाचित व्ही. डी. महाजन यांनी म्हटल्याप्रमाणे असे होण्याचे एक कारण म्हणजे अकबर दिन-ए-इलाहीचा प्रसार करण्यासाठी धर्मोपदेशक बनला नाही. याचे कारण तो धर्मवेडा झाला नाही व त्याची इच्छा होती की, लोकांनी हा धर्म स्वेच्छेने स्विकारावा. असे म्हणणे संयुक्तिक ठरेल की, अकबराची लोकांच्या आतील आवाजाला व संवेदनांना साद घालण्याची इच्छा होती. जे. एल्. मेहता यांच्यानुसार, "दिन-ए-इलाही हा समविचारी बुध्दीवंतांचा संघ होता ज्यांनी आपल्या सनातनी धर्मांशी निगडीत श्रद्धा व पद्धती मागे टाकलेल्या होत्या".

त्यामुळे अकबराने तो जबरदस्ती करू शकत असला तरी कुणालाही दिन-ए-इलाही हा नवीन धर्म स्विकारण्यासाठी कुणासोबतही बळजबरीपणा केला नाही. याचा परिणाम म्हणून दिन-ए-इलाहीचे फक्त अठरा सदस्य होते आणि यातील अतिशय महत्वाचे सदस्य म्हणजे अबूल फज्ल, त्याचा भाऊ फैजी, फजल त्यांचे वडील शेख मुबारक आणि राजा बिरबल हे होते. दुर्दैवाने अकबराच्या मृत्यूनंतर दिन-ए-इलाही हा धर्म टिकू शकला नाही. यामागचे सर्वसाधारणपणे मान्य केले गेलेले कारण म्हणजे अकबराने ज्याप्रमाणे साम्राज्याची स्थापना केली त्या धर्तीवर एका नवीन धर्माची स्थापना करण्याचा प्रयत्न केला. परंतु तो एक गोष्ट विसरला की, धर्म बनवता येत नाहीत. दुसऱ्यांची मूलतत्वे स्विकारून ती एकत्र केल्याने धर्मस्थापना होत नाही. आज लोक ज्या वेगवेगळ्या धर्मांचे पालन करतात त्या धर्मांच्या संस्थापकांनी आपण नवीन धर्माची स्थापना करत आहोत असे कधीच म्हटले नव्हते. त्यांनी स्वतःला आलेली अनुभूती व त्यांचे सत्य, देव आणि जीवनाविषयीचे गूढ याबाबतचे ज्ञान सामान्य जनांना देण्याचा प्रयत्न केला. त्यांच्या अनुयायांनी त्यांचा वेगळा गट बनवला व त्यातून आपसूकच नवीन धर्माची स्थापना झाली.

तरीसुद्धा अकबराच्या दिन-ए-इलाही स्थापन करण्याच्या प्रयत्नांना दाद द्यावी लागेल कारण यातून त्याची वेगवेगळ्या धर्मांच्या व संस्कृतींच्या लोकांमध्ये ऐक्य व सामंजस्य प्रस्थापित करण्याची तीव्र इच्छा प्रदर्शित होते. असे करून अकबराला एका खऱ्या राष्ट्रीय, धर्मनिरपेक्ष आणि कल्याणकारी राज्याची स्थापना करावयाची होती. जरी दिन-ए-इलाही हा धर्म फार कमी काळ टिकला तरी त्याचे वेगळेपण उठून दिसते कारण हा धर्म म्हणजे सर्व धर्मांच्या मूलतत्वांचा संगम होता. अकबराला विश्वास पटला होता की, सर्व धर्म म्हणजे एकाच उद्दीष्टाकडे जाणारे वेगवेगळे मार्ग होत. दिन-ए-इलाही इतर धर्मापेक्षा अजून एका कारणामुळे

वेगळा होता व ते म्हणजे हा धर्म प्रकटीकरणावर आधारित नव्हता तसेच या धर्माच्या तत्वज्ञानाची विशेष असी व्याख्या नव्हती. तसेच या धर्मात ना कुणी पुजारी होता की पवित्र ग्रंथ होते. जसे जेस्यूट लेखक बार्टोली म्हणतात की, "दिन-ए-इलाही हा अनेक बाबींनी बनलेला नवीन धर्म होता यात काही गोष्टी मुहम्मद पैगंबराच्या कुराणातून, काही गोष्टी ब्राम्हणांच्या पवित्र ग्रंथांतून तर काही गोष्टी ख्रिस्ताच्या शिकवणीतून घेतल्या होत्या". दिन-ए-इलाहीचे सिद्धांत म्हणजे दुसरे तिसरे काही नसून नैतिक तसेच सामाजिक सुधारणा घडविणे हे होते. उदाहरणच द्यावयाचे झाले तर:

- प्राणीमात्रांचा प्राण न घेणे
- विधवांना पुनर्विवाहाची अनूमती देणे
- बालविवाहावर बंदी आणणे
- जवळच्या नातेसंबंधांमध्ये विवाहाला बंदी आणणे
- मर्जीविरूद्ध सती जाण्यावर बंदी आणणे
- एकपत्नीत्वास चालना देणे
- पावित्र्याला महत्व देणे
- जुगार व मद्यप्राशनावर मद्यविक्रीवर निर्बंध आणून नियंत्रण आणणे

भारतीय तसेच युरोपियन इतिहासकार व अभ्यासकांनी अकबराच्या दिन-ए-इलाहीचा अभ्यास करून आपली मतं मांडली आहेत. काही इतिहासकारांची नावे द्यावयाची झाली तर पुढीलप्रमाणे आहेत: एस. आर. शर्मा, डॉ. ईश्वरीप्रसाद, एस. एम. जाफर, लेनपूल, व्हिन्सेंट स्मिथ, इत्यादी. प्रसिद्ध ब्रिटिश इतिहासकार व्हिन्सेंट स्मिथ यांनी पुढील शब्दांत दिन-ए-इलाहीवर टिका केली आहे, " हा दैवी धर्म म्हणजे अकबराच्या शहाणपणाची नव्हे तर मुर्खपणाची वास्तू होती. व्हिन्सेंट स्मिथ व इतर युरोपियन लेखकांनी अकबराची धार्मिक नीती समजून घेण्यात चूक केली. त्यांनी आपली मते अकबराचा समकालीन असलेल्या बदाउनी सारख्या सनातनी लेखकाच्या लिखाणावरून बनविलेली होती.

बदाउनीने अकबर व त्याच्या धार्मिक धोरणावर टिका केलेली निदर्शनास येते. त्याने बादशहाने बनविलेल्या नियमांचे वर्णन मूर्खपणा असे केल्याचे निदर्शनास येते. त्याने असेदेखील नमूद केले आहे की, अकबर सच्चा मुस्लीम राहिला नव्हता. त्याच्या प्रमादिदता हुकुमाने धर्मअभ्यासकांचा इतरांवर त्यांच्या धार्मिक मतांसाठी कार्यवाही करण्याचा अधिकार काढून घेतला होता. कदाचित त्याच्या कल्पना त्याच्या काळापेक्षा फार पुढारलेल्या होत्या. अकबराच्या हयातीत दिन-ए-इलाहीचे फक्त अठरा सदस्य होते हे त्याच्या सहनशीलतेचे द्योतक होते. एस. आर. शर्मा यांच्यानुसार," दिन-ए-इलाही म्हणजे बादशहाच्या राष्ट्रिय आदर्शवादाच्या अभिव्यक्तीचा मुकुट होता."

**तुमची प्रगती तपासून पहा:**

दिन-ए-इलाहीवर एक नैतिक वा सामाजिक सुधारणा म्हणून भाष्य करा.

## १०.४ सारांश

अशाप्रकारे आपण असे म्हणू शकतो की, त्याच्या कमतरता वा फायद्यांव्यतिरिक्त दिन-ए-इलाही वा तौहीद-ए-इलाही या धर्माने एक उदाहरण घालून दिले होते की, सामाजिक, राजकिय व धार्मिक मतभेद असले तरी लोक एकाच व्यासपीठावर येऊ शकतात व देव आणि राजासाठी ऐक्य साधू शकतात जेणेकरून अध्यात्मिक ते ऐहिक गोष्टींचे प्रतिक होते.

## १०.५ प्रश्न

१) अकबराच्या धार्मिक धोरणांवर भाष्य करा.

२) अकबराच्या दिन-ए-इलाहीवर विस्तृत टिप लिहा.

३) अकबराचे धार्मिक धोरण व त्याचे महत्व स्पष्ट करा.

## १०.६ संदर्भ

१) ईश्वरी प्रसाद, ए शॉर्ट हिस्ट्री ऑफ मुगल रूल इन इंडिया, द इंडियन प्रेस लिमिटेड अलाहाबाद.

२) एक. एल. श्रीवास्तव, द मुगल एम्पायर (१५२६-१८०३ इसवीसन), शिवलाल अग्रवाल अँड कंपनी, १९६०.

३) एस. एम. जाफर, द मुगल एम्पायर फ्रॉम बाबर टू औरंगजेब, एस. एम. सादिक खान (प्रकाशक) पेशावर, १९३६.

❄❄❄❄❄❄❄

# ११

# मध्ययुगीन भारतातील महसूल प्रशासनातील प्रयोग आणि कर प्रणाली

**घटक रचना:**

११.० उद्दीष्टे

११.१ प्रस्तावना

११.२. सुलतान कालखंडातील महसूल प्रशासन

११.३ विजयनगर कालखंडातील महसूल प्रशासन

११.४ मोगल कालखंडातील महसूल प्रशासन

११.५ मध्ययुगीन भारतातील कर प्रणाली

११.६ सारांश

११.७ प्रश्न

११.८ संदर्भ

## ११.० उद्दीष्टे

- सुलतान कालखंडातील महसूल प्रशासनाची माहिती जाणून घेणे.
- यादव कालखंडातील महसूल प्रशासनाचा अभ्यास करणे.
- मोगल कालखंडातील महसूल प्रशासनाचा अभ्यास करणे.
- मध्ययुगीन भारतातील कर प्रणाली समजून घेणे.

## ११.१ प्रस्तावना

मध्ययुगीन कालखंडात भारतावर सुलतान, यादव, मोगल या सत्ताधीशांनी आपली सत्ता राबवत असताना आपली स्वतंत्र अशी महसूल व्यवस्था निर्माण केली. प्रत्येक राजकर्त्याने आपापल्या कारकिर्दीत जी महसूल प्रशासन व्यवस्था निर्माण केली त्याचा अभ्यास आपण या घटकात करणार आहोत. सुलतान कालखंडात, गुलाम, खिलजी, तुघलक, लोदी घराण्याच्या राजकर्त्याने राज्य केले तर यादव कालखंडातील राजकर्त्याने आपली स्वतंत्र अशी महसूल प्रणाली राबविली. तर मोगल कालखंडात बाबर, हुमायुम, शेरशहा, अकबर, जहांगीर, शहाजहान व औरंगजेब या राजकर्त्याने आपली महसूल प्रणाली निर्माण केली. या सर्व राजवटीतील समग्र महसूल प्रणालीचा अभ्यास आपण या प्रकरणात करणार आहोत.

## ११.२ सुलतान कालखंडातील महसूल प्रशासन

तसे पाहता दिल्लीच्या सुलतानशाहीतील महसूल प्रशासन सुसंघटित नव्हते असे म्हणावे लागेल. राज्याचा आर्थिक स्त्रोत देखील त्यामानाने कमी होता कारण दिल्लीच्या सुलतानांचे राज्य उत्तर व पूर्व भारतातील मर्यादित भागांवरच होते.

शेतसारा म्हणजेच शेतीवरील कर हा राज्याच्या महसूलाचा मुख्य स्त्रोत होता कारण राज्यातील बहुतांश लोक शेतीवर काम करत असत. परंतु शेतकऱ्याने आपल्या उत्पादनातील किती हिस्सा राज्याला महसूल म्हणून द्यावा हे निश्चित नव्हते. प्रत्येक सुलतान आपल्या मर्जीप्रमाणे शेतसाऱ्याचे प्रमाण ठरवित असे व हा हिस्सा साधारणतः १/१० ते १/२ या प्रमाणात असे.

अल्लाउद्दीन खिलजी या सुलतानाला महसूल प्रशासन फक्त कार्यक्षमच करावयाचे नव्हते तर महसूलाचे प्रमाण वाढविण्यासाठी त्यात आमूलाग्र बदल देखील करायचे होते. त्यामुळेच त्याने दिल्लीच्या सुलतानशाहीच्या एकंदरीतच महसूल प्रशासनात नवीन नियमावली तयार होईल असे बदल घडवून आणले. त्याने सरदारांना इनाम म्हणून दिलेल्या जमीनी तसेच धार्मिक कारणांसाठी (वक्फ) जमीनी सुलतानाच्या मालकिच्या आहेत म्हणून ताब्यात घेतल्या.

सर्व शेतजमीनींचे मोजमाप करून व शेतीतील उत्पादनाची खातरजमा करून राज्याचा भाग ५३ टक्के असेल असे ठरविण्यात आले. अशाप्रकारे राज्याचा महसूलाचा हिस्सा जास्त होता असे म्हणावे लागेल. शेतकऱ्यांना शेतसाऱ्याव्यतिरिक्त इतरही कर द्यावे लागत त्यामुळे त्यांची स्थिती त्या मानाने कठिण असे. बरानी या इतिहासकाराच्या मताप्रमाणे हिंदू शेतकऱ्यांची संख्या जास्त असे व त्यांना देखील जास्त प्रमाणात असणाऱ्या कराची झळ सोसावी लागे. त्यांच्याकडे सोने-चांदी देखील विरळने आढळे व मुकदमांच्या स्त्रियांना मुसलमान कुटूंबांच्या घरी काम करावे लागे. सुलतानाने हिंदू मुकादम, खोत व चौधरी यांना पिढ्यान् पिढ्या मिळणारे फायदे व विशेषाधिकार काढून घेतले होते. तसेच त्यांना शेतसारा, घरावरील कर व गुरे-ढोरे चारण्यासाठीचा कर देखील द्यावा लागत असे.

राज्याचा महसूल शेतकऱ्याच्या माध्यमातून वाढविण्यासोबतच अल्लाउद्दीन खिलजीने महसूल खात्यातील भ्रष्टाचार संपविण्यासाठी अनेक पावले उचलली. त्याने पटवाऱ्यांच्या वेतनात वाढ केली मात्र त्यांनी भ्रष्टाचार केल्यावर त्यांना कठोर शासन वा शिक्षा देखील दिली.

दिल्लीच्या सुलतानशाहीच्या भौगोलिकदृष्ट्या मध्य भागात येणाऱ्या प्रदेशांमध्ये महसूलाचे प्रमाण शेतजमीनीच्या मोजणीवर ठरविण्यात येत असे व ते प्रमाण साधारणपणे एकूण उत्पादनाच्या पन्नास टक्के एवढे असे. पूर्वी शेतसारा चलनात वा जे उत्पादन (पिक) घेतले आहे त्याचा काही भाग शेतसारा म्हणून गोळा केला जाई. परंतू अल्लाउद्दीन खिलजीने बाजार व्यवस्थेबाबतची नियमावलीची अमंलबजावणी सुरू केल्यानंतर शेतकऱ्याने जे पिक घेतले आहे त्याचाच काहि भाग शेतसारा म्हणून गोळा करण्यास पसंती दिली. तसेच शेतकऱ्यांना घरावरील कर व गुरे-ढोरे चारण्यासाठीचा कर द्यावा लागत असे. हिंदूंना जिझिया नामक करदेखील द्यावा लागत असे. बरानीने दिलेल्या माहितीनुसार गावच्या

कूरणात चरण्यासाठी जाणाऱ्या प्रत्येक गुराची मोजणी होत असे व प्रत्येक गुरावर कर आकारला जाई. मात्र, फेरिश्ता या इतिहासकाराप्रमाणे ज्या व्यक्तीकडे बैलाच्या दोन जोड्या, दोन म्हैसी, दोन गाई व दहा शेळ्या असतील त्यांना गुरे चरण्याच्या करातून मूभा वा सूट दिली जात असे. ज्या व्यक्तींकडे यावरून जास्त गुरे-ढोरे असतील त्यांना चरण्यासाठीचा कर द्यावा लागत असे.

अल्लाउद्दीन खिलजीने अंमलात आणलेली महसूल व्यवस्था त्यांच्या नंतरच्या सुलतानांच्या काळात देखील सुरू असली तरी अल्लाउद्दीन खिलजीच्या काळात महसूल धोरण व प्रशासनात असलेला कडकपणा घियासुद्दीन तुघलकच्या काळात कमी झालेला आढळतो. त्यामुळे महसूल प्रशासनातील कार्यक्षमता कमी झाल्याचे लक्षात येते. घियासूद्दीन तुघलकाला राज्याचा महसूलातील असलेला पन्नास टक्के हिस्सा जास्त वाटला त्यामुळे त्याने तो शेतीतील एकूण उत्पादनाच्या वा उत्पन्नाच्या एक दशांश एवढा ठरवला. त्याच्या काळात नापीक आणि पडिक जमीन लागवडीखाली आणण्यात आली व शेतकऱ्यांच्या कल्याणाकडे लक्ष देण्यात आले.

घियासुद्दीन तुघलकनंतर गादीवर आलेला सुलतान मुहम्मद बिन तुघलक याने देखील महसूल प्रशासनात महत्वाच्या सुधारणा घडवून आणल्या. त्याची महसूल प्रशासनात सुधारणा आणण्याची तीव्र इच्छा होती. त्याने गादीवर आल्यावर लगेचच राज्यातील प्रांतांच्या उत्पन्नाचे व खर्चाचे संकलन केले. प्रांताधिकाऱ्यांना त्यांच्या प्रांतांच्या महसूलाबाबतची संकलित केलेली माहिती केंद्रिय प्रशासनाला पाठवून देण्याचे आदेश देण्यात आले. महसूल प्रशासनात एकसूत्रता आणण्यासाठी व राज्यातील कुठल्याही गावाकडून महसूल गोळा करण्याचा बाकी राहू नये ही खबरदारी घेण्यात आली. दंड व बाकी वसूल करण्यासाठी दिवान-ए-मुस्तखरिझ या वेगळ्या खात्याची स्थापना करण्यात आली.

मुहम्मद बिन तुघलकाने गंगेच्या त्रिभुज प्रदशांतील शेतसारा वाढविण्यासाठी केलेल्या सुधारणा असफल ठरले तरी त्यामागील संयुक्तिक व न्याय्य कारणं समजून घेणे आवश्यक ठरते. मुहम्मद बिन तुघलक ने केलेली एक आदर्श गोष्ट म्हणजे त्याने दिवान-ए-कोही नामक स्थापन केलेले कृषी खाते वा विभाग होय. या विभागाने जास्तीत जास्त जमीन लागवडीखाली आणण्यासाठी व आळीपाळीने वेगवेगळी पिके घेण्याचे प्रयोग केले. परंतु, हा प्रयोग अयशस्वी झाल्याचे आपल्या निदर्शनास येते. हि योजना तीन वर्षांनंतर बंद करण्यात आली. या प्रयोगासाठी निवडलेल्या शेतजमीनीचा निकृष्ट दर्जा, अधिकाऱ्यांमधील भ्रष्टाचार तसेच शेतकऱ्यांमध्ये याबाबत असलेली उदासीनता ही सदर प्रयोग अपयशी ठरण्याची कारणे होत. तसेच इतिहासकारांचे असे म्हणणे आहे की, हा प्रयोग घाईघाईमध्ये बंद करण्यात आला.

१३२९-१३३० या वर्षात मुहम्मद बिन तुघलकने चलनविषयक सुधारणा सुरू केल्या. त्याने नाण्यांच्या बाबतीत नवीन प्रयोग केला व हा नवीन प्रयोग म्हणजे प्रतिकात्मक चलन जारी करणे हा होय. बरानी या मध्ययुगीन इतिहासकारानुसार सुलतानाने लष्करावर सततपणे वाढणारा खर्च भागविण्यासाठी तांब्याची व पितळेची नाणी सर्व आर्थिक व्यवहारांत सोने व चांदीच्या नाण्यांप्रमाणे वापरण्यात यावीत व ग्राह्य धरण्यात यावीत असे आदेश वा फर्मान दिले. या नाविन्यपूर्ण प्रयोगामागची अजून काही कारणं म्हणजे खर्चिक

युद्धे व बंडांमुळे राज्याच्या खजिन्यावर पडलेला ताण व खर्चिक प्रयोग हि होत. प्रतिकात्मक चलन पद्धतीचे परिणाम तर फारच भयंकर झाले. सुलतान बाजारपेठेत बनावट नाणी येण्यापासून रोखण्यासाठी खबरदारीची उपाययोजना करण्यात अपयशी ठरला. बरानीनुसार प्रत्येक हिंदू इसमाचे घर म्हणजे अनधिकृत टांकसाळ बनले. अर्थात, हे मत पूर्वगृहदूषीतपणे मांडल्याचे जाणवते.

शेतकरी त्यांचा शेतसारा (महसूल) प्रतिकात्मक चलनात भरत असत. सामान्य लोकदेखील आपला कर प्रतिकात्मक चलनाच्या स्वरूपात भरत असत व सोन्या-चांदीच्या नाण्यांचा साठा करून ठेवत असत. परकिय व्यापारी सुद्धा भारतीय वस्तू विकत घेताना प्रतिकात्मक चलनाचा वापर करत असत परंतु आपल्या वस्तू भारतीयांना विकत असताना सोन्या-चांदीची नाणीं मागत असत. यामुळे आर्थिक गोंधळाची स्थिती निर्माण झाली. याचा व्यापारावर देखील विपरीत परिणाम झाला व राज्याचे महसूलाबाबत व एकंदरीतच आर्थिक नुकसान झाले.

मुहम्मद बिन तुघलक नंतर सुलतान बनलेल्या फिरोजशहा तुघलकच्या लक्षात आले की, सुलतानशाहीची महसूल व्यवस्था गोंधळाच्या अवस्थेत आहे व सामान्य लोक जबरदस्तीने होणाऱ्या कर वसूलीनें व दुष्काळांनी हैराण आहे. हा नवीन सुलतान शेतकऱ्यांचा खरा मित्र होता. मुहम्मद बिन तुघलकाच्या काळातील अन्यायकारक वागणूकीमुळे कर्जबाजारी झालेल्या शेतकऱ्यांची कर्जे माफ करण्यात आली. जमीनीचे व्यवस्थित मोजमाप करून शेतसारा ठरविण्यात येऊ लागला, शेतसाऱ्याचे प्रमाणदेखील कमी करण्यात आले. त्याने अजून दोन मूर्खपणाचे, बेकायदेशीर व अन्यायकारक कर रद्दबातल ठरवून टाकले जे त्याच्या पूर्वीच्या सुलतानांनी गोळा केले होते. त्याचे ते कर शरियतच्या कायद्याला धरून नव्हते असे मत होते. त्याने अस्तित्वात असलेल्या चालीरिती व प्रथांमध्ये पवित्र धार्मिक कायद्याशी सुसंगती होण्याच्या दृष्टीने बदल घडविले. त्यामुळे त्याने मुस्लिमेत्तर जनतेकडून जिझिया कर सक्तीने वसूल केला.

फिरोजशहा तुघलक एक सच्चा वा श्रद्धाळू मुस्लिम असल्यामुळे त्याने सहा प्रकारचे कर गोळा केले. हे सहा प्रकारचे कर पुढीलप्रमाणे होत. खरज- म्हणजेच मुस्लिमेत्तर व्यक्तिंनाकडून गोळा केलेला शेतसारा.

या कराचे प्रमाण एकूण उत्पादनाच्या एक पंचमांश ते अर्धे एवढे असे. उश्र- मुस्लिम शेतकऱ्यांकडून एकूण उत्पादनाच्या एक दशांश एवढा घेतलेला कर. खाम्स- युद्धात केलेल्या लूटीचा एक पंचमांश एवढा भाग. तरकट- वारस नसलेली मालमत्ता. जकात- मुस्लीमांकडून मिळविलेल्या मालमत्तेवरील दोन टक्के कर, हा कर फक्त विशिष्ट धार्मिक कारणांसाठीच वापरला जाई. जिझिया- मुस्लिमेत्तरांकडून गोळा केला जाणारा कर. नंतरच्या काळात सुलतानाने उलेमांच्या संमतीने जे शेतकरी राज्याच्या कालव्यांमधून शेतीसाठी पाणी वापरत असत त्यांच्याकडून सिंचन कर घेण्यास सुरुवात केली. या कराचा दर वा प्रमाण सिंचन केलेल्या शेतीतील उत्पादनाच्या वा उत्पन्नाच्या एक दशांश एवढे होते.

सुलतानाने व्यापार-उदीमाला चालना देण्यासाठी विशेष प्रयत्न केले. त्याने अंतर्गत व्यापारावरील कर व कृत्रिम अडथळे काढून टाकले. त्याने महसूल प्रशासन विकसित करण्याकडे विशेष लक्ष दिले. ज्यांना आपल्या जमीनींपासून बेकायदेशीररित्या वंचित ठेवले

होते त्यांना न्यायालयांमध्ये आपली कैफियत मांडण्यास सांगण्यात आले. त्याने राज्याच्या शेतसाऱ्याचा हिस्सा वा प्रमाण कमी केले. त्याने शेतकऱ्यांना 'ताकवी' नामक कर्ज (पतपुरवठा) देण्यास सुरुवात केली तसेच सिंचनविषयक सुविधा मोठ्या प्रमाणात उपलब्ध करून दिल्या. त्याने निरंतर पाणीपुरवठा (सिंचन) करणारे चार कालवे बांधल्याचे वा निर्माण केल्याचे तज्ज्ञांचे मत आहे.

या टाकलेल्या पावलांचा परिणाम म्हणून कृषी, व वाणिज्य, जनतमधील सुबत्ता व राज्याच्या महसूलात सततपणे वाढच होत गेली. तसेच जीवनावश्यक वस्तू उत्तरोत्तर स्वस्त होत गेल्या. अफिफच्या शब्दांत सांगावयाचे तर- लोकांची घरे धान्य, मालमत्ता, अश्वं व फर्निचरने परिपूर्ण होते; प्रत्येकाकडे मोठ्या प्रमाणात सोनं व चांदी होते; कुठलिही स्त्री दागिन्यांशिवाय नव्हती व कुठलेही घर चांगल्या बिछान्याशिवाय दिवानाशिवाय नव्हते. संपत्ती मोठ्या प्रमाणात होती व सुखसोयी सहजपणे उपलब्ध होत्या.

फिरोजशहा तुघलकने अवलंबिलेली महसूल व्यवस्था त्याच्यानंतरच्या सुलतानांनी देखील स्विकारलेली निदर्शनास येते.

## ११.३ विजयनगर कालखंडातील महसूल प्रशासन

शेतसारा हा विजयनगरच्या साम्राज्यातील महसूलाचा मुख्य स्त्रोत होता. शेतसाऱ्याव्यतिरिक्त खंडणी तसेच मांडलिकांकडून व प्रांतांधिकाऱ्यांकडून प्रामुख्याने महानवमीच्या सनादरम्यान मिळालेल्या भेटवस्तू, सीमाशुल्क, विविध व्यवसायांवर आकारलेला कर, घरांवर आकारलेला कर, बाजारपेठांवर आकारलेला कर तसेच परवाना शुल्क, इ. कर हे राज्याच्या महसूलाचे प्रमुख स्त्रोत होते. याव्यतिरिक्त भरभराटिस आलेली सागरी बंदरेदेखील राज्याच्या महसूलाचा महत्वाचा मार्ग होता. यामुळे सागरी तसेच देशांतर्गत व्यापार हा राज्याच्या महसूलासाठी महत्वपूर्ण होता.

कर पैशाच्या तसेच वस्तूंच्या स्वरूपात गोळा केला जाई. शेतजमीनीचे काळजीपूर्वक सर्वेक्षण करून शेतसारा ठरविला जाई व त्यानंतर ठरल्याप्रमाणे शेतसारा शेतकऱ्याकडून गोळा केला जात असे. जमीनीच्या उत्पादन क्षमतेनुसार तिचे वर्गीकरण पुढील तीन प्रकारांमध्ये केले जात असे- पाणथळ जमीन, कोरडवाहू जमीन, फळबागा आणि वनें. विजयनगरच्या साम्राज्यात तीन वर्षे व्यतीत करणाऱ्या फर्नानो नुनीझ या पोर्तुगीज प्रवाशानें असे नमूद केले आहे की, शेतकऱ्यांना एकूण उत्पादनाच्या नऊ दशांश एवढा भाग जमीन मालकांना द्यावा लागत असे. जमीन मालक आपल्या उत्पन्नातील जवळपास अर्धा भाग वा हिस्सा राजाला देत असत. शेतसाऱ्याचा हिशोब व देखरेख ठेवण्यासाठी एका विशिष्ट विभागाची स्थापना करण्यात आली होती. या विभागाला 'आठवणे' असे म्हटले जात असे. राज्यात विविध प्रकारचे कर आकारले जात परंतु लोकांमध्ये सर्वात अप्रिय असलेला कर म्हणजे संपूर्ण साम्राज्यातून गोळा केला जाणारा लग्नावरील कर होता. हा कर नंतरच्या काळात सळूवा तिम्मा यांच्या सांगण्यावरून रद्द करण्यात आला.

असे निदर्शनास आणले गेले आहे की, या राज्याची एकंदरीतच आर्थिक प्रणाली व करप्रणाली शेतकऱ्यांना पोषक नव्हती. निदर्शनास आलेल्या पुराव्यांनुसार शेतकऱ्यांचे हाल होत असत व जमीन मालक तसेच काही अधिकाऱ्यांच्या त्रासाला कंटाळून ते इतरत्र

स्थलांतर करत असत. कृष्णदेवरायासारख्या शासकांनी शेतकऱ्यांची स्थिती सुधारण्यासाठी प्रयत्न केलेले निदर्शनास येतात. परंतु कमजोर राजांच्या कारकीर्दीत उमराव व सरदार मंडळी शेतकऱ्यांचे शोषण विनासायास करत असत. दस्तावेजांनुसार राज्याचे दोन खजीनें होते- प्रत्येक दिवशीचा पैसा जमा करण्यासाठी व पैसा काढण्यासाठी लहान खजीना व मोठी रक्कम तसेच मांडलिक राजांकडून प्राप्त झालेल्या भेटवस्तू जमा करण्यासाठी वेगळा मोठा खजिना होता. मंडलेश्वरांकडे राज्याच्या महसूलाचे नियंत्रण होते.

## ११.४ मोगल कालखंडातील महसूल प्रशासन

बाबर व हुमायून या पहिल्या दोन मुघल सम्राटांच्या काळात दिल्लीच्या सुलतानशाहीप्रमाणेच महसूल प्रशासन वा व्यवस्था होती. बाबर हा भारतातील मुघल घराण्याचा संस्थापक असल्याने त्याचा बराचसा वेळ युद्धे लढण्यात व साम्राज्याची घडी बसविण्यात खर्ची पडला त्यामुळे त्याला महसूल प्रशासनाकडे जास्त लक्ष घालता आले नाही. बाबर नंतर मुघल सम्राट बनलेल्या हुमायूनला देखील महसूलाबाबतच्या बाबींकडे म्हणावे तसे लक्ष पुरवतात आले नाही कारण त्यालासुद्धा सिंहासनासाठी लढावे लागले व आपला बराच काळ अज्ञातवासात व्यतीत करावा लागला.

उत्कृष्ट दर्जाची महसूल व्यवस्था सुरू करण्याचे श्रेय शेरशहा सुर याला जाते. शेरशहा हुमायून नंतर व अकबरापूर्वी दिल्लीच्या तख्तावर बसला होता. महसूल सुधारणा हे शेरशहाच्या प्रशासनाचे प्रमुख वैशिष्ट्य होते असे म्हणावे लागेल. शेरशहानें अवलंबिलेल्या महसूल सुधारणा म्हणजे भविष्यातील प्रामुख्यानें अकबरच्या काळातील महसूल सुधारणांचा पाया ठरला. सुरूवातीच्या काळात आपल्या वडिलांची जागीर (जहागिरी) व नंतरच्या काळात बिहारचे प्रशासन हाताळण्याचा शेरशहाला अनुभव होता व त्यामुळे त्याला सर्व पातळीवरील महसूल प्रशासनाचा अनुभव होता. कुशल प्रशासकांच्या मदतीने शेरशहानें संपूर्ण महसूल व्यवस्था कार्यक्षम बनविली. महसूल सुधारणांच्या मागे शेरशहाची खालील दोन उद्दीष्ट्ये होती:

१. शेतकऱ्यांची स्थिती सुधारणे

२. राज्याचा महसूल वाढवून महसूल व्यवस्था स्थिर करणें

शेरशहानें शेतसारा ठरविण्यासाठी संपूर्ण साम्राज्यभरातील शेतजमीनीचे मोजमाप करण्यावर भर दिला. येथून पुढे अंदाजावर वा शेतीतील उभ्या पिकांचे अंदाजे मोजमाप करून वा खळ्यावर पिकाचे (धान्याचे) अंदाजे मोजमाप करून शेतसारा गोळा करण्याची पद्धत बंद करण्यात आली. लागवडीखालील शेतजमीनीचे मोजमाप करून महसूलाचे मूल्यनिर्धारण वा प्रमाण ठरविण्यात येऊ लागले व कुठल्याही मध्यस्थाच्या मदतीशिवाय सरळ शेतकऱ्यांकडून महसूल गोळा केला जाऊ लागला. शेतजमीनेचे मोजमाप केल्यानंतर तिचे पुढील तीन प्रकारच्या प्रतींमध्ये विभाजन करण्यात आले-चांगली, मध्यम व निकृष्ट दर्जाची. शेततीचे उत्पादन ठरविण्यासाठी या तिन्ही प्रकारच्या शेतजमीनींचा मध्यमान धरला जाई. राज्याचा हिस्सा साधारणपणे एकूण उत्पादनाच्या एक चतुर्थांश वा एक तृतीयांश एवढा असे. शेतकऱ्यास शेतसारा पिकांच्या तसेच चलनाच्या (पैशाच्या) स्वरूपात भरण्याची मुभा होती. शेतकऱ्यांचे अधिकार मान्य व मंजूर केलेले असत. तसेच त्यांच्या

जबाबदाऱ्यांची नोंद 'काबुलियत' नामक दस्तावेजावर केली जात, हा एक प्रकारचा करारनामा असे जो शासक शेतकऱ्यांकडून लिहून घेत. शेतकऱ्यांना शासकांतर्फे 'पट्टा' नामक दस्तावेज दिला जाई ज्यावरून शेतकऱ्याची शेतजमीनीची मालकी प्रतित होत असे. प्रत्येक गावात पटवारी नामक (गावचा लेखापाल वा हिशेबनीस) अधिकारी असे जो कुळांच्या जमीनीबाबत इत्यंभूत माहिती ठेवत असे. सुलतानाच्या (सम्राट वा राजाच्या) मालकिच्या शेतजमीनीचे (खालसा) भाडे पटवारी व मुकादमाच्या सहाय्यानें या कामासाठी पगारावर वा वेतन देऊन नियुक्त केलेले विशेष सरकारी अधिकारी वसूल करत असत.

पेरणी केल्यानंतर शेतकऱ्याला राज्याला शेतसारा म्हणून किती हिस्सा द्यावयाचा आहे हे ठाऊक असे. कुठल्याही अधिकाऱ्याला शेतकऱ्याकडून राज्यानें ठरवून दिलेल्या शेतसाऱ्यापेक्षा जास्त शेतसारा गोळा करता येत नसे वा आकारता येत नसे. दुष्काळासारख्या आणिबाणीच्या स्थितीला वा इतर नैसर्गिक आपत्तीला सामोरे जाण्यासाठी प्रत्येक शेतकऱ्याकडून प्रत्येक बिघा जमीनीमागे अडिच शेर एवढे धान्य गोळा केले जात असे.

शेरशहानें आपल्या साम्राज्याच्या बहुतांश भागांत रयतवारी शेतसारा पद्धतीचा स्विकार केला होता. रयतवारी पद्धतीमध्ये राज्याचा शेतसारा मोजणीत व तो गोळा करण्याच्या कामात शेतकऱ्याशी थेट संबंध वा संपर्क येत असे. मात्र, मुलतान, माळवा व राजस्थान या भागांमध्ये रयतवारी पद्धतीचा अवलंब झाला नाही कारण तेथे जागिरदारी पद्धत अस्तित्वात होती. शेरशहानें केलेल्या उपाययोजनांमुळे शेतकऱ्यांची स्थिती मोठ्या प्रमाणात सुधारण्यास मदत झाली. राज्याच्या महसूलात वा उत्पन्नात देखील लक्षणिय वाढ झाली. त्यानें शेतकऱ्यांचे कल्याण होईल यासाठी विशेष काळजी घेतली. शेरशहा म्हणत असे, "शेतकरी हे निर्दोष असतात, ते ज्यांचे राज्य असते त्यांचे म्हणणे मुकाटपणें ऐकत असतात, मी त्यांच्यावर अत्याचार केले तर ते आपले गाव सोडून देतील व मुलूखाचे वाटोळे होईल व प्रदेश भकास होतील व पुन्हा एकदा सुबत्ता येण्यासाठी बराच कालावधी लागेल". शेरशहानें अशाप्रकारे शेतकऱ्यांच्या हिताला प्राधान्य दिले होते व आपत्तीच्या काळात शेतसाऱ्याचे प्रमाण कमी केले जात असे वा शेतकऱ्यांना त्यातून सूट दिली जात असे. जरी अधिकाऱ्यांना कर वा शेतसारा ठरविताना शेतकऱ्याबाबत सौम्य भूमिका घेण्याच्या सूचना असल्या तरी तो गोळा करताना कठोरता दाखविली जाई.

त्यामुळे असे म्हणणे अतिशयोक्ती ठरू नये की, शेरशहा हा हिंदूस्थानातील पहिला राजा होय त्यानें महसूल विषयक व शेतसऱ्याबाबत दूरगामी सूधारणा घडवून आणल्या ज्याचा राज्याला तसेच रयतेला फायदा झाला. अकबराची महसूल व्यवस्था शेरशहाच्या तत्वांवर आधारित होती तसेच त्यानें त्या व्यवस्थेत काही नाविन्यपूर्ण बदल घडवून तिच्यात सुधारणा केल्या होत्या. त्यामुळे आपल्या असे लक्षात येते की, आपले साम्राज्य सुरक्षित करून स्थान बळकट केल्यावर अकबराने (अकबर हुमायून नंतर मुघल सम्राट बनला) खऱ्या अर्थानें महसूल प्रशासनाकडे लक्ष दिले. अकबर शेरशहाच्या महसूल सुधारणांचा प्रशंसक होता व त्यानें त्यात सुधारणा आणण्याचा प्रयत्न केला. अबूल फजलच्या ऐन-ए-अकबरी या ग्रंथात अकबराच्या महसूल प्रशासनाचे विस्तृत वर्णन आले आहे. राज्यारोहणानंतर म्हणजेच सम्राट बनल्यानंतर अकबरानें शेरशहाची शेतसारा गोळा करण्याची पद्धत स्विकारली. या पद्धतीनुसार लागवडीखालील शेतजमीनीचे मोजमाप

करून शेतसारा गोळा करण्याचे केंद्रीय वेळापत्रक बनविले जाई. शेतजमीनीच्या उत्पादकतेनुसार शेतकऱ्यांची पिकनिहाय देणी ठरवली जात. या कार्यक्रमानुसार किंमतींचे केंद्रिय वेळापत्रक ठरविले जाई. अकबराच्या असे लक्षात आले की, केंद्रिय स्तरावर ठरविलेल्या या कार्यक्रमाच्या काहि मर्यादा होत्या. सर्वात महत्त्वाचे म्हणजे याचा शेतकऱ्यांना खूप त्रास होत असे. सर्वसामान्यपणें या व्यवस्थेमुळे शेतकऱ्याला जास्त भुर्दंड बसे कारण किंमती केंद्रिय दरबारात ठरत असत ज्या ग्रामीण भागापेक्षा जास्त असत.

अकबरानें महसूल प्रशासनात अनेक प्रयोग केले. त्याला या कामात मुझफ्फर खान, इतिमाद खान आणि राजा तोडरमल यांनी मोठ्या प्रमाणात मदत केली. त्याला शेतकऱ्यांशी थेट संबंध प्रस्थापित करण्यात रस होता. पिकांची विविधता व जमीनीच्या सुपीकतेत असलेला फरक या कारणांमुळे संपूर्ण देशात एकाच स्वरूपाची वा समान स्वरूपाची व्यवस्था आणणे कठीण होते. त्यामुळे अकबरानें शेरशहाच्या पद्धतीमध्ये काही बदल केले. १५६० मध्ये ख्वाजा अब्दुल मजीद खान याला वजीर म्हणून नियुक्त करून अकबरानें महसूल प्रशासनात सुधारणा आणण्याच या दृष्टीनें पहिला महत्त्वाचा प्रयोग केला. त्याने शेतसारा पैशाच्या स्वरूपात गोळा करण्याचे ठरवून त्याचा दर व प्रमाण जास्त ठेवले, त्यामुळे शेतकऱ्यांना शेतसारा देणे कठीण जाऊ लागले, व त्यामुळे शेतकरी नाराज होते. १५६३ मध्ये अकबरानें इतिमाद खान याला खालिसा शेतजमीनींचा प्रमुख दिवान म्हणून नियुक्त केले. त्यानें खालिसा शेतजमीनींना जहागिरींपासून वेगळे केले. त्याने खालिसा शेतजमीनींचे विभाजन प्रत्येकी वर्षाला एक कोटी दाम एवढा महसूल देणाऱ्या महसूल विभागांमध्ये केली. या प्रत्येक विभागाच्या प्रमुख अधिकाऱ्याला करोडी असे संबोधले गेले.

१५६४ साली राजा तोडरमल सोबत मुझफ्फर खान याला दिवान-ए-कूल म्हणून नियुक्त करण्यात आले. त्यानें महसूल सुधारणा घडवून आणल्या. वेगवेगळ्या परिसरातील कानूंगोंना त्यांच्या परिसरातील महसूलविषयक आकडेवारी विझारतेत पाठविण्यास सांगण्यात आले. विझारतेत या आकडेवारीवरून महसूल वा शेतसाऱ्याचे दर ठरवले जात. १५६९ मध्ये त्यानें वार्षिक मूल्यनिर्धारणाची पद्धती सुरू केली. कानूनगो या अधिकाऱ्याला स्थानिक स्थितीचे आकलन असे त्यामुळे त्याला प्रत्यक्ष उत्पादन, स्थानिक पातळीवरील किंमती, विक्री व पिकांचे स्वरुप याविषयी अहवाल देण्यास सांगण्यात आले. वार्षिक मूल्यनिर्धारणाचे वा आकारणीचे काही दोष होते त्यामुळे शेतकऱ्यांचे हाल झाले व राज्याला देखील त्रास झाला.

१५७३ साली गुजरात जिंकल्यानंतर अकबरानें त्या प्रांतात महसूल सुधारणा घडवून आणण्यासाठी राजा तोडरमलला निवडले. तोडरमल शेतजमीनीचे नियमितपणे सर्वेक्षण घेत असे व शेतसाऱ्याची आकारणी शेतजमीनीचा वा गुणवत्ता तसेच ती ज्या परिसरात आहे हे पाहून ठरविण्यात येत असे. जहागिरिंचे रूपांतर राजाच्या (सम्राटाच्या) शेतजमीनींमध्ये करण्यात आले. तत्कालीन साम्राज्याचे विभाजन १८२ परगन्यांमध्ये करण्यात आले. प्रत्येक परगन्याचे उत्पन्न एक कोटी दाम म्हणजेच वर्षाला अडिच लाख रूपये एवढे होते. महसूल सुधारणांची अंमलबजावणी करण्यासाठी अकबरानें तोडरमलला दिवान तर ख्वाजा शहा मन्सूर याला त्याचा सहायक वा प्रतिनिधी म्हणून नियुक्त केले. तोडरमलनें अकबराच्या साम्राज्याच्या शेतसाऱ्याच्या प्रशासनाचा पाया रचला. तोडरमलनें टाकलेली तीन महत्वाची पावले खालीलप्रमाणे होत:

- शेतजमीनीचे पद्धतशीर सर्वेक्षण व मोजणी. पूर्वी शेतजमीनीची मोजणी अंबाडीच्या दोरीच्या सहाय्याने केली जात असे जी हवेतील बाष्पाच्या प्रमाणानुसार आंकूचन वा प्रसरण पावत असे. या अंबाडीच्या दोरी ऐवजी आता लोखंडी रिंगा लावलेले बांबू शेतजमीनीची मोजणी करण्याकरिता वापरले जाऊ लागले ज्यांच्यात कुठल्याही वातावरणात व तापमानात बदल होत नसे.

- शेतजमीनीची मोजणी झाल्यानंतर लागवडीच्या सलगतेच्या आधारे तिचे वर्गीकरण केले जात असे. राज्याचा शेतीच्या उत्पादनातील हिस्सा ठरविण्यासाठी शेतजमीनीचे पुढील चार प्रकारांमध्ये वर्गीकरण केले जाई: पोलज, परौती, चाचर व बंजर. पोलज या प्रकारातील शेतजमीन नेहमीच वा सातत्याने लागवडीखाली असे. परौती या प्रकारातील शेतजमीनीची सुपिकता टिकविण्यासाठी तिला  एक किंवा दोन वर्षे पडित ठेवावे लागत असे. चाचर या प्रकारातील शेतजमीनीची सुपिकता टिकविण्यासाठी तिला तीन किंवा चार वर्षे पडित ठेवावे लागत असे. बंजर हा शेतजमीनीचा चौथा प्रकार होता, हि जमीन वा शेती पडिक म्हणजेच नापिक असे. राज्याचा पिकातील हिस्सा जमीनीची सुपिकता तसेच मागच्या दहा वर्षांतील उत्पादन यावर ठरत असे. पोलाज व परौती या शेतजमीनींचे वर्गीकरण चांगली, मध्यम व खराब (कमी प्रतीची) अशा तीन प्रकारांमध्ये होत असे. या तिन्ही प्रकारांतील उत्पादनाची सरासरी काढून शेतसारा ठरवला जाई. बंजर जमीनीची लागवड करण्याकरिता प्रोत्साहन दिले जाई.

- फक्त प्रत्यक्ष लागवडीखाली असलेली शेतजमीन मोजून शेतसारा ठरवला जाई. राज्याचा उत्पादनातील हिस्सा एक तृतीयांश एवढा असे, परंतु हे प्रमाण जमीनीची उत्पादकता व शेतसारा ठरविण्याची पद्धती यानुसार बदलत असे. वेगवेगळ्या पिकांसाठीचा शेतसाऱ्याचा दर वेगळा असे.

राजा तोडरमलच्या या शेतसारा गोळा करण्याच्या पद्धतीमुळे शेतकरी व राज्य या दोहोंमध्ये शेतसाऱ्याबाबत नाहक रहस्य वा गूढता राहत नसे. शेतकऱ्याला त्याला किती शेतसारा द्यावा लागणार आहे ते ठाऊक असे. राज्याला शेतसारा दिल्यानंतर शेतकऱ्याला त्याची पोच (पोचपावती) दिली जात असे. गोळा करण्यात आलेला शेतसारा, जमीनीची धारणा तसेच, शेतकऱ्याचे देणे, इत्यादींची नोंद ठेवली जात असे. शेतकऱ्याला त्याच्या नावे 'पट्टा' दिला जात असे व व 'काबुलियत' नामक करारनाम्यावर शेतकऱ्याला स्वाक्षरी करावी लागत असे. या दस्तावेजांमध्ये शेतकऱ्याच्या शेतजमीनीचा तपशील दिलेला असे, ज्यात शेतीचे क्षेत्रफळ व त्यानें द्यावयाचा शेतसारा याबाबतचा समावेश असे. शेतसारा गोळा करणारा अधिकारी गोळा केलेल्या शेतसाऱ्याचा तपशील राज्याच्या खजिन्याकडे पाठवित असे. जमाखर्च (हिशोब) व तत्सम तपशील पर्शियन (फारसी) भाषेत ठेवला जाई.

दहसाला पद्धती, जब्ती पद्धती, गल्लाबक्ष पद्धती आणि नस्क पद्धती अशा महसूल (शेतसारा) गोळा करण्याच्या विविध पद्धती होत्या. या पद्धतींचे वर्णन खालीलप्रमाणे दिले आहे:

- दशला पद्धती (दहा वर्षांची शेतसारा गोळा करण्याची पद्धती) बिहार, माळवा, अलाहाबाद, आग्रा, दिल्ली, लाहोर, अवध आणि मुलतानच्या काही भागांमध्ये हि पद्धती अवलंबिण्यात आली होती. या पद्धतीनुसार विविध पिकांच्या उत्पादनाची सरासरी आणि शेवटच्या काही वर्षांतील किंमती यांचा हिशेब केला जाई व त्यानंतर राज्याचा हिस्सा उत्पादनाच्या सरासरीच्या एक तृतीयांश एवढा ठरवला जाई.

- जब्ती पद्धतीमध्ये बितिकची नामक महसूल अधिकारी प्रत्येक शेतजमीनीतील विविध पिकांचे क्षेत्रफळ मोजत असे व त्यानंतर त्यावेळी लागू असलेल्या दरानुसार महसूल वा शेतसाऱ्याचा हिशेब करून तो तत्सम शेतकऱ्यांकडून गोळा करत असे. या पद्धतीची अंमलबजावणी बिहार, मुलतान, अलाहाबाद अजमेर, आग्रा व दिल्लीमधील काही सुभें तसेच गुजरातच्या काही भागांमध्ये केली जात असे.

- गल्लाबक्ष ही सर्वात जुनी व सर्वत्र आढळणारी शेतसारा पद्धती होती. या पद्धतीमध्ये शेतीचे उत्पादन राज्य व शेतकऱ्यामध्ये एका निश्चित प्रमाणात विभागले जाई. हि पद्धती काश्मीर, कंदाहार, आणि सिंध व मुलतानच्या काही भागांमध्ये हि पद्धती अस्तित्वात होती.

- नस्क पद्धतीस कनकुत पद्धती देखील म्हटले जाई. या पद्धतीची अंमलबजावणी बंगाल, गुजरात व काठियावाड़ या भागांमध्ये केली जाई. या पद्धतीमध्ये शेतसाऱ्याचे मोजमाप करणारे अंदाजे शेतीच्या उत्पादनाचा अंदाज प्रत्यक्ष निरिक्षण करून प्रत्यक्ष ठिकाणी लावत असत व लावलेल्या अंदाजापैकी एक तृतीयांश एवढा हिस्सा राज्याला दिला जाई.

अकबराच्या शेतसारा पद्धतीला रयतवारी पद्धत म्हटले जाई. या पद्धतीत प्रत्यक्ष शेतकरी ठरलेला वार्षिक महसूल वा शेतसारा भरण्यास जबाबदार असे. पटवारी व मुकादम हे राज्याचे अधिकारी नसत परंतु राज्याने व सम्राटानें त्यांच्या सेवा ग्राह्य धरून मान्य केल्या होत्या व त्यांच्या सहाय्याने शेतसाऱ्याचे मोजमाप करून तो गोळा केला जात असे तसेच त्याची नोंद ठेवली जात असे. याच्या मोबदल्यात त्यांना शेतसाऱ्याचा काही भाग दिला जात असे. अमिल हा शेतसारा (महसूल) गोळा करणारा अधिकारी असे व त्याला बितिकची, फोतेदार व कानूनगो हे अधिकारी मदत करत असत. आपल्या असे निदर्शनास येते की, अकबराच्या कारकिर्दीच्या नंतरच्या काळात कानूंगोंना राज्याचे अधिकारी म्हणून मान्यता मिळाली होती व त्यांना राज्याकडून वेतन दिले जाई. अमिलांच्या वर अमलगुज़र हे अधिकारी असत, जे प्रांतीय दिवानांच्या देखरेखीखाली कार्यरत असत व प्रांतीय दिवान केंद्रिय दिवानाच्या म्हणजेच वजीराच्या नियंत्रणाखाली काम करत असत. अकबराला लागवडीखालील क्षेत्र वाढविण्यात आणि शेतीत सुधारणा घडवून आणण्यात खूपच रस होता. त्यानें अमिलांना शेतकऱ्यांसोबत पित्याप्रमाणे वर्तन करण्याच्या सुचना दिल्या होत्या. त्याला शेतकऱ्यांना बियाणे विकत घेण्यासाठी, पशूधन विकत घेण्यासाठी व शेतीच्या इतर कामासाठी कर्ज देण्याच्या व शेतकऱ्याला परवडेल अशा हप्त्यांमध्ये ते वसूल करण्याच्या सुचना होत्या.

अकबराच्या कारकीर्दीत शेतकऱ्यांवर करांचा अतिप्रमाणात बोजा नव्हता. तो पारंपारिकरित्या चालत आलेला उत्पादनाचा एक तृतीयांश एवढा हिस्सा शेतकऱ्यांकडून शेतसारा म्हणून गोळा करत असे. दाहसाला पद्धतीमध्ये शेतकऱ्याला दहा वर्षे एका ठरलेल्या प्रमाणात शेतसारा द्यावा लागत असे. जर शेतकऱ्यानें स्वबळावर उत्पादनात वाढ केली तर त्याचा फायदा त्याला मिळत असे. याव्यतिरिक्त जहागिरदारीची सर्व जमीन राज्याच्या अधिकाऱ्यांच्या नियंत्रणाखाली असे. अशाप्रकारे, अकबराच्या काळात जहागिरदार व जमीनदारांसारखे शेतकऱ्यांचे शोषण करणारे मध्यस्थ नव्हते. त्यामुळे अकबरकालिन महसूल व्यवस्था वा शेतसारा पद्धती राज्य तसेच शेतकरी या दोहोंना पुरक होती. या पद्धतीमुळे उत्पादनात वाढ होण्यास मदत झाली व त्यामुळे व्यापार उदिमात देखील वाढ झाली. नेमक्या याच कारणामुळे जरी अकबर सातत्याने युद्ध करत असला तरी त्याचा खजिना नेहमीच द्रव्यानें भरलेला असे. त्यामुळेच व्हिन्सेंट स्मिथ या इंग्रज इतिहासकारानें अकबराच्या महसूल प्रशासनाची प्रशंसा केली आहे.

मात्र, येथे एक बाब लक्षात घेतली पाहिजे व ती म्हणजे ही की, मुघल सम्राट जनतेकडून इतरही कर गोळा करत असत. अशा तऱ्हेने राज्याच्या उत्पन्नात वाढ व्हावी यासाठी शेतकऱ्यांकडून शेतसाऱ्यासोबतच इतरही कर घेतले जात. या इतर करांना 'अवाब' असे म्हटले जाई. या इतर करांमध्ये विक्री केलेल्या मालावरील कर, स्थावर मालमत्तेच्या विक्रीवरील कर, सरकारी अधिकाऱ्यांनी कामानिमित्त घेतलेली आगाऊ रक्कम तसेच राज्याच्या वतीनें घेतलेले शुल्क व दलाली, काही विशिष्ट प्रकारचे व्यापार करण्यासाठीचा परवाना कर, जबरदस्तीने वसूल केलेली वर्गणी, हिंदूंकडून गोळा केली जाणारी पुढील प्रकारची जकात- गंगेत स्नान करण्यासाठी द्यावा लागणारा कर, हिंदूंच्या अस्थी गंगेत विसर्जीत करण्यासाठी लागणारा कर, इत्यादींचा समावेश असे. औरंगजेबाने जरी काही 'अवाब' रद्द केलेले निदर्शनास येत असले तरी राज्याच्या महसूलात वृद्धी करण्यासाठी काही नवीन 'अवाब' सुरू केले. मुस्लिमेत्तर जनतेकडून घेतला जाणारा जिझिया हा कर अकबरानें रद्द केला होता मात्र औरंगजेबाने तो पुन्हा सुरू केला.

मुघल काळात महसूल प्रशासनात जमीनदार महत्वाची भूमिका निभावत असत. त्यांच्या परिसरात कायदा व सुव्यवस्था राखणे ही त्यांची जबाबदारी असे. परंतु ते अंमल गुजरांप्रमाणे राज्याचे अधिकारी नसत तर गावातील क्षुल्लक जमीन धारक वा जमीन मालक असत. यातील काहीजण पूर्वीच्या राजघराण्यांतील वंशज होते जे आपली वडिलोपार्जित शेतजमीन कसत होते. जमीनदार आपल्या मालकी हक्काच्या शेतजमीनीची लागवड करत असत. त्यांना अनेक गावांचा शेतसारा गोळा करण्याचा वंशपरंपरागत हक्क देखील प्राप्त होता. असे असले तरी, सर्वसामान्य मान्यता होती की, जमीनदार त्याच्या जमीनदारीअंतर्गत येणाऱ्या सर्व शेतजमीनीचा मालक नसे. याचाच अर्थ असा होता की, जोपर्यंत कुळ रितसरपणे शेतसारा वा जमीनीचा महसूल रितसरपणे देत आहे तोपर्यंत जमीनदार कुळाला शेती करण्यापासून रोखू शकत नव्हता वा त्याला शेतजमीनीपासून

बेदखल करू शकत नव्हता. बंगाल प्रांतामध्ये जमीनदार एक ठराविक रक्कम राज्याला महसूल म्हणून देत असे व उरलेले उत्पादन वा रक्कम स्वतःचे उत्पन्न म्हणून ठेवून घेत असे. जेथे शेतकऱ्याने राज्याला द्यावयाचा शेतसारा निश्चित झालेला असे अशा ठिकाणी जमीनदार स्वतःच्या फायद्यासाठी शेतकऱ्यांवर वेगळा उपकर लावून त्याची वसूली करत असे. जमीनदारांनी शेतकऱ्यांच्या अशाप्रकारे केलेल्या शोषणामुळे त्यांची ख्याती 'शोषणकर्ता वर्ग' अशी झाली.

जमीनदार त्यांचे खाजगी सैन्यदेखील बाळगत असत. ते किल्ले वा गढ्यांमध्ये निवास करत असत जे आपसूकच त्यांच्या प्रतिष्ठेचे लक्षण बनले. जोपर्यंत ते राज्याच्या खजिन्यात नित्यनेमाने महसूल जमा करत असत तोपर्यंत त्यांच्या बाबींमध्ये वा व्यवहारामध्ये राज्यातर्फे वा सुलतान वा सम्राटातर्फे हस्तक्षेप केला जात नसे. या जमीनदारांचा स्थानिक पातळीवर मोठ्या प्रमाणात प्रभाव तसेच सत्ता असे त्यामुळे साधारणपणे राज्याला वा सम्राटाला त्यांच्याकडे दुर्लक्ष करणे शक्य नसे.

अकबराच्या काळात सरकारी अधिकाऱ्यांना प्रामुख्याने मनसबदारांना रोख रक्कमेच्या स्वरूपात वेतन दिले जात असे. मात्र, अकबरानंतर यात बदल करण्यात आला. अकबराच्या उत्तराधिकाऱ्यांनी या पद्धतीमध्ये बदल केले. आता मुघल अधिकाऱ्यांना रोख रक्कमेच्या स्वरूपात वेतन न देता त्यांना ज्या जमीनीतून महसूल मिळेल अशी जमीन दिली जात असे. अशा जमीनीला जहागिर (जहागिरी वा जागिर) म्हटले जाई व ती ज्या व्यक्तीच्या ताब्यात असेल त्याला जहागिरदार असे संबोधले जाई. मनसबदाराला त्याची प्रतिष्ठा व हुद्याप्रमाणे जहागिरी मिळत असे. त्याला त्याचे उत्पन्न या जहागिरीतून प्राप्त होत असे. विजारत (वजीराचे कार्यालय) अशा सर्व जहागिरींचे मुल्यमापन करत असे.

जहागिरदार हे एकप्रकारे राज्याचे अधिकारी असत व त्यांच्या वेगवेगळ्या ठिकाणी नियुक्त्या व बदल्या केल्या जात. काही वर्षांनंतर जहागिरदाराची रवानगी एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी केली जात असे जेणेकरून त्याचे तत्सम परिसरात हितसंबंध निर्माण होऊ नयेत. परंतु जहागिरदार साधारणपणे आपल्या जहागिरितील जनतेच्या कल्याणासाठी काही विशेष प्रयत्न करताना निदर्शनास येत नसत. तसेच साम्राज्याच्या प्रशासनाचे अशा जहागिरींवर नियमितपणे नियंत्रण नसे. नंतरच्या काळातील मुघल सम्राटांच्या काळात अशा जहागिरी वंशपरंपरागतरित्या त्याच कुटूंबांकडे आल्या त्यामुळे परिस्थिती अजूनच बिकट बनली.

मुघल सम्राट जहांगीर याच्या काळात शेती (कृषी क्षेत्रात) व महसूलात (शेतसारा) उत्तरोत्तर घट आल्याचे वा ऱ्हास झाल्याचे जाणवते. जहागिरदारांना त्यांच्या जमीनींचे नियोजन करण्याचे स्वातंत्र्य होते. साधारणपणे हे जहागिरदार शेतकऱ्यांचा छळ करत असत. खालसा प्रकारच्या जमीनीतून मिळणाऱ्या महसूलात देखील उत्तरोत्तर घट होत गेल्याचे निदर्शनास येते. शहाजहान बादशहानें आपल्या शेतकऱ्यांची बिकट होत चाललेल्या या

स्थितीत सुधारणा आणण्याचा प्रयत्न केला. त्याने जास्त जमीन लागवडीखाली आणण्याचा प्रयत्न केला. मनसबदारांना रोख रक्कमेच्या स्वरूपात वेतन देण्याऐवजी जहागिरी देण्याची पद्धत सूरूच ठेवण्यात आली. औरंगजेबाच्या कारकीर्दीत कृषीक्षेत्रातील समस्या खूपच शोचनीय बनली. राज्य शेतकऱ्यांना वा कुळांना शेतजमीनीपासून बेदखल करू शकत नव्हते म्हणून त्यांना शेतीच्या कामात व्यस्त ठेवावे लागत असे. अधिकारी वर्ग व जहागिरदार शेतकऱ्यांवर जुलूम करत असत व दहशत निर्माण करत असत. उत्तरकालीन मुघल शासकांच्या काळात महसूल प्रशासनाचा प्रचंड ऱ्हास व अधोगती होण्यास सुरुवात झाली त्यामुळे एकूण गोळा होणाऱ्या महसूलात मोठ्या प्रमाणात घट झाली आणि साम्राज्याची आर्थिक स्थिती डबघाईला येऊन बिकट झाली.

सुरूवातीलाच असे नमूद करणे संयुक्तिक ठरेल की, सम्राट अकबरानें अंगिकारलेल्या जमीन महसूल वा शेतसारा पद्धतीची विद्वानांनी प्रशंसा केली आहे. अबूल फजलच्या प्रशस्तीपत्रानुसार अकबराची शेतसारा पद्धती अतिशय कार्यक्षम होती व या पद्धतीवर शेतकरी खूश होते. शेतसाऱ्याचे प्रमाण निश्चित केलेले असल्याने शेतकऱ्यांकडून जास्त प्रमाणात शेतसारा गोळा करणे वा उकळणे कठिण होते. तसेच दुष्काळात व अतिवृष्टीच्या काळात शेतसाऱ्यात सूट दिली जात असे. या प्रकारची महसूल व्यवस्था वा शेतसारा पद्धती कमी जास्त फरकाने वा कुठलाही बदल न करता संपूर्ण मुघल साम्राज्यात अस्तित्वात होती.

जरी शेतसारा हा प्रमुख कर असला तरी राज्याच्या उत्पन्नात भर पडावी म्हणून या व्यतिरिक्त इतरही कर गोळा केले जात असत. हे कर पुढीलप्रमाणे होते- वेगवेगळ्या प्रकारच्या जकाती, सीमाशुल्क, टंटसाळीवरील कर, प्रांताधिकारी, मंत्री व जहागिरदारांकडून बादशहाला वा राजाला महत्वाच्या प्रसंगी मिळणाऱ्या भेटवस्तू, पराभूत राजांकडून मिळणारी नुकसानभरपाई, इत्यादी. अशाप्रकारे मध्ययुगीन काळातील महसूल प्रशासनात अनेक बदल झालेले निदर्शनास येतात. गोळा केलेल्या महसूलाचा बराचसा भाग वा मोठा हिस्सा युद्धांवर व राजाच्या वैयक्तिक सुखसविधांवर व चैनीवर खर्च केला जाई. येथे आपणास औरंगजेब बादशहाचे उदाहरण देता येईल. त्याने त्याला आपल्या पूर्वजांकडून द्रव्याने भरपूर भरलेल्या प्राप्त झालेल्या खजिन्याची नासाडी दख्खनमधील आवश्यक नसलेली खर्चिक युद्धे लढण्यासाठी केली व आपल्या वंशजांना वा उत्तराधिकाऱ्यांना रिकामा खजिना वारसाहक्क म्हणून मागे ठेवला.

## ११.५ मध्ययुगीन भारतातील कर प्रणाली

मध्यकालीन भारतातील करप्रणाली वेगवेगळी होती आणि ती त्या काळातील विविध शासक, राजवंश आणि प्रदेशांनुसार बदलत गेली. मध्यकालीन भारतातील दिल्ली

सल्तनत, मुघल साम्राज्य आणि विविध प्रादेशिक राज्यांच्या अंतर्गत विविध करप्रणाल्या लागू होत्या. मध्यकालीन भारतातील करप्रणाली पुढीलप्रमाणे:

**सल्तनत कालीन कर प्रणाली:**

मुस्लीम कायद्याच्या हनफी विचारधारेच्या संरचनेवर आधारित सल्तनत काळातील आर्थिक नीती दिल्लीच्या सुलतानांनी गझनीच्या शासकांकडून घेतली होती. सल्तनत काळात वसूल केले जाणारे कर धार्मिक आणि धर्मेत्तर भागात विभाली होती. धार्मिक करांमध्ये जकात आणि धर्मनिरपेक्ष करामध्ये जझिया, खराज आणि खम्स होते. काही इतर कर पुढीलप्रमाणे- **उश्र**-मुस्लिमांकडून घेतला जाणारा भूमिकर ५% ते १०% पर्यंत घेतला जात असे. **खराज**-मुस्लीमेत्तरांकडून वसूल केला जाणारा भूमिकर १/३ ते १/२ होता. खम्स- हा लुट केलेल्या संपत्तीवर १/५ राज्याचा अधिकार होता. उरलेल्या ४/५ संपत्तीवर सैनिकांचा अधिकार होता. **जकात**-मुसलमानांवर धार्मिक कर २.५% होता. **जझिया-** मुस्लीमेत्तरांवर लावला जाणारा कर होता. त्याबदल्यात त्याच्या जीवन आणि संम्पत्तीचे रक्षण केले जात असे. या करामधून स्त्रिया, मुले, भिकारी, पुजारी, साधू इत्यादींना मुक्त होते. **फिरोजशाह तुघलकाने** ब्राम्हणांवरपण जझिया कर लावला होता. **घरी-** हा गृह कर होता. **चरी-** पाळीव प्राण्यांवर लावला जाणारा हा कर होता. घरी आणि चरी हा कर **अल्लाउद्दिन खिलजीने** हा कर लावला होता. घरी आणि चरी हे कर **फिरोजशाह तुघलकाने** बंद केले. **हर्ब-ए-शर्ब** – हा सिंचाई कर होता. हा कर फिरोजशाहने लावला होता. **जजारी**-कसायांकडून (खाटिक) घेतला जाणारा कर होता. फिरोजशाहने तकावी (ऋण) माफ केले होते. काही कृषी कर बंद केले.

**मुघलकालीन कर प्रणाली:**

मुघल काळात जमिनीवर **खराज** या कराव्यतिरिक्त अनेक धार्मिक, सामाजिक आणि स्थानिक कर वसूल केले जात असे. **भूमीकर (खराज): खराज** हा मध्यकालीन भारतातील अत्यंत महत्त्वाचा कर होता. विशेषत: मुघल साम्राज्याच्या काळात. हा एक भूमीवर लावला जाणारा कर होता आणि तो सामान्यतः शेती उत्पादनाच्या एका निश्चित टक्केवारीवर लावला जात असे.

अकबरच्या काळात जमिनीच्या मोजमापावर आधारित **झब्त** नावाची पद्धत सुरू करण्यात आली. या पद्धतीत जमिनीचे मोजमाप घेऊन उत्पादनावर ठराविक हिस्सा (साधारणतः **१/३** किंवा **१/२**) कर घेण्यात येत होता. हा कर किमान किंवा प्रत्यक्ष उत्पादनाच्या स्वरूपात किंवा रोख रकमेने घेतला जात असे. बाबर आणि हुमायून यांनी हिंदुकडून **जझिया कर** वसूल केला होता. परंतु १५६४ मध्ये अकबराने **जझिया** कर समाप्त केला. **जझिया कर** औरंगजेबाने **१६७९** ला परत पुन्हा चालू केला परंतु १७१३

मध्ये फा**रुखसियरने** पुन्हा हा कर समाप्त केला. १७२० मध्ये **मोहम्मद शाह**च्या शासन काळात शेवटी हा कर संपविला. मुस्लिमांकडून त्यांच्या संपत्तीचे रक्षण करण्याच्या बदल्यात **जकात** हा कर २.५% वसूल केला जात असे. हा कर अकबराने बंद केला होता. पुढे औरंगजेबाने राजाज्ञा कडून हा कर बंद केला. '**तमगा**' नावाचा कर जहांगीरने समाप्त केला. मुघल काळात **विवाह क**र घेतला जात असे. हा कर अकबराने चालू केला होता. 'खुम्स'हा युद्धातील लुटीवरचा कर होता. १/५% हिस्सा राज्याचा होता आणि ४/५ हिस्सा सैनिकांमध्ये दिला जात असे परंतु हा कर नंतर बंद केला. कारण मुघल सैन्याला नगदी वेतन दिले जात होते.

**विजयनगर** साम्राज्याच्या जमीन महसूल हा मुख्य साधन होते. 'शिष्ट' हा जमीन महसूल कर होता. हा कर नगदी किंवा वस्तूंच्या रुपात गोळा केला जाई. समकालीन साधनांनुसार कृष्णदेवरायने सर्व जमिनीची मोजणी केली होती. या काळात भिखारी,मंदिर आणि वेश्यांवर पण कर लावला जात होता. कदमाई, मागमाई, कनक्काई, कत्तनम, वरम, भोगम,वारी, पत्तम, इराई आणि कत्तायम यांचा इतर करांमध्ये समावेश होता. या व्यतिरिक्त घर, पशु, धोबी, मनोरंजन करणारे तसेच न्हावी यांच्यावर पण कर लावला जात होता. विवाह कर हा सामाजिक कर होता. तो वर पक्ष आणि वधु पक्षांकडून घेतला जात असे. विधवा विवाहावर हा कर घेत नसत.

## ११.६ सारांश

मध्ययुगीन भारतामध्ये सुलतान, यादव, मोगल या राजवंशानी आपापल्या काळात आपली स्वतंत्र अशी महसूल व्यवस्था निर्माण केली. प्रत्येक राज्यकर्त्याने आपापल्या कारकिर्दीत स्वत:ची महसूल व्यवस्था निर्माण केली. सुलतान कालखंडात गुलाम, खिलजी, तुघलक, सय्यद, लोदी घराण्याच्या राजकर्त्यांनी राज्य केले तर यादव कालखंडातील राजांनी आपली स्वतंत्र अशी महसूल प्रणाली राबविली. मोगल कालखंडात बाबर, हुमायुम, शेरशहा, अकबर, जहांगीर, शहाजहान व औरंगजेब या राजकर्त्यांनी आपली महसूल प्रणाली निर्माण केली. दक्षिण भारतात विजयनगर साम्राज्यातील राजांनी सुद्धा आपली महसूल आणि कर प्रणाली राबवली होती.

मध्यकालीन भारतातील करप्रणाली विविध प्रकारची होती आणि ती प्रत्येक साम्राज्याच्या आणि प्रदेशाच्या प्रशासनावर आधारित होती. शेतमालावर आधारित करप्रणाली मुख्य असली तरी व्यापार, जजिया आणि इतर उत्पन्नाचे स्रोत देखील महत्त्वाचे होते. मुघल साम्राज्याच्या काळात या करप्रणाली अधिक सुव्यवस्थित झाली, पण पुढे अस्थिरतेमुळे कर प्रणालीमध्ये विस्कळीतपणा आला. दक्षिण भारतातील विजयनगर साम्राज्यातील जमीन महसूल कर, काही सामाजिक कर, व्यापारी कर, घरावरील कर हे प्रामुख्याने वसूल केले जाणारे कर होते.

## ११.७ प्रश्न

१. सुलतान कालखंडातील महसूल पद्धतीवर भाष्य करा.

२. मोगल कालखंडातील महसूल पद्धतीचा आढावा घ्या.

३. मध्ययुगीन भारतातील कर प्रणालीवर प्रकाश टाका.

## ११.८ संदर्भ

१. चौबळे जे. असे होते मोगल, महाराष्ट्र राज्य साहित्य मंडळ.

२. डॉ. धनंजय आचार्य, मध्ययुगीन भारत : कल्पना प्रकाशन.

३. गाठाळ एस. एस. भारताचा इतिहास : कल्पना प्रकाशन.

४. विद्याधर महाजन, मध्यकालीन भारत : स. चंद. दिल्ली २००२.

५. गायकवाड आर. डी., भोसले आर. एच. प्राचीन व मध्ययुगीन भारताचा इतिहास.

❄❄❄❄❄❄❄

# १२

# मध्ययुगीन भारतातील उद्योग, व्यापार व नागरीकरण

**घटक रचना:**

१२.० उद्दीष्टे

१२.१ प्रस्तावना

१२.२ मध्ययुगीन कालखंडातील उद्योग

१२.३ मध्ययुगीन कालखंडातील व्यापाराचे स्वरुप

१२.४ मध्ययुगीन कालखंडातील व्यापार

१२.५ मध्ययुगीन भारतातील नागरीकरण

१२.६ सारांश

१२.७ प्रश्न

१२.८ संदर्भ

## १२.० उद्दीष्टे

- मध्ययुगीन कालखंडातील उद्योगाची माहिती करुन घेणे.
- मध्ययुगीन कालखंडातील व्यापाराचे स्वरुप जाणून घेणे.
- मध्ययुगीन सागरी व्यापाराची माहिती समजून घेणे.
- मध्ययुगीन भारतातील नागरीकरण समजून घेणे.

## १२.१ प्रस्तावना

चौदाव्या शतकात जेव्हा इब्न बतूता दिल्लीत आला तेव्हा भारतीय उपखंड पूर्वेकडे चीनपासून पश्चिमेकडे वायव्य आफ्रिका तसेच युरोपपर्यंत जागतिक संपर्काच्या वा दळणवळणाच्या जाळ्याचा भाग बनलेला होता. त्यांच्या असे लक्षात आले की, आवश्यक ती कौशल्ये, इच्छाशक्ती व संसाधने असणाऱ्या व्यक्तींसाठी भारतीय नगरांमध्ये वा शहरांमध्ये विविध क्षेत्रांतील रोमांचक संधी उपलब्ध होत्या. तो आपणास कशाप्रकारे भारतीय नगरांमधील (शहरांमधील) लोकसंख्येची घनता जास्त होती म्हणजेच शहरांतील लोकसंख्येचे प्रमाण जास्त होते व सुबत्ता व समृद्धी होती याविषयी देखील माहिती देतो. यावरून तो आपणास हेदेखील सुचवतो की, भारतातील नागरिकरणाचे (शहरीकरणाचे) प्रमाण जास्त होते तसेच व्यापार उदीमाच्या क्षेत्रातदेखील मोठ्या प्रमाणात वाढ झालेली होती. आपल्या इतिवृत्तांतात इब्न बतूता भारतीय शहरांचे व प्रामुख्याने दिल्ली व दौलताबादचे वर्णन देतो.

भारतातील बऱ्याचशा शहरांतील रस्त्यांवर तुडुंब गर्दी असे व त्यातील चमकदार (लख्ख) व आकर्षक बाजार विविध वस्तूंनी भरलेले असत. भारतीय उपखंडाचे आंतर-आशियाई व्यापार उदीमाच्या जाळ्याशी दृढ संबंध प्रस्थापित झाले होते व भारतीय उत्पादकांना आग्नेय व पश्चिम आशियात मोठ्या प्रमाणात मागणी होती. याचा भारतीय कलावंत व व्यापाऱ्यांना खूप फायदा होत असे. ज्या भारतीय वस्तूंना मागणी होती त्यात प्रामुख्याने कापडाचा व त्यातल्या त्यात सूती, मलमल, रेशमी, जरीच्या व मुलायम कापडाचा समावेश होता. आपणास बरेचसे भारतीय राजे वेगवेगळ्या प्रकारे व्यापार उदिमाला चालना देत असत असे आढळते. व्यापाऱ्यांना प्रतोत्साहित करण्यासाठी विशेष उपाययोजना केल्या जात. जवळजवळ सर्वच व्यापारी मार्गांवर सुखसुविधांनी परिपूर्ण असलेल्या धर्मशाळा तसेच विश्रामगृहांची व्यवस्था केलेली असे. इब्न बतूता आपणास माहिती देतो की, भारतातील तत्कालीन टपाल खाते फार सक्षम होते. याची प्रचिती आपणास याच्यावरून येते की, व्यापारी या विभागामुळे वा सेवेमुळे दूरच्या ठिकाणी फक्त माहितीच पुरवू शकत नव्हते तर त्यांना पैशांचे व्यवहार व अगदी कमी वेळात वस्तू देखील एका ठिकाणाहून दुसऱ्या दुचरच्या ठिकाणी पाठविणे शक्य होते.

## १२.२ मध्ययुगीन कालखंडातील उद्योग

जरी भारतीय कापड उद्योग फार जूना असला तरी कापडाची विविधता मर्यादित होती. मुस्लिमांनी भारतात आकर्षक प्रकारचे वेगवेगळे कापड आणले. बंगाल हे भारतीय कापड उद्योगाचे मुख्य केंद्र होते व कालांतराने याबाबतीत गुजरात बंगालचा स्पर्धक म्हणून पुढे आलेले आपल्या लक्षात येते. कापड उद्योगानंतर महत्वाचे असलेले उद्योग म्हणजे धातुकाम, साखर बनविणे व कागद बनविणे हे होते. यातील कागद बनविणे हा किरकोळ उद्योग होता. हे उद्योग बहुदा खाजगी मालकीचे असत. मात्र, राज्याला आवश्यक असणाऱ्या वस्तूंचे उत्पादन करणाऱ्या कारखान्यातील अवजारे शासकीय मालकीची असत व त्यांचे व्यवस्थापन देखील राज्याच्या यंत्रणेकडून केले जाई. दिल्लीतील शाही कारखान्यांमध्ये फक्त रेशमाचे कापड बनविण्यासाठी चार हजाराच्या आसपास विनकरांना कामाला लावले जाई.

भारत युरोप, चीन व प्रशांत महासागरातील व आसपासच्या देशांसोबत सागरी मार्गाने जोडलेला होता. तसेच जमीनीच्या वा भूमार्गाने वा खुष्कीच्या मार्गाने भारत मध्य आशिया, अफगाणिस्तान, पर्शिया, तिबेट व भुतान सोबत जोडलेला होता. दिल्लीच्या सुलतानशाहीच्या काळात व्यापार भरभराटिस होता व परकिय व्यापारी मोठ्या प्रमाणात स्थायिक झाले होते त्यामुळे सुलानशाहीतील शहरांना वैश्विक रूप प्राप्त झाले होते.

पैसे व्याजाने दिले जात आणि श्रीमंत सावकार या व्यवसायात वा क्षेत्रात सक्रिय असत. आश्चर्यकारक बाब म्हणजे जरी बऱ्याचदा राजकिय स्थिती अस्थिरतेची असली तरी भारतीयांच्या ठायी असलेल्या प्रामाणिकता या गुणांमुळे भारतासोबत व्यापार करणे सुरक्षित समजले जाई अशी माहिती आपणास त्याकाळात भारतात येणारे व्यापारी आणि परकिय प्रवासी यांच्याकडून मिळते. भारत हा महत्त्वाचा निर्यातदार होता व व जगभरातले व्यापारी विविध वस्तूंची व मालाची खरेदी करण्यासाठी सोनं देखील देत असत आणि या मालमध्ये शेतीमाल, कापड, औषधी वनस्पती व इतर अनेक वस्तूंचा समावेश होता. तसेच भारत हा

पर्शिया च्या आखातातील देशांसाठी अन्नधान्याचा महत्वाचा स्त्रोत होता. सुलानशाहीत चलनाचा (चलनी नाणे) वापर व महत्व वाढत चालले होते व नाणी टंकसाळीत पाडून व्यवहारासाठी वापरली जात. हि नाणी संपूर्ण उत्तर भारतातील शहरांमध्ये (नगरांमध्ये) प्रसारित करून वापरात आणली जात. खाण्याचे पदार्थ (अन्न) विविध वस्तू गंगेच्या त्रिभुज प्रदेशात स्वस्त दरात मिळत, जरी या काळात वस्तूंचा तुटवडा व अस्थिरता अशा अनेक बाबींवर किंमती अवलंबून असत. परकिय प्रवाशांच्या वृत्तांतांनुसार वस्तूंच्या किंमती साधारणपणे कमी असत.

परकिय प्रवाशांच्या साक्षींनुसार एक बाब अधोरेखित होते की, विजयनगरचे साम्राज्य देखील श्रीमंत होते व सर्वत्र सुबत्ता होती. तेथील शेती चांगल्या प्रतीची होती व कृषी क्षेत्रात भरभराट होती. विजयनगरचे शासक विविध प्रकारच्या जलसिंचन सुविधा व प्रकल्प विकसित करून कृषी क्षेत्राला बढावा देण्यात रस घेत असत. कृषी क्षत्रासोबतच विविध उद्योगातून राज्याला अतिरिक्त उत्पन्न मिळत असे किंबहूना हे उद्योग म्हणजे राज्याला अतिरिक्त संपत्ती मिळवून देण्याचे स्त्रोत होते. कापड उद्योग, खाणं उद्योग, सुगंधी द्रव्यांचा उद्योग आणि धातूशुद्धीकरण उद्योग हे त्याकाळातील काही महत्वाचे उद्योग होत. व्यापार व उद्योग हे चांगल्या व्यापारी संघांमध्ये संघटित झाल्याचे निदर्शनास येते.

अब्दुल रझाक या विजयनगरातील पर्शियन राजदूतानूसार विजयनगरच्या साम्राज्याच्या ताब्यात तीनशेच्या आसपास सागरी बंदर होते. होन्नावर, भटकळ, मंगरूळू, कालिका, कोचिन, क्विलॉन, कावळा, नेगापटनम्, सेंट थॉम आणि पुलिकत ही काही विजयनगरमधील महत्वाची बंदरे होती. येथील परकिय व्यापार प्रामुख्याने पोर्तुगीज, भारतीय व अरबी व्यापाऱ्यांच्या माध्यमातून चालत असे. महत्वाचे म्हणजे विजयनगरच्या साम्राज्याचे मलाया द्वीपसमूह, हिंद महासारातील बेटे, ब्रह्मदेश, पर्शिया, चीन, ॲबिसिनिया, दक्षिण आफ्रिका व पोर्तुगाल या देशांसोबत चांगले व्यापारी संबंध होते. विजयनगरच्या साम्राज्यातून प्रामुख्याने कापड, तांदूळ, लोखंड, साखर, सोरामीठ आणि मसाले या वस्तूंची व जिन्नसांची निर्यात होत असे. विजयनगरच्या साम्राज्यात आयात केल्या जाणाऱ्या महत्वाच्या वस्तू व प्राणी पुढीलप्रमाणे होत्या- तांबे, पारा, चीनी रेशमी कापड, मखमल, घोडे व हत्ती. १५१६ साली विजयनगरच्या साम्राज्याला भेट देणारा दुआर्दो बारबोझा हा पोर्तुगीज प्रवाशी अगोदरच्या प्रवाशांनी दिलेल्या माहितीला दुजोरा देतो. त्याने विजयनगर शहराची पुढील शब्दांमध्ये प्रशंसा केली आहे- " शहराची व्याप्ती मोठी होती, लोकसंख्येचे प्रमाण जास्त होते व हे शहर देशातील एक सक्रिय व्यापारी केंद्र होते- येथे हिरे व रूबीसारखे खडे पेगूमधून येत असत, रेशीम कापड चीन व अलेक्झांड्रिया मधून येत असे, शेंदूर, कापूर, कस्तुरी, काळी मिरी आणि चंदन मलबार मधून येत असत."

विजयनगरचे साम्राज्य व शेजारच्या राज्यांमधील राजकीय तणावाचा परिणाम व्यापारावर पडत असे. युद्धाचा निर्णय अनेकदा परिणामकारक घोडदळावर अवलंबून असल्यामुळे अरेबिया (अरबस्तान) आणि मध्य आशियातून उत्तम प्रतीच्या घोड्यांची आयात करणे दक्षिणेतील मध्ययुगीन स्पर्धक राज्यांना महत्वाचे होते. तसेच विजयनगरचे साम्राज्य तेथील मसाल्यांच्या, कपड्यांच्या आणि मौल्यवान खड्यांच्या बाजारपेठांसाठी प्रसिद्ध होते. असे लक्षात येते की, अशा गर्भ श्रीमंतांच्या शहरांमध्ये व्यापार प्रतिष्ठेचे प्रतिक मानला जात असे जेथे श्रीमंत नागरिकांना विदेशी वस्तू, प्रामुख्याने दागिने आणि मौल्यवान खडे लागत

असत. राज्याने प्राप्त केलेल्या महसूलाचे विजयनगरच्या साम्राज्यातील सुबत्ता व समृद्धीत महत्वाचे योगदान होते.

जेव्हा हुमायून नंतर व अकबरापूर्वी शेरशहा दिल्लीच्या तख्तावर आला तेव्हा त्याने मोठ्या प्रमाणात व्यापार उदीमाला प्रोत्साहन दिले. त्याने आपल्या साम्राज्यात वस्तूंवर विविध ठिकाणी कर गोळा करण्याची पद्धती बंद करून टाकली व फक्त सीमेवर जेव्हा वस्तू देशात आयात केली जाईल तेथे व जेथे वस्तूंची विक्री केली जाईल तेथे अशा दोनच ठिकाणी वस्तूंवर कर आकारण्याचे निर्देश आपल्या अधिकाऱ्यांना दिले. पश्चिमेकडून व मध्य आशियातून आयात होणाऱ्या वस्तूंचे सीमाशुल्क सिंधू नदीच्या तीरावर गोळा केले जाई. फक्त व्यापार उदीमाला प्रोत्साहन देणेच पुरेसे नसते तर व्यापार उदिमाचा उत्कर्ष करण्यासाठी त्यात सुधारणा करणे व तो सुस्थितीत ठेवणै आवश्यक असते ज्यामुळे राज्यामध्ये सुबत्ता व समृद्धी येते. शेरशहाने व्यापार उदीमाची उन्नती करण्यासाठी वा बढावा देण्यासाठी व्यापाऱ्यांना व्यापारी मार्गांवर संरक्षण देणे, कार्यक्षम पोलिस व्यवस्था, चांगल्या प्रतीची नाणीं पाडणे, रस्ते व सराईचे निर्माण, व्यापाऱ्यांच्या मालमत्तेला संरक्षण पुरविणे, अधिकाऱ्यांना व्यापाऱ्यांच्या हितांचे रक्षण करण्याच्या सुचना देणे आदि उपाययोजना केल्या.

मध्ययुगीन भारतातील अर्थव्यवस्था बऱ्याच प्रमाणात आत्मनिर्भर होती. मुस्लिम आक्रमणे व त्यांना प्राप्त झालेले विजय याचा परिणाम देशाच्या व्यापार उदीमावर झाला नाही. या काळात मोठे उद्योग विकसित झाले नाहीत असे आपल्या लक्षात येते. आपण असे पाहतो की, या काळात बरेच उद्योग स्थानिक स्वरूपाचे होते. मध्ययुगीन काळात काही गावपातळीवर भरभराटिस आलेले उद्योग पुढीलप्रमाणे होत- कापसावर प्रक्रिया करणे, कताई वा हातमाग आणि वीणकाम, साखर व गुळ बनविणे, तेलबियांपासून तेल काढणे, नीळ बनविणे, मातीची भांडी बनविणे (कुंभारकाम), चामड्याच्या वस्तू बनविणे, शेतीसाठी लागणारी विविध अवजारे , युद्ध सामुग्री (शस्त्रे), भांडी बनविणे, कांस्य, चांदी व तांबे आदि धातूंपासून विविध देवदेवतांच्या मूर्ती बनविणे तसेच सोनं, चांदी, कांस्य, तांबे तसेच इतर वेगवेगळ्या धातूंच्या मिश्रणापासून बनविलेल्या अनेक प्रकारच्या वस्तू, आणि इतर अनेक तत्सम वस्तू.

कापड उद्योग हा मध्ययुगीन भारतातील सर्वात मोठा व लोकप्रिय उद्योग होता. तसेच हा उद्योग संपूर्ण देशभर पसरलेला होता. सूती कापड उद्योग हा कुटिरोद्योग व मोठा उद्योग म्हणून देखील प्रसिद्ध होता. बंगाल, गुजरात, ओरिसा आणि माळवा ही सूती कापड उद्योगाची प्रमुख केंद्रे होती. सुरत, कॅम्बे, पाटना, बुऱ्हाणपूर, दिल्ली, आग्रा, सोनारगांव, बनारस, देवगिरी, लाहोर, थट्टा आणि मुलतान ही काही शहरे व नगरे वेगवेगळ्या प्रकारच्या कापडासाठी प्रसिद्ध होती. सूती कापड एवढ्या अप्रतिम प्रतीचे असे की त्याला प्रदेशात मोठ्या प्रमाणात मागणी असे. याव्यतिरिक्त इतरही उत्तम प्रतीचे कापड विणले जाई मात्र ते कापड प्रामुख्याने राजघराण्यातील व कुलीन अमीर-उमराव घराण्यातील लोक वापरत असत. कपड्याचे उत्पादन व त्याची निर्यात याचा विचार केला असता बंगाल आणि गुजरातचे मुख्य स्थान होते. यामागचे प्रमुख कारण म्हणजे या प्रदेशांमध्ये व आसपास मोठ्या प्रमाणात उपलब्ध असलेला कापूस, बंदरे असलेला समुद्र किनारा आणि पारंपारिकरित्या इतर देशांशी असलेले व्यापारी संबंध हे होय. गुजरातचे याबाबतीतले

योगदान आपणास कॅम्बे बाबतची विधाने वाचून लक्षात येते. भारताच्या कपड्याच्या एकूण निर्यातीत कॅम्बेचा जवळपास पन्नास टक्के एवढे योगदान होते. येथे मोठ्या प्रमाणात कौशल्यपूर्ण कारागीर होते. त्याचप्रमाणे कॅम्बे येथील कपड्याला पश्चिम युरोप, दक्षिण आफ्रिका आणि दक्षिण आशियात फार मोठी बाजारपेठ होती.

याकाळातील प्रवासी भारतात विणल्या जाणाऱ्या कपड्यांच्या प्रकारांचे रसभरित वर्णन करत. अमिर खुसरो मलमलीच्या कपड्याला अप्रतिम पोत असलेले 'बंगालचे कापड' असे संबोधतो. चीनी प्रवासी मा हुआन बंगालमधील विविध प्रकारच्या कपड्यांची माहिती देतो तसेच बंगालमध्ये तुतीची झाडे व रेशमाचे किडे होते अशीदेखील माहिती देतो. सूती कापड विणण्याच्या उद्योगावर, कपडा रंगविणे, कापसाच्या वा सूती कपड्यावर खळी किंवा नक्षीकाम करणे तसेच राजस्थानची विशेषता असलेले कड्यावरील बंधनी नामक नक्षीकाम इत्यादी उद्योग विसंबून होते.

अबूल फजल त्यांच्या ऐन-ए-अकबरी या ग्रंथात खानदेशातील सूती धाग्याविषयी माहिती देतो. अकबराच्या काळात वेगवेगळ्या प्रकारच्या आकर्षक कापडाचे उत्पादन वाराणसी, आग्रा, माळवा आणि गुजरातसारख्या ठिकाणी होत असे. सूती कपड उद्योगाचे चार महत्त्वाचे पट्टे होते, हे पट्टे समुद्र किनाऱ्याजवळ होते व त्यांची नावे पुढीलप्रमाणे आहेत- सिंधु नदीच्या खोऱ्यातील मैदानी प्रदेश, कॅम्बेचे आखात (खंबाटकचे आखात) ते दक्षिणेत दाभोळपर्यंतचा सागरी किनारा, कोरोमंडल समुद्र किनारा (भारताचा पूर्वेकडील समुद्र किनारा) आणि बंगाल.

कासिम बाजार, माल्डा, मुर्शिदाबाद, पाटना आणि बनारस ही रेशमाच्या उत्पादनाची प्रमुख केंद्रे होती. आश्चर्य म्हणजे गुजरातमध्ये रेशमाचे उत्पादन होत नसले तरी तेथे रेशीम विणण्याच्या (रेशमाचे कापड विणण्याच्या) उद्योगाचा उत्कर्ष झाला होता. दिल्लीच्या सुलतानशाहीच्या काळापासूनच कॅम्बेच्या रेशमी कापडाला मोठ्या प्रमाणात मागणी होती. मुघलांच्या राजवटीत अहमदाबादच्या रेशमी कापडाचा नावलौकिक होता. रेशमी सूत (धागा) विणून त्यापासून कपडे बनविण्याचा उद्योग लाहोर, आग्रा आणि फतेहपूर सिक्री आदि ठिकाणी नावारूपास आला होता. रेशमी कापड प्रामुख्याने प्रसिद्ध अमिर-उमराव घराण्यातील सदस्य वापरत असत.

लोकरी कापडाचा उद्योग राजस्थान, लाहोर, काबूल, काश्मिर, आग्रा, फतेहपूर सिक्री, अमृतसर, पाटना, जौनपुर आणि बुरहानपूर अशा लहानशा भौगोलिक पट्ट्यापूरता मर्यादित होता. काश्मिरमध्ये विविध प्रकारची कांबळी (घोंगडी), शाली आणि लोकरीचे इतर कपडे बनवले जात. काश्मिरी शाली त्यांचा नरमपणा (मुलायमपणा) व उबेसाठी प्रसिद्ध होती. या शाली लडाख व तिबेटमधून आणलेल्या लोकरीपासून बनवल्या जात. फतेहपूर सिक्री तेथील गालिच्यांसाठी (सतरंजी) प्रसिद्ध होते. गालिचा विणण्याचा उद्योग आग्रा व लाहोर येथे उत्कर्षाला आला होता.

भारतात वेगवेगळ्या धातूंपासून विविध वस्तू बनविण्याचा उद्योग प्राचिन काळापासूनच विकसित झाला होता. दिल्लीजवळील मेहरोलीचा स्तंभ, देशाच्या विविध भागांतील मंदीरांमध्ये आढळणारे लोखंडी स्तंभ आणि लोखंडी मूर्त्या प्रचिती देतात की, प्राचिन भारतात लोखंडी वस्तू बनविण्याचा उद्योग भरभराटीस आला होता. दिल्लीच्या

सुलतानांच्या काळातदेखील पूर्वीप्रमाणेच हा उद्योग जोमाने सुरू होता. लोखंडाचा उपयोग बचावासाठी तसेच चढाई करण्यासाठी लागणारी तलवार, बंदुका, तोफा, ढाल आणि चिलखत अशी शस्त्रास्त्रे बनविण्यासाठी केला जाई. लोखंडाचा वापर घरे, राजवाडे आणि किल्ले बांधण्यासाठी, भांडी बनविण्यासाठी तसेच वेगवेगळ्या प्रकारची शेतीची व घरगुती वापराची अवजारे बनविण्यासाठी मोठ्या प्रमाणात केला जात असे. मूस (रसपात्र) व जहाज आणि बोटी बांधण्यासाठी वापरला जाणारा लोखंड हा प्रमुख धातू होता. लाहोर, मुलतान, मेवाड, गुजरात आणि गोंवळकोंडा हि लोखंडी व पोलादी वस्तू बनविण्याची मुख्य केंद्र होती. पितळ व तांब्यापासून वस्तू बनविण्याचादेखील मोठा उद्योग होता. या दोन धातूंचा वापर भांडी, निम्न वर्गातील लोकांचे दागिने, बंदुका आणि तोफा तसेच नाणी पाडण्यासाठी होत असे. बनारस पितळ व तांब्याच्या वस्तू बनविण्यासाठी प्रसिद्ध होते. तसेच दिल्ली व लखनौ हे पितळ व तांब्याच्या वस्तूसाठी सर्वज्ञात होते. श्रीमंत लोक प्रामुख्याने सोनं व चांदीपासून बनविलेले दागिने वापरत असत. कांस्य धातूपासून बनविलेले दागिनेदेखील वापरले जात. दागिन्यांना जडावाच्या कामाने सुद्धा सजवले जाई. बनारस, दिल्ली, गुजरात आणि आग्रा हि ठिकाणे तेथे बनणाऱ्या सुंदर जडावाच्या दागिन्यांसाठी प्रसिद्ध होती. हा उद्योग अकबर व शहाजहान यांच्या काळात मोठ्या उंचीवर जाऊन पोहोचला होता.

अमिर खुसरो शमी वा सिरियन कागद बनविला जात असल्याचा संदर्भ देतो. हा कागद साधा व रेशमी या दोन प्रकारांमध्ये बनविला जात असे. बंगालला भेट देणारा माहुआन हा चिनी प्रवासी झाडाच्या सालीपासून बनविल्या जाणाऱ्या तकतकीत कागदाचा उल्लेख करतो. निकोलो कोंटी गुजरातमध्ये कागद वापरला जात असल्याचा उल्लेख करतो. मध्ययुगीन काळातील जी वेगवेगळी हस्तलिखितं आपणास सापडली आहेत त्यावरून असे सिद्ध होते की, त्याकाळात कागद उद्योग अस्तित्वात होता. मुघलांच्या काळात कागद उद्योगात अजून जास्त प्रमाणात विकसित झाला. हा उद्योग सियालकोट, काश्मिर, दिल्ली, गया, अहमदाबाद, राजगिर, पाटना आणि इतर काही ठिकाणी हा उद्योग एकवटलेला होता. विशेष प्रतिचा कागद अलाहाबादजवळ शहजादपूर येथे बनविला जाई.

मुघल काळात जहाजबांधणी उद्योग चांगल्या प्रकारे विकसित झाला होता. मोठ्या सागरी जहाजा पश्चिम तसेच पूर्व किनाऱ्यावर बांधल्या जात. सुरत हे जहाजबांधणी उद्योगाचे एक प्रमुख केंद्र होते कारण येथील आसपासच्या परिसरात उत्तम प्रतिचे लाकूड उपलब्ध होते. मल्ला समाजाचे लोक ज्या बोटी वा होड्या चालवित त्या संपूर्ण देशभर पाठविल्या जात. भारतीय जहाजबांधणी उद्योग एवढा विकसित झाला होता की, पोर्तुगीजांनी त्यांची काही उत्तम जहाजे भारतात बांधली होती. त्याकाळातील सर्वात वजनदार प्रवासी जहाजा या १००० ते १५०० एवढ्या टन वजनाच्या असत ज्यांचा वापर सोळाव्या आणि सतराव्या शतकात हजच्या यात्रेला जाणाऱ्या यात्रेकरूंच्या वाहतूकिसाठी व रहदारीसाठी होत असे.

याकाळात चामडीच्या वस्तू बनविण्याचा उद्योगदेखील बऱ्याच प्रमाणात विकसित झाला होता. चामडीपासून बनणाऱ्या पुढील वस्तूंना मागणी असे- खोगिर, तलवारीची म्यान, पुस्तकाचे आवरण, बुट व पाणी नेण्याची पखाल किंवा चामडी पिशवी. बंगालमध्ये साखर निर्यातीसाठी चामड्याचे गठ्ठे वापरले जात. गुजरातमध्ये सोनं व चांदीचे नक्षीकाम केलेल्या सुंदर चटया बनविल्या जात ज्यांची प्रशंसा प्रसिद्ध इटालियन प्रवासी मार्को पोलो यानेदेखील केली होती.

मध्ययुगीन काळात इतरही अनेक किरकोळ उद्योग अस्तित्वात होते. सुतारकाम व मातीची भांडी बनविण्याव्यतिरिक्त शोभेच्या वस्तू बनविण्याचे अनेक उद्योग होते. तांब्याचे दागिने गुजरात आणि बंगालमध्ये बनविले जात, हस्तीदंताचे कोरिव काम, सोन्याचे नक्षीकाम आणि शोभेचे (नकली) दागिने हे उद्योग भारताच्या विविध भागांमध्ये चालत असत. सुगंधी द्रव्ये (अत्तर) व सुगंधी तेल, दगडी व लाकडी काम, चटया आणि टोपली (परडी) या वस्तू बनविणारे किरकोळ उद्योग मध्ययुगीन भारतात अनेक ठिकाणी विकसित झाले होते.

येथे एक महत्त्वाचा मुद्दा लक्षात घेणे आवश्यक आहे व तो हा की मध्ययुगीन काळात विविध प्रकारच्या वस्तू हस्तकलेचा उपयोग करून बनविल्या जात. वेगवेगळ्या वस्तू बनविण्यासाठी साध्यासुध्या अवजारांचा वापर केला जात असे. पशुधनाला बळाचे (शक्तीचे/उर्जेचे) प्रमुख साधन म्हणून वापरले जात असे.  मात्र, वाऱ्याचा व पाण्याचा वापर उर्जेची साधने म्हणून वापरात होती असा पुरावा सापडत नाही. जलशक्तीवर चालणाऱ्या जनित्रांचा/झोतयंत्रांचा वापर दळण गिरण्या चालविण्यासाठी केला जात असे. ग्रामीण भागातील विणकर, तेली, लोहार, सुतार आणि कुंभार हे कारागीर वस्तूविनिमयाच्या मोबदल्यात आपल्या सेवा इतर गावकऱ्यांना देत असत. शहर वा नगरातील कारागीर त्यांनी बनविलेल्या सहसा वस्तू पैशाच्या मोबदल्यात खुल्या बाजारात विकून टाकत असत. जहाजबांधणी, खाणकाम आणि किल्ल्यांची, राजवाड्याची व पुलांचे निर्माण करताना मोठ्या प्रमाणात कुशल आणि अकुशल मजूरांचा वापर केला जात असे.

मुघलांच्या काळात व्यापार-उदीम चांगल्या प्रकारे विकसित झाला होता. जरी बाजारात विकल्या जाणाऱ्या अधिकांश शेती पेरलेल्या (कृषी) व शेतीत न पेरलेल्या (अकृषी) वस्तू अनेकदा स्थानिक पातळीवर खपल्या जात तरी शहरातील लोकांच्या गरजा प्रामुख्याने त्यांच्या आसपासच्या परिसरातील प्रदेशांतून भागवाव्या लागत. वस्तू सुसंघटित पद्धतीने विकल्या जात. विशिष्ट कालावधीने वा वारी भरणारे बाजारदेखील असत त्यांना 'पेठ' वा 'हाट' असे म्हणत. मोठ्या नगरांमध्ये व शहरांमध्ये महत्वाचा व्यापार बाजार वा मंडीतील नियमित दुकानांतून चालत असे. सर्व प्रकारच्या पशुधनाची खरेदी व विक्री साधारणतः पशु वा गुरांच्या बाजारात होत असे जो कधीकधी भरवला जात असे.

या काळात मोठ्या प्रमाणात देशांतर्गत व्यापार होत असे. बारबोझा, पेस, निकोलो कोंटी आणि इतर अनेक परकिय व्यापारी भारताच्या अंतर्गत व्यापाराविषयी भरपूर माहिती देतात. त्याच्या भारतातील प्रवासादरम्यान इब्न बतूताने चौदाव्या शतकाच्या पूर्वार्धात मोठे बाजार व बाजारपेठा असलेले अनेक शहरे पाहिली होती. उत्कृष्ट रस्त्यांमुळे त्या काळात देशांतर्गत व्यापार भरभराटिस आला होता. मात्र मध्ययुगीन काळात रस्त्यांची कल्पना आजच्यापेक्षा वेगळी होती. अनेकदा रस्ते म्हणजे मळलेल्या वाटा (मातीच्या वाटा) असत व रस्त्याच्या दोन्ही बाजूला वा कडेला झाडे असत. या रस्त्यांचे सर्वात वैशिष्ट्य म्हणजे थोड्या थोड्या अंतरावर असलेल्या विहिरी व पाण्याचे हौद असलेल्या सराई हे होते. या सराई प्रवाशांना व प्राण्यांना प्रवासादरम्यान निवारा व पाणी पुरविण्याचे काम करत असत. दिल्ली ते दौलताबाद अशा चाळीस दिवसांच्या प्रवासासाठी एक रस्ता असल्याचे आपल्या निदर्शनास येते. हाच रस्ता पुढे तेलंगणा व मदुरा पर्यंत जात असे व पायाने चालत हे अंतर कापण्यासाठी जवळजवळ सहा महिने लागत असत.

सोळाव्या शतकाच्या सुरुवातीला गुजरातच्या अंतर्गत भागात असलेल्या लिम्बोदरा या ठिकाणाहून सार्दीच्या खड्याचे (लाल रंगाचे खडे जे दागिने घडविण्यासाठी वापरले जातात) खड्याचे मणी युरोप व पूर्व आफ्रिकेला निर्यात करण्यासाठी मोठ्या प्रमाणात कॅम्बेच्या बंदरावर नेले जात. दाभोळ बंदरात आयात करून आणलेले तांबे देशाच्या अंतर्गत भागात नेले जात असे. गुजरातमधील रांडेर हे बंदर मलाक्का व चीनमधील वस्तूंच्या व्यापारासाठीचे सर्वात मोठे केंद्र होते.

अनेक नगरांमध्ये व शहरांमध्ये असलेल्या मोठमोठ्या व्यापारीपेठा या व्यावसायिक तत्वावर चालणाऱ्या व्यापारासाठी व अंतर्गत व्यापारासाठी महत्वाच्या पूरक घटक होत्या. राजधानी दिल्ली आणि मुलतान, लाहोर, जौनपुर, अजमेर, अलाहाबाद, बनारस पुरीसारखी तीर्थक्षेत्रे त्याचप्रमाणे महामार्गावरील आग्रा, पाटना, अहमदाबाद बुरहानपूर आणि थट्टा ही शहरे तसेच भारताच्या पूर्व व पश्चिम किनाऱ्यावरील बंदरे व्यापार-उदिमाची महत्वाची केंद्रे म्हणून भूमिका बजावत असत.

## १२.३ मध्ययुगीन कालखंडातील व्यापाराचे स्वरुप

सोळाव्या व सतराव्या शतकात ग्रामीण समाजाचे तेथे आढळणारा आर्थिक व सामाजिक भेद हे एक प्रमुख वैशिष्ट्य होते. याचा अर्थ असा की, आपणास एका बाजूला सामाजिक प्रतिष्ठा व विविध अधिकार प्राप्त असलेले गर्भ श्रीमंत जमीनदार आढळत तर दुसरीकडे भूमीहिन अस्पृश्य शेतमजूर नजरेस पडत. या दोन टोकांच्यामध्ये शेतकऱ्यांचे स्थान असे जें भाडोत्री मजूरांच्या मदतीने अन्नधान्य व विविध वस्तूंचे उत्पादन करत असत. शेती कमी असणाऱ्या लहान शेतकऱ्यांना त्यांचा उदरनिर्वाह चालवणे देखील कठिण जात असे. असे मानले जाते की, सतराव्या शतकात भारतातील साधारणपणे १५% टक्के एवढे लोक शहरांमध्ये राहत असत व ही संख्या वा प्रमाण सर्वसामान्यपणे त्याच काळात पश्चिम युरोपात जेवढे लोक शहरांमध्ये राहत असत त्यापेक्षा जास्त होती. आपणास बर्नियर कडून पुढीलप्रकारच्या नगराची माहिती मिळते- व्यापारी नगरे (शहरे), सागरी बंदरे असणारी शहरे, पवित्र शहरे, वेगवेगळ्या वस्तूंचे उत्पादन करणारी शहरे, यात्रेसाठी प्रसिद्ध असणारी शहरे, इत्यादी. अशी विविध प्रकारची शहरे अस्तित्वात होती याचा अर्थ व्यापारी वर्ग व विविध व्यवसाय करणारे लोक समृद्ध होते असा होतो. शहरांमध्ये राहणाऱ्या इतर लोकांमध्ये वेगवेगळ्या व्यवसायातील पुढील लोकांचा समावेश होत असे- वैद्य (हकिम), शिक्षक, वकिल, चित्रकार, वास्तुविद्याविशारद, संगीतकार, सुलेखन करणारे, इत्यादी.

हिंदू व्यापारी देशांतर्गत तसेच देशाबाहेरील व्यापारात महत्वाची भूमिका बजावत असत. तरीसुद्धा आपण एक बाब लक्षात घेतली पाहिजे व ती म्हणजे खुरसानी (परकिय मुस्लिम व्यापारी) व्यापाऱ्यांचादेखील व्यापारात मोठा हिस्सा होता. दख्खनमधील काही किनारपट्टीवरील राज्य व त्यांचे शासक परकिय व्यापाऱ्यांकडून अतिरिक्त कर वसूल करून त्यांना प्रदेशबाह्य अधिकार व विशेष सवलती देत असत.

आयात केल्या जाणाऱ्या वस्तूंमध्ये प्रामुख्याने उच्च वर्गासाठी लागणाऱ्या महागड्या विलासी वा चैनीच्या वस्तूंचा व घोड्यांचा तसेच खेचरांचा समावेश असे. निर्यातीमध्ये अन्नधान्य, औषधी वनस्पती, मसाले, साखर व कापडाचा अंतर्भाव होता. आग्नेय आशिया

व पूर्व आफ्रिकेत निर्यात होणाऱ्या सूती व इतर प्रकारच्या कापडांचा प्रामुख्याने समावेश होता. असे म्हटले जाते की, या काळात पर्शियाच्या आखाताच्या आसपास वसलेले काही देश अन्नधान्याच्या पुरवठ्यासाठी पूर्णतः भारतीय उपखंडावर अवलंबून होते. जरी कापडाची निर्यात प्रामुख्याने आग्नेय आशिया व पूर्व आफ्रिकेत होत असली तरी भारतीय कापड युरोपमध्ये देखील पोहोचले होते असे निदर्शनास येते. अरब व्यापारी या भारतीय वस्तू तांबड्या समुद्राच्या मार्गाने दमास्कस (सिरियाची राजधानी) व अलेक्झांड्रिया (इजिप्तमधील प्रांत) येथे घेऊन जात असत. तेथून पुढे या वस्तूंचे वितरण भूमध्य सागराच्या परिसरातील व त्यापलीकडील देशांमध्ये होत असे.

## १२.४ मध्ययुगीन कालखंडातील व्यापार

नैसर्गिक समुद्रकिनारा लाभलेला असल्याने भारताचा किनारी क्षेत्रातील व्यापार विकसित झाल्याचे निदर्शनास येते. कॅम्बे, दिव, सुरत, गोवा, कालिकत, कोचिन आणि क्विलॉन ही भारताच्या पश्चिम किनारपट्टीवरील महत्वाची बंदरे होती. इब्न बतूता आणि बार्बोसा यांनी दिलेल्या विस्तृत माहितीनुसार आपणास असे कळते की, भारताच्या पश्चिम किनाऱ्यावर जहाजांना नांगर टाकण्यासाठी उत्तम सोय व समुद्राची पूरक खोली असणारे अनेक सागरी बंदरे होती. मलबारी व्यापाऱ्यांची गुजरात व मलबारच्या दरम्यान चालणाऱ्या व्यापारावर एकाधिकारशाही होती. दख्खनमधील बंदरांमधून चालणाऱ्या व्यापारात गुजराती तसेच मलबारी व्यापाऱ्यांचा सहभाग असे. कोरोमंडल म्हणजेच भारताच्या पूर्व सागरी किनाऱ्याचा विचार करता असे लक्षात येते की, भारताचा आग्नेय समुद्री किनरा व विजयनगरच्या साम्राज्याच्या व्यापारावर मोठ्या प्रमाणात मलबारमधील शहरांतील हिंदू आणि मुस्लिम व्यापाऱ्यांचे वर्चस्व होते. मुस्लिम व्यापाऱ्यांच्या जहाजा पुलिकत बंदरात मोठ्या संख्येने येत ती बर्मातील माणिक (दागिने बनविण्यासाठी वापरले जाणारे मौल्यवान लाल खडे) आणि कस्तुरीची मोठी बाजारपेठ होती.

मुघलांच्या काळात पुढील तीन प्रकारचा देशांतर्गत व्यापार चालत असे: देशांतर्गत जमीनीवरील व्यापार, समुद्र किनारपट्टीलगतचा व्यापार आणि नदीच्या सहाय्याने चालणारा व्यापार. मात्र, व्यापारी अंतर्गत जमीनीवरील व्यापारापेक्षा किनारपट्टीवरील व्यापारास जास्त पसंती देत कारण हा व्यापार करण्यास फार सोपा, सुरक्षित तसेच सागरी व्यापार जमीनीवरील व्यापारापेक्षा जास्त नफा देणारा समजला जाई. समुद्र किनाऱ्यावरील व्यापारात समुद्री चाचांची भीती व त्यांच्याकडून लूट होण्याचा धोका असे. परंतु ही समस्या काही विशिष्ट क्षेत्रिपुरतीच मर्यादित होती. मुघलांच्या काळात नदीच्या सहाय्याने चालणारा व्यापार प्रामुख्याने पुढील चार नदी प्रणालींच्या परिसरात व मदतीने चाले: सिंधु नदी व तिच्या उपनद्या, गंगा नदी व तिच्या उपनद्या, तापी नदीचे खोरे आणि बंगालमधील त्रिभुज प्रदेश.

या नद्यांच्या तीरावरील अनेक शहरं व्यापारी केंद्रं होती. एक विशिष्ट असा साहसी व पुरेसं भांडवल असणारा व्यापारीवर्ग अंतर्गत व्यापार मोठ्या प्रमाणावर नियंत्रित करत असे. जातीव्यवस्थेनुसार व्यापिरीवर्ग वैश्य जातीत मोडत असे. मुलतानी लोक व गुजराती बनिया हे दोन अनुक्रमे उत्तर व पश्चिम भारतातील प्रमुख व्यापारी समाज होते. जरी हिंदू व्यापाऱ्यांचे

देशांतर्गत व्यापारावर वर्चस्व असले तरी खुरासाणी म्हणून ओळखले जाणारे परकिय व्यापारीदेखील संपूर्ण देशभर व्यापारात गुंतलेले आढळत.

नियमितपणे व्यापार करणाऱ्या समुदायाव्यतिरिक्त दलाल, मुनीम, शेटे आणि महाजन अशा वर्गातील लोकदेखील आपल्या उदरनिर्वाहासाठी व्यापारावर अवलंबून असत. दलाल विक्रेते तसेच ग्राहकांकडून दलाली घेत असत. ते सहसा वस्तूंच्या किंमती वाढविण्याचा प्रयत्न करत असत. शेटे आणि महाजन हे स्थानिक पातळीवरील सावकार होते. हे लोक हुंडीच्या बदल्यात कर्ज देत असत तसेच जास्त व्याजदरानेदेखील कर्ज देत असत.

तत्कालीन भारतीय तसेच परकिय प्रवाशांचे वृत्तांत अंतर्गत व्यापारासाठी विविध प्रकारची वाहतूकीची साधने वापरली जात असे संदर्भ देतात. सामान्यपणे वापरात असलेली वाहतूकीची साधने पुढीलप्रमाणे होती: मालाने वा वस्तूंनी लादलेला बैल, बैलगाडी, घोडे, खेचर, उंट व हत्ती. किनारपट्टीलगतच्या व सागरी व्यापारासाठी मोठ्या, मध्यम तसेच लहान आकाराच्या जहाजा वापरल्या जात आणि वेगवेगळ्या आकाराच्या बोटी नदीतून चालणाऱ्या व्यापारासाठी वापरल्या जात. व्यापाऱ्यांना देशांतर्गत एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी माल घेऊन जात असताना संक्रमण वा परिवहन शुल्क द्यावे लागत असे. बंदरांवर, सीमेवरील नगर वा शहरांमध्ये आणि मोठ्या व्यापारी केंद्रांवर वस्तू किंवा मालाच्या मूल्याच्या अडिच टक्के एवढी किंमत कर म्हणून द्यावी लागत असे. औरंगजेबाने हा कर वा शूल्क हिंदूकरिता पाच टक्के एवढा केला होता. यासोबतच व्यापाऱ्यांना वेगवेगळ्या व्यापारी मार्गांवर नियंत्रण असणाऱ्या स्थानिक अधिकाऱ्यांनी लावलेले कर व जकात द्यावी लागत असे.

भारताने तांबडा समुद्र, पूर्व आफ्रिकेचा समुद्र किनारा, मलाया द्वीपसमूह, चीन आणि काही प्रशांत महासागरातील देश अशा पाच महत्त्वाच्या प्रदेशांतील व्यापारी संबंध राखले होते व विकसित केले होते. पर्शियाच्या आखाताचा मार्ग आणि तांबड्या समुद्राचा मार्ग हे भारताला पश्चिमेशी जोडणारे प्रमुख दोन सागरी मार्ग (जलमार्ग) होते. पर्शियाच्या आखाताच्या मार्गाचा विचार केला असता इराकच्या बंदरांपर्यंत माल समुद्र मार्गाने आणून नंतर तो जमीनीच्या मार्गाने भूमध्यसागराच्या किनाऱ्यावरील बंदरांपर्यंत नेला जात असे. तांबड्या समुद्राचा विचार केला असता इजीप्त पर्यंत माल सागरी मार्गाने आणून तेथून पुढे तो जमिनीच्या मार्गावरून भूमध्यसागराच्या किनाऱ्यावरील बंदरांपर्यंत नेला जात असे. त्यानंतर इटलीतील व्हेनिस या शहरातील व्यापारी व इतर इटालियन व्यापारी त्या मालाचे वितरण संपूर्ण पश्चिम युरोपात करत असत. पर्शियाच्या आखाताच्या मार्गावर ओरमूज ही भव्य व्यापारीपेठ होती तर तांबडा समुद्र मार्गावर एडन आणि जेद्दाह या दोन भव्य व्यापारीपेठा होत्या. इब्न बतूता नमूद करतो की, ओरमूज हे ठिकाण हिंद व सिंधमधील वस्तूंच्या आयात-निर्यातीचे केंद्र होते. भारतातील कॅम्बे, ठाणा, क्विलॉन, मगळूरू, होन्नावर, कालिका आणि इतर बंदरांतून येणाऱ्या मोठ्या जहाजांसाठी एडन हे त्यांच्या मूळ बंदराव्यतिरिक्त थांब्याचे व आश्रय घेण्याचे बंदर होते. भारतातील मलबारमधून सागरीमार्गाने पूर्वेकडे व पश्चिमेकडे हिंदमहासागर मार्गाने मोठ्या प्रमाणात मालाची ने-आण केली जात असे

इब्न बतूता, बार्बोसा, बर्नियर यांच्यासारखे प्रवासी व अबूल फजल या काळात भारताचा जो सागरी व जमीनीच्या मार्गाने परकिय व्यापार चालायचा त्याविषयी सखोल माहिती देतात.

बार्बोसा आपणास माहिती देतो की, भारताचा पूर्व आफ्रिकेशी व्यापार वाढण्याचे एक महत्त्वाचे कारण म्हणजे पूर्व आफ्रिकेच्या समुद्रकिनाऱ्यावर झिला, मोगादिशू, मोम्बासा आणि किलवा अशा ठिकाणी असलेल्या अरबांच्या वसाहती हे होय. चौदाव्या शतकाच्या पूर्वार्धात चीनी व्यापारी जहाजा मलबारमधील इली, कालिकत आणि क्विलॉन या बंदरांमध्ये नियमितपणे येत असत असे आढळते. पंधराव्या शतकात मलाक्का हे आग्नेय आशियातील आघाडीचे आंतरराष्ट्रीय बंदर म्हणून नावारूपाला आले होते. येथे पेगू, बंगाल, पुलिकत, कोरोमंडल (भारताचा पूर्वेकडील समुद्र किनारा), मलबार आणि गुजरात येथून व्यापारी जहाजे येत असत. त्यामुळे यात आश्चर्य वाटण्यासारखे काही नाही की, बार्बोसा मलाक्काचे वर्णन खूप मोठ्या संख्येने घाऊक व्यापारी असलेले आणि संपूर्ण जगात सर्वात जास्त प्रमाणात व्यापारी जहाजांच्या माध्यमातून व्यापार होणारे सर्वात श्रीमंत बंदर असे करतो.

भारत अन्नधान्य, कपडा, मसाले, तेलबिया, साखर, सुगंधी लाकूड, इत्यादी विविध प्रकारच्या वस्तूंची निर्यात करत असे. भारतीय कपडा व मसाले यांना प्रामुख्याने युरोपमधून मोठ्या प्रमाणात मागणी होती. मलमलाचे कापड पर्शिया, अरबस्तान आणि इजीप्तमध्ये निर्यात होत असे. प्रामुख्याने सुरत, बनारस, बंगाल आणि अहमदाबाद येथे तयार होणारे रेशमी कापड प्रामुख्याने युरोपमध्ये निर्यात केले जात. भारतीय मसाल्यांनादेखील युरोपमध्ये मागणी होती. काळ्या मिऱ्यांना खूपच मागणी होती. वेलची, आलं (अद्रक), हळद हे मसाले आणि औषधी वनस्पती देखील निर्यात केल्या जात. डिंक-लाख, मोती आणि हिरे सुद्धा निर्यात केले जात. प्रवाशांनी असे नमूद केले आहे की, अकबर व जहांगीर यांच्या कारकिर्दीत व्यापार-उदिम मोठ्या प्रमाणात विकसित झाला होता व चालना मिळाली होती.

भारत या काळात सोनं, चांदी, पारा, शिसे हे धातू तसेच उत्तम प्रतिचे घोडे आयात करत असे. अर्थात, घोडा हा आयात केला जाणारा सर्वात महत्त्वाचा प्राणी होता कारण त्याला मध्ययुगीन काळातील राजघराण्यांमध्ये खूप मोठ्या मागणी होती. चिकणमाती आणि रेशमी कापड चीनमधून आयात केले जात असे. सोनं आणि चांदी परदेशांतून मोठ्या प्रमाणात आयात केले जात असे. फ्रेंच प्रवासी बर्नियर आपणास माहिती देतो की, भारत सुका-मेवा तसेच ताजी फळे, पिवळसर-तपकिरी गेरू, खडबडीत माणिक, इत्यादी वस्तू मोठ्या प्रमाणात मध्य आशिया व अफगाणिस्तानातून आयात करत असे. हिमालयातील देश व तिबेटमधून कस्तुरी, चीनी लाकूड, पाचू, उत्तम प्रतीची लोकर, सोनं, तांबे, शिसे आणि याप्रकारच्या इतर वस्तू आयात केल्या जात.

उपलब्ध वृत्तांत आणि परकिय प्रवाशांनी नोंदविलेल्या निरिक्षणांनूसार आपण असे म्हणू शकतो की, व्यापाराचा समतोल हा भारतासाठी अनुकूल होता. जरी, व्यापाराचे प्रमाण व उलाढाल दिल्लीच्या सुलतानशाहीच्या काळात कमी असली तरी मुघल काळात व्यापारात वृद्धी झाल्याचे निदर्शनास येते. मुघल शासकांनी युरोपियन देशांसोबत व्यापार वाढविण्यावर भर दिला. त्याचप्रमाणे अनेक युरोपियन कंपन्यांना भारताच्या किनाऱ्यावर वखारी उघडून व्यापार करण्याची अनुमती देण्यात आली.

सोळाव्या शतकात मुस्लिमांचे आंतरराष्ट्रीय व्यापारातील वर्चस्वाला पोर्तुगीजांनी गंभीर आव्हान दिले. त्यांचा व्यापारावरील अधिकार व एकाधिकारशाही यांना अजून जास्त प्रमाणात डच आणि इंग्रजांनी दिले. यावरून असे लक्षात येते की, मुघल काळात मुस्लिम, पोर्तुगीज, डच आणि इंग्रज एकमेकांमध्ये सागरी व्यापारावरील नियंत्रणासाठी स्पर्धा करत होते.

## १२.५ मध्ययुगीन भारतातील नागरीकरण (शहरीकरण)

शेती आणि शेतीपूरक असा बहुतांशी लोकांचा व्यवसाय असलेला समुदाय म्हणजे ग्राम किंवा गाव होय. अशा गावाची सर्वांगीण प्रगती होऊन उद्योगधंदे, व्यापार व शेती व्यतिरिक्त व्यवसायामध्ये लोकांचा जास्तीतजास्त सहभाग होऊ लागला. तसेच अनेक सेवा, सुविधा, सोई निर्माण होऊ लागल्या आणि शहराचा मुखवटा चढू लागला की त्यास **नागरीकरण** (Urbanization) असे म्हणतात.

भारतातील पहिले नागरीकरण **हडप्पा संस्कृती**मध्ये पहायला मिळते तसेच दुसरे नागरीकरण इ.स.पूर्व ६ व्या शतकात उदयास आले होते. मध्यकालीन भारतातील नागरीकरणाची प्रक्रिया राजकीय, आर्थिक, सामाजिक आणि सांस्कृतिक घटकांमुळे प्रभावित झाली होती. या काळात दिल्ली सल्तनत, मुघल साम्राज्य आणि प्रादेशिक राज्यांच्या आधिपत्याखाली नागरीकरणामध्ये महत्त्वपूर्ण बदल झाले. व्यापार, प्रशासन, सैन्य, धर्म आणि संस्कृतीशी संबंधित असलेल्या घटकांमुळे या काळात शहरांचा विकास झाला.

### १२.५.१ दिल्ली सल्तनत कालीन शहरीकरण

या काळात अनेक शहरांचा उदय झाला. अबुल फजलने ३२०० कस्ब्यांचा उल्लेख केला आहे. सल्तनत काळात पण त्यांची संख्या इतकीच असू शकते. इरफान हबीब यांनी सल्तनत काळात झपाट्याने झलेल्या शहरीकरणाला कारणीभूत काही घटक सांगितले आहेत त्यामध्ये शिल्प उत्पादनाचा झालेला विस्तार, व्यापार-वाणिज्याचा विकास तसेच कागद, वास्तूंची निर्मिती आणि कापड उद्योगांसंबंधित तंत्रज्ञानाचा वापर चालू झाला. शिल्पकार- व्यापाऱ्यानी सोबत नवे तंत्र त्याचबरोबर मोठ्या प्रमाणात गुलाम प्रथेमुळे कामगार उपलब्ध झाले. तसेच जमिनींवर लावलेला महसुल सरळ खजिन्यात जमा होऊ लागला. अल्लाउद्दिन खिलजीच्या काळात ही प्रक्रिया वेगाने झली. सल्तनत काळात दिल्ली राजधानी बनली. दिल्ली केवळ राजकीय केंद्र नव्हते तर व्यापार, संस्कृती आणि प्रशासनासाठी देखील महत्त्वाचे केंद्र बनले.

सल्तनतकालीन नागरीकरणाविषयी बऱ्याच साधनांमध्ये संदर्भ मिळतात. **दिल्ली, मुलतान, अन्हीलवाडा, खंबायत, कडा, लखनौती, दौलाद्ताबाद** आणि **लाहोर** या शहरांचा उल्लेख तत्कालीन साधनांमध्ये मिळतात. **इब्न बतुता** इ.स. १३३० मध्ये दिल्ली हे शहर पूर्वेकडील इस्लामी साम्राज्यांमध्ये आकार आणि लोकसंख्येमध्ये सर्वात मोठे होते असा

उल्लेख करतो. या काळात काही नवीन शहरांचा उदय झाला होता उदा. राजस्थान मधील 'झाईन'. नागरीकरणाची प्रक्रिया ही अगोदरपासुनच चालू होती परंतु तुर्की सत्ता स्थापन झाल्यानंतर व्यापारामुळे गती पकडली.

दिल्लीमध्ये मद्य कोल, अलिगढ येथून, मलमल देवगिरी येथून, पान माळवा येथून येत असे. व्यापारी गटा-गटाने यात्रा करत असत. काही शहरे व्यापारी केंद्र म्हणून उदयास आली होती. **लाहोर, मुलतान, उछ, अजोधन, दिपालपुर, ठठा, देबल, भक्कर, खंबात, अन्हीलवाडा, धार, सतगांव, सोनारगाव, आग्रा** आणि **बनारस** यासारखी व्यापारी केंद्रे सल्तनत काळात उदयास आली होती.

**१२.५.२ मुघल काळातील शहरीकरण** :

मुघल काळात **दिल्ली आणि लाहोर** शहरांचा विस्तार झाला आणि **अलाहाबाद, फतेहपुर सिकरी, बनारस** आणि **फरीदाबाद** सारख्या काही नवीन शहरांचा उदय झाला. मुघल काळात चार प्रकरच्या शहरांचा विकास झाला- प्रशासकीय, धार्मिक, लष्करी आणि व्यापारिक.

या काळातील बहुतेक शहरे तटबंदीने घेरलेली असत. लोकवस्ती या तटबंदीच्या आत वसलेली असे परंतु लोकसंख्या जास्त झाली तर तटबंदीच्या बाहेरपण वस्ती वसवली जात असे. शहरामध्ये वेगवेगळे बाजार भरत असत. वस्त्या त्यांच्या जातीनुसार किंवा त्यांच्या व्यवसायिक समूहानुसार वसवल्या जात असत. प्रत्येक शहरात प्रवाश्यांसाठी किंवा व्यापाऱ्यांसाठी थांबण्यासाठी धर्मशाळा असत. धर्मशाळेची देखभाल **'भटीयारे'** करत असत. शहरांचे व्यवस्थापन करण्यसाठी वेगळी प्रशासनव्यस्था असे. शहरामध्ये कुलीन वर्ग, राज्याचे अधिकारी, सैन्य, व्यापारी, सर्राफ, दलाल, धर्मगुरु, संगीतकार, चित्रकार, कवी-साहित्यिक, वैद्य, हकीम, कामगार, मजूर इत्यादी वर्ग राहत होते. **तबाकत- ए-अकबरी** नुसार अकबराच्या काळात जवळपास १२० मोठी शहरे आणि ३२०० छोटी शहरे (कस्बे) होती. **इरफान हबीब** यांच्या मतानुसार एकूण लोकसंख्येच्या १५% लोकसंख्या ही शहरात राहत होती.

मध्यकालीन भारतातील **व्यापार आणि वाणिज्यामुळे** काही शहरांचा उदय झाला. **मलाबार**, **सूरत**, **कोचिन** आणि **बंगाल** यांसारखी बंदरे मसाल्यांचे, कापडांचे आणि इतर वस्तूंचे व्यापार करणारी महत्त्वाची केंद्रे बनली. या शहरांचा व्यापार मध्य पूर्व, दक्षिण-पूर्व आशिया, आणि युरोपसह विविध देशांशी होत होता. मध्ययुगीन भारतातील अंतर्गत **व्यापारी मार्गावर** काही शहरे उदयास आली होती. **कनौज**, **कलकत्ता** आणि **बीकानेर** यांसारख्या शहरांचा समावेश प्रामुख्याने होतो. या मार्गांवरून वस्तूंचे आदानप्रदान केले जात होते यामध्ये कापड, रेशीम आणि द्रव्ये यांचा समावेश होता. काही शहरे विविध बाजारांमुळे समृद्ध झाली होती उदा. कापड बाजार, मसाले बाजार आणि हस्तकला उत्पादन असलेले बाजार. तसेच काही शहरांचा उदय किंवा विकास **प्रशासनिक आणि**

**सैन्य केंद्रामुळे** झाला होता. **दिल्ली** आणि **आग्रा** सारख्या शहरांचा समावेश यामध्ये होतो. या शहरांमध्ये प्रशासन, शाही दरबार, मंत्रालये, आणि सैन्य मुख्यालये स्थित होती. दिल्ली सल्तनत आणि मुघल साम्राज्याच्या काळात अनेक शहरे किल्ल्यांनी सुरक्षित केली होती. मुघल सम्राटांनी **दिल्ली, आग्रा, लाहोर** आणि **अजमेर** यांसारख्या शहरांमध्ये भव्य किल्ले बांधले यामुळे मुघलांचे साम्राज्य स्थिर राहिले. **सैन्य विस्तारामुळे काही शहरांचा उदय झाला.** लष्करी मोहिमांमुळे छावण्यांचे रुपांतर नंतर कायमस्वरूपी वस्ती किंवा शहरात झाले.

काही शहरांचा उदय/विकास **शिक्षणाचे केंद्र** म्हणून झाला. मुस्लिम शासकांच्या काळात शहरी केंद्रांमध्ये शिक्षण संस्थांचा प्रसार झाला. **दिल्ली**, **अजमेर**, आणि **फतेहपूर सीकरी** सारखी शहरे इस्लामी शिक्षण आणि संस्कृतीचे केंद्र बनली. सम्राट अकबरने विद्वान, कलाकार आणि कवी यांना प्रोत्साहन दिले, ज्यामुळे शहरी संस्कृतीला बळ मिळाले. तसेच काही शहरे **धार्मिक केंद्रे** म्हणून उदयास आली. **दिल्ली**, **अजमेर** आणि **वाराणसी** यांसारखी शहरे याकाळात प्रमुख तीर्थक्षेत्रे बनली. सुफी आणि भक्ती चळवळींच्या प्रसारामुळे काही शहरे **दरगाह** (सुफी दरगाह) आणि **मंदिरे** यांसारख्या धार्मिक स्थळांमुळे प्रभावित झाली आणि शहरांमध्ये वाढ झाली. **सांस्कृतिक आणि वास्तुशिल्पाच्या** विकासमुळे काही शहरांचा उदय झाला. मुघल शासकांमध्ये भव्य वास्तुशिल्पाचे महत्त्व होते, त्याचा मध्ययुगीन शहरीकरणावर मोठा प्रभाव पडला. **लाल किल्ला** (दिल्ली), **ताजमहल** (आग्रा), **जामा मस्जिद** (दिल्ली), आणि **फतेहपूर सीकरी** यांसारख्या भव्य वास्तूंमुळे ही शहरे मध्यकालीन जगतात प्रसिद्धीस आले.

मध्यकालीन शहरीकरणाच्या प्रक्रियेमध्ये **सार्वजनिक पायाभूत सुविधांचा** विकास झाला. यामध्ये **उद्यान (बाग)**, **मस्जिद**, **सार्वजनिक स्नानगृह**, **बाजार** आणि **पाणी व्यवस्था** यांचा समावेश होता. हे सर्व शहरी जीवनासाठी आवश्यक होते आणि ते शाही साम्राज्याच्या वैभवाचे प्रतीक होते. मुघल साम्राज्याच्या काळात **शहरी नियोजन** महत्त्वाचे ठरले. सम्राट शाहजहाँने **शाहजहानाबाद** (दिल्ली) मुघल साम्राज्याची राजधानी म्हणून स्थापित केली. येथील रुंद रस्ते, बाजारपेठा, रहिवासी भाग आणि सार्वजनिक जागा यामुळे हे शहर अत्यंत प्रसिद्ध बनले.

मध्ययुगीन शहरांची रचना **सामाजिक-आर्थिक** आधारावर केली. मध्यकालीन शहरी केंद्रांमध्ये एक जटिल सामाजिक रचना होती. वरच्या स्तरावर राजकीय आणि नबाबी कुटुंबे, व्यापारी, शिल्पकार आणि शिल्पकार होते. त्याखाली श्रमिक आणि कामगार वर्गाचे लोक होते. ते विविध व्यवसाय आणि सेवा देत असत. शहरी अर्थव्यवस्था व्यवसाय आधारित **व्यापारी संघावर** आधारित होती. कापड, मातीचे भांडे, दागिने आणि धातूच्या वस्तू तयार करणे यांसारख्या शिल्पकलांना शहरी केंद्रांमध्ये प्रोत्साहन मिळाले. मध्यकालीन काही शहरे विशिष्ट उत्पादनाचे केंद्रे बनली होती तसेच विशिष्ट हस्तकला किंवा उद्योगांसाठी प्रसिद्ध होती. उदा. **बनारस** हे रेशमी कापड तयार करण्यासाठी प्रसिद्ध होते, तर **दिल्ली** हे धातूचे काम आणि दागिन्यांसाठी ओळखले जात होते. मध्ययुगीन

शहरीकरणाच्या विकासात **शेतकऱ्यांची भूमिका** महत्वाची होती. शेतकरी ग्रामीण भागात असले तरी शहरी केंद्रे कृषी उत्पादनावर आधारित होती. शहरी लोकसंख्या, यामध्ये कामगार, व्यापारी आणि प्रशासनिक कर्मचारी यांचा समावेश होता, त्यांना भाजीपाला, धान्य आणि इतर कृषी उत्पादने पुरवली जात असे. ग्रामीण-शहरी व्यापार मध्यकालीन शहरांच्या विकासकार्यासाठी महत्त्वाचा होता. यामध्ये अन्नधान्य, कच्चा माल, आणि वस्तू शहरात आणल्या जात होत्या.

**मध्ययुगिन नागरीकरणाचे पतन :**

औरंगजेबाच्या मृत्यूनंतर मुघल साम्राज्य कमजोर होऊ लागले त्यामुळे शहरी केंद्रांचे पतन चालू झाले. प्रादेशिक सत्तांचा उदय आणि युरोपियन सत्तांच्या आगमनामुळे मध्यकालीन काही शहरांचा ऱ्हास होऊन काही नवीन शहरांचा उदय होऊ लागला. या काळातील शहरांच्या ऱ्हासास दुष्काळ हे एक कारण सांगितले जाते. पेशवे काळात आणि नंतर ब्रिटिशांनी **पुणे, निजाम काळात हैदराबाद**, आणि ब्रिटीश काळात **मद्रास (चेन्नई)** सारखी शहरे विकसित होऊ लागली.

## १२.६ सारांश

मध्ययुगीन भारतातील उद्योग हे शेतीवर आधारित तसेच बिगरशेतीवर आधारित उद्योगांचा उदय आणि विकास झाला होता. मध्यकालीन भारतातील हस्तोद्योग आणि कुटिरोद्योगामध्ये शेतकऱ्यांची भूमिका महत्वाची होती. धातुउद्योग, कातडी, कागद, तेल, काष्ठ, सिसे, काच, दगड, मीठ, इत्र इत्यादि बिगरशेती उद्योग मध्यकाळात अस्तित्वात होते.

सुलतान काळात काही प्रमाणात अस्थिरता असली तरी मुघल काळात खास करून सम्राट अकबराच्या काळात स्थिरता असल्यामुळे व्यापारास चालना मिळाली. अंतर्गत व्यापार हा रस्तामार्गे आणि जलमार्गे (नद्या) होत असे. आंतरराष्ट्रीय व्यापारस या काळात चांगली गती मिळाली होती. आंतरराष्ट्रीय व्यापार हा रस्तामार्गे आणि समुद्रामार्गे चालत होता. दक्षिणेतील विजयनगर सुद्धा या काळात खूप भरभराटीस आले होते. बाबर **तुझुक-ए-बाबरी**मध्ये विजयनगरचा उल्लेख करतो. तसेच काही परकीय प्रवासी पण दक्षिणेतील व्यापार, आयात-निर्यात वस्तू, बंदरे यांचा उल्लेख करतात. मध्यकालीन व्यापार हा काही प्रमाणात भारताच्या दृष्टीने चांगला होता.

प्रामुख्याने प्रशासकीय, धार्मिक, लष्करी आणि व्यापारिक या चार प्रकारच्या कारणांमुळे मध्ययुगीन भारतातील नागरीकरणाचा विकास झाला होता. मध्यकालीन भारतातील नागरीकरण हे विविध घटकांवर आधारित होते. लाहोर, मुलतान, दिपालपुर, ठठा, देबल, भक्कर, खंबात, अन्हीलवाडा, धार, सतगांव, सोनारगाव, आग्रा आणि बनारस यासारखी व्यापारी केंद्रे सल्तनत काळात उदयास आली होती. मुघल काळात **दिल्ली आणि लाहोर** शहरांचा विस्तार झाला आणि **अलाहाबाद, फतेहपुर सिकरी, बनारस** आणि **फरीदाबाद**

सारख्या काही नवीन शहरांचा उदय झाला. सल्तनत आणि मुघल साम्राज्याच्या स्थापनेने शहरी विकासाला चालना मिळाली होती.

## १२.७ प्रश्न

१. मध्ययुगीन कालखंडातील उद्योगांची माहिती सांगा.

२. मध्ययुगीन कालखंडातील व्यापाराचे स्वरुप कसे होते त्याची माहिती नमूद करा.

३. मध्ययुगीन कालखंडातील भारताच्या व्यापारावर भाष्य करा.

४. मध्यकालीन भारतातील नागरीकरणावर प्रकाश टाका.

## १२.८ संदर्भ

१. अनिल कठारे, मध्ययुगीन भारताचा इतिहास: प्रशांत पब्लिकेशन.

२. गाठाळ एस. एस. , भारताचा इतिहास, परभणी २००४.

३. डॉ. धनंजय आचार्य, मध्ययुगीन भारत, कल्पना प्रकाशन.

४. विद्याधर महाजन, मध्यकालीन भारत : एस. चंद. दिल्ली २००२.

❄❄❄❄❄❄❄

# १३

# मध्ययुगीन भारतातील चलन व्यवस्था व पतपुरवठा (बँकिंग) प्रणाली

**घटक रचना:**

१३.० उद्दीष्टे

१३.१ प्रस्तावना

१३.२ मध्ययुगीन भारतातील वित्त व चलन पद्धती

१३.३ मध्ययुगीन भारतातील आर्थिक अभिसरण

१३.४ मध्ययुगीन भारतातील बॅकिंग प्रणाली

१३.५ सारांश

१३.६ प्रश्न

१३.७ संदर्भ

## १३.० उद्दीष्टे

- मध्ययुगीन कालखंडातील चलन पद्धतीची माहिती जाणून घेणे.
- मध्ययुगीन कालखंडातील आर्थिक अभिसरण संकल्पना जाणून घेणे.
- मध्ययुगीन कालखंडातील बँकिंग प्रणालीची माहिती जाणून घेणे.

## १३.१ प्रस्तावना

दिल्लीच्या सुलतानशाहीची स्थापना झाल्यावर अशी अनेक वेगवेगळी राजघराणी होती ज्यांचे भारताच्या विविध भागांवर राज्य होते. बदलत्या प्रशासनांसोबतच मध्ययुगीन भारतातील चलन व नाणी विकसित होत गेली व त्यात उत्कृष्ट कला, साहित्य आणि स्थापत्याचा नमूना या भरभराटिच्या युगापासून दिसू लागला. मुहम्मद बिन तुघलकाच्या काळात नाणेप्रणालीने प्रयोगाचा एक नवीन टप्पा अनुभवला. त्याने चलनाच्या नवीन संकल्पनेची ओळख करून दिली. त्याने आपल्या पूर्वीच्या सुलतानांपेक्षा जास्त प्रमाणात सोन्याची नाणी पाडलेली दिसतात.

## १३.२ मध्ययुगीन भारतातील वित्त वा चलन पद्धती

मध्ययुगीन अर्थव्यवस्थांमध्ये नाणी म्हणजे विनिमय व व्यापाराचे एकप्रकारे जीवनसत्त्व व रक्त होत्या. धातूच्या पैशामुळे अर्थात नाण्यांमुळे वस्तूविनिमय पद्धतीत व्यापारावर जी बंधने

व मर्यादा येत होत्या त्यावर मात करणे शक्य होऊ लागले होते. आर्थिक देवाघेवाणीमध्ये सातत्य रहावे यासाठी विकसित अर्थव्यवस्थांमध्ये उधारीची पद्धत योजिली जाते. या पद्धतीत पैसे देण्याच्या दाव्याला अनुमती देऊन व्यवहार केले जातात. अशा प्रकारच्या उधारीच्या पद्धतीमध्ये ज्यात देयकांना स्थगिती दिली जाते वा पैसा एका क्षेत्रातून किंवा दुसऱ्या विभागात हस्तांतरित केला जातो त्यामुळे अस्तित्वात असलेल्या चलनाच्या परिणामाची वाढ होऊन चलनाच्या वितरणाच्या वेगात वाढ होते. जेव्हा विनिमय बिले, पतपत्र, इत्यादी प्रकारची बॅंकिंग प्रणालीतील साधने चलनाऐवजी वापरली जातात तेव्हा पैशाची परिणामता आपोआपच वाढते आणि ठेवी आणि पैशाच्या स्वरूपातील कर्ज व्यक्तीव्यक्तींमधील चलनाच्या वापराला व प्रसाराला सुकर करते. धातूच्या स्वरूपातील पैसा (नाण्यांच्या स्वरूपातील चलन), पण आणि इतर आर्थिक (बॅंकींग) साधने यांच्यातील जवळच्या नातेसंबंधाविषयी इतिहासकार तसेच अर्थतज्ज्ञांनी चर्चा केलेली असून चलन पुरवठ्यात बदल झाल्यावर यांतींल संबंधांवर काय परिणाम होऊ शकतो याबाबतदेखील उहापोह झाल्याचे निदर्शनास येते. पत वा जमा असलेली राशी चलनाचे वा पैशाचे काय करू शकते. कारण पण असल्यावर वा जमा राशी असल्यावर प्रत्यक्षात पैशाने जे व्यवहार करता येतात ते सगळे आर्थिक व्यवहार केले जाऊ शकतात. परंतु काही तज्ज्ञमंडळी म्हणतात की, पत हा व्यवहाराचा अतिरिक्त प्रकार झाला कारण मध्ययुगीन काळात आर्थिक व्यवहार प्रामुख्याने नाण्यांच्या स्वरूपात वा माध्यमातून होत असत.

मुगल साम्राज्यातील चलन, आणि इतर आर्थिक साधने यांचा परस्परसंबंध समजण्यासाठी आधुनिक आर्थिक (बॅंकींग) देवाणघेवाणींच्या उत्क्रांतीचे परिक्षण करणे आवश्यक ठरते. येथे 'बॅंकींग' वा आर्थिक देवाणघेवाण हा शब्द व्यक्तींनी वा व्यवसायी संस्थांनीं ठेवींच्या स्वरूपात जमा झालेल्या रक्कमेतून नियमितपणे पतपुरवठा वा कर्जपुरवठा करणे व ठेवी घेणे या अर्थाने योजलेला आहे.

### १३.२.१ दिल्ली सुलतानशाहीतील चलन व्यवस्था

प्राचीन रोमन काळापासून भारतात मौल्यवान धातू लॅवेंटाइन म्हणजेच पूर्व भुमध्यमहासागराच्या क्षेत्राशी असलेल्या व्यापारातून प्रामुख्याने मिळत असत. येथूनच पूर्वेकडील वस्तूंचा सोनं व चांदीच्या मोबदल्यात विनिमय वा व्यापार चालत असे. इजीप्त हा देश अशा विनिमयाचा महत्वाचा घटक होता. उत्तर इजीप्तमधील कुस या शहरात येमेन व भारतातील व्यापारी व्यापारासाठी जात असत. भारतीय माल भारतीय तसेच येमेनी जहाजांमधून तांबड्या समुद्रातील आयझाब या बंदरात आणला जाई व तेथून पुढे तो माल कुसला घेऊन जात असत.

बाराव्या शतकात जेव्हा दिल्लीच्या सुलतानशाहीची स्थापना झाली तेव्हा हा तांबड्या समुद्राचा परिसर तसेच लॅवेंट ह्या प्रदेशाशी व्यापार प्रस्थापित झाला होता.

अशाचप्रकारे भारताचा इराणसोबत देखील व्यापार चालत असे. भारत व इराणमधील तब्रीजच्या मार्गावरील व्यापार एवढा भरभराटीचा झाला होता की, इटलीच्या व्यापाऱ्यांनी तब्रीज येथे आपले मुख्यालय ठेवून चीन सोबत थेट व्यापारी संबंध प्रस्थापित करण्याचे ठरविले होते. तसेच व्हेनीसच्या व्यापाऱ्यांनी मुहम्मद तुघलकला दिल्लीला येऊन वस्तू विकण्याचा प्रयत्न केल्याचे दाखले आढळतात.

आपणास असे म्हणावे लागेल की, दिल्लीच्या सुलतानशाहीतील मौल्यवान धातूची नाणी मध्य आशिया, इराण, भुमध्य सागराच्या आसपासचा प्रदेश व युरोपशी होणाऱ्या व्यापारातून प्राप्त होणाऱ्या सोनं व चांदीचा उपयोग करून बनविली जात.

भडोचमधून प्राप्त झालेली जास्तीत जास्त नाणी ही १२६० ते १३८२ या कालावधीतील आहेत. आपणास नाणेशास्त्राच्या अभ्यासावरून असे लक्षात येते की, या काळात मोठ्या प्रमाणात धातूचे चलन वापरात होते. भडोच येथे सापडलेल्या नाण्यांचे विश्लेषण केल्यावर असे लक्षात येते की, सोन्याची आयात होत असे व दिल्लीच्या सुलतानशाहीत सोन्याची नाणी मोठ्या प्रमाणात पाडण्यात येत होती. येथे ४४८ सोन्याची तर १२०० चांदीची नाणी सापडली आहेत. या ४४८ सोन्याच्या नाण्यांपैकी ३६७ नाणी इजीप्तच्या बाहरी मामलूक सुलतानांची होती असे म्हणतात.

यानंतरच्या काळात दिल्लीच्या सुलतानशाहीत चांदी व सोन्याच्या चलनाचे प्रमाण कमी झाल्याचे दिसते. चांदीच्या टंका या नाण्यांचे वस्तुमान कमी करण्याचे अनेक प्रयत्न झालेले दिसतात. चांदीच्या नाण्याची किंमत कमी झाल्यामुळे चांदीच्या टक्याएवढे विनिमय मुल्य असलेले तांब्याचे नाणे मुहम्मद बिन तुघलकाने जारी केले. मुळात चांदीचा टंका जारी करण्याचे श्रेय अल्तमशला जाते. फिरोज तुघलकच्या काळात सोन्या चांदीच्या तसेच तांब्याच्या नाण्यांचा बाजारपेठांवर प्रभाव असे. चौदावे शतक संपेपर्यंत उत्तर भारतातून सोन्या चांदीची नाणी चलनातून बाद झालेले आढळतात. अबूल फझल आपणास अशी माहिती देतो की, सिकंदर लोदी ची नाणी चांदी व तांबे मिश्रीत असत.

## १३.२.२ मुगल कालीन चलनव्यवस्था

मुगल काळातील वित्तव्यवस्था वा चलनपद्धती सुनियोजित होती. धातूंच्या शुद्धतेची पातळीदेखील उच्च दर्जाची होती. मुघलांची चलनव्यवस्था त्रीधातूय होती असे म्हणणे वावगे ठरणार नाही. त्यांच्या काळात तांबे, चांदी व सोनं या तीन धातूंची नाणी होती. मात्र चांदीचे नाणे हे मुघलांच्या वित व आर्थिक व्यवस्थेचा पाया होता.

चांदीच्या नाण्याला मुघलांच्या आधीच्या काळापासूनचा इतिहास आहे. दिल्लीच्या सुलतानशाहीत चांदीचे नाणे टंका म्हणून ओळखले जात असे. शेर शहाने पहिल्यांदा चांदीच्या नाण्यांचे प्रमाणीकरण केले. शेर शहाच्या चांदीच्या नाण्याला रूपया म्हणत असत. नाणी पाडताना त्यात मिश्रधातू मिसळला जातो असे ज्याचे प्रमाण नाण्याच्या वजनाच्या चार टक्के एवढे असे. अकबराने जवळपास तेवढ्याच वस्तूमानाचे रूपया नाणे हे पायाभूत चलन म्हणून स्विकारले होते. औरंगजेबाच्या काळात रूपयांच्या वस्तूमानात वाढ केली गेली होती. व्यापार व महसूलविषयक बाबतीत चांदीचे रूपया हे नाणे प्रामुख्याने वापरले जात असे.

मुघलांनी अश्रफी वा मुहर नामक सोन्याची नाणी पाडलेली होती. सोन्याचे नाणे साधारणपणे व्यवहारात वापरले जात नसे. ते प्रामुख्याने साठा करण्यासाठी व भेट म्हणून देण्यासाठी वापरले जात असे. लहान सहान व्यवहारांसाठी दाम नामक तांब्याचे नाणे वापरले जात असे. तांब्याच्या तुटवड्यामुळे औरंगजेबाच्या काळात दाम या नाण्यांचे वस्तूमान एक तृतीयांश एवढ्या प्रमाणात घटविण्यात आले होते. क्षुल्लकशा व्यवहारांसाठी

किनारपट्टीच्या भागांत कवडी वापरली जात असे. कवड्या प्रामुख्याने मालदीव बेटांवरून आणल्या जात. साधारणपणे २५०० कवड्यांचा एक रूपया होत असे.

चांदीच्या रूपयासोबतच इतर प्रकारची नाणी देखील वापरली जात असत. अशाच नाण्यांपैकी गुजरातमधील बराच काळ वापरात असणारे महमूदी हे नाणे होते. मुघलांची राजवट सुरू झाल्यावर देखील हे नाणे पाडले जात असे व व्यवहारात वापरले जात असे.

मुगलांप्रमाणे मराठ्यांची चलन व्यवस्था देखील विकसित होती. छत्रपती शिवाजी महाराजांनी आपली नाणी पाडली होती. अठराव्या शतकाच्या मध्यापर्यंत मराठ्यांची नाणी व चलनव्यवस्था प्रगत झाली होती. होन शिक्का, अंकुशी रूपया व चांदोरी रूपया ही तीन प्रकारची नाणी मराठा काळात वापरात होती अशी माहिती आपणास मिळते. यातील अंकुशी रूपया हा प्रामुख्याने पुण्यात वापरात होता.

### १३.२.३ नाण्यांचे विनिमय मूल्य

सोनं, चांदी व तांब्याच्या नाण्यांचे विनिमय मूल्य या धातूंच्या पुरवठ्यानुसार बदलत असे. संपूर्ण मुगल काळात सोन्याच्या नाण्याचे चा़दी मूल्य सतत बदलत असे. हे प्रमाण साधारणपणे १० ते १४ चांदीचा रूपया म्हणजे एक सोन्याचे नाणे एवढे होते. इरफान हबीब या प्रसिद्ध इतिहासकाराने या काळातील तांब्याच्या नाण्यांबाबत माहिती दिली आहे.

अकबराच्या काळात व्यवहाराच्या दृष्टीने तांब्याच्या ४० दामांचे मूल्य एक रूपया एवढे होते. जमीन महसूलाचा हिशेब दामात केला जात असे. कमी विनिमय मूल्य असलेली मा नामक चांदीची नाणी देखील वापरात होती.

अशाप्रकारे आपण मध्ययुगीन काळातील नाण्यांचा विविध अंगांनी अभ्यास करून परामर्श घेण्याचा प्रयत्न केला आहे.

### १३.२.४ विजयनगरच्या साम्राज्यातील वित्त व चलन व्यवस्था

विजयनगरच्या साम्राज्यात पैगोडा वराह, रामटंका नाणी सोने धातूची होती. काही चांदीची होती तसेच काही तांब्याची नाणी पण होती. मध्यकालीन भारतातील काही प्रादेशिक सत्तांनी पण आपापली नाणी चलन म्हणून वापरात आणली होती. जसे छत्रपती शिवाजी महाराजांनी सोन्याचे 'होन' आणि तांब्याचे 'शिवराई' ही नाणी चलनात आणली होती. विजयनगरकालीन सर्वात प्रसिद्ध स्वर्ण नाणे हे '**वराह'** नावाचे होते. **वराह** नाणे भारतात व जगातील सर्व व्यापारी नगरांमध्ये स्वीकारले जाई. परकीय प्रवाशांनी **हून** व **पगोडा** या नाण्यंचा पण उल्लेख केला आहे. सोन्याच्या छोट्या नाण्याला **प्रताप** किंवा **फणम** म्हटले जात असे. चांदीच्या छोट्या नाण्याला **तार** म्हणत असत. दख्खनमध्ये मुघलांचा अंमल सुरू झाल्यावर त्यांची चांदीची नाणी पाडण्यासाठी टांकसाळी निर्माण केल्याचे दिसते.

**आपली प्रगती तपासा**

१) मध्ययुगीन भारतातील वित्त वा चलन व्यवस्था स्पष्ट करा.

--------------------------------------------------------------------------------------------

--------------------------------------------------------------------------------------------

## १३.३ मध्ययुगीन भारतातील आर्थिक अभिसरण

मुगल साम्राज्यात अर्थव्यवस्थेच्या ज्या क्षेत्रात चलनाचा वा पैशाचा मोठ्या प्रमाणात वापर होत असे त्याचे दोन प्रकार होते: एक म्हणजे स्थानिक बाजारपेठा व दुसरे म्हणजे दुरस्थ ठिकाणांसोबत व परकिय बाजारपेठांसोबत चाललेला व्यापार होय. अतिशय निम्न पातळीवर गावकरी त्यांना आठवडाभर लागणाऱ्या वस्तू जवळच्याच कसब्यातून घेत असत व तेथील माल पुरवठा करणाऱ्यांना ज्यात सावकार म्हणजेच सराफांचादेखील समावेश असे पैसे नगदी स्वरूपात देत असत यातून राज्याला महसूलप्राप्ती देखील होत असे. गावांमध्ये होणारा चलन पुरवठा वा पैशाचे अभिसरण हे कसब्यांमध्ये तसेच नजीकच्या शहरांमध्ये बनीया व महाजनांसारख्या ग्रामीण व्यापाऱ्यांकडून कृषीमालाची विक्री करून तसेच बंजारे व फिरत्या व्यापाऱ्यांच्यामार्फत होत असे. हे बंजारे आणि फिरते व्यापारी ग्रामीण भागांत चलन वा पैशाचा प्रवाह परत आणण्यात महत्वाची भूमिका बजावत असत. व्यापारी मार्गांच्या नजीक वसलेली गावे त्यांच्या विशिष्ट वस्तूंच्या बाजारपेठा विकसित करत असत.

देवाणघेवाणीचा दुसरा स्त्रोत हा ग्रामीण भागांतून शहरी भागांकडे असे ज्यामध्ये ऋतूंप्रमाणे वा मोसमाप्रमाणे निर्यातीच्या वस्तूचा पुरवठा केला जाई. कापड, नीळ, सोरामीठ आणि साखर अशा वस्तू ज्यामधून व्यापार अधिशेष निर्माण होत असे त्यांचे उत्पादन केले जात असे व गावांमध्ये त्यांच्यावर प्रक्रिया केली जात असे. त्यानंतर या वस्तूंना बाजारपेठांमध्ये किंबहुना अनेक बाजारपेठांच्या साखळ्यांमधून निर्यात केली जात असे. या संपूर्ण देवाणघेवाणीच्या जाळ्यामध्ये स्थानिक पातळीवर शेतकरी व उत्पादक समाविष्ट असत तर इतर मधल्या टप्प्यांत व्यापारी, दलाल, सावकार, मालाची वाहतूक करणारे आणि इतर अनेक संबंधीत लोक सामावलेले असत. असे जाणवते की, देशांतर्गत ग्रामीण भागात निर्यातीच्या वस्तूंची मागणी आणि देशांतर्गत प्रदेशांमध्ये असलेली अन्नधान्याची व हस्तउद्योगात बनविलेल्या वस्तूंची मागणी पाहता जे आर्थिक विशेषीकरण झाले त्यातून चलन वा पैशाच्या स्वरूपात व्यवहार वा वस्तूंचा विनियोग वा देवाणघेवाणीवर भर होता या तथ्याकडे आतापर्यंत बऱ्यापैकी दुर्लक्ष झाल्याचे जाणवते.

मुगल साम्राज्यातील शहरी भाग व आयात-निर्यात केंद्रांमध्ये पैशाच्या स्वरूपात सर्रास व्यवहार होत असत. अशा ठिकाणी लष्करी व मुलकी अधिकारी, व्यापारी वर्ग व कारागिर मंडळी असत व त्यामुळे खाद्यपदार्थ (अन्नधान्य), हस्तकलाच्या सहाय्याने बनविलेल्या वस्तू तसेच इतर विविध सेवांसाठी सतत मागणी असे. तसेच परकीय सोनं व चांदी यांचे मुगल चलनात टांकसिळींमध्ये रूपांतर केले जात आहे. या कामात प्रामुख्याने सोने चांदीच्या बाजारपेठेतील सराफ मध्यस्थी करण्यात आघाडीवर असत. हीच मंडळी सोने चांदीचे व्यापारी, सावकार आणि विमाकार म्हणून कार्यरत असत. मुगल काळात मालाचा पुरवठा करणाऱ्या विशिष्ट दिवस ठरवून दिले जात असत परंतु त्याचा त्यांना ग्रामीण भागात गुंतवणूक करण्यात व विविध वस्तू निर्यात करण्याच्या दृष्टीने तयारी करण्याच्या दृष्टीने देखील त्रास होत असे. अशाप्रकारे चलनाशी निगडीत कामे करून सराफ मंडळी व्यापाऱ्यांना पतपुरवठा करत असत तसेच ठेवी ठेऊन घेत असत व 'हुंडी' घ्या माध्यमातून व्यापाऱ्यांना व्यापार करण्यास मदत करत असत. तसेच व्यापाऱ्यांना गरजेप्रमाणे नगद पैसा उपलब्ध करून देत असत आणि सर्वात महत्वाचे म्हणजे थोडीसी दलाली घेऊन पैसा एके ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी उपलब्ध करून देत असत.

सुरूवातीच्या काळात मुगल शासकांनी दिल्लीच्या सुलतानशाहीची व नंतर शेर शहाची चलन व्यवस्था स्विकारलेली आढळते. परंतु नंतरच्या काळात स्पॅनीश-अमेरिकन चांदी पोर्तुगीजांच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणात उपलब्ध झाल्यामुळे याचा फायदा मुगल अर्थव्यवस्थेला देखील झालेला निदर्शनास येते. पोर्तुगीज लेवंट ते (भुमध्य सागराच्या आसपासचा परिसर) हिंद महासागरापर्यंत (भारतासह) आंतरराष्ट्रीय व्यापारात आघाडीवर होते त्यामुळे मोठ्या प्रमाणात उपलब्ध झालेल्या चांदीचा मुगल साम्राज्यातील समुद्र किनारी असणाऱ्या व्यापारी केंद्रांना व व्यापाऱ्यांचे मोठे गट (कारवा) असणाऱ्या शहरांना प्रकर्षाने फायदा झाला. हे सर्व होत असताना कोठारांची प्रमुख शहरे व ग्रामीण भाग यांच्यातील राजकीय आणि व्यापारी संबंध वृद्धिंगत होऊन एक नवीन अर्थप्रणाली उदयास येऊ घातली होती.

अशाप्रकारे जे वित्तीय व चलनविषयक जैन बदल घडत होते त्यामुळे मुगल अर्थव्यवस्थेत एक नवीन मापदंड निर्माण होत होता व जुन्या प्रकारच्या चलन पद्धीतीत बदल होऊन एक नवीन दर्जेदार चलन प्रणाली उदयास येत होती. छोटेमोठे व्यवहार चांदी (आना) व तांब्याच्या चलनाच्या माध्यमातून होत असत. जेव्हा वस्तूंची किंमत तांब्याच्या नाण्यांपेक्षा कमी असे तेव्हा बंगाल, बिहार व ओरिसामध्ये कवड्या तर गुजरातमध्ये कडू बदाम स्विकारले जात. कवड्या इराणमधून तर कडू बदाम मालदीव मधून भारताच्या किनारी भागात मुबलक प्रमाणात उपलब्ध होत असत परंतु त्यांना देशाच्या अंतर्गत व मधील ग्रामीण भागांमध्ये मोठी मागणी असे. वस्तूंची एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणची देवाणघेवाण व त्याचा चलनरूपी मोबदला याला मुगल अर्थव्यवस्थेतील पतपुरवठ्याचे पाठबळ मिळत असे. विविध वस्तूंचा व्यापार करणाऱ्या व्यापाऱ्यांना पैशाच्या स्वरूपात दिले जाणारे कर्ज हा आर्थिक वाणिज्याचा महत्वाचा भाग होता. मुगल काळात वस्तूंच्या विक्री झालेल्या रक्कमेतून व्याजाची रक्कम वजा करून नफा मोजला जात असे. कुठल्याही धार्मिक तत्वांचा अडथळा न येता आर्थिक व्यवहार सुरळीतपणे चालावेत म्हणून पैशाच्या स्वरूपात कर्जपुरवठा करण्यावर भर दिला गेला असावा. कर्जपुरवठ्याची मागणी व कर्जावर व्याज घेण्याची मुभा असल्यामुळे एकंदरीतच पतपुरवठा करण्याची मागणी मोठ्या प्रमाणात होत असे व हा व्यवसाय एक महत्वाचा व्यवसाय होता. प्रमुख व्यापारी केंद्रांच्या ठिकाणी कर्जपुरवठ्यात सराफ मंडळी आघाडीवर असत व ते मागणीनुसार लघू वा दीर्घ मुदतीचे कर्ज देत असत. व्यापारी, सावकार व दलाल यांना एकत्र आणण्याच्या जाळ्याचे सुरेख वर्णन फ्रेंच व्यापारी रोकस याने केलेले निदर्शनास येते.

रोकस ने दिलेली माहिती एकंदरीतच वाणीज्य व पतपुरवठा तसेच वस्तूंच्या व्यापारात सराफ देत असलेले आर्थिक सहाय्य यांचा परस्पर संबंध समजण्यास मदत होते. सुरत व आग्रासारख्या प्रमुख व्यापारी केंद्रांमध्ये असलेल्या टांकसाळी व सोनं-चांदीच्या बाजारपेठांवरून सराफांचे एकंदरीत वर्चस्व व प्रभाव लक्षात येतो व ही ठिकाणे म्हणजे शहरांतील व्यापारविषयक बाबींची मुख्य ठिकाणे असत. लहान शहरे व गावांच्या बाबतीत व काहीवेळा मोठ्या शहरांच्या बाबतीत देखील जेथे वाणिज्य-व्यापार व कर्जपुरवठा यातील भेद फार कमी होता तेथे महाजन आणि सावकार मंडळी वैयक्तिक व व्यापारी कारणांसाठी व इतर लोकांना देखील कर्जपुरवठा करत असत. महाजन हे सामान्यपणे धान्याचे व्यापारी असत जे शेतकऱ्यांना व ग्रामीण भागातील उच्चभ्रू व नामांकित व्यक्तींना कर्जपुरवठा करत असत. त्यामुळे महाजनांचा तत्कालीन कागदपत्रांमध्ये इतर व्यापाऱ्यांपेक्षा वेगळा उल्लेख व

वर्गीकरण येते. काही साधनांमध्ये महाजनांचा उल्लेख कर्जाची परतफेड न करू शकणाऱ्या कर्जदारांनी गहाण ठेवलेल्या वस्तूंची विक्री करणारे म्हणून देखील उल्लेख येतो. महाजन शेतकऱ्यांना पिक घेण्यासाठी तसेच कर भरण्यासाठी अर्थपुरवठा करत असत. तसेच मनसबदारांना कर्ज देत असत.

**आपली प्रगती तपासा**

१) मध्ययुगीन भारतातील वित्त वा चलन अभिसरणावर भाष्य करा.

-----------------------------------------------------------------------------------------------

-----------------------------------------------------------------------------------------------

## १३.४ मध्ययुगीन भारतातील बॅंकिंग प्रणाली

वस्तूंची देवाणघेवाण व पैशाची वाढती मागणी यामुळे पतपुरवठा करण्यासाठी लागणाऱ्या स्त्रोतांवर ताण पडत असे. पतपुरवठ्याचे किचकट कालचक्र व सावकारांचे कर्जपुरवठ्याचे वेगवेगळे प्रकार यामुळे या क्षेत्रातील उलाढालीचे प्रमाण व त्यांच्याकडे येणारे वेगवेगळ्या प्रकारचे भांडवल सांगणे कठीण जाते. अज्ञात स्त्रोत व स्वनिर्मित हे भांडवल म्हणजे हे व्याज रूपाने मिळविलेला नफा होता व तो आरक्षित रक्कमेत जमा केला जात असे. चलन वा पैशाच्या बाजारपेठेबाहेर निर्माण झालेले भांडवल देखील रोजच्या वापराचे, कर्जपुरवठ्याचे व एकंदरीतच पतपुरवठ्याचे स्त्रोत होते. मुगल काळात दोन प्रकारे रोखीच्या ठेवी स्विकारल्या जात. एक म्हणजे हुंडी व दुसरे म्हणजे व्यक्ती, व्यापारी वर्ग व सरकारी अधिकाऱ्यांकडून स्विकारल्या जाणाऱ्या मागणी स्वरूपातील ठेवी होत. मागणीनुसार थेट ठेवी काढून घेण्याचे एक उदाहरण आग्रा येथून आढळून येते. येथे विविध कर्जदारांनी ठेवलेल्या ठेवी पैशाची मागणी आल्याने काढून घेतलेले आढळते. वेगळ्या प्रकारे नोंदविलेला ठेवी व कर्ज यांच्या व्याजातील फरक म्हणजे पतपुरवठा करणाऱ्यांचा नफा असे.

वैयक्तिक भांडवला व्यतिरिक्त राज्याच्या खजान्यातील आरक्षित पैसा देखील सराफांकडे ठेवी म्हणून ठेवला जात असे. १६२३ मध्ये राजपुत्र खुर्रम याने आपला खजाना मांडू येथे पाठविला होता तसेच अहमदाबादच्या सराफांना त्या शहरातील पैशाचा वा चलनाचा झालेला तुटवडा कमी करण्यासाठी पैसा पुरविण्यास सांगितले होते. असे वाटते की, खजाना अगोदर सराफांकडे ठेव म्हणून ठेवण्यात आला ज्याचा वापर त्यांनी व्याजाने पतपुरवठा करण्यासाठी केला. त्यानंतर खजाना जेव्हा मांडूला हलविण्याचे ठरवले गेले तेव्हा सराफांनी आपल्या कर्जाची वसूली केली व त्यामुळे अहमदाबादमध्ये चलनाची करतरता भासली वा तुटवडा निर्माण झाला.

महाजन देखील व्यापाऱ्यांकडून व राज्याच्या अधिकाऱ्यांकडून ठेवी स्विकारत असत अशाप्रकारच्या व्यवहारांचा संदर्भ राजस्थानातून पाठविलेल्या अहवालामध्ये आढळतो. मुघलांचे महसूल गोळा करणारे अधिकारी अनेकदा वैयक्तिक फायद्यासाठी रोखीची रक्कम राज्याच्या खजान्यात जमा करण्याऐवजी महाजनांना देत असत या पद्धतीला राज्याने लबाडी म्हटले होते. अशाच प्रकारच्या एका घटनेमध्ये अमीन, कारोरी व फोतेदार या

महसूल अधिकाऱ्यांनी महसूलाच्या नोंदी मध्ये फेरफार करून व्याज मिळविण्यासाठी महाजनांना पैसा दिल्याचे निदर्शनास येते. अशाप्रकारच्या ठेवी व महाजनांचे वस्तूंच्या व्यापारातून उभे केलेले वैयक्तिक भांडवल त्यांच्या पतपुरवठ्यासाठी वापरले जात असे.

पतपुरवठा करण्यासाठी लागणारे भांडवल उभे करण्यासाठी हुंडीच्या स्वरूपातील अल्पकालीन ठेवी होत. वाहतूकीत असलेला धोका टाळण्यासाठी व्यापारी हुंडीच्या बदल्यात पतपुरवठादारांकडे रोख रक्कम जमा करत असत. इंग्रज व डच व्यापारी आपल्या व्यवहारांसाठी व त्यांच्या क्षेत्रांतील गुंतवणूकींसाठी भांडवल पुरवठा करण्यासाठी हुंडीचा मार्ग सर्रासपणे अवलंबत असत.

राज्याचे स्त्रोत केंद्रीय खजीन्यात जमा करण्यासाठीच्या व तेथून राज्यभरातील विविध खजान्यांमध्ये पिठविण्याच्या एकंदरीतच प्रक्रियेवर सराफांच्या हुंडींचा परिणाम होत असे. हुंडीच्या स्वरूपात जॉन ऑफ जुल्फाच्या पन्नास रूपयांचा तर पाटण्याच्या प्रांताधिकाऱ्याने आग्र्याला पाठविलेले तीन लाख रूपये व अकबराने दख्खनेत पाठविलेल्या रक्कमेचा भरणा झालेला आढळतो. जरी सराफ मोठ्या रक्कमांचा भरणा करण्यासाठी वा करून घेण्यासाठी सक्षम असले तरी हे प्रयत्न अपुरे पडत असत व राज्याला सैनिकी संरक्षणात खजाना एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी न्यावा लागत असे. आपल्या असे निदर्शनास येते की, पतपुरवठादारांकडे थेट ठेवींच्या स्वरूपात व व्यापाऱ्यांकडून हुंडीच्या स्वरूपात येणारी रक्कम व पतपुरवठा वा अर्ज म्हणून दिलेली रक्कम जूळत असे. ज्याप्रकारे व्यापारी पतपुरवठादाऱ्यांच्या हुंडी वित्तप्रेषणासाठी वापरत असत त्याचप्रमाणे पतपुरवठादारदेखील कर्ज घेण्यास लायक असलेल्या व्यक्तींनी दिलेल्या हुंडी स्विकारत असत. हे दोन गोष्टींसाठी केले जात असे, एक म्हणजे अल्प मुदतीचे अर्ज देण्यासाठी व त्यांच्या स्वतःच्या पैशाचे हस्तांतरण करण्यासाठी. दुसरे म्हणजे ज्या व्यक्तींचे त्यांच्याकडे खाते आहे त्यांच्या वतीने रक्कमेचा भरणा करण्यासाठी. येथे पहिल्या प्रकारच्या हुंडीच्या नेमके उलट क्रमाने कर्जाचा ओघ असे. व्यापाऱ्यांनी कर्ज घेण्यासाठी अशा हुंडींचा वापर केल्याची अनेक उदाहरणे आहेत. या दोन्ही प्रकारच्या हुंडीं रोख रक्कमेचे पतपुरवठ्यासाठी एका व्यक्तीकडून दुसऱ्या व्यक्तीकडे व एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी हस्तांतरण करण्याचे काम परिणामकारकरित्या करत असत.

जेव्हा या हुंडींमध्ये एखाद्या विशिष्ट व्यक्तीला एका विशिष्ट वेळेत मागणीनुसार एखादी रक्कम देण्याचा तपशील असेल त्यानुसार कर्जाचे रूपांतर तेवढ्या रक्कमेच्या चलनात वा रोखीत केले जात असे. परंतु जर हुंडीची रक्कम हुंडी ज्याच्याकडे असेल त्याला देय असेल तर पतपुरवठ्याचे रोखीत रूपांतर करण्यासाठी वेळ आणि ठिकाणाचे बंधन नसे. ग्राहक ही हुंडी किंमत अदा करण्यासाठी, कर्जाची परतफेड करण्यासाठी तसेच रोख रक्कम स्विकारण्यासाठी करू शकत असे. अशाप्रकारे निर्माण होणारा पतपुरवठा निव्वळ आर्थिक कारणासाठी होत असे व चलनाचे अभिसरण वाढण्यासाठी मदत होत असे. हुंडीसाठी ठेवी रूपात असलेली रक्कम पतपुरवठादार पतपुरवठ्यासाठी करत असत तसेच त्याला अनुसरून असणारे दावे इतर व्यवहारांसाठी वापरले जात.

एखाद्या विश्वासघातकी मुगल राजपुत्राने आपल्या कर्जाची परतफेड केली नसेल तर अशा हुंडींबाबत चर्चा होताना तत्सम हुंडी विकत घेणाऱ्या ग्राहकाच्या हिताचे रक्षण केले जाई.

प्रत्येक हुंडीची खरेदी व विक्री ठरलेल्या विनिमय दरानुसार होत असे. हा विनिमय दर हुंडीचा वापर तसेच पतपुरवठ्याची मागणी इत्यादी घटकांवर अवलंबून असे. परंतु याबाबतची सर्वात महत्वाची बाब म्हणजे हुंडी ज्या ज्या ठिकाणी जाईल तेथील रोख रक्कमेची जेवढी शिल्लक असेल त्यावर अवलंबून असे. सुरत, अहमदाबाद व आग्रा येथे तत्सम वेळी असणाऱ्या दरांची तुलना करून हुंडींचे आर्थिक मुल्यमापन केले जात असे. यामागचे कारण असे होते की, सुरत येथे परकिय सोने चांदी येत असे व व्यापाऱ्यांना अंतर्गत भागांमध्ये गुंतवणूक करण्यासाठी वित्तप्रेषण वा पैसा पुरवावा लागत असे. आग्रा हे ठिकाण वस्तूंची प्राथमिक बाजारपेठ असलेले ठिकाण होते त्यामुळे तेथे गुंतवणूकीसाठी भांडवल लागत असे. सतराव्या शतकापर्यंत अहमदाबाद ऐवजी सुरत हे शहर सोने चांदीची बाजारपेठ, टांकसाळीचे ठिकाण व नवीन चलनाचा पुरवठा करणारे शहर म्हणून पुढे आले होते. अशाप्रकारे अहमदाबादचे व्यापारी सुरतमधील पैसा आग्र्यास हस्तांतरीत करण्याच्या व तत्सम व्यवहारांमध्ये सक्रिय असत.

अशाप्रकारे हुंडीचे व्यवहार प्रामुख्याने व्यापारी संबंधांवर अवलंबून असल्यामुळे याचे रूपांतर एखाद्या ठिकाणी पैसा एकवटण्यात तर दुसऱ्या ठिकाणी पैशाच्या मागणीत होत असे. ही पद्धती सुरळीतपणे चालण्यासाठी पतपुरवठादारांना एके ठिकाणी मिळालेली रक्कम व त्याच ठिकाणी त्यांनी केलेला पतपुरवठा वा कर्ज यात समतोल ठेवणे आवश्यक होते. हे जाळे फार मोठे असल्यामुळे त्यांना समतोल राखण्यासाठी अनेकदा रोख रक्कम ठेवावी लागत असे. ही बाब अंशतः साध्य करण्यासाठी व्यापाऱ्यांना हुंडी विकत घेण्यासाठी वा विकण्यासाठी भाग पाडण्यासाठी जर पैसा सोन्याच्या स्वरूपात असेल तर संदेशवाहकासोबत पाठवून व चांदीत असेल तर बैलगाड्यांवर लादून तत्सम ठिकाणी पाठवून विनिमय दरात योग्य तो बदल केला जात असे.

प्रांतीय व्याजदरावरून मुगल साम्राज्याचे विभाजन दोन व्यापारी भागांत होत असे. सुरत, अहमदाबाद व आग्रा येथे समान व्याजदर असे व दुसरा भाग म्हणजे बंगाल व गोलकोंडा होय. आपणास येथे एक मुद्दा लक्षात घेतला पाहिजे की, दुसऱ्या गटात पहिल्या गटाच्या तुलनेत व्याजदर जास्त होता. आपण व्याजदरांचे बारकाईने निरिक्षण केल्यास असे लक्षात येते की, दीर्घकालापर्यंत व्याजदर स्थिर होता तर सतराव्या शतकाच्या मध्यापर्यंत तो खाली आला होता. आपल्याला भारतात व्यापार करणाऱ्या युरोपियन व्यापाऱ्यांच्या पत्रव्यव्हारावरून अल्पकाळात व्याजदरावर चलनाचा वा पैशाचा प्रभाव पडत असे.

पतपुवठ्यासाठी एक ठराविक मागणी असल्यावर चलनाच्या वा पैशाच्या पुरवठ्यावर व्याजदर अवलंबून असे. व्यजदरावर परिणाम करणारा अजून एक घटक म्हणजे नफ्याचा पतपुरवठ्यासाठी असलेली बिनशर्त मागणी याच्याशी असलेला संबंध होय. औद्योगिकीकरण होण्याच्या पूर्वीच्या अर्थव्यवस्थांमध्ये याचा अर्थ कमी दराने विकत घेणे आणि चढ्या दराने विक्री केल्यानंतर जास्त नफा व पतपुरवठ्यासाठी जास्त मागणी व जास्त व्याजदर असा होता. त्याही काळात अल्प वेळेत किंमतीमध्ये झालेल्या बदलांचा व्यापाऱ्यांनी घेतलेल्या फायद्याची उदाहरणे आहेत.

अशाप्रकारे मुगल काळात वित्तीय तसेच इतर ठोस घटक बाजारपेठेच्या अर्थव्यवस्थेत कार्यरत असत व त्याचा कर्जाच्या दरावर प्रभाव पडत असे. जर आपण असे गृहित धरले

की, सतराव्या शतकाच्या आसपास व्याजदरात होणाऱ्या घटीचे कारण चलन पुरवठ्यात होणारी वाढ हे होते, त्याबाबतचे बरेच गुणात्मक व संख्यात्मक पुरावे आहेत, तर याला कारणीभूत घटक म्हणजे ठेवींच्या स्वरूपात एकवटलेले पतपुरवठा भांडवल आणि इतर मार्गांनी निर्माण झालेला देखील नफा हा होय.

पतपुरवठादार संपूर्णपणे स्थानिक व परकीय चलन अदलाबदलीचा व्यवहार हाताळत असत, तसेच परकीय सोनं चांदी खरेदीवर त्यांची जवळ जवळ मक्तेदारी होती. ही मक्तेदारी टांकसाळीला सोनं चांदी पुरवठा करण्याचा संपूर्ण अधिकार असलेला सराफांच्या निर्माण झालेल्या वर्गामुळे प्रामुख्याने सतराव्या शतकाच्या उत्तरार्धात बळावलेली दिसते. मधल्या काळात हुंडींच्या वाढत्या वापरामुळे पतपुरवठादारांच्या नफ्यात मोठ्या प्रमाणात वाढ झालेली दिसते. ते सागरी तसेच जमीनीवरील व्यापाऱ्यांचा विमा उतरवत असत व मोठ्या प्रमाणात विम्याची रक्कम घेत असत संक्रमणात असलेले भांडवल व मालाला संरक्षण देऊन त्याबदल्यात व्यापाऱ्यांनी घेतलेल्या कर्जावर तसेच व्यवहारातील पतपुरवठ्यावर मोठ्या प्रमाणात व्याजदर घेत असत. प्रांतीय स्तरावर बंगालमध्ये गुजरात व आग्र्यपेक्षा व्याजदर जास्त असतं. जर आपण असे स्विकारले की, वित्तीय वा चलनाशी संबंध घटक व्याजदरावर प्रभाव टाकत असत तर गुजरात व आग्र्याच्या तुलनेत बंगालमध्ये कमी प्रमाणात होणारा चलन पुरवठा हे यामागचे कारण असावे. परकीय सोनं चांदीची उपलब्धता दिल्ली, आग्रा व पाटण्याच्या तुलनेत बंगालमध्ये कमी प्रमाणात होत असे. तसेच बंगालमधील पैसा आग्रा, दिल्ली व गुजरातकडे अतिरिक्त महसूलाच्या स्वरूपात वर्ग केला जात असे. तसेच मुगल सरदारांनी तसेच अनिवासी व्यापाऱ्यांनी पाठविलेल्या स्वरूपात देखील तेथून पैसा बाहेर येत असे. अशाप्रकारे त्याकाळात बंगालच्या वित्तीय समभागावर आग्रा व गुजरातच्या तुलनेत जास्त भार असे.

जर भांडवलाचा तुटवड्याचा संबंध जर जास्त प्रमाणात असलेला व्याजदराशी संबंध जोडला तर सतराव्या शतकाच्या उत्तरार्धात कमी झालेल्या व्याजदराचे आपण स्पष्टीकरण देऊ शकतो. या काळात युरोपमधून येणाऱ्या सोन्या चांदीच्या पुरवठ्यात नाट्यमयरित्या वाढ झालेली आढळते त्यासोबतच व्यापारात वृद्धी झाली असावी. व्यापारात झालेल्या वृद्धीचा फायदा व्यापारी वर्गाने तर उठवलाच परंतु चलन वा पैशाची अदलाबदली करणाऱ्यांनी व पतपुरवठादारांना यांचा प्रकर्षाने फायदा झाला, ज्यांचा नफा पैशाच्या व पतपुरवठ्याच्या व्यवहारात मोठ्या प्रमाणात वृद्धी झाल्याने भरपूर वाढ झाली. जर हीच बाब बंगालच्या बाबतीत खरी असली तर गुजरात व आग्र्यामध्ये झालेल्या वाढीचा एकमेकांशी संबंध जोडता येतो.

वेगळा चलन विभाग असल्यामुळे कोरोमंडल म्हणजेच पूर्व किनारपट्टीचा भाग रोचक ठरतो. तसेच खंडणीमुळे गोवळकोंड्याच्या व्याजदरावर विरूद्ध परिणाम तसेच तेथील चलन पद्धतीवरदेखील दुहेरी परिणाम झालेला आढळतो. पुर्व किनारा तसेच गोवळकोंड्यामध्ये व्याजदर जास्त होता जो १६४० च्या दशकात कमी झाला, नंतर पुन्हा त्यात वाढ झाली व १६७० च्या दशकात परत एकदा घट झाली. गोवळकोंडा याची चलन व्यवस्था वा पद्धती सोन्यावर आधारित होती व परदेशातून जी काही चांदी थोड्याफार प्रमाणात येत असे तिचा उपयोग रूपया हे चलन असलेल्या मुगल प्रांतांतील वस्तूंची आयात कलण्यासाठी केला जात असे.

१६३५ मध्ये शहाजहान नें दख्खनेतील राजवटींविरूद्धच्या मोहिमेचे नेतृत्व केले. याचा परिणाम गोवळकोंडा व मुगल साम्राज्यात खंडणीचे संबंध प्रस्थापित होण्यात झाला. या मोहिमेनंतर झालेल्या तहानुसार गोवळकोंडा राज्याने मुगल सम्राटाला वार्षिक खंडणी द्यावी तसेच त्यांचे चलन मुगल सम्राटाच्या नावाने जारी करावे असे ठरले. १६६० च्या दशकापर्यंत खंडणी रूपयाच्या स्वरूपात घेण्याची गरज भासल्यामुळे व गोवळकोंड्यात चांदीच्या टांकसाळीचे निर्माण झाल्यामुळे त्या प्रांतात चांदीच्या अभिसरणाला चालना देण्यात आली. गोवळकोंड्यात रूपया हे चलन सुरू केल्यामुळे चांदीच्या आयातदारांना यांचा फायदा झाला ज्यामुळे त्यांना स्थानिक पातळीवर नाणी मिळविण्यात तसेच त्यांचा वापर निर्यातीसाठी लागणाऱ्या वस्तू खरेदी करण्यास झाला. तसेच गोवळकोंडा, औरंगाबाद व गुजरातदरम्यान त्रीधातुयीय हुंडी व पैशाच्या व्यवहारात वाढ झाली. औरंगाबाद ही मुघलांच्या दख्खनच्या सुभ्याची वा प्रांताची राजधानी होती. पूर्व किनाऱ्यावरील फतपुरवठादार राज्याकडून प्राप्त झालेली सुवर्णरूपी  रक्कम युरोपियन व्यापाऱ्यांना देत असत व त्यांच्याकडून सुरतमध्ये चांदीच्या स्वरूपात रक्कम स्विकारत असत व ती रक्कम गोवळकोंड्याच्या गरजा भागविण्यासाठी औरंगाबादकडे वर्ग केली जात असे. यामुळे सुरत येथील चांदीचा पुरवठा व पुर्व किनाऱ्यावरील पतपुरवठ्याचे प्रमाण यांच्यात थेट संबंध प्रस्थापित झाला तसेच गोवळकोंड्याला किनारी भागांमध्ये स्पर्धात्मक चलनाची वाढ रोखण्यास मदत झाली.

१६३५ नंतर लागलीच गोवळकोंड्याच्या अर्थव्यवस्था चांदीधिष्ठीत मोठ्या चळवळीचा मोठा भाग बनली असेल तर १६४० पूर्वी तेथील व्याजदर का जास्त होते व त्यानंतर ते कमी का झाले यांचे उत्तर वा स्पष्टीकरण आपणास मिळते. गुजरात व गोवळकोंड्यात चांदीच्या अभिसरणात झालेल्या वाढीमुळे एकंदरीतच पैशाच्या प्रमाणात वाढ होण्यास सोन्याच्या चलनात वृद्धी न होताही मदत झाली. आंतरप्रांतीय व कालबाधित व्याजदरात होणाऱ्या बदलांचे विश्लेषण केल्यास सतराव्या शतकातील भारतीय अर्थव्यवस्थेच्या व्याजदरात वाढत्या चलन पुरवठ्यामुळे  झालेली घट स्पष्ट करता येते. असेही लक्षात येते की, परकीय व्यापारात झालेली वृद्धी व तोटा यांचा परिणाम चलन व पतपुरवठ्यावर होत असे. तसेच चलन तुटवड्यामुळे वस्तुंच्या किंमतीत तात्काळ वाढ होत असे व विक्री व नफ्यात घट होत असे. तसेच पतपुरवठा यात झालेली घट व व्यापारासाठी आवश्यक असलेल्या भांडवलात घट झाल्यास सुद्धा त्याचा परिणाम पैशावर वा चलनावर होत असे.

सतराव्या शतकात भांडवलाचे हस्तांतरण व रक्कम प्रदान करण्याच्या तंत्रामध्ये बऱ्याच प्रमाणात प्रगती झाल्याचे दिसते. पतपुरवठा करण्याच्या साधनांचे प्रमुख काम अस्तित्वात असलेल्या चलनाचे अधिक कार्यक्षमतेने अभिसरण करणे आणि जेव्हा चलन वा पैसा प्रत्यक्षपणे उपलब्ध नसल्यास त्याची कार्ये पार पाडणे हे होते. तसेच, पतपुरवठ्याची व्याप्ती व विस्तार धातूरूपी चलनाच्या उपलब्धतेच्या प्रमाणावर देखील अवलंबून असे. जेव्हा व्यापारी भांडवलाच्या मागणीपेक्षा चलनाचा पुरवठा वा अभिसरण वाढत असे तेव्हा व्याजदरात घट होत असे. पतपुरवठ्याचे मूल्य कमी केल्यास व्यापारी गुंतवणूकीला त्याचा फायदा होत असे. तसेच चलनाच्या स्वरूपातील विनिमयाचे मापदंड रूंदावत असत.

**तुमची प्रगती तपासा**

१) मध्ययुगीन भारतातील पतपुरवठा व बॅकिंग प्रणालीचे परिक्षण करा.

-----------------------------------------------------------------------------------------------

-----------------------------------------------------------------------------------------------

## १३.५ सारांश

या घटकात आपण मध्ययुगीन भारतातील वित्त म्हणजेच चलन व पतपुरवठा वा बॅकिंग प्रणालीचा मागोवा घेण्याचा प्रयत्न केला. दिल्लीच्या सुलतानशाहीत व मुगल साम्राज्यात धातूच्या चलनाची पद्धती अस्तित्वात होती. राज्यामध्ये अनेक ठिकाणी तांबे, चांदी व सोन्याची नाणी पाडण्याच्या टांकसाळी होत्या. या काळात व्यापार व पतपुरवठ्यासाठी हुंडीचा वापर केला जात असे. कालानुरूप मध्ययुगीन काळातील चलन व बॅकिंग प्रणालीत बदल घडत गेलेले दिसतात. या बदलांसोबतच विविध प्रांतांच्या व्यापार पद्धतीत सुद्धा बदल झालेले दिसतात. बॅकिंग वा पतपरवठा प्रणालीचा फायदा विविध वस्तूंच्या उत्पादकांना तसेच व्यापाऱ्यांना देखील झालेला दिसतो. यामुळे त्यांना आपले उद्योगधंदे व व्यापार वाढविण्यासाठी अतिरिक्त भांडवल वा धनराशी देखील उपलब्ध झाल्याचे दिसते.

## १३.६ प्रश्न

१) दिल्लीच्या सुलतानशाहीतील वित्तव्यवस्थेच्या (चलनव्यवस्थेच्या) महत्वाची चर्चा करा.

२) मुघलकालीन चलनव्यवस्थेचा वृत्तांत द्या.

३) मध्ययुगीन काळातील बॅकिंग प्रणालीचे परिक्षण करा.

## १३.७ संदर्भ

१) गोरोन, स्टान व जे. पी. गोएंका, द कॉइन्स ऑफ दिल्ली सुलत्नेत, न्यू दिल्ली २००१

२) इरफान हबीब, द अॅग्रेरियन सिस्टम ऑफ मिडिवियल इंडिया

३) रे चौधरी टी. आणि इरफान हबीब, संपादित. द केंब्रिज इकॉनॉमिक हिस्ट्री ऑफ इंडिया, १२००-१७०० व्हाल्यूम १ (उ.प्र. १९८२)

४) चौधरी के. एन्., ट्रेड अॅड सिव्हीलायजेशन इन द इंडियन ओशन, न्यू दिल्ली, मुंशीलाल मनोहरलाल, १९८५.

५) चंद्रा. एस्. एसेज् ऑन मिडिवियल इंडियन हिस्ट्री, न्यू दिल्ली, ओयूपी, २००३

६) जॉन एफ्. रिचर्ड्स, संपादित द इंपिरियल सिस्टम ऑफ मिडिवियल इंडिया, ऑक्सफोर्ड युनिव्हर्सिटी प्रेस, दिल्ली १९८७

❄❄❄❄❄❄❄